महाराष्ट्र लोकसाहित्य प्रकाशन

# महाराष्ट्र लोकसाहित्य माला

## पुष्प दुसरें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
REFBK-0009415

महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणें.




महाराष्ट्र लोक साहित्य माला
महाराष्ट्र लोक साहित्य समिति, पुणें

महाराष्ट्र लोकसाहित्य प्रकाशन

# महाराष्ट्र लोकसाहित्य माला

## पुष्प दुसरें

REFBK-0009415

तीन रुपये

महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणें.

: प्रकाशक :

चिं. ग. कर्वे, अध्यक्ष

महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणें.

२०४ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति १९५७

: मुद्रक :

१ म. ना. चापेकर,

आर्यसंस्कृति मुद्रणालय, टिळकरस्ता, पुणें २.

[ नगरी लोकसाहित्य व संकीर्ण लोकसाहित्य ]

आणि

२ प्र. भा. काळे,

प्रतिभा मुद्रणालय, सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें २.

[ खानदेशी लोकसाहित्य, प्रस्तावना, निवेदन ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23060 दि.
क्रमांक 2700 नों. दि.

# समितीचें निवेदन

गुदस्तां, १९५६ च्या मार्च महिन्यांत, मुंबई राज्यसरकारनें समितीची स्थापना करून त्या महिना अखेर मजूर केलेल्या रकमेंतून समितीचें कार्य चालविण्याचा आदेश दिला. नंतर पुढील ( १९५६–५७ ) सालासाठीं मंजूरी आगष्ट महिन्यांत मिळाली. तेव्हां समितीची सभा घेऊन या सालांतील कामांची आंखणी केली. लोकसाहित्य जमाविणें हें एक काम चालू आहेच. व दुसरें, प्रकाशन करण्याचें काम कसें उरकलें याची कल्पना मालेच्या पहिल्या व दुसऱ्या पुस्तकावरून येईल. पहिल्या पुस्तकाला जी घाई झाली ती याला नाहीं, तेव्हां कांहीं योजना करून समितीच्या लोकसाहित्यांत मुरलेल्या सभासदांच्या मदतीनें जें प्रकाशन करतां आलें तें असें :

प्रस्तुत पुस्तकांत नगरी लोकसाहित्य, खानदेशी लोकसाहित्य, व संकीर्ण लोकसाहित्य असे तीन विभाग केले आहेत. या तीन विभागांतील मजकुराच्या निवडीचें काम अनुक्रमें श्रीमती दुर्गाबाई भागवत, प्रा. बोरसे, व डॉ. सरोजिनीबाई बाबर या तज्ज्ञ सभासदांकडे सोंपविलें होतें.

संकीर्ण लोकसाहित्यात, कोंकणी गीतात चकवे हा प्रकार दिला आहे. होळी लावण्यापूर्वी ‘ फाग ’ म्हणतात. फाग झाल्यानंतर होळीच्या भोंवतीं दांडकीं घेऊन खेळये नाचतात तेव्हां गण म्हणतात. तसेंच भात लावणीच्या वेळीं, भात झोडणीच्या वेळीं जे चकवे म्हणतात तेहि घेतले आहेत. एका-दशीचें कथात्मक गाणें, नागपचमीचें गाणें हीं नवीन आहेत. मराठवाड्यांतील सुप्रसिद्ध साहित्यिक व लोकसाहित्याचे अभ्यासू समाइक डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनीं आमच्या विनतीवरून ‘ जैन स्त्रियांच्या ओव्या ’ पाठविल्या. हा गीत-प्रकार इकडे नवीनच आहे. या तऱ्हेचें जैन मराठी वाङ्मय पुढें यावयास पाहिजे. तसेंच, पहिल्या पुस्तकांत दिल्याप्रमाणें हिंदुधर्मीयेतर मराठी वाङ्मय आवर्जून गोळा करून छापणें आपलें कर्तव्य आहे. या भागांत दक्षिण महाराष्ट्रांतील लोकसाहित्य–समाहिका विदुषी सौ. मालतीबाई दांडेकर यांनीं पाठविल्यापैकीं लग्नात जें रुखवत आणतात त्यासबंधीं एक व रामलंकेची कथा ’ हें वासुदेव–गाणें एवढींच दोन देतां आलीं. ख्यातनाम सव्यसाची साहित्यिक प

महादेवशास्त्री जोशी यांनी कृपया अज्ञात लिंगायत कवि कमलाकरसुत याचें ' गौरी स्वयंवर ' आमच्याकडे प्रसिद्धीला दिलें. त्यांची ' मल्हार मुरली ' हीहि नादमधुर आढळेल. लोककथेची उणीव राहू नये म्हणून डॉ. बाबर यांनी पांच कथा या भागांत गोविल्या आहेत.

नगरी लोकसाहित्य विभागांत कै. सुलोचनाबाई समर्थ यांच्या संग्रहांतील व अहमदनगर कॉलेजांतील विद्यार्थी–विद्यार्थिनींनीं जमविलेली निवडक लोकगीतें दिलीं आहेत. त्यांत कांहीं वेगळे प्रकार आढळतील; उदा० ' वेरुळच्या लेण्यावर ' हा जरा वेगळा प्रकार आहे. तसेंच सकाळपासून रात्रीं निजेपर्यंत नित्यकर्मे करतांना स्त्रिया जीं स्तोत्रें व कवनें म्हणतात तीं सर्व ' दिनक्रम ' या प्रकारांत दिलीं आहेत. गवळी लोकांत म्हैस व्याल्यानंतर लोकांना जेवण देण्याची पद्धत आहे, जेवण देण्यापूर्वी पुरुष दळण दळतात व त्या पिठाचें जेवण ते आपल्या जातीला देतात. तेव्हां दळतांना ते ज्या ओव्या म्हणतात त्या यांत सांपडतील. तसेंच, नाथपंथी दंतकथा व म्हणी श्रीमंत सरदार ग. ना. ऊर्फ आबासाहेब मुजुमदार यांनी यांत ज्या संग्रहित केल्या आहेत त्यांचें महत्त्व भाषाशास्त्र व समाजशास्त्र यांच्या दृष्टीनें फार आहे.

खानदेशी लोकसाहित्य या भागात, सीतेचा वनवास, जनाबाई, भाऊबीज वगैरेवर ओव्या आहेत; व बागलाणी व अहिराणी गीतें दिलीं आहेत. लग्न झाल्यानंतर मुलीला सासरीं पाठविण्याच्या अगोदर ' साडा ' हा विधि करतात. त्यावेळीं स्त्रिया जें गाणें म्हणतात तें यांत घेतलें आहे. त्याचप्रमाणें वृक्षकथा, स्थलकथा, पौराणिक दंतकथा, सामान्यकथा असे निरनिराळे लोककथा–प्रकाराचे नमुने दिले आहेत. ललितप्रमाणेंच ' बोहाडे ' म्हणून लोकनाट्य–प्रकार या भागांत दिला आहे, त्याकडे अभ्यासकांचें लक्ष जावें अशी अपेक्षा आहे.

समितीनें एक सुंदर ग्रंथसंग्रह ठेवून त्यांत लोकसाहित्यावरचें निरनिराळ्या भाषांतीलहि वाङ्मय संग्रहित केलें आहे व या संग्रहांत भर पडत आहे. हा ग्रंथसंग्रह लोकसाहित्याच्या अभ्यासकांना नमुनेदार व उपयुक्त वाटेल असाच आहे.

समितीच्या टेप–रेकॉर्डवर डॉ. बाबर यांनीं बरींच गाणीं उद्धृत केलीं असून, कॅमेरानें कांहीं विशेष प्रसंगांचे फोटोहि घेतले आहेत.

आतां विशाल मुंबईराज्य झाल्यानें समितीच्या कार्याचा व्यापहि वाढणार आहे. विदर्भ आणि मराठवाडा या प्रादेशिक विभागांत अमाप लोकसाहित्य

पडलें आहे व नांवाजलेले अभ्यासूहि तिकडे आहेत. तेव्हां त्यांच्या सहकार्यानें या लोकसाहित्य विषयाला संकलन–प्रकाशनाबाबत मोठी चालना मिळावी अशी आशा वाटते.

मुंबईराज्य सरकारच्या शिक्षणखात्याचें या जुन्या लोकसाहित्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याकडे विशेष लक्ष गेलें आहे हें पाहून मोठा आनंद वाटतो. कोणीहि व्यासंगी विद्वान्, संशोधक, व साहित्यिक यासंबधीं धन्योद्गारच काढील, समितीचीहि यांत साथ आहे. मागच्याप्रमाणेंच समितीचे चिटणीस ( पुणें जिल्हा शिक्षणाधिकारी ) श्री. बा. रा. कोल्हटकर यांनीं अनेक निकडीचीं कामें मागें असतानाहि वेळोवेळीं सहकार्य दिलें याबद्दल मी समितीतर्फें त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

ज्या संग्राहकांनीं आपलें संकलन आमच्याकडे पाठविलें व त्वरित सहकार्य दिलें त्यांचेहि आभार मानतों. तसेंच, समितीच्या सभासदांनी आपला कितीतरी वेळ समितीच्या कामांत खर्चिला याबद्दल त्यांचे आभार मानणें–केवळ उपचार म्हणून नव्हे–कर्तव्य आहे यांत शंका नाहीं त्यांच्या बळावरच समिति थोड्या अवधींत एवढें भरीव कार्य करू शकली. तेव्हां शेवटीं त्यांच्या ऋणाची जाणीव ठेवून, हें निवेदन पुरें करतों.

चिं. ग. कर्वे,
अध्यक्ष
महाराष्ट्र लोकसाहित्य समिति

मुंबईराज्य सरकारनें नियुक्त केलेली

# महाराष्ट्र लोकसाहित्य समिति

## पुणें

★

उद्देश

महाराष्ट्रांतील जुनें लोकसाहित्य जमा करणें व तें वेळोवेळीं प्रसिद्ध करणें

### पदाधिकारी मंडळ

अध्यक्ष

श्री. चिंतामण गणेश कर्वे, पुणें

चिटणीस

पुणें जिल्हा शिक्षणाधिकारी, पुणें

सभासद

कु. दुर्गाबाई भागवत, मुंबई.
डॉ. कु. सरोजिनीबाई बाबर, पुणें.
डॉ. कमलाबाई देशपांडे, पुणें.
श्री. सौ. अनसूयाबाई लिमये, पुणें.
प्रा. दा. गो. बोरसे, पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम २३०८० वि: ...
क्रमांक ... नों: दि: २९/३/५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. ८४९५

# मराठी लोकसाहित्यावरील कांहीं टिपणें

## (१) ओव्यांचें संकलन व अभ्यास

महाराष्ट्राच्या लोकसाहित्याचा सामग्र्यानें विचार करणें, अभ्यासाची सिद्धता फार अल्प असल्यानें मला अजून तरी नीट जमलेलें नाहीं. कारण, ज्या ज्या क्षेत्रांत पदार्पण करावें तिथें वरवर वरीचशी उकराउकर झालेली दिसली तरी अजून अनेक प्रथांचें, गीतांचें, कथांचें मूळ नक्की कुठें आहे हें सांगणें तर राहोच, पण साधारणपणें त्या त्या विषयाची सर्वांगसिद्ध अशी मांडणी देखील केल्याचें आढळणें विरळा आहे. केवळ संग्रहाच्या दृष्टीनें पाहिलें, तर ओव्यांचा संग्रह निश्चित बऱ्यापैकीं म्हणतां येईल. कारण लोक-साहित्याचा हा प्रकार विपुल प्रमाणांत उपलब्ध आहे, म्हणजे अजूनहि त्याची लोकप्रियता टिकून राहिलेली आहे परंतु हें झालें वरवरचें दर्शन. ओव्यांचा संग्रह जो अनेक लेखकांनीं संपन्न केला आहे, त्यांत बहुसंख्य ओव्या जात्यावरच्या असून त्यांत कौटुंबिक जिव्हाळ्याला पहिलें स्थान दिलेलें आहे. नंतर कथात्मक विषय येतात. त्यांत पुराणकथांना विशेष महत्त्व आहे. या पुराणकथा संस्कृत पुराणांवरूनच उचललेल्या आहेत. त्यानंतर ज्ञानेश्वरापासूनच्या संतांचीं चरित्रें येतात, आणि आतां टिळक-गांधींवरहि ओव्या मिळतात. ही झाली बायकांच्या सार्वत्रिक ओव्यांची सध्यांची हकिगत. आतां गर्भाधानाच्या, झोंपाळ्यावरच्या ओव्या—तो विधि लुप्तप्राय झाल्यामुळें—लोप पावल्यासारख्या झाल्या आहेत. मुंजीच्या ओव्याहि तद्वतच आहेत. गर्भाधानाच्या ओव्या किंवा झोंपाळ्यावरील ओव्या अबादास गाडेकर यांच्या ‘ स्त्रीगीत मनोरंजिके’त (१८८५) काय त्या पाहायला मिळाल्या. मुंजीच्या ओव्या अहमदनगर, मराठवाडा व विदर्भ यांत काय त्या मिळू शकतात. गर्भाधानाचा विधि पांढरपेशांतच असल्यानें गीतांचा हा प्रकार मिळणें आतां दुरापास्त झालें आहे. त्यामुळें नेहमींच्या त्याच त्या ओव्या जमा करण्यापेक्षां कार्यकर्त्यांनीं असे प्रकार हुडकून काढण्याचें कार्य प्रथम केलें पाहिजे.

कथात्मक ओवींत अग्रेसर स्थान धनगरी ओव्यांचें आहे. आणि या प्रकाराचें वैशिष्ट्य असें कीं, हा प्रकार केवळ पुरुषांनीच जोपासलेला आहे. या ओव्यांचेहि दोन प्रकार आहेत. एक प्रकार म्हणजे शेळ्या रात्रीं शेतात बसवतात तेव्हा म्हणायच्या ओव्या. या प्रकाराचें प्रथम व अत्यंत बहुमोल संकलन श्री. मुडले यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध केलें. या ओव्यांत मल्हारी–मार्तंड, मगाई, वगैरे धनगरांच्या पर्यायानें दक्षिण महाराष्ट्रांतील ग्रामविभागात अजून पूज्य समजल्या गेलेल्या दैवतांचा भाग आहे. दुसरा भाग दसऱ्याच्या वेळीं माणदेशांत पदुबाईची जत्रा भरते, तुळजापूरची यात्रा होते, त्यावेळीं म्हटल्या जाणाऱ्या ओव्यांचा. या गायनाला धार्मिक महत्त्व असतें. तीं दैवतें जागृत करण्याचें कार्य त्याच्या करवीं होत असतें. या वेळीं पदुबाईच्या ओव्या म्हणतात. गंगा सुरावतीच्या ओव्या म्हणतात. बिरोबाच्या म्हणतात. वस्तुत' मुडल्यांनीं दिलेल्या ओव्यांत व मला मिळालेल्या ओव्यांत विषयाच्या दृष्टीनें मुळींच फरक नाहीं चौकशी करतांना हा ओव्यांचा साठा नेमकाच असल्यामुळें अमुक प्रसंगीं अमुक ओवी म्हणावी, अमुक प्रसंगीं अमुक असा समज असला, तरी गाती मंडळीदेखील ओव्यासारखीं नेमकींच असल्यानें कंठस्थ ओव्याच वारंवार घोळल्या जातात. आणि म्हणून पौराणिक ओव्या जरी धर्मकृत्याशीं संलग्न म्हणून पूज्य असल्या, तरी त्यांचाच वापर शेळ्या बसवण्याच्या वेळींहि करण्यांत येऊं लागला. मूळच्या शेळ्या बसवण्याच्या ओव्या अश्लील असत, रंगेल असत असें कांहीं वृद्ध धनगर म्हणाले. तेव्हां लोकपरंपरेंत जसें पावित्र्याचें अवगुंठन असलेल्या गीतांनीं केवळ ऐहिक अशा कर्मगीतांचें व्यवहारातून उच्चाटन केलें तसेंच धनगरी ओव्यांचें झालें आहे. कदाचित् आज प्रयत्न केला तर लावण्यांना चिकटून अजूनहि कर्मगीताचा वर्ग अस्तित्वांत असण्याचा संभव आहे. पण शिवराळ व लैंगिक लोकवाङ्मयावर भारतांत बहुसंख्य अभ्यासकांनीं बहिष्कारच टाकल्यासारखा आहे. तेव्हां असलें वाङ्मय समाजशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें असलें तरी त्याचें संकलन व त्याहूनहि प्रकाशन होणें दुरापास्त दिसतें

## ( २ ) ग्रामीण छंद व संगीत

रेकॉर्डिंगच्या सुलभतेमुळें ग्रामीण संगीताचा संग्रह करणें व त्याची जपणूक करणें शक्य व सुलभ झालें आहे, तरी पण या संगीताच्या अभ्यासास

अजून सुरुवातहि झालेली नाहीं. मराठी चालींचा अभ्यास फार कसोशीनें झाला पाहिजे. चालींचा अभ्यास म्हणजे केवळ गात्या गळ्याची गायकी नव्हे, तर त्यामागें मराठी मनाची असलेली अभिरुचि पण व्यक्त झाली पाहिजे. मीं एक म्हण ऐकली तिच्यात, 'संगीत उत्तरेकडे गेलें आणि संपन्न झालें, गुजरातेंत गेलें तें रडकें झालें, कर्नाटकांत गेलें आणि नाचरें झालें, आणि दख्खनमध्यें महाराष्ट्रांत मृत्यु पावलें!' असा आशय होता. हें वचन केव्हां व कधीं अस्तित्वांत आलें त्याची चौकशी करणें मला अद्याप जमलेलें नाहीं. कदाचित् या वचनांत चूक असण्याचाहि संभव आहे. पण पारंपरिक वचनें, भलींबुरीं, परस्परविरोधी असलीं तरी त्याची पुरती शहानिशा होऊन तीं खरींखोटीं ठरेपर्यंत त्याचा संग्रह व विचार होणें अगत्याचें असतें या वचनाला पूरक असें 'दख्खन हें संगीताचें थडगें आहे' असेंहि वचन मला कांहीं हिंदुस्तानी लोकांनी सांगितलें. दख्खनमध्यें दक्षिण महाराष्ट्राचा समावेश होतोच. तेव्हा मराठी लोकांची संगीताची अभिरुचि,' ही एक अभ्यसनीय वस्तु आहे असें मला वाटतें जयदेवानें गुर्जरीसारखे अनेक राग घेतले; पण त्यांत मराठी राग कुठेंच नाही. 'बृहद्देशी' या त्रिवेंद्रम् संस्कृत सीरीजच्या १३ व्या शतकांतल्या संगीतविषयक ग्रथांत ग्रामरागांवर एक प्रकरण आहे. त्यांत आभीरी व गुर्जरी वगैरे ग्रामपद्धति असून, हिंदोल राग हा या ग्रामपद्धतींवरच आधारलेला आहे असें विधान आहे. आभीरांचा मुलुख खानदेश आहेच मराठींत धनगरांचीं गाणीं वेधक आहेत गोपगीतें तर भारतभर आहेतच. चरवाहाची बांसरी व त्याचें संगीतप्रेम जगभर ज्ञात आहे. भारतहि त्याला अपवाद नाहीं. तेव्हां महाराष्ट्रातले अहीर, धनगर व गवळी यांच्या गीतांच्या चालींची परप्रांतांतील चालींशीं तुलना करून हिंदोल रागांत समाविष्ट झालेली मराठी संगीतरीति शोधून काढणें हें महाराष्ट्रांतल्या संगीततज्ज्ञांचें काम आहे. झोंपाळ्यावरच्या गाण्यांची प्रथा महाराष्ट्रांत चैत्रगौरी, नागपंचमी, गर्भाधान, डोहाळे यांच्या निमित्तानें चालू आहेच.

मराठी रागांबद्दल वर उल्लेखिलेल्या ग्रंथांत जरी कांहीं माहिती नसली तरी ओरिसांतल्या जुन्या वाङ्मयांत मरहठी राग १६ व्या शतकात मानला जात होता अशी माहिती आढळली बंगाल एशियाटिक जर्नलच्या १९२४ सालच्या अंकात ' On Some Maithili Dramas of the 17th and 18th

Centuries' या लेखांत मरहठी रागाचा उल्लेख बिहारांतील वाङ्मयांत आढळतो, असा उल्लेख आहे. मरहठी हा संगीतांतला एक राग आहे, पण तो आतां कुठल्या तें सांगतां येत नाहीं, ओळखतां येत नाहीं असें म्हटलें आहे. यावरून मराठी चालीदेखील स्वतंत्र व लोकप्रिय होत्या असें दिसून येतें.

ही झाली संगीताची भूमिका. मराठी छंदांचेंहि खोलवर परीक्षण होणें अगत्याचें आहे. कै. डॉ मा. त्र्यं. पटवर्धन यांनीं या बाबतींत पहिलें पाऊल टाकलें. त्यानंतर डॉ. ना. ग. जोशी यांनीं त्याच कल्पनांचा क्षेत्रविस्तार केला. श्री. श्रीराम अत्तरदे यांनीं या विषयांत अधिक व्यापक व खोलवर विचार केला आहे, असें त्यांच्या एकदोन लेखांवरून दिसून आलें. पण त्यांचा ग्रंथ अप्रकाशित असल्यानें त्याबद्दल कांहीं चर्चा करतां येत नाहीं. ओवीच्या रचनेबद्दल राजवाड्यांचे उडते उद्गार, पटवर्धन, डॉ. कमळाबाई देशपांडे व जोशी यांचीं विवेचनें उपलब्ध असलीं तरी ओवीच्या रचनेवरचें डॉ. नांदापूरकर यांचें गत सालीं ' छंद 'मध्यें आलेलें विवेचन अधिक परिपूर्ण आहे. या सर्व दीर्घकाल चाललेल्या प्रयोगांवरून व परिश्रमांवरून लौकिक छंदांचा व्यासंग किती कठिण व अल्पफलदायी आहे हें सहज दिसून येतें आणि म्हणूनच या अभ्यासाचें मोल अधिक आहे.

## ( २ ) ओनामासीधं

मराठी जुन्या पद्धतीनें शिकणाराला ' श्रीगणेशायनमः, ओनामा सिद्ध (सीध)' असा पहिला धडा शिकावा लागे नुकतेच श्री वासुदेवशास्त्री कोनकर यांनीं या वचनाकडे माझें लक्ष वेधलें. हा ' नमः सिद्ध ' चा मंत्र काय दर्शवतो ! हा जैनांपासून आम्हीं घेतला का ? हा जैनांकडून आला तर तो गणपतीला कसा चिकटला ? सिद्धाची पूजा, विद्येच्या आरंभीं करावी, तरच विद्या येतें असें का यांत सूचित केलें आहे ? एकटा गणपतीच पुरेसा नाहीं का ? असे अनेक प्रश्न त्यांच्या एका प्रश्नानें माझ्या मनांत उद्‌भवले. अजूनहि त्याचें समर्पक उत्तर मला मिळालेलें नाहीं. पण नुकताच ओरिसांत शिल्लक असलेल्या बौद्ध धर्माच्या कांहीं वाङ्मयीन व आचारमय अवशेषांचा परिचय झाला. सुप्रसिद्ध संशोधक नागेंद्रनाथ वसु यांचा ' मयूरभज ' ( Archaeological Survey ) मध्यें बाथुरी या अगदीं मागासलेल्या जातींतील महायान पंथांतील

काहीं तांत्रिक अवशेष त्यांनीं दिले आहेत. इतकेंच नव्हे तर 'सिद्धांत दिगंबर' या बौद्ध तत्रांत बाथुरींचा गायत्रीमंत्रहि दिलेला आढळतो. तो असा :—

ओं सिद्धदेवः सिद्धधर्मः वरेण्यमस्य धीमही ।
भर्गदेवो धीयो यो न सिद्धधुवो प्रचोदयात् ॥

वेदांतला गायत्रीमत्र बुद्धीला चालना देणारा आहे. तीच चालना येथें सिद्धाला म्हणजेच बुद्धाला लावलेली आहे. (जैनहि महावीराला सिद्धच म्हणतात. परंतु जैनांत तत्रवाङ्मय नाहीं.) तत्रवाङ्मय ही हिंदु व बौद्ध धर्मांचीच पैदास आहे. तेव्हां मला असें वाटतें कीं, बौद्ध तांत्रिक प्रथेतल्या सिद्धाच्या आवाहनाचें जसें सूर्याच्या आवाहनाशीं वरील गायत्रींत मीलन झालें, तसेंच वैदिकांच्या देवतांचें अशुद्ध का होईना पण 'सस्करण' व स्वीकार महायानी तांत्रिक बौद्धांनीं केला. 'ओनामासिद्ध' मध्येंहि गणेशनमनाशीं सिद्धनमनाची सांगड घातली गेलेली आहे 'सिद्ध' बुद्धीस चालना देणारा असल्यामुळें विद्येचा प्रारभ त्याच्यापासून होणें अशक्य नाहीं. तेव्हां माझें अनुमान असें आहे कीं, हा पहिला धडा तांत्रिक बौद्ध विशेषाचा एक अवशेष आहे. याला विकल्प नाथसप्रदायाचा आहे.

Nagendra Nath Vasu Mayurbhanj, Vol II, (Calcutta, 1911) p. cxxxiii.

## (४) मराठी लोकसाहित्यावरील इंग्रजी लिखाण

माझें या विषयावरील संकलन अजून पूर्ण झालेलें नसल्यामुळें उपलब्ध झालेल्या साहित्याचेंच थोडें सिंहावलोकन येथें केलेलें आहे.

ग्रंथनिष्पत्तिः--(१) महाराष्ट्रांतल्या कथांचा पहिला सग्रह--किंबहुना भारतीय कथांचा पहिला सग्रह मेरी फ्रियर हिचा 'Old Deccan Days' हा १८६८ सालीं प्रसिद्ध झाला. मुंबईचे त्यावेळचे राज्यपाल सर बार्टल् फ्रियर यांची कन्या मेरी. मेरीची दाई ॲना लिबर्टा डिसूझा हिनें मेरीचें मन रिझविण्यासाठीं चोवीस कथा सांगितल्या त्या मेरीनें लिहून प्रकाशित केल्या.

ॲनाचें घराणें मूळचें लिंगायत व कालिकतचें, पण १७९८ नंतर हें घराणें खडकीला आलें. ॲनाच्या घराण्याच्या दोन पिढ्या पुण्यासच गेलेल्या. ॲनाची आजी गोष्टी सांगण्यांत पटाईत होती हीच कला नातींत आली.

या पुस्तकाला सर बार्टल् यांनीं प्रस्तावना लिहिली. या पुस्तकाला युरोपमध्यें अमाप लोकप्रियता मिळाली. त्याच्या पांच आवृत्त्या निघाल्या पांचवी आवृत्ति १८९६ सालची आहे. जर्मन, हंगेरियन आणि डॅनिश भाषेंत त्याचीं भाषांतरें झाली. हिंदुस्थानींत व गुजरातींतहि झालीं. मराठींत पण झालें होतें, असा उल्लेख तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत आहे. पण तें मला पाहण्याला मिळालें नाहीं. या कथा फार चांगल्या आहेत. त्यांचा अनु–वाद मीं चार भागांत केला असून तो चित्रशाळेमार्फत प्रकाशित होत आहे.

या पुस्तकाला सर बार्टल् फ्रियरनीं जी प्रस्तावना लिहिली त्यांत महत्त्वाचा मुद्दा असा कीं, यातली कुठलीच कथा त्यांना महाराष्ट्रांत आढळून आलेली नाहीं. तेव्हां या कथा मलबारमधूनच ॲनाच्या कुटुंबाबरोबर वाटचाल करीत आलेल्या असाव्यात

या कथांच्या उगमासंबंधीं मीं जो अभ्यास केला त्यावरून मला वरील विधान बरोबर वाटत नाहीं. कारण भारतीय लोककथांचा हा पहिलाच संग्रह होता. त्यामुळेंच त्या त्या प्रांतांतील कथांचा तौलनिक अभ्यास करण्याचीं साधनेंच अपुरी होतीं. आणि त्यातहि सर बार्टल् यांचा संबंध, ते सुशील लोकप्रिय राज्यपाल असले तरीहि, मराठी लोकजीवनाशीं समरस होण्याइतका आलेला नाहीं.

‘ चिमणीचें घर शेणाचें, कावळ्याचें घर मेणाचें ’ ही कथा महाराष्ट्रांतच मला आढळली अजून कुठल्याहि इतर प्रांतांतील कथांत ती दिसली नाहीं. आणि समजा, दिसली तरी ती महाराष्ट्रांत महानुभाव कालापासून रूढ आहे यांत कांहींच शंका नाहीं. ‘ आप्पलपोटी चिमणी व बिन घराचा कावळा ’ ही गोष्ट तीच आहे.

‘ ब्राह्मण, वाघ व सहा न्यायाधीश ’ ही कथा जगभरच्या लोकसाहित्यांत आढळते. अर्थात् ती जितकी जागतिक तितकीच महाराष्ट्रीय आहे. भारतांतल्या सर्व प्रांतांत व जातींत ती रूढ आहे.

‘ शूर कुमार ’ ही कथा महाराष्ट्रांत घरोघरीं लोकप्रिय आहे. ‘ आंधळा, बहिरा व गाढव ’ ही कथाहि तशीच.

‘कोल्हा व मगर किंवा सुसर’ यांची कथा महाराष्ट्रांत कुठेंहि जा ऐकायला मिळते. कोंकणांतल्या कुणब्यांत ही गीतयुक्त अशी आढळते. महाराष्ट्रांत ही अनेक शतकें नांदत असावी यांत शंका नाही. ‘राक्षसाचा वाडा’ ही कथा मीं चार जिल्ह्यांत ऐकली आहे. ‘नवलकथा’ ही कथा अधिक विस्तृत व वेगळ्या प्रारंभांत कै. सुलोचना सप्तर्षि यांच्या संग्रहांत आहे. ‘कोल्हा व न्हावी’ ही कथा मला कोंकणांतील कुणब्यात आढळली. ‘पचाकिन’चा पर्याय भैरूराम गोसावी या नांवानें महारी घरगुती लावणींत आढळला. ‘बायकोच्या नथींतून नेम मारणाऱ्या तिरदाजाची कथा’ महाराष्ट्रांत रूढ आहेच. ‘सूर्य, चंद्र व वारा जेवायला जातात’ या कथेचा पर्याय श्री. श. ग. दाते यांच्या लोककथा या पुस्तकांत आढळतो.

‘विक्रमाच्या कथा’ या आतां साऱ्या भारतांत लोकप्रिय झाल्या आहेत. त्या उत्तरेची मिरास आहेत. त्या मलबारमधून महाराष्ट्रांत आल्या असें नसून उत्तरेकडून महाराष्ट्रांत आल्या व ॲनानें ऐकल्या हें जास्त सयुक्तिक वाटतें.

या संग्रहांतली एकच कथा काय ती तामीळनाडकडची असून ती मलबारामध्यें दुसऱ्या शतकांत अस्तित्वांत होती. ही कथा कन्नकीची. हीच कथा काय ती संपूर्णपणें अमहाराष्ट्रीय आहे. तिचें नांव चंद्राचे पैंजण. पण या कथेवरहि ॲनानें अभावितपणें मराठीचे संस्कार घडवलेले आहेत. अर्थात् एवढ्या कथांचा निश्चित वापर महाराष्ट्रांत असतांना त्या महाराष्ट्राच्या प्रातिनिधिक कथा म्हणावयाला प्रत्यवाय नसावा. कारण कुठलाहि मराठी कथांचा संग्रह घेतला तरी त्यांतल्या बहुसंख्य कथांचे पर्याय भारतभर सांपडतातच.

( २ ) Folklore of the Konkan–by A. M. T. Jacson, ( Bombay, 1915 )—ए. एम. टी. जॅक्सन हे इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधले एक विद्याप्रेमी अधिकारी होते. १९१० सालीं नाशिकचे कलेक्टर असतांना ते राष्ट्रीय सशस्त्र क्रांतिवाद्यांच्या गोळीला बळी पडले. जॅक्सन यांचा भारतीय संस्कृतीचा व्यासंग दांडगा होता. त्यांचें वाचन सूक्ष्म होतें. अधिक काळ ते जगते, तर त्यांचें या विषयावरील लेखन विल्यम क्रुकच्या लिखाणाइतकें मोलवान ठरलें असतें. जॅक्सन यांनीं सरकारी नोकरांकडून महाराष्ट्र व गुजरात यांच्या लोकसाहित्याची माहिती गोळा करून त्यांचीं टांचणें बनवलीं होतीं. पण त्यांचें व्यवस्थित संपादन होण्यापूर्वीच त्यांचा खून झाला. त्यांचें

हें अपूर्ण कार्य त्यांचे स्नेही व भारतीय मानसशास्त्राचे एक अभ्यासू आर. ई. एन्थोवेन यांनीं पूर्ण केलें. एका भागांत गुजरातचें लोकसाहित्य असून, दुसऱ्या विभागांत कोंकणचें आहे. अदमासें शभर पानें असलेल्या या पुस्तकात इतकी माहिती ठांसून भरलेली आहे कीं, हें पुस्तक वगळून कोणत्याहि लोक-साहित्याच्या अभ्यासकास पुढें जातां येत नाहीं.

या पुस्तकांत मुख्यत्वें सणवार, व्रतवैकल्यें, धार्मिक श्रद्धा यांचा समावेश होतो. व्रतांच्या अनुषंगानें येणाऱ्या दंतकथाहि अधूनमधून येतात. गीतें, उखाणे, म्हणी, वगैरे अंगें यांत नाहींत.

या पुस्तकाचीं एकंदर दहा प्रकरणें आहेत. पहिलें प्रकरण ' Nature Powers ' या नांवाचें आहे निसर्ग-दैवतावरचें हें विवेचन अतिशय महत्वाचें आहे.

सूर्यपूजनाचें भारतांतील वेदकालापासून महत्त्व व त्याचें वेगवेगळ्या प्रांतांत, वेगवेगळ्या लोकसमूहांत झालेलें परिवर्तन अतिशय महत्त्वाचें आहे. संक्रांति, आदितवार, षष्ठी, सप्तमी हे दिवस सूर्यपूजनांत महत्त्वाचे असून त्यांतल्या विशेष दिवसांची चर्चा यात आहे. त्यानंतर चंद्रपूजन येतें. अमावास्या व पौर्णिमा त्याचप्रमाणें द्वितीया व चतुर्थी यांचें महत्त्व चंद्रपूजनांत अधिक. स्थूलपणें यांतल्या कांहीं सणांचा व व्रताचा आढावा यात आहे. नंतर येतें ग्रहपूजन किंवा नक्षत्रपूजन मंगळ, बुध, गुरु, शुक्र व शनि हे पंचमहाग्रह व राहू व केतु हे ग्रहणासंबधींचे ग्रह यांची अगदी स्थूल माहिती यांत आहे. त्यानंतर वायु, आप ( पर्जन्य ) व पृथ्वी याच्यासंबंधींच्या लोकभ्रमांचीं व पूजनाचीं ठोकळ वैशिष्ट्यें स्थानिक परंपरेच्या अनुषंगानें विशद केलेलीं आढळतात.

दुसऱ्या प्रकरणांत ग्रामदेवता, स्थानदेवता, कुलदेवता, इष्टदेवता आणि वास्तुदेवता किंवा गृहदेवता यांचा विचार आलेला आहे. ग्रामदेवतांत मारुती, कालिका, अंबा, वाघोबा, चेडोबा, म्हसोबा, भैरोबा, गणेश, वीर, म्हाळसा, चामुंडा, वेताळ, खंडोबा, मल्हारी, जागाई, भवानी, वाघेश्वरी व शिव यांचा अंतर्भाव होतो यांपैकीं गणेश सोडल्यास साऱ्यांचें पूजन ब्राह्मणेतर पुजाऱ्यां-कडून होतें गुरव, वाणी, कुणबी, धनगर, महार, इत्यादि हे पुजारी असतात.

ग्रामदेवतांपैकीं मारुती व खंडोबा यांचीच काय ती ठोकळ माहिती या पुस्तकांत आहे.

ग्रामदेवतांत कुलाबा विभागात चौलांत हिंगळाज, जखमाता, भगवती, चंपावती, महिकावती व गोळबादेवी यांना महत्त्व आहे. त्याचप्रमाणें खोपोलीची बहिरी सोमजाई प्रसिद्ध आहे. आपटें गांवीं बापदेवाचें प्रस्थ आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत रवळनाथ, माऊली, वेताळ व रामेश्वर यांचीं ठिकठिकाणीं देवळें आहेत सावंतवाडींत आजगांवचा वेताळ प्रसिद्ध आहे. त्याला वाहणा वाहण्याची प्रथा आहे. त्याला वाहिलेल्या कोऱ्या वहाणा आपोआप झिजलेल्या दिसतात, असा समज आहे. रत्नागिरींतल्या खेड या गांवीं रेडजाई नांवाची देवी आहे दर तीन वर्षांनीं चैत्री पौर्णिमेला तिची यात्रा भरते व तिथें तिला रेडा बळी दिला जातो. याशिवाय महालक्ष्मी, वज्राबाई, वगैरे देवता कोंकण विभागांत प्रसिद्ध आहेत.

तिसऱ्या प्रकरणांत रोगदैवतांची माहिती आहे जरी, मरी, शीतला यांच्या पूजनाची माहिती आहे. ताप, देवी किंवा साथीचे रोग उद्भवले, कीं मग या दैवतांची अर्चना अधिक जोरांत सुरू होते. या सर्व दैवतांत शीतळेचें स्थान फार महत्त्वाचें आहे. ती बालकांचें देवीच्या रोगापासून संरक्षण करणारी आहे. तिचीं देवस्थानें ठिकठिकाणीं दिसून येतात या प्रकरणांत, साथ आली कीं ठिकठिकाणीं कोणत्या दैवताचें पूजन कसें केलें जातें याची माहिती आहे. उदाहरणार्थ, कुलाबा जिल्ह्यात पोलादपूर येथें मरी किंवा महामारीची पूजा होते पेण तालुक्यांत वावशी येथें शिवपूजा करतात. मेढ्याला हनुमानाचें अनुष्ठान करतात. मालाडला नवचंडीचें आवाहन करतात कोल्हापूरला नव-ग्रहांचें पूजन करतात, इत्यादि

चवथ्या प्रकरणांत पितरें व संत यांच्या पूजनाची माहिती आहे. पितृपूजा ही आमच्या धर्माचें मूलाधिष्ठान आहे. हा झाला कुलाचाराचा भाग. सामाजिक पूजनांत संतांना महत्त्व, तुकाराम, एकनाथ, वगैरे संत आणि अनेक स्थानिक भक्तांची प्रतिष्ठा यांत येते.

पांचव्या प्रकरणांत छळणाऱ्या मृतात्म्यांच्या पूजनाची माहिती आहे. भूतप्रेतपिशाच वगैरेंबद्दल जे लोकभ्रम आहेत त्यांची माहिती यांत आहे.

या भूतवर्गांत वेताळ, ब्रह्मग्रह, समंध, देवचार, मुंजा, खवीस, गिऱ्हा, चेटक, झोटिंग, वीर, चेडा, म्हसोबा, जखीण किंवा अळवत, लाव आणि डुबळ यांचा समावेश होतो. वेताळ हा भुतांचा राजा. ब्रह्मग्रह म्हणजे ब्राह्मणाचें भूत. समंध ज्याला वारस नाहीं अशा माणसाचें किंवा संन्याशाचें भूत देवचार हें शूद्राचें भूत. मुंजा हें मुंज झाल्यानंतर मेलेल्या ब्राह्मण मुलाचें भूत. खवीस मुसलमानाचें, महाराचें किंवा मांगाचें भूत. बुडून मेलेल्या माणसांचें भूत म्हणजे गिऱ्हा. चेटक हें कुणब्याचें किंवा कोळी पुरुषाचें भूत. झोटिंग हें खारवी किंवा कोळी पुरुषाचें भूत. वीर हें लग्न न होतां मेलेल्या क्षत्रियाचें भूत. चेडा हें अविवाहित महाराचें भूत. म्हसोबा हाहि भुतांचा स्वामी असून त्याचें स्थान वेताळाच्या बरोबरीचें आहे. जखीण हें सवाष्णीचें भूत. अळवत म्हणजे बाळंतिणीचें भूत. लावसट किंवा लाव हें विधवेचें भूत. डुबळ हें दहा दिवसांच्या आंत मेलेल्या बाळंतिणीचें किंवा विटाळशीचें भूत. अशीं हीं नानाप्रकारचीं भुतें माणसांना झपाटतात. ब्रह्मराक्षस किंवा देवचार हीं वाईट भुतें नसतात. वेताळहि सकटीं पावतो.

सहाव्या प्रकरणात दृष्ट काढणें व भुतांना घालवण्याच्या वेगवेगळ्या क्रिया सांगितल्या आहेत. सातव्या प्रकरणात वृक्षपूजा व नागपूजा यांबद्दल विवेचन आहे. औदुंबर, पिंपळ, वड, तुळस, रुई, वगैरेंच्या पूजनाचे संकेत सांगितलेले आहेत. नागपूजनात ठिकठिकाणीं असलेलीं नागाचीं राऊळें आणि नागपंचमीच्या सणाचें वर्णन आहे.

आठव्या प्रकरणांत देवक व प्रतीकपूजा हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. वेगवेगळ्या जातीजमातींचे कुलपालक वृक्ष कुठले, प्राणीरूप देवकें कुठलीं आणि त्यांचें पूजन कशाप्रकारचें होतें याबद्दल माहिती आहे. उदाहरणार्थ, मराठ्यांत शेलार कुळीत शेळी हें देवक आहे. हे लोक शेळीचें मांस खात नाहींत. साळुंके साळुंकीचें मांस खात नाहींत. मडाऱ्यांतले पडवळ हे पडवळाची भाजी खात नाहींत.

नवव्या प्रकरणांत प्राणिपूजेबद्दल माहिती आहे. गाय, बैल, वगैरेंची पूजा, कोकिळेची पूजा, कावळ्याला बळि अर्पण करणें, वगैरेंबद्दल माहिती आहे.

दहाव्या प्रकरणांत चेटकाबद्दल माहिती आहे. मूठ मारणें, जारणमारण, वगैरेंचा अभ्यास कसा असतो याचें विवेचन आहे.

अकरावें प्रकरण अवांतर माहितीनें भरलेलें आहे. अशा प्रकारें केवळ वर्णनात्मक असें हें पुस्तक आचारात्मक लोकसाहित्याचा पाया आहे.

( ३ ) Hindu Holidays and Ceremonials [ With Dissertations on Origin, Folklore and Symbols ]-by Rai Bahadur B A. Gupte ( Calcutta, 1916 ),

रावसाहेब बा. आ. गुप्ते यांचें हिंदूंच्या सणावारासंबधींचें हें पुस्तक पांढरपेशांच्या पौराणिक व्रतवैकल्याच्या कल्पनांवर आधारलेलें असलें तरीहि त्यांत लौकिक महाराष्ट्रीय परपरेचा विचार जागोजागीं केलेला आढळतो; आणि म्हणून भारतीय आचारपरंपरेतील मराठी परंपरेचें स्थान दाखविण्यास हें पुस्तक उपयुक्त ठरतें. ऋग्वेदींच्या 'आर्यांच्या सणांचा इतिहास' या पुस्तकाची ही प्रथमावृत्ति म्हटली तरी चालेल.

हें पुस्तक २७५ पृष्ठांचें असून त्यात शेवटी दहाबारा चित्रेंहि आहेत. या पुस्तकाची मांडणी विषयानुक्रमानें व आकारविल्हेवारीनें दिलेली आहे.

पुस्तकांत जे मराठी सणवार, व्रतवैकल्यें, कथा, कहाण्या, वगैरे विषय आहेत ते असे—( १ ) आदित्य राणूबाईची कथा व श्रावणी रविवारीं करायचें व्रत; ( २ ) आजेपाडवा, ( ३ ) चैत्रगौरी ( ४ ) चंपाषष्ठी, खंडोबा व बाणाईची कथा, ( ५ ) गोपद्माची कहाणी; (६) देवाची चौथ; ( ७ ) दिवाळी, ( ८ ) दिव्याची आवस, ( ९ ) श्रावणी शुक्रवार व त्याची कहाणी; (१०) गौरीपूजा व कहाणी, (११) महालक्ष्मीपूजा व कहाणी, (१२) सोमवार-व्रत, सोमवतीची कहाणी, श्रावणी सोमवाराची कहाणी, शिवामुठीची कहाणी, श्रावणी सोमवाराची दुसरी कहाणी, खुलभर दुधाची कहाणी, सोळा सोमवारांची कहाणी, (१३) मगळागौर व कहाणी; (१४) नागपचमी व कहाणी, (१५) पिठोरी अमावास्या; (१६) पोवती पूर्णिमा, (१७) सपत शनिवार व्रत व कहाणी; (१८) षष्ठीपूजा व कहाणी; (१९) शिराळशेट; (२०) शिळासप्तमी व्रत व कहाणी, (२१) शिवरात्र व कहाणी, (२२) शीतळ-षष्ठी पूजा व कहाणी, ( २३ ) वर्णसठीची कहाणी.

( ४ ) Folklore of Bombay—by R. E Enthoven Oxford, 1924 )—जॅक्सनच्या लोकसाहित्याच्या पुस्तकांचें सपादन एन्थोवेन

यांनीं केलें. परंतु त्यांत आलेली माहिती अपुरी वाटल्यानें एन्थोवेन यांनीं हें पुस्तक लिहिलें. महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक या तिन्ही प्रांतांची माहिती या पुस्तकांत आहे. एकंदर विषयाच्या दृष्टीनें पाहातां जॅक्सनच्या पुस्तकाची ही सुधारून वाढवलेली आवृत्ति आहे. एन्थोवेननीं 'Tribes and Casts of Bombay' हा ग्रंथ तयार केलेला आहे. त्याच्या मुळेंच अनेक जाती जमातींची दुर्मिळ माहिती त्यांना मिळाली. जॅक्सनप्रमाणें एन्थोवेन एक खरेखुरे लोक-साहित्यशास्त्रज्ञ होते आणि म्हणूनच लोकसाहित्यावर विशेषतः लोकाचारावर हा ग्रंथ त्यांना लिहितां आला. या ग्रंथाचें भाग्य असें कीं, एन्थोवेन यांचे सहकारी श्री. गो. म. कालेलकर यांनीं त्याचें भाषांतर केलें. 'लौकिक दंतकथा' (बडोदा, १९३४) या नांवानें तें प्रसिद्ध आहे या भाषांतरामुळें मराठी अभ्यासकास यांतली समग्र माहिती उपलब्ध आहे. आणि म्हणूनच त्याच्या विवेचनाच्या भानगडींत मी पडत नाहीं.

(५) Deccan Nursery Tales—by Kincaid (Bomby 1924)

'दख्खनच्या बालकथा' असा मथळा असलेलें हें पुस्तक मराठी भाषेचा अगत्यानें अभ्यास केलेले किंकेड यांनीं तयार केलेलें आहे. किंकेड यांचा भारतीय पौराणिक कथांचा अभ्यास चांगला होता तुळशी व इतर कथा (Tulsi and Other Tales), भारतीय पौराणिक कथा, वगैरे त्यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. सिंध व गुजरात इथल्या कथाहि त्यांनीं लिहिल्या आहेत प्रस्तुत पुस्तक हें मराठी कहाण्यांच्या संग्रहाचें इंग्रजी भाषांतर आहे. या कथा पांढरपेशांच्या कथा व स्त्रीवर्गांत प्रसृत असलेल्या आहेत. यांतल्या कांहीं कथांना पुराणांचाहि आधार आहे. या उघड व्रत कथा आहेत. तेव्हां या कथांचा अनुवाद म्हणून जरी पुस्तक उपयुक्त ठरलें तरी लेखकानें त्यांना बालकथा ठरवणें बरोबर नाही. या केवळ रंजक कथा नाहींत.

(६) Marathi Folktales— by Wilfrid E Dexter (London, 1938)–मराठी लोककथांचा म्हणून निघालेला हा संग्रह मेरी फ्रियरच्या ग्रंथानंतरचा दुसरा ग्रंथ म्हणून वास्तविक फार महत्त्वाचा ठरावा; परंतु कथांकडे दृष्टि टाकली कीं भ्रमनिरास होतो. कारण यांतल्या बऱ्याचशा कथा मुळीं लोककथा नव्हेतच. कांहीं आनंद मासिकांत आलेल्या कथांचें हें

इंग्रजी भाषांतर आहे पण आनंदच्या कथांचें पृथक्करण केल्यास असें सहज आढळून येतें कीं, त्यांतल्या कथा या बालरजनासाठीं रचलेल्या कथा होत्या. बऱ्याच कथा परकया कथांतून उचललेल्या होत्या. खेळगडी मासिकांत जें लोकसाहित्य आलें-सोनसाखळीच्या गोष्टीसारखें-त्याच्यासारखी शुद्धता या मासिकांत राखली गेलेली नाहीं. तेव्हां केवळ मराठींतल्या गोष्टी व त्या मूळ महाराष्ट्रीय व बालकथा म्हणूनच त्या लोककथा मानणें चुकीचें आहे. काही कथा तर कथाच नव्हेत उदाहरणार्थ, 'चार कावळे' या कथेचा आशय असा चार कावळे मित्र होते. ते उडून थकले होते त्याना एक किडा वळवळतांना दिसला. कावकाव करून ते त्याच्याजवळ गेले. बघतात तों तो किडा नसून मांजराचें वळवळणारें शेपूट होतें. त्याचप्रमाणें 'केशवराव' ही एक आधुनिक कंजुष माणसावर लिहिलेली नीतिकथा आहे. या संग्रहांत बनविलेल्या प्राणिकथा आहेत आहेत, नीतिकथा आहत, विनोदी कथा आहेत, पण खऱ्या अर्थानें लोककथांत बसू शकेल व तीहि मराठी लोककथांत अशी कथा एकच आहे. ती म्हणजे शेंपटींत कांटा मोडलेल्या व बई वई धांवणाऱ्या उंदराची. स्वतःचे पाय कुरूप म्हणून खंतावलेलें हरिण स्वतःच्या शिंगाचा अभिमान बाळगीत होतें. पण तें अखेर शिकारी मागें लागल्यावर शिंग झाडांत अडकल्यामुळें प्राणास मुकलें, ही कथाहि अस्सल लोककथांतली नव्हे. त्याचप्रमाणें गणूची चूक' ही देखील बनावटच कथा आहे तशीच 'सुरेशचा शहाणपणा' ही कथा. बावन कथांच्या या संग्रहातील कथांचें स्वरूप पाहिलें तर तें पारंपरिक कथांहून भिन्न आहे. कांहीं कथांना इंग्रजी कथांचा वास येतो. त्यामुळें हा संग्रह अभ्यासकाला मार्गदर्शन करण्याऐवजीं धोक्यांत टाकणारा झालेला आहे.

( ७ ) Folk-dances of Maharashtra— by A. J. Agarkar, ( Bombay 1950 )

महाराष्ट्रांतल्या नाचगाण्यावर हें पुस्तक आहे. इंग्रजींत असें पुस्तक प्रथमच झालें असलें तरी मराठींत या विषयावर ठिकठिकाणीं इतकी माहिती उपलब्ध आहे कीं तिचा उपयोग केला असता तर हें पुस्तक भरघोस झालें असतें.

---

## इंग्रजी नियतकालिकांतील लिखाण

**1. Journal of the Bengal Asiatic Society (New Series).**

(1) Vol. 7, 1911

**B. A. Gupte**—(1) Folklore of the Origin of the Constellation of Mrigashirsha (p 93). (2) Note on the Dark Monday Somavati (p. 631).

**2. Journal of the Royal Asiatic Society, Great Britain and Ireland.**

(1) Vol. I

**Stevenson D. D.**—(1) On the Anti-Brahmanical Worship of the Hindus in the Dekhan Divali Festival and the Worship of Vetal (pp, 189, 195)

**John Wilson**—A note on the Worship of Vetal (p 196).

**3. Journal of the Royal Asiatic society, Bombay Branch.**

(1) Vol IX, 1867-70

**V. N. Mandlik**—(1) Serpent Worship in Western India (p 169).

(2) Shrine of the River Krishna at the village of Mahabaleshwara (p. 250)

(2) Vol. X, 1871-1874.

**V. N. Mandlik**— Notes on the Shrine of Mahabaleshwara. (p 1)

(3) Vol. XI, 1874-1875.

**V. N. Mandlik**—Sangameshwara Mahatmya and Linga Worship (p. 99).

(4) Vol XII, 1876.

**J. Gerson da Cunha**— Notes on the History and Antiquities of Chaul (p. 1).

(5) Vol. XXI, 1901-1908

**Macmilan M.**—Matheran Folk-songs ( p. 517 ).

**4. Indian Antiquary.**

( 1 ) Vol. I, 1872

**J. Beams** — A Lake Legend of the Central Provinces ( p 143 ).

( 2 ) Vol XVI, 1887.

**G. F. D' Penha**—Folklore of Salsette ( p. 327 )

( 3 ) Vol. XVII, 1888 ( pp. 13, 50, 104 )

( 4 ) Vol. IXX, 1890 ( p. 314 ).

( 5 ) Vol XX, 1891 ( pp. 29, 80, 111, 142, 183, 192, 332 ).

( 6 ) Vol. XXI, 1892 ( pp 23, 45, 312, 374 )

( 7 ) Vol. XXII, 1893 ( pp. 53, 243, 276, 306 ).

( 8 ) Vol XXIII, 1894 ( p. 134 )

( 9 ) Vol XXVI, 1897 ( p 333 ).

(10) Vol. XXVII, 1898 ( pp 54, 82, 304 ).

( या एकदर २४ कथा असून त्या साष्टींतल्या खिस्ती समाजाच्या आहेत. )

**Pandita Ramabai.** ( R D. M. ) Four Religious Tales ( pp. 154, 261, 288, 291. )

( तुलसी, राहू, कलि व आस्तिक यांच्या पौराणिक पण महाराष्ट्रात रूढ असलेल्या कथा. )

**5. Journal of the Anthropological Society of Bombay.**

( 1 ) Vol. I. 1886–1888.

**P. B. Joshi**– On the Evil Eye in the Konkan (p 120).

**K. Raghunathjee**—On the Pitar or Tank (p 363 ).

**Gerson da Cunha**—On Amulets. ( p 378 )

**K R Kirtikar**—On the Ceremonies Observed among Hindus during Pregnancy and Parturition ( p. 394 ).

**E. J. Gunthrope**—On the Bhende Kochars (p. 409)

( 2 ) Vol II 1889-1891.

**P. B. Joshi**—(1) On the Household and Village Gods of Maharashtra (p 202)

**W Dymock**—On Pithori Worship among the Hindus (p 207)

(3) Vol III 1892-1894

**J J. Modi**—(1) A Few Ancient Beliefs about the Eclipse and a Few Superstitions Based on these Beliefs (p 346).

(2) The Dhangars and Dhavars in Maharashtra (p 471)

(4) Vol IV 1895-1899. (Part III)

**Fardunji Dadabhai Mulla**—Etymology of the Name of Khandesh (p. 449)

(5) Vol V 1899 1901

**J. J. Modi**—The Thakurs of Matheran (p. 458).

(6) Vol VII. 1904-1907

**Bomanji Byramjee Patell**—A Few Dreams and their Interpretations amnong the Natives of Bombay (p 155)

**J J. Modi**—Notes on the Kolis of Bassein (p 521).

(7) Vol IX. 1910-1912

**K R Kirtikar**—Some Forms of Bombay Amulets (p 55)

**Otto Rothfield**—The Sonkolis and the Agri Caste of Kolaba District (p 179).

**J. J. Modi**—The Vadaris of the Villages round Deolali Camp (p. 307).

**J A. Saldhana**—Savantwadi Village Gods and Ghosts (344, 480)

(8) Vol. X 1913-1916

**J. A. Saldhana**—Folklore of Savantwadi,Gods and Ghosts of the village Matand (p 178)

**R. P. Masani**—(1) Folklore of Bombay Wells (p. 708).

(9) Vol XIII. 1924-1927

**R. E. Enthoven**—(1) Devaks in the Deccan and Konkan (pp 1, 649).

**R P Chavan**—(1) Folklore and Tale (p. 4 38).
(2) Proverbs in Konkani Language (p. 497)

**E Hedberg**—Proverbs and Riddles Current among the Bhils of Khandesh (p 854)

**6 Man In India**

(1) Vol. XXIII 1943.

**Mary Fuller**—Maher (p. 111)—Ovi-songs of the Grinding Wheel

**Durga Bhagvat**—Premarital Puberty Rites of Girls in Western Maharashtra

(2) Vol XXIV. 1944

**Mary Fuller**—Nagpanchami.

**7. Journal of the University of Bombay** (New series)

(1) Vol. I. 1932-33.

**Iravati Karve**— The Parashurama Myth (p 115).

(2) Vol X 1944-42, Part I

**Anasuya Bhagwat**:—Maharashtriyan Folk-songs on the Grind-mill (Part I, p 134); Part IV, (Part 2, p 105)

(3) Vol XV 1946-47, Part IV.

**V. D. Rao**—The Pathare Prabhu Folklore (p. 47).

(4) Vol. XVII. 1949-59. Part I

**D P. Khanapurkar**—Rani Paraj Proverbs (p. 9).

(5) Vol XIX 1951

**D. P. Khanapurkar**— Bombay Villages through Folk-song (p 27)

8. **Bulletin of the Deccan College Research Institute, Poona.**

Vol. I, 1939-40.

**Iravati Karve** —( 1 ) Folk-songs of Maharashtra ( p. 79 ). ( 2 ) Kinship Terminology and Kinship Usages of the Maratha Country ( यांत अनेक ओव्या आहेत. )

9. **Journal of the American Oriental Society, Boston.**

Vol. XXV. 1905.

**Lucia C. G. Greive**—Folk–stories about Ramdas, the Last of Sages ( p 185 ).

10. **New Review,** Calcutta.

Vol. XI, 1940

**Mary Fuller**—Marathi Grinding Songs ( pp. 382, 508 )

जव्हेरी बिल्डिंग,
गिल्डर लेन, मुंबई ८.

— दुर्गा भागवत

# अनुक्रमणिका

★

## १ संकीर्ण लोकसाहित्य


१ संग्राहिका : डॉ. कु. सरोजिनी बाबर

कोंकणी गीतें

(१) चकवे
- (१) फाग १
- (२) गण २
- (३–५) चकवे २

(२) एकादशी ४
(कथात्मक गाणें)

(३) नागपचमीचें गाणें ८
(फेराचें)

२ संग्राहिका सौ. शांताबाई शिरनामे

ओव्या १६

३ संग्राहिका . सौ. आनंदीबाई शिर्के
- (१) मूळ २०
- (२) लग्न २१
- (३) पढरीच्या वाटें २१
- (४) बया २१
- (५) जांवई २२
- (६) बहिण–भाऊ २२
- (७) बाळराज २२
- (८) शाल २३

४ संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

ओव्या २४

५ संग्राहिका . सौ. सुशीलाबाई शितोळे देशमुख

ओव्या २७

६ संग्राहिका कु. शरदिनी बाबर
- (१–६) गाणीं ३०
- (७) ओव्या ३३
- (८) ही नार कुठ जाती ३४
- (९) पहिली ग माझी ओवी ३५

७ संग्राहिका : सौ. नलिनी वैद्य

जात्यावरील गाणीं ३६

८ संग्राहिका : श्री. जानकीबाई पाटील

ओव्या ३७

९ संग्राहक . डॉ. ना. गो. नांदापूरकर, हैद्राबाद

जैन स्त्रियांच्या ओव्या–
- (१) शिरपूरचें अतरिक्ष महाराज ३८
- (२) जिनमंदिर ३९
- (३) केशरी महाराज ४०
- (४) नवागड ४०
- (५) पार्श्वनाथ ४१

( ६ ) पद्मावती ४१
( ७ ) गोमटस्वामी ४२
( ८ ) सकीर्ण ४३
( ९ ) शिरडगांव ४४
(१०) तीर्थंकर नेमीनाथ ४५

१० संग्राहिका : सौ. निर्मला धारप
मगळागौरीचीं गाणीं ४६

११ संग्राहक : श्री. दा. गो. बोरसे
बेळगांवी गाणीं —
( १ ) कृष्णदेव ४८
( २ ) हिंदोलीगीत ४८
( ३ ) अगाई ४९
( ४ ) नागपचमी ४९
( ५ ) हिंदोलीगीत ५०
( ६ ) बुडडीण ५०
( ७ ) खिडकी पेरीला डवना ५१
( ८ ) मिरगाची वई ५१
( मृग नक्षत्राचा पाऊस )

१२ संग्राहिका सौ. मालतीबाई दांडेकर
( १ ) रुखवत ५१
( २ ) राम-लकेची कथा ५२

१३ संग्राहिका : सौ. इंदुबाला ढेरे
ओव्या ५३

१४ संग्राहिका : कु. विमल तपस्वी
मगळागौरीच्या खेळाचीं गाणीं ५५

१५ संग्राहक : पं. महादेवशास्त्री जोशी
( १ ) गौरी-स्वयवर ५६
( २ ) मल्हार मुरली ६८

### लोककथेचे कांहीं नमुने

१६ संग्राहिका डॉ. कु. सरोजिनी बाबर
( १ ) योगायोग ७०
( २ ) हुकमाची धनीण ७३
( ३ ) जादूची अगठी ७६
( ४ ) लाखाची गोष्ट ७९
( ५ ) धनदौलत ८१

१७ संग्राहक : चिं. ग. कर्वे
जुन्या आचारविषयक समजुती ८४

## २ नगरी लोकसाहित्य

कै. कु. सुलोचनाबाई सप्तर्षि १
अहमदनगरच्या परिसरांतील ऐतिहासिक लोकगीतें

### विविध लोकगीतें

१ संग्राहक : विष्णू रंगनाथ सोनार
( १ ) बाभळ्या बाईचा ९
( २ ) कावडीचें गाणें १०
( ३ ) भलरी ११

२ संग्राहक : भीमराव डी आंधळे
भिल्लीण १२

३ संग्राहक : ये. स. झावरे
म्हातारा सबुदेव १३

४ ए. डी. सदगीर
ओव्या १३
५ संग्राहक . उ. भा. कोठारी
(१) कुणबीक १५
(२) तुळस १९
६ संग्राहिका : नलिनी रसाळ
(१) लग्न व मुंज २१
(२) दिनक्रम २२
७ संग्राहक : जी. जी. मोरे
लोकगीतें २६
८ संग्राहक : उमेश बलवंत विटेकर
(१) लोकगीत ३१
(२) वेरुळच्या लेण्यावर
ओव्या ३२
९ संग्राहिका मंगला सप्तर्षि
(१) तुळशीच्या प्रदक्षिणा ३३
(२–३) तुळशीला पाणी घालतांना
म्हणायचें ३४
(४) तुळशीचं तीर्थ घ्यायच्या
वेळीं म्हणायचें ३४
(५) तुळशीचं गाण (धांवा) ३४
(६) नारायणाची (रविवारची)
कहाणी ३५
१० संग्राहिका : सुलोचनाबाई सप्तर्षि
(१) विठोबाच्या ओव्या ३५
११ संग्राहक . श्रीमत ग. ना. ऊर्फ
आबासाहेब मुजुमदार
नागपंथी दंतकथा—
(१) वारुळ ४६
(२) नागीण व नागकुळ ४७
(३) नागरपंचमी ४८
(४) सटवाई ४८
(५) धोंडाई ४९
(६) नाथपंथी मुद्रा ५०
(७) नाथपंथी म्हणी ५०

## ३ खानदेशी लोकसाहित्य

प्रस्तावना : श्री. दा. गो. बोरसे १

लोकगीतें

१ संग्राहक · श्री. सदाशिव माळी
(१) देव विठ्ठल पाहुणा ३
(२) सीतेचा वनवास ४
(३) मथुरेच्या बाजारांत ५
(४) भाऊबीज ६
(५) जनाबाई ७
२ संग्राहक : श्री. दा. गो. बोरसे
(१) भल्याच लेकरु परणाया
जात ऽ ८
(२) विठ्ठल–रुखमाई ८
(३) बाळकृष्ण ९
(४) बागलाणी व अहिराणी
गीतें—
(१) नारायण पेशवे १०
(२) अवखळ कृष्ण ११

(३) लाडशिकी लोकगीतें ११
(४) कानड सासरीं जाते १४
(५) बद्रीनारायण १५
(६) उकिरडा १६
(७) तेलवण (अहिराणी) १७
(८) साडा १८
(९) हरिश्चंद्र तारामती १९
(१०) सणमाहात्म्य ( अहिराणी ) २०
(११) जात्यावरील ओंव्या ( महापूर ) २०
(१२) जात्यावरील ओंव्या २१
(१३) भाऊ २२
(१४) दिवाळी २२
(१५) जन्मदात्री २३
(१६) संकीर्ण २३
(१७) चन्द्रावळ ( हिंदोलीगीत ) २५

३ संग्राहक : श्री. सदाशिव माळी

( १ ) सई बहीण २७
( २ ) चंद्र–सूर्य २८
( ३ ) अबाबाई २९

## लोककथा

४ संग्राहक . श्री. दा. गो. बोरसे

( १ ) वृक्षकथा ३१
( २ ) स्थलकथा ३३
( ३ ) पौराणिक दंतकथा ३४
( ४ ) सामान्यकथा—
( १ ) अस्तुरीच्या बळें चढे पुरुषास महिमा ३६
( २ ) भाग्यशाली व तिचीं दोन मुलें ३७
( ३ ) सटीना टाक ३८
( ४ ) सोनाराचें चातुर्य ४६

## ललितें

( १ ) गौळण ४८
( २ ) तुलसीदास ५०

खानदेशांतील कांहीं लोकसमज ५२

५ संग्राहक : वसंत नारायण देशपांडे

बोहाडे ५५

६ संग्राहक : श्री. दा. गो. बोरसे

( १ ) मुलीच्या वाङ्‌निश्चय ते लग्नापर्यंतचे खानदेशांतील विधी ७१
( २ ) खानदेशी उखाणे ( कूट व नांवाचे ) ७२

# संकीर्ण-लोकसाहित्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 2-3-2-6-0 वि: 3104
क्रमांक 97002 नों दि: 24/3/92

# संकीर्ण लोकसाहित्य

१. संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

## १. कोंकणी गीतें

मराठी ग्रंथ संग्रहालय
८१९६

### चकवे

### (१) फाग

कलकीचे बेटीं एक कोम जलामला
आडवा तिडवा गगनाशीं गेला
सुन्याच्या सुरीन कोम उतरीला
त्यो ज्यो कोम सोनारा घरां नेला
सोनारदादान सोन्यान मढविला
त्यो ज्यो कोम सालिया घरा नेला
सालियादादान सुतानं मढविला
त्यो ज्यो कोम सुतारा घरां नेला
सुतारदादानं पालक्या जोडिल्या
रुप्याच दांडपट्ट ऽ सोन्याच ऽ ठस ऽऽ
त्यो ज्यो पालकी कोन येव बस ऽ
त्यो ज्यो पालकीं सातमाय येव बस ऽ
सातमाय येव पर सोबिवंत दिस ऽऽ

(होळी लावण्यापूर्वी हा फाग म्हणतात.)

## ( २ ) गण

( फाग झाल्यावर म्हणावयाचा गण )

हरि हो रामा रामा ऽ
इठू पंढरीच्या राया ऽऽऽ
तुझ्या दंडवत पाया ऽ
तू कुठ ऱ्हासी ऽऽऽ
सुखी राखावें आम्हासी ऽऽ

( होळीच्या भोंवतीं दाडकी घेऊन नाचत हा गण म्हणतात )

## ( ३ ) चकवा

( लावणी करताना म्हणावयाचा )

दरियात मचवा झुलताय लाडके
सावला दीर तुझा येताय् गो ऽ
पायात साकल्या आनूताय् लाडके
सावला दीर तुझा येताय् गो ऽ
नाकात मोतीं आनूताय् लाडके
सावला दीर तुझा येताय् गो ऽ
दडांत येला आनूताय् लाडके
सावला दीर तुझा येताय् गो ऽ
कागदी पलग मांगल्या दारा
काढ गो ऽ चोली घाल गो ऽ वारा
काढताय् चोली घालताय् वारा
हात नको लावूं मेल्या फजित खोरा

## ( ४ ) चकवा

( लावणी करताना म्हणावयाचा )

मल्याची पोर उभी एक मल्यामर्दी
मारत्ये कुदल् पानी लावत्ये दांडा
बागीचा मला शिपत्ये सदा
पानी लावत्ये दांडा
नागवेलीचा मला शिपत्ये सदा
पानी लावत्ये दांडा
मिरच्याचा मला शिपत्ये सदा
पानी लावत्ये दांडा
गुलबाचा मला शिपत्ये सदा
पानी लावत्ये दांडा
माली जातो रं SS मलिया S
जो जो हार फुलाचा गलिया SS
ऐशा शेवंतीच्या कलिया
जो जो हार फुलाचा गलिया
ऐशा गुलाबाच्या कलिया
जो जो हार फुलांचा गलिया
ऐशा मोगऱ्याच्या कलिया
जो जो हार फुलाचा गलिया SSS

## ( ५ ) चकवा

( भात झोडणीचा )

भात झोडतान् गो SS रात गेली सारी
सुवारा डालतान् गो SS रात गेली सारी
मलन करियेतान् गो SS रात गेली सारी
गूत* काढतान् गो SS रात गेली सारी
भात जमवतान् गो SS रात गेली सारी

* गूत=भाताच्या पडलेल्या काड्या.

• • •

# २. एकादशी

## ( कथात्मक गाणें )

पहीलं नमन करु ज्या देवा गणपती । साह्य होई ग तूं माते सरस्वती । चरण वंदीन कुळ स्वामीनी श्रीपती । एकादशी वर्णावया द्यावी मज मती । पून्य पावन नाव तीच एकादशी । व्रत ठाउक नव्हतें कोणासी । व्रत विष्णूनें सांगितलें इंद्रासी । त्यानीं प्रगट केलें समस्त ऋषीसी । नगरोनगरींचीं फुलें हीं विष्णूचीं । षोडशोपचारें इंद्र पुजा करी त्याची । महरुद्र थोर आनदें गाती । नाना वाद्यें पुढे वाजत्रें वाजती । ऋषी मेनीका त्याही नृत्य करिती । सकळ देवांगणा त्याही ओवाळती । नगरोनगरीचीं फुलेंही सरलीं । राजा रुकमाणगदाच्या माळयाची फेरी आली । राजा रुकमाणगद सकाळीं उठला । हाकारी रे माळीया समस्ताला । मळे जावया का उशीर लागला । फुलें कोमलीं आणा उपर पुजेला । फुलें आणाया माळी गेले अवघेजण । तो चोरें भार नेला उतरून । एकुन एक फुलें नेलीसे वेचुन । ऐसें सांगती रायाजवळ येऊन । राजा म्हणे येतील तस्कर नेतील द्रव्यधन । फुलें चोरटा रे आला असे कोण । तुम्हीं विकीलीं असाल नेहुन । लटक सांगता आम्हाजवळ येऊन । दोन चार वेळें तुम्ही ऐसे वा हो केलें । तरी तुमचे अन्याय क्षमा केले । आणा रात्रीं चोर धावा उमगुन । नाहीं तर सकाळीं घेईन तुमचा प्राण । जसें चिखलात रुतलें कालींद्रण । तैसें भेदलें तयाचें अतःकरण । चिंताक्रांत माळी बैसले होऊन । माळ्या मनीं थोर चिंता प्रवर्तली । एक म्हणती चला बाबा मळया जाऊ । काहीं यत्न तरी करून पाहावू । चोर सापडला तर बरें केलें देवें । असलें आयुष्य सरलें तर काय वा करावें । ( ऐसें बोलुनी ) माळी बैसले राखण । शोभिवत पाळा जो माडुन । तीन प्रहर रात्र जी सरली । एक म्हणती चोर वेळा जी टळली । घोर धाकें अंगीं हुडहुडी आली । मत्र काष्ठाची त्यानीं आगटी जी केली । पहाटेची उरली प्रहर रात्र । तेव्हा गधर्व विमान घेऊन येती । एकु एक नयनी देखती । घंटा वाजती श्रवण देऊन ऐकती । एक खुणावती एकमेकाशीं । पहा दु'शिन्न काय दिसते आकाशीं । मत्र धुंम्र लागला विमानाशीं । त्या दोषें

विमान बैसलें भूमीशीं । माळ्या मनीं आनंदले । थोर हर्षें रायाजवळी सागु गेले । स्वामी आज चोर जे धरीले । काय वर्णूं ते बहुत चागले । वस्त्र पागरेले शेले । या तकटी लटके वाटेल तर पहा आपल्या द्रीष्टीं । स्वताहा जाऊनी घ्यावी त्याची भेटी । तशी तुम्ही बोलाव्या दोन गोष्टी । माळ्या वचनीं राजा संतोषला । सिंहासनीं खालीं राजा उतरला । चरणीं चालता मळेयासी गेला । साष्टांग नमस्कार रुकमाणगदानें घातीला । करुणा वचनें रुकमाणगदानें केली स्तुती । तेव्हा समाधान झाली चित्त-वृती । रुकमाणगद म्हणे तुम्ही कुणाचे हो कोण । तुमचें ठावठिकाण सागा हो आम्हासी । आमचा ठावाठिकाण आमी स्वर्गीचे गधर्व । पुष्पा कारणें धाडीती इंद्रराव । तिथें नित्यनेम पुजीतीं विष्णूदेव । नाव त्याचे प्रसिद्ध केशव । रुकमाणगद म्हणें तुम्ही भले पुन्यशिळ दिसता । चोरी कर्म काहो आचारिता । एकाचें न्हेऊनी एकाशीं का वाहातां । ह्मात काय वाहील तुम्हाशि साध्यता । गंधर्व म्हणती आम्ही विष्णूचे दूत ते सागती तितुके ऐकतों । त्यांच्या आज्ञे प्रमाण वागतों । पाप पुन्याचा प्रतीग्रह देतों । पाप पुण्य आम्हा नाहीं बा बाधत । म्हणून ह्याची तोंडें आम्ही नाहीं पाहात । त्याच्या धुब्राची केवढीसे हाणी । स्वर्गीचें विमान येऊन बैसले धरणी । त्याच्या धुब्राची तात्काळ प्रचिती । ऐसें नवल वाटतें आमुच्या चित्तीं । आम्हा कोपतील देव रुषिकेशी । रुकमाणगद म्हणे मजसारखा नगरात । दाता असताना तुम्ही इतके का झाला चिंताक्रात । नको होऊ अतरी चिंताक्रात । तुमचें विमान पावेल निमिषात । काय पुण्य लागते विमानाशी । आशी आज्ञा कर मज सेवकाशी । जोडी जोडली जोड देईन दानाशीं । ती पुढें येईल माझ्या बा कायांशीं । गधर्व म्हणती काय करशिल दान धर्म । तो सत्य सांगा आम्हा हो लागून । राजा म्हणे साठ सहस्त्र गाई देईन गो दान । धातु मात्रा तुळा पुरुष करिन । आणि देईन द्रुष्ट द्रष्ट दान । थोर थोर देवाना जप आरभीन । भले भले बोलावु ब्राह्मण । गाव मोकाशे देईन तया मी लागुन । शेवटी वेंचीन आपुला प्राण । तरी तुमचे वर चढविण विमान । काय पुण्य लागते विमानाशीं । ऐशी आज्ञा कर मज सेवकाशीं । एकादाशिचें पुण्य लागे ह्यासी । एकादशी आहे ती कायशी । एकादशी आहे पाप नाशी । एकादशी नाहीं देखली नयनीं । एकादशी नाहीं ऐकली शास्त्रही पुराणीं । राजा म्हणे आम्ही पुसतों

तुम्हाशीं । त्याकारणें करुणी सत्य सांगा हो आम्हाशीं । गंधर्व म्हणती आम्ही सत्य जी सांगतों । दशमीच्या दिवशीं अळणी ताकभात । एक पगतीसी घेऊनी अतीत । रात्रीं दत न धुऊनी तुळस घालावी मुखात । दुसरे दिवशीं निरार उपषोण । प्रात:काळीं करावें गंगास्नान । बरवें करावें देव देवतार्जन । रात्रीं करावें हरी कथाही जागरण । बारा ब्राह्मण सांगावें द्वादशी । बारा सुर्य येतील त्या दिवशीं । पचामृतीं त्रुप्त करावें तयाशीं । विडें दक्षणा देऊन बोळवावें त्याशीं । रुकमाणगद चालवे सांगा आचरण । दुबळे बाभळे आहेत ब्राह्मण । मी पुशीतों लौकीका कारण । येवढे निष्टा-गंद येईल कोठुन । ज्याला होईना गंगेचें गंगा स्नान । त्यानें करावें उष्ण उदक कढवून । ज्याला होईना निरार उपषोण । त्यान करावं अल्प फराळ खाऊन । ज्याला होईना रात्रीचें जागरण । त्यानें करावें दिवसा हरीचें स्मरण । ज्याला होइना नपटीचें अन्न । त्यानीं तरी न भक्षावें लवण । बारा ब्राह्मण सांगावे द्वादशीं । नसल्या अर्ती सांगावा एकाशी । नाहीतर ग्रासातला ग्रास द्यावा गाइत्रीशीं । ऐसें कळलें एकादशीचें महीमान । नवतें ठावुक कोणाला वर्तमान । एका अब ऋषिनीं केलसें साधन । त्याचे दहा जन्म घेता झाला भगवान । ज्याचा भाव असेल देवाशीं। त्याच्या चंत्रभुज श्रीकृष्ण हो पाठीशीं । कष्टी होय निज भक्ताशी । पितांबराची सावली करी त्याशीं । गधर्व म्हणती उठा चला करा त्वरा । नगरात पिटा हो डांगोरा । जन नगरात डागोरा पिटीती । कुणी उपवाशी आहे म्हणून विचारीती । सगळे जन हे जेवले म्हणती । त्या नगरात एक होती रजकिण । सासवा-सुनाचें झालेसें भाडण । भाडता भाडता चार प्रहर केलें जागरण । रात्रा रुक्मिणीं झालें हरीचें स्मरण । ऐसें कळलें रायाला वर्तमान । रायान पाठवलं छत्र सुखासन । छत्र सुखासन गेलें रजकिणीच्या घराशीं । राजानीं अभय दिल ग तुंम्हाशीं । छत्रसुखासनीं त्या दोघी बैसविल्या उभ्या केल्या आणुनी राजापाशीं ।। त्याच्या करवुनी केल गंगस्नान । वस्त्र अलकार भूषण देऊन ।। धार घाल्ती सासवा सुना । त्याच्या पुण्यं वर चढल विमान ।। व्रत धरीलं रुक्माणन मानशीं । पिटा डागोरा समस्त ऋषीसीं ।। जे न करीती व्रत एकादशी । पीटुन घाल्वावे नगराबाहेर त्यासी । रायाचें धाकें जन करिती एकादशी ।। प्राणीमात्र-वैकुंठाशीं जाती यमपुरी अवघी पडलीसे ओस ।। तेव्हा कोप आला त्या

यमास । रागें उठुनी गेला अम्ह्याच्या सभेस । एथं कशाला आम्हा ठेवीलास । जेवढ्या तेवढ्याचा वाकिल झालास । दे आज्ञा जाउंदे आम्हास ।। रायानं पाठवीली ती मोहनी । हातीं मोहनमाळ जी घेऊनी । वृंदावनीं बैसली अनुष्ठानीं ।। तों त्या राजानें देखली नयनीं ।। राजा म्हणे तु कुणाची हो कोण ।। तुझें रूप दिसतं लावण्य । एवढी सुंदर तू कुणाची कामीण । मोहणी म्हणे देवागणा मी वरहीण । योग्य वर पाहतें आपणाशीं । कोण मान देईल माझ्या वचनाशीं । माळ घालीन तया मी वराशीं ।। तुझें वचन मीच ग पाळीण । तुझ्या आज्ञेप्रमाण वर्तेन । मोनी म्हणे ऐशी देई भाक । रक्षणामधें बुद्धी योजीसी अनेक । नाहींतर हसतील तुझे तुला लोक ।। राजान भाक दिली त्या मोनीशीं । घेऊन गेले निजमदीराशीं । उपर माडी न्हेली । मोहन घालुनी राजा भुलवीला ।। मोहनी म्हणे तुमच्या अंगीं वृद्धपण । आता राजाच कायबा कारण ।। रायानं बोलाविले धर्मांगद हो पुत्राशी । शिका काढुनी पाट दिला त्यासी । बाप सुखी राखावें प्रजेशीं । त्याच्याकडुनी करावावी एकादशी । मदोन्मत्त तो उदन्मत्त झाला । एकादशी नाद श्रवणीं विसरला । काहीं एके दिवशीं जागासि झाला । डागोऱ्याचा नाद कर्णी पडला । तेव्हा रायानें माडीखालतीं टाकली उडी । सवें तात्काळ आलीसे मोहनी । भाक देऊनी लटका झालाशी उदार होईबा पुत्राच्या शिराशीं । नाहीं तर मोडाव व्रत एकादशी ।। रायानं बोलाविली सध्या बळीराणी । काय म्हणते ऐक मोहनी ।। सध्या बळी राणी म्हणे ।। चागुणेनं पोटीच बाळ दिलं । गीत गाऊनी चिलया कांडीयेल । परी सत्व नाहींजी जाऊं दिल । रायानं बोलाविले धर्मांगदहो पुत्राशीं । काय विचार येतो रे चित्ताशीं । तुझं शिर मोनी मागे आपणाशीं । नाहींतर मोडाव व्रत एकादशी । हरीचद्र राजें डोंबा घरीं पाणी जे वाहील । परी सत्व नाहीं जी जाऊ दिल । रायान बोलाविले धर्मांगदच्या स्रीयेशीं । काय विचार येतो तुझ्या ग चित्ताशीं । तुझ्या पतीचं शीर मोनी मागे आपणाशीं । नाहींतर व्रत मोडावं एकादशी । सुखीं तुम्ही त्याचें हो शिर द्यावें । परी एकादशी व्रत न मोडाव ।। पहा कैशी चौघाची एकमत । पहा कैशी चौघाचीं अंत:करण । वेडीबावडी मोनी राहीली होऊन । पुत्र घेतला असे माडीवरी । शस्त्र उभारिल ऊजवे करीं ।। शंखचक्रगदा पितांबरधारी । तो येऊनी वरचा हात धरी । म्हणे प्रसन्न झालों मी मुरारी । काय इच्छा

असेल ती माग बा अंतरीं । अत्ता बाप्पा पुरेपुरे उरीं ।। रायान बोलाविलें पुष्पक विमान । ह्यामध्यें ती चौघे बैसविली । ऐस कळल लोकाला वर्तमान । नगर लोक आले हो धांऊन । आम्हाकडुनि करविली एकादशी । एकटा विमानी बैसुनी चाललाशी । गाई म्हशीचे कळप विमानीं । उंच पाखांवें राये धरीलीं । विमानीं शेळ्यामेंढ्याचे कळप । विमानीं नाना जातीचे पक्षी बैसले । विमानी नगरासहीत राजा । विमानीं बैसला ध्वज लाऊनी । वैकुंठाशीं गेला । एकादशी पुन्याचे पोवाडे । गाती ऐकती उघडी मुक्तीचीं कवाडें । एकादशी ज्या गाती ऐकती । सप्तजन्मीचे दोष हरण पावती ।।

• • •

## ३. नागपंचमीचें गाणें

(फेराचें)

आली वर्षाची पंचीम । आली वर्षाची पचीम ।
लोकाच्या बाळाया माहेरीं । लोकाच्या बाळाया माहेरीं
आमची बाळाई सासरीं । आमची बाळाई सासरीं
आर तू सुवनार बाळा । आर तू सुवनार बाळा
जावं बाळीला आनाई । जाव बाळीला आनाई
जातों म्हणोनी बोलिला । जातों म्हणोनि बोलीला
कर ग तानीयाच लाडू । कर ग भुकच लाडू
बाधी शेल्याच्या पदरीं । बाधी शेल्याच्या पदरीं
गेला नदीच्या पागला । गेला नदीच्या पागला
शेलका नदीबा सोडीला । शेलका नदीबा सोडीला
आला वाड्याला निघूनी । आला वाड्याला निघूनी
घातला मखमली मठ । घातला मखमली मठ
वडली रेशमी पठार । वडली रेशमी पठार
नदीवरी स्वार झाला । नंदीवरी स्वार झाला
जातों म्हणोनी बोलीला । जातों म्हणोनी बोलीला
निघाला वाड्याच्या बाहेरी । निघाला वाड्याच्या बाहेरी
निघाला वेशीच्या बाहेरी । निघाला वेशीच्या बाहेरी

लागला वनाच्या मारगी । लागला वनाच्या मारगी
एक वन वलांडील । एक वन वलांडील
दोन वन वलाडीलीं । दोन वन वलाडीलीं
तीन वन वलाडीलीं । तीन वन वलाडीलीं
चौथ्या पाचव्या वनायाला । चौथ्या पाचव्या वनायाला
लागल दिसाया नगर । लागलं दिसाया नगर
गेला नगरा जवळी । गेला नगरा जवळी
गेला नगराच्या आत । गेला नगराच्या आत
गेला वेशीच्या जवळी । गेला वेशीच्या जवळी
गेला वाड्यायाच्या जवळी । गेला वाड्यायाच्या जवळी
गेला वाड्याच्या आत । गेला वाड्याच्या आत
बाळीन तिथच देखील । बाळीन तिथच देखील
झारी राजनात बुडविली । झारी राजनात बुडविली
घेतल चौरगी सूप । घेतल चौरगी सूप
गेली पाचव्या उतरंडी । गेली पाचव्या उतरंडी
काढल्या साळी नि बाडाळी । काढल्या साळी नि बाडाळी
पेटविल्या कांतीव चुली । पेटविल्या कातीव चुली
लावल्या चंदनाच्या फाळी । लावल्या चदनाच्या फाळी
सासू आली बाहेरन । सासू आली बाहेरन
काहो सुबाना येण केल । काहो सुबाना येण केल
लोकाच्या बाळाया माहेरीं । आमची बाळाई सासरीं
सासरा आला बाहेरून । सासरा आला बाहेरून
काहो सुबाना येण केल । काहो सुबाना येणें केल
लोकांच्या बाळाई माहेरीं । आमची बाळाई सासरी
आलों बाळीला न्यायला । आलों बाळीला न्यायला
न्हेजा म्हणोनी बोलीला । न्हेजा म्हणोनी बोलीला
दीर आला बाहेरून । दीर आला बाहेरून
काहो सुबाना येण केलं । काहो सुबाना येणं केल
लोकाच्या बाळाई माहेरीं । आमची बाळाई सासरीं
आलों बाळीला न्यायला । आलों बाळीला न्यायला

नेजा म्हणोनी बोलईला । नेजा म्हणोनी बोलईला
कात आले बाहेरून । कात आले बाहेरून
काहो सुबाना येणं केल । काहो सुबाना येणं केल
लोकाच्या बाळाई माहेरीं । आमचीं बाळाई सासरीं
आलों बाळीला न्यायाला । आलों बाळीला न्यायाला
नेजा म्हणोनी बोलाइल । नेजा म्हणोनी बोलाईल
सासरा भोजनाबा केलं । सासरा भोजनाबा केल
दिर भोजनाबा केल । दिर भोजनाबा केल
कात भोजनाबा केल । कात भोजनाबा केल
सुभाना भोजनाबा केल । सुबाना भोजनाबा केल
सासू भोजनाबा केलं । सासू भोजनाबा केलं
आपून भोजनाबा केल । आपून भोजनाबा केल
झाल सर्वांच भोजन । झालं सर्वांच भोजन
नेशीवली साडी चोळी । नेशीवली साडी चोळी
कुंकू बाळीला लावीलं । कुकूं बाळीला लावील
वटी बाळीची भरीली । वटी बाळीची भरीली
नदीवरी स्वार झाली । नंदीवरी स्वार झाली
जातों म्हणोनी बोलीईली । जातों म्हणोनी बोलोईली
निघाली वाड्याच्या बाहेरी । निघाली वाड्याच्या बाहेरी
निघाली वेशीच्या बाहेरी । निघाली वेशीच्या बाहेरी
लागली वनाच्या मारगी । लागली वनाच्या मारगी
एक वन वलाडील । एक वन वलाडील
दोन वन वलाडीलीं । दोन वन वलांडीली
तीन वनं वलाडीलीं । तीन वन वलाडीलीं
चौथ्या पांचव्या वनाला । चौथ्या पाचव्या वनाला
नगर दिसायला लागल । नगर दिसायला लागलं
गेली नगरा जवळ । गेली नगरा जवळ
गेली वेशीच्या जवळ । गेली वेशींच्या जवळ
गेली वेशीईच्या आत । गेली वेशीईच्या आत
गेली वाड्याच्या जवळी । गेली वाड्याच्या जवळी

बयान तिथंच देखीलं । बयान निथच देखीलं
पाट बसाया टाकिला । पाट बसाया टाकिला
झारी राजनात बुडविली । झारी राजनात बुडविली
आग तूं आंबीका ग माता । आग तूं आंबीका ग माता
जा ग गडणींच्या आळी । जा ग गडणींच्या आळी
आग त्या वाण्या बामणाच्या । आग त्या वाण्या बामणाच्या
जाग तेल्या तांबोळ्याच्या । जाग तेल्या तांबोळ्याच्या
आग त्या शिंप्या कासाराच्या । आग त्या शिंप्या कासाराच्या
साऱ्या गडणी जमविल्या । साऱ्या गडणी जमविल्या
आली वाड्याला निघून । आली वाड्याला निघून
आग तूं आंबीका ग माता । आग तू आंबीका ग माता
आमी काय ग नेसावं । आमी काय ग नेसावं
नेस जा तुज पातळं । नेस जा तुज पातळं
नको माजं पाताळ । नको माज पाताळ
नेस जा माझी नवी साडी । नेस जा माझी नवी साडी
नको तुझी नवी साडी । नको तुझी नवी साडी
नेस जा वयनीची कासायी । नेस जा वयनीची कासायी
लावली माडीईला शिडी । लावली माडीईला शिडी
काढली वयनीची कासायी । काढली वयनीची कासायी
काढली मधुपखा चोळी । काढली मधुपखा चोळी
काढला नवूलाखी हार । काढला नवूलाखी हार
काढला खुंटीचा झोळणा । काढला खुंटीचा झोळणा
नागा निवद भरईला । नागा निवद भरईला
घेतल हाळद आणि कुंकू । घेतल हाळद आणि कुंकू
नागा पवतं घेतईलं । नागा पवत घेतईल
लाह्या झोळण्या भरईल्या । लाह्या झोळण्या भरईल्या
निघाली वाड्याच्या बाहेरी । निघाली वाड्याच्या बाहेरी
निघाली वेशीच्या बाहेरी । निघाली वेशीच्या बाहेरी
लागली वनाच्या मारगी । लागली वनाच्या मारगी
एक वन वलांडील । एक वन वलांडील

दोन वन वलांडीलीं । दोन वन वलाडीलीं
तीन वन वलाडीलीं । तीन वन वलाडीलीं
चौथ्या पाचव्या वनाला । चौथ्या पाचव्या वनाला
लागल वारुळ दिसाया । लागल वारुळ दिसाया
गेली वारुळाजवळी । गेली वारुळा जवळी
लावलं हळद नि कुकूं । लावल हळद नि कुकू
नागा पवत घातिलं । नागा पवत घातिल
नागा लाह्या बा वाहिल्या । नागा लाह्या बा वाहिल्या
नागा निवद दावीला । नागा निवद दावीला
नागा पाया बा पडिली । नागा पायां बा पडिली
हाताला हात बा धरोनी । हाताला हात बा धरोनी
एक फेरी घातली । एक फेरी घातली
दोन फेऱ्या बा घातल्या । दोन फेऱ्या बा घातल्या
तीन फेऱ्या बा घातल्या । तीन फेऱ्या बा घातल्या
चौथ्या पाचव्या फेरीला । चौथ्या पांचव्या फेरीला
एक कुकवाचं बोट, एक हळदीच बोट । एक कुंकवाच बोट, एक हळदीचें बोट
लागल वैनीच्या कासायी । लागल वैनीच्या कासायी
सारजा झाली काळीमोरी । सारजा झाली काळीमोरी
आली रडत फुंदत । आली रडत फुदत
आली वाड्याला निघोनी । आली वाड्याला निघोनी
तुमी सर्वाजनी आहे । माजी आस्तुरी कुठ आहे
आसल आत न बाहेरी । आसल आत न बाहेरी
नाहीं आत न बाहेरी । नाहीं आत न बाहेरी
आसल बाहेर भितर । आसल बाहेर भितरं
नाहीं बाहेर भितर । नाहीं बाहेर भितर
असल गाईच्या गोठ्यांत । असल गाईच्या गोठ्यात
नाहीं गाईच्या गोठ्यात । नाहीं गाईच्या गोठ्यात
घेतली खाटनी वाकळ । गेली घोड्याच्या पागला
टाकला आगावला शेला । टाकला आंगावला शेला



'नागा पायां वा पडिली'

[ नागपंचमीसंबंधी ओंथ- संदर्भ: लोकसाहित्य, पृष्ठ ८ ]

अनुक्रम .. . ........... .. वि: ................ ...



'गौरीस्वयंवर'

गौरी म्हणे प्रसन्न जाहलेत जरी । तरी अर्धांगीं या बैसवा त्रिपुरारी ।

(संकीर्ण लोकसाहित्य पृ. ६१)

हाडवडूनी जागी झाला । हाडवडूनी जागी झाला
कोणीं बोटान खुनाविलं । कोणीं बोटानं खुनाविलं
तेज बोट मी काढीन । तेज बोट मी काढीन
कोणीं डोळ्यानं खुनाविलं । कोणीं डोळ्यान खुनाविल
त्येचा डोळा मी काढीन । त्येचा डोळा मी काढीन
कोणीं पदरानं पालविल । कोणीं पदरान पालविल
त्येचा पदर मी काढीन । त्येचा पदर मी काढीन
नाहीं बोटान खुनविलं । नाहीं डोळ्यानं खुनविल
नाहीं पदरान पालविल । तुमच्या पाठीच्या वहिनीन
तुमच्या पाठीच्या वहिनीनं । माझ्या कासयी नासविली
तिला वनात नेवावी । रक्त कुड्यांत धरावं
त्यात कासयी बुडवावी । सुर्य किरनीं वाळवावी
त्याची घडीबा घालावी । शेल्या पदरीं बाधावी
मला आनून दावावी । मग मी येथून उठीन
होय म्हणोनी बोलला । आला वाड्याला निघोनी
आग तुं आवी काग माता । आग तु आवी काग माता
आला बाळीचा सागावा । आला बाळीचा सागावा
तिच्या कांताला ग जड । तिच्या काताला ग जड
तिला नेऊन घालावावी । तिला नेऊन घालवावी
होय म्हणोनी बोलीयील । होय म्हणोनी बोलीयील
गेली चाटयाच्या आळी । गेली चाटायच्या आळी
चागल चागल लुगडं घे माता तूं बाई । चागल चागल लुगड घे माता तूं बाई
आम्हाला परतून येणं नाहीं । आम्हाला परतून येण नाहीं
अशी का ग म्हणतीस बाळा तूं बाई । अशी कां ग म्हणतीस बाळा तू बाई
सुबान बधू संग नाहीं । सुबान बधू संग नाहीं
बधू न्हव त्यो वईरी । बंधू न्हव त्यो वईरी
घात करी वाटेवरी । घात करी वाटेवरी
त्येच्या कबरेला सुरी । त्येच्या कंबरेला सुरी

गेली शिप्यायाच्या आळी । गेळी शिप्यायाच्या आळी
चांगली चागली चोळी घे माता तूं बाई ! चागली चांगली चोळी
घे माता तूं बाई
आम्हाला परतून येण नाहीं । अशी कांग म्हणतीस तूं बाई
सुबाना बंधू संग हाय । सुबाना बधू संग हाय
बधू न्हव त्यो वईरी । वधू न्हव त्यो वईरी
त्येच्या कंबराला सुरी । घात करी वाटेवरी
गेली कासाराच्या आळी । गेली कासाराच्या आळी
चागलीं चागलीं काकण घाल माता तू बाई । चागलीं चांगलीं
काकण घाल माता तूं बाई
आमाला परतून येण नाहीं । आमाला परतून येण नाहीं
सुबाना बधू सग हाई । सुबाना बंधू सग हाई
तेच्या कंबरला सुरी । तेच्या कबरला सुरी
घात करी वाटेवरी । घात करी वाटेवरी
आली वाड्याला निघूनी । आली वाड्याला निघूनी
पानी बाळीला ठेवीयलं । चागल पाणी घाल तू बाई
आमाला परतून येणं नाहीं । आम्हाला परतून येण नाहीं
अशी का म्हणतीस बाळा तू बाई । अशी का म्हणतीस बाळा तू बाई
सुबाना बधू सग हाई । सुबाना बधू सग हाई
बधू न्हव तो वईरी । बधू न्हव त्यो वईरी
त्येच्या कबरेला सुरी । त्येच्या कबरेला सुरी
घात करी वाटेवरी । घात करी वाटेवरी
चागली चागली बुत्ती कर माता तू बाई । चागली चांगली बुत्ती कर
माता तूं बाई
आह्याला परतून येण नाहीं । आम्हाला परतून येण नाहीं
अशी का ह्मणतीस बाळा तूं बाई । अशी का ह्मणतीस बाळा
तूं बाई
सुबान बंधू सग हाई । सुबान बधू सग हाई
बधू न्हव त्यो वैइरी । बधू न्हव त्यो वैरी
त्येच्या कबराला सुरी । त्येच्या कंबराला सुरी

घात करी वाटेवरी । घात करी वाटेवरी
नेशीयली साडी चोळी । नेशीयली साडी चोळी
कुंकू बाळीला लावीयल । कुकू बाळीला लावीयल
वटी बाळीची भरीयली । वटी बाळीची भरीयली
नदीवरी स्वार झाली । नदीवरी स्वार झाली
जातों म्हणोनी बोलइली । जातों म्हणोनी बोलईली
निघाली वाड्याच्या बाहेरी । निघाली वाड्याच्या बाहेरा
निघाली वेशीच्या बाहेरी । निघाली वेशीच्या बाहेरी
लागली वनाच्या मारगी । लागली वनाच्या मारगी
एक वनं वलांडील । एक वनं वलांडील
दोन वनं वलांडीलीं । दोन वन वलांडीलीं
तीन वन वलांडीलीं । तीन वन वलांडीलीं
चौथ्या पाचव्या वनायाला । चौथ्या पाचव्या वनाला
आर तू सुबानार बधू । आर सुबानार बधू
माझी सासऱ्याची वाट । न्हव सासऱ्याची वाट
केळीयाचं वन दाट । केळीयाचं वन दाट
येडी झालीस ग बाळा । येडी झालीस ग बाळा
आग ह्या वळवाच्या पावसान । आग ह्या वळवाच्या पावसान
गेलं केळीयीच खुट । गेलं केळीयीच खुट
तितनं म्होर झडाकली । तितनं म्होरं झडाकली
आर तूं सुबानार बधू । आर तूं सुबानार बधू
न्हव सासऱ्याची वाट । न्हव सासऱ्याची वाट
तुळशीच वनं दाट । तुळशीच वन दाट
येडी झालीस ग बाळा । येडी झालीस ग बाळा
चैताच्या उन्हान झाल तुळशीच खराट । चैताच्या उन्हान झाल तुळशीच खराट
तितन म्होरं झडाकली । तितन म्होर झडाकली
आर तू सुबानारे बधू । तान आम्हाला लागली
बान हितच माराव । पाणी हीतच काढाव
होई म्हणोनी बोलाईल । होई म्हणोनी बोलाईल

नंदीवीन खालीं केला । शेला बाळान हातरला
झोप बाळाला लागीयली । काढलीं पळसाचीं पान
त्येचा दुरुन वनविला । डाक दुरुन उषाला एक दुरुन पायथ्याला
काढली कवराची सुरी । शिर बाळाचें उतरीलें
रक्त कुड्यात धरईल । त्यात कासायी बुडविली
सूर्य किरनीं वाळविली । तिची घडी बा घातईली
शेंल्याच्या पदरीं बांधईली । नदीवरी स्वार झाला
आला वाड्याला निघोनी । टाकला आगावरला शेला
हाडबडूनी जागी झाली । दावली कासायी आनून
मग तेथून उठयीली । आली वाड्याला निघूनी

• • •

२. संग्राहिका—सौ. शांताबाई शिरनाने

## १. ओव्या

पहिली माझी ओवी रामाला गाईली ।
त्याच्या पदावरी लक्ष तुळस वाहीली ॥ १ ॥
तुळशीला पाणी घाली हात पुरेना नेणतीचा ।
मैना माझी जोडा माधे प्रीतीचा ॥ २ ॥
लेक द्यावी गरीबाला सून करावी मोठ्याची ।
चिरबंदी वाडा त्याला महिमा जोत्याची ॥ ३ ॥
मैनाला मागणं दोन्ही दारांनीं झाली दाटी ।
कन्नेला शेला मामा तिचा पान वांटी ॥ ४ ॥
सोनसळी गहू सोजीसाठीं ओलविले ।
बधू माझे भाऊबिजेला बोलविले ॥ ५ ॥
सोनसळी गहू सोजी घेते मी नखुल्याला ।
बंधुला माझ्या भाऊबीज धाकल्याला ॥ ६ ॥
बहीण भावंडाचा झगडा रानीं वनीं ।
बहिणीच्या डोळ्यां पाणी बधू चिंतावला मनीं ॥ ७ ॥

नऊ दिसाच्या नऊ माळा दहाव्या दिसाचा दसरा ।
शीलगण खेळायाला अंबा निघाली ऊशीरा ॥ ८ ॥
भाऊबिजेच्या दिवशीं माझें तवक झालें जड ।
बया तुझें बाळ ओवाळीला शाहीगड ॥ ९ ॥
भाऊबिजेच्या दिवशीं माझ्या तबकात मोती ।
भावजये नारी ओवाळीला तुझा पति ॥ १० ॥
दूर देशाची मला काळी रेघ आली ।
बाळाची माझ्या आधीं भेट झाली ॥ ११ ॥
शेजी समद्र वाड्यानि घोड्ययानीं ।
माझी मी समद्र पोटीं पुत्तर जोड्यानीं ॥ १२ ॥
माहेर घरीं सगळी माझी सोई ।
जेऊ वाढी बयाबाई ताट धुवायला भावजई ॥ १३ ॥
माहेर घरीं झोप बाईनें वेढीलें ।
भोजनाचें ताट बया माझीनीं वाढीलें ॥ १४ ॥
मायलेकीचें भाडण जशी दुधाची उकळी ।
माता मनाची मोकळी ॥ १५ ॥
आईच्या राज्यात खाल्ली दुधावरची साई ।
भावजईच्या राज्यीं ताकाला सत्ता नाई ॥ १६ ॥
वाटेवरी मळा आल्या गेल्याचा घोळ ना ।
पिता माझा कुनबी भीडेचा बोलाना ॥ १७ ॥
वाटेवरी मळा काट्या लावूनी केला बंद ।
अभंड त्याची नार काय करीत्याल भाऊबंद ॥ १८ ॥
जेजूरी गडावरी लगर कोणाचा तुटतो ।
बाळाच्या माझ्या नवस फिटतो ॥ १९ ॥
पिवळा अगरखा जन म्हणत नवरा झाला ।
बाळानं माझ्या देव जेजूरीचा केला ॥ २० ॥
पाया पडू आली आशीरवाद देऊं काय ।
हो ग लेकाची वरमाय ॥ २१ ॥

सुनेला सासुरवास करूं नकोस सासू आता ।
तुझ्या घरीं राम होता आली परक्याची सीता ।। २२ ।।
सुनेला सासुरवास ननदबाईची लावणी ।
कळ लाविती येऊनी दोड दिसाची पावणी ।। २३ ।।
आयुक्ष मागतें शेजीनारीच्या पूताला ।
बाईच्या ग माझ्या मगळसुताला ।। २४ ।।
शेजी शेजाराला वया माझी उसण्याला ।
बंधू माझा लाल सोईरा भूषणाला ।। २५ ।।
शेजीचें उसनें मी फेडीतें काडी काडी ।
बयाचें उसनें माझ्या भिनलें हाडोहाडीं ।। २६ ।।
जीवाला जड भारी उबऱ्याला दिल उसं ।
बाई माझे तुला कळल नाहीं कस ।। २७ ।।
जीवाला जड माझ्या सागू नका हारणीला ।
बाई माझी पडेल धरणीला ।। २८ ।।
शेजीचें उसनें मी फेडूनी वाईली ।
बयाच्या उसन्याची याद नाहीं राहिली ।। २९ ।।
नऊ दिसाच्या नऊ माळा अंबा बसली नऊ चडी ।
तिच्या नदादीपा तेल जळत सव्वा खडी ।। ३० ।।
जावई बाळाला समई नाहीं दिली ।
मैना माझी चद्रज्योत उभी केली ।। ३१ ।।
ससाराचा ओढा मला ओढता जड जाई ।
माझ्या आवल्या देतो भाई ।। ३२ ।।
ससाराचा ओढा नार ओढत रोड्याली ।
आवल्या नाहीं धड नाव पान्यात बुडाली ।। ३३ ।।
ससार केला पाचाच्या मना आला ।
मैना माझे कत तुझा नानावला ।। ३४ ।।
शेजीच्या घरीं गेल शेजी बोलली उशीरानीं ।
नाहीं नाहीं जायाची दुसऱ्यानीं ।। ३५ ।।
माझ्या ग बाळाला नका म्हणू काळा काळा ।
देवकी बाईनीं मला दिला वानवळा ।। ३६ ।।

शेजारनी बाई एका दारानें दोघी वागू ।
अंगनात खेळे तुझी मैना माझा राघू ॥ ३७ ॥
पढरपूरांत गल्लोगल्लीला सोनार ।
विठ्ठलाची राणी चंद्रहाराची लेनारीण ॥ ३८ ॥
पढरपुरात बुक्का पैशाला पाईली ।
विठ्ठलानीं माझ्या नाहीं धारन पाहिली ॥ ३९ ॥
लाडक्या लेकीला सासुरवास बरा ।
आईबापाचें करी नाव बधुला लावी तुरा ॥ ४० ॥
लाडकी लेक लईदी नसावी माहेरीं ।
नौतीची कोथबीर वास मळ्याच्या बाहेरी ॥ ४१ ॥
दुबळ्यापनाला नको नारी डगमगू ।
नीघून जाईल चद्रावरीचा काळा ढगू ॥ ४२ ॥
पीकलं पीकलं बंधू माझ्याच लवन ।
इरजा मागल्यात तूपपोळीचं जेवण ॥ ४३ ॥
अगणात उभी कोण मोकळ्या केसाची ।
बाळाची माझ्या राणी चवथ्या दिसाची ॥ ४४ ॥
आबा आला पाडा चिंच बाई कधीं येशी ।
सून बाईचे माझ्या सईचे डोहाळे पुरवीशी ॥ ४५ ॥
पाव्हना आला मला आंब्याच्या ग दिसामधीं ।
बंधूला माझ्या तूप वाढीतें रसामधीं ॥ ४६ ॥
गूज बोलायाला मला कशाला व्होवा लोक ।
गूजा जोगा माझा बाप ॥ ४७ ॥
गूज बोलायाला मला कशाला व्होवी शेजी ।
गूजा जोगी बया माझी ॥ ४८ ॥
बाप म्हणतो लेकी देऊनी तुला आलं ।
तुझ्या नशीबाला जामीन नाहीं झालं ॥ ४९ ॥
गावाला गेला कोण्या कशी करी रे तुझी सूध ।
नासुनी गेलं तुझ्या रतीबाचें दूध ॥ ५० ॥
झाल्या तिन्ही साजा दिवा लावू कुठ कुठं ।
बंधुचे माझ्या हैतीं चिरबदी गोठ ॥ ५१ ॥

झाल्या तिन्ही सांजा गाईवासराची वेळ ।
वाटे निराळ्या बाळा खेळ ॥ ५२ ॥
आहेव मरनाची किती सयानों मौज ।
पुढे चाले कत मागे गोताची फौज ॥ ५३ ॥
आहेव मरन मला याव पारवती ।
चवधे माझे बंधू खांदे माझे घरगुती ॥ ५४ ॥
सरल दळण सूप सारीतें पलीकड ।
सासरीं माहेरीं राज मागतें दोन्हीं कड ॥ ५५ ॥
सरलं दळण पदर घेतें डोई ।
आऊक्षाची ओवी तुला गातें मी बयाबाई ॥ ५६ ॥
सरील दळण नीघळण चदनाचं ।
हळदीवर कुंकू माझ जडीव कोंदनाचं ॥ ५७ ॥
जिवाला तुझ्या जीव मीं देऊनी पाहिला ।
पाण्यात पाषाण आत कोरडा राहिला ॥ ५८ ॥

• • •

## २ संग्राहिका—सौ. आनंदीबाई शिर्के

### मूळ

आधीं मूळ धाडा । घुगुराची गाडी ।
शालजोडीचे वऱ्हाडी । गणराज ॥
माझ्या कार्याला । गणराज तुम्हीं याव ।
धागऱ्याचे धोळ । सग सारजाला घ्याव ॥
आधीं मूळ धाडा । चिपळूण गांवाला ।
पर्शराम देवाला । आमत्रण ॥
आधीं मूळ धाडा । दुरिचिये दुरीं ।
देवी जोगेश्वरी । कुळाचिये ॥
आधीं मूळ धाडा । कोंकणची राखणी ।
देवी दुर्गाराणी । मुरुडासी ॥

आधीं मूळ धाडा । भाळीं कुंकवाची चिरी ।
दाभोळ बदरीं । अंबाबाई ॥

## लग्न

खांद्यावरी ग कुऱ्हाडी । कुठं जाता हो वऱ्हाडी ।
चंदनाच्या मेढी । मांडवाला ॥
भिंती सारवोनी । वर काढिल्या जिवत्या ।
तुझ्या लग्नाच्या माळत्या । बाळाबाई ॥
भिंती सारवोनी । वर काढियलीं फुलें ।
तुझ्या लग्नाचे गऱ्हले । सीताबाई ॥
भिंती सारवोनी । वर काढिलें ताम्हण ।
तुझ्या लग्नाच सामान । बाळाबाई ॥

## पंढरीच्या वाटें

पंढरीच्या वाटें । पिवळ्या करवंदी ।
देवा इठ्ठलाचे । भंडाराला गेले नदी ॥
पंढरीची वाट । कशान ओली झाली ।
रखमाबाई न्हाली । केस वाळवीत गेली ॥
पंढरीची वाट । मला दिसती सपाट ।
देव ग इठ्ठल । वाट चालला पोपट ॥
पंढरीची वाट । मला दिसे हिरवीगार ।
देवा इठ्ठलान । ताशी लाविली मखमल ॥
तुळशी ग बाई । तुझ्या बुडखी वली माती ।
तुझ्या भेटीसाठीं । देव आले रातोरातीं ॥
तुळशी ग बाई । तुझं वाळुनि झालं फाट ।
देवा इठ्ठलान । पलंगाला केलं गात ॥
एकुलता एक । तुप सागतें तुळशीबाई ।
मी जतन करूं काई । रावा मंजुळांच्या साई ॥

## बया

बया म्हणूं बया । बया बंगाल देशांत ।
जलमली जशी । खडीसाखर उसांत ॥

बापाचे उपकार । फिटतीं काशी केल्या ।
बया तुझे उपकार । फिट ना काहीं केल्या ।।
गरतीचा गरतावा । चुलीप पारखावा ।
बयाचा माझ्या । घरात बारकावा ।।
चोळी तापल्याची ! दर्डी उसवली ।
शुक्राची चादणी । मैना माझी दिष्टावली ।।

## जांवई

जावयाची जात । आली दरोजा वाकून ।
नवसाची माझी बाळ । नेली मोहना झाकून ।।
आवुख मागतें । जावया शेजाऱ्याला ।
मैना बाळाबाई । हाये तुळस निवाऱ्याला ।।
आवुख मागतें । लेकी आधीं जावयाला ।
बाळाबाई माझी । राहू तुळस निवाऱ्याला ।।
सरज्याची नथ । लेकी दिली बायजाला ।
किऱ्या खालीं गाव । मुनसुबी जांवयाला ।।

## बहिण-भाऊ

पोटच्या परीस । मला पाठच्याची गोडी ।
मैनी बदुराया । आपली बाळपणीची जोडी ।।
संसारीं असतीं । कितीक नातीगोतीं ।
बहीण आणि भाऊ । हीं मोलाचीं माणिक मोतीं ।
साकर शेरणी । घ्या ग बायांनो आणिक ।
आता ना गवसलं । माझ्या हिऱ्याला माणिक ।।
साकर शेरणी । मी ग वाटितें पसा पसा ।
भरितें तुमची ओटी । बायानों खालीं बसा ।।

## बाळराज

लावणीचा आंबा । याला पाणी चुळचुळ ।
लाडकी माझी मैना । आंब्याचडी आली केळ ।।
सांविसाज झाली । दिवा लावा ग जिन्यांत ।
सावितरी सून । लक्ष्मी आली ग मेण्यात ।।

सविसाज झाली । लामण दिवा लावा दारीं ।
लाडक्या बाळाची । माझ्या राघुची आली स्वारी ॥
कोण्या गांवीं गेला । लाल माझ्या लालणीचा ।
नेतरं झालीं लाल । शिण आला ना चालणीचा ॥
कोणाचे लेक लेकीं । कोणाच्या ग सोप्या माड्या ।
कारे गुतलासी । आतम्या राजा येड्या ॥
दळणं रधन माझं । जलदीनं होयाचं ।
अवघड वाटतं । मला पाण्याला जायचं ॥
दुबळ्यापणाला । नको नारी डगमगू ।
जाईल निघुनी । चद्रावरील ग ढगू ॥

## झाल

आहो आहो विहिणीबाई, सखे ग । आहो आहो । विहिणीबाई ।
कुठं गेले आमचे व्याही, सखे ग । कुठ गेले०
व्याही गेले वेळूबना, सखे ग । व्याही गेले०
वेळूबनाहून काय आणलं, सखे ग । वेळूबनाहून०
वेळूबनाहून आणिला गोफ जोफ, सखे ग । वेळूबनाहून०
गोफा जोफाचा झाला गुंता, सखे ग । गोफाजोफाचा०
सव्वालक्ष सोन टाका, सखे ग । सव्वालक्ष०
याहो नवऱ्याच्या बापा, सखे ग । या हो नवऱ्याच्या बापा०
दारीं होते मोर मुराळी, सखे ग । दारीं होते मोर मुराळी०
तिथं होते चोर जांवई, सखे ग । तिथं होते०
त्यानीं नेली आमची बाळी, सखे ग । त्यांनीं नेली०
बाळीपायीं धावण्या धांवा, सखे ग । बाळीपायीं धांव०
आपल्या धावण्यान काय होतं, सखे ग । आपल्या धांवण्यानं०
ज्याची होती त्यानं नेली, सखे ग । ज्याची होती त्यानं०
आपली माया व्यर्थ गेली, सखे ग । आपली माया व्यर्थ गेली !

●●●

४ संग्राहिका—सौ. कुमुदिनी पवार

# ओव्या

पहिली माजी ओवी हिरा सागर जगजेठी
कृष्णत जलमला माता देवकीच्या पोटीं. १
भरतार म्हनी रानी हावस कशायाची
खालीं पुतळ्याची माळ चाल निगाली ठुसीयिची. २
लेण्यामदीं लेनं ठुशीचं कवळ्ळ
हिरकणी चोळीवरी लेनं लोळत पिवळ. ३
चितळी येवढं गाव पानीयाचं तळं
गाव गावच्या पाटलानं लेकी आणून दिल्या बळं. ४
ताबड्या मदीलाची बाधणी बेताची
बोट कवळ्या हाताची. ५
ताबडा मदील गुडून मला दाव
दृष्ट होईल सोग खव. ६
पाण्याला जाती नार हरी बसला बुरुजावरी
हाणीतो चिमण खड नथीच्या सर्जावरी. ७
पाण्याला जाती नार हरी निघाला अघुळीला
अगावरचा शेला देतो राधच्या चुंबळीला. ८
कमानी दरवाजा वाड्याला शोभा देतो
माजा बाळ लिंब सोप्याला गध लेतो. ९
सोमवारीं न्हाली पाणी बेलाच्या झाडा गेल
सुन माझ्या गवरीला जोड्यान ल्याक झालं. १०
दोन तिनी हिरी चवथ धरण
हरीच्या मळ्यात वाघ टाकीती किरनं. ११
नवस करीती हिरीबाईच्या काठाला
माज्या बाळ राजाची बैल खिल्लारी मोटला. १२
हात जोडयिती हिरीबाईच्या चोपेशिळं
लालासाहेब माजा ताना मोट हाणीत चेंडू खेळ. १३

ताबडी चद्रकळा निरी पडोती हजार
माजा बाळराज करी मिरजचा बाजार. १४
ताबडी चंद्रकळा निरी पडती ऐंशीचार
तान्या माज्या माल्नींची कवार माग सर. १५
लावुनीया आंबा त्याला पलानीचा भर
माज्या बाळाजीचा आंबा वाढतो डौलदार. १६
भावज गुजरी तिचा पदर खवणीचा
लाडका ताना माजा चांफा वयेच्या लावणीचा. १७
चौकोनी वाडा वारकऱ्याला जागा दावा
तुळशीच्या वट्यावरी झेंडूची कैची लावा. १८
रखमीण म्हणी काय तुळशी चळ्ळीस
देवा इठ्ठलाच्या गळा हरीच्या भिडलीस. १९
राघु मैना दोघी किलबिलीत गेली
माझ्या राघुची मैना ऊंच शबुत त्येचा झेली. २०
मनी भावाड एका शिपल्याच मोती
सुन माझ्या गवरीला भरणी गगला आली होती. २१
पैंजन फोलार वाजत रुनझुन
सुन माझ्या गवरीची रंग महालाला जाती खून. २२
आखाड श्रावण दोन्ही महिन खाडाव्याच
दोघजण माझ हरी माझ दार्गीन जडावाच. २३
आखाड श्रावण दोन्ही महिन जोडीच
दोघजण माज हरी भीम अर्जुन जोडीच. २४
दिवस मावळला रावळीच्या माग
इठ्ठल रुक्मिण न्हावा म्हनिती मला दोग. २५
पढरीला जातें वाट चुकली रावळाची
देव माज्या इठ्ठलाच्या हातीं परात पेढ्याची. २६
पढरीला जातें गरुड खांबाला देतें तक्क्या
प्रितीच्या पांडुरंगा गुज बोलाव प्राणसख्या. २७
पंढरीला जातें कुणीं आडव येऊ नका
धनी दोषाला होऊ नका. २८

भनी भावाडाची बाळपणाची पिरत
झेनुबा शेजायिरी मुक्ताबाईची सुरत. २९
उन्हाळ्याचं ऊन बाई लागतं गवन्याराला
माज्या ग राजसाच्या मोतीं छत्रीच्या झालरीला. ३०
ईश्वर पिंडीवरी फुलं वाहिलं ताडाच
चुडिया राजसाचं सोनं दुनिया पाडाचं. ३१
मनी डोरल्याचं आला सराप वाड्यापुढ
हौशिया कानाला घाली भिड. ३२
एकुलतं एक जवारीला भारी
सावळ्या इठ्ठलाची नित्य कचेरी त्याच्या दारीं. ३३
माझ्या रास म्होर नित्य दिवान चावडी
वडीलाला न्याय मनसुप निवडी. ३४
मुक्ताबाईला मागन चिंचवडीच्या देवाचं
गाव आळदी वतन तिच्या ज्ञानोबा भावाचं. ३५
देव ज्ञानुबा बोलती मुक्ताबाई तू माजे भैनी
तुझ्या कुंकवाकारन देतों आळंदी लिवुनी. ३७
रुक्मिण लेन लेती शेष फळाचं येलझुब
गेलं लगीन लावाया कृष्ण भवल्यावरी उभ. ३८
रुक्मिण न्हवरी आंबिकेच्या देवळीं
द्वारकेच्या वाटं रथ दिसतो पिवळा. ३९
न्हवरी आबीकेला बाई तो व्हाती फुलं
लगीन लावायाला आली दोरकेचीं मुलं. ४०
द्रोपदीच्या अगनी हाती डुलतो मानाचा
द्रुपतीबाईचा बंधु कृष्ण ग गुणाचा. ४१
सासऱ्याला जाती कोण बामण रुपाची
नार कताच्या सुखाची. ४२
भरतार बोलत्याती का ग कामिनी रागात
काळी चंद्रकळा न्हाई शिंप्याच्या मागात. ४३
काळी चद्रकळा तिच्या पदराला मोतीं
पित्या माज्या राजसानं केलं म्हायार अमरावती ४४

काळी चंद्रकळा तिचा पदर मोती जाळी
बया गौळण बोल बाळे नेसावी सध्याकाळी. ४५
बाळ जातीया सासऱ्याला काय मुराळ्या तुझी घाई
बया गौळण माझी बोल साज गौरीचा झाला न्हाई. ४६

●●●

५ संग्राहिका—सौ. सुशीलाबाई शितोळे देशमुख

## १. ओव्या

विठ्ठल देव बोल, चल जने ग धुनं धूवूं ।
चंदगनाच्या शिळा, धुन पाठगवाचं घेवू ।।
भरली चंद्रभागा, पाणी लागल वडाला ।
बोलती रुखमिन, माझा पुंडलिक बुडाला ।।
भरली चंद्रभागा बाई मी पल्याळ कशी जावूं ।
देवा (द्यावा) त्या विठ्ठलानीं, त्यानीं फुलाची केली नावू ।।
तुळशीबाईला हिला नाहीं ग आई बाप ।
काळ्या मातीवर इची उगवलीं रोपं ।।
तुळशीची सेवा, कोन करितो उन्हात ।
बंधू तो ग भाऊराया पुत्र मागतो मनात ।।
राहीबाई बोल, रुक्मिण कशान थोरली ।
तुळशीच्या मजुळाची, इच्या नथीला आरली ।।
एकुलता एक, पाणी घाल्ह कवूलानीं ।
माझा तो बंधू राया, आंबा वाढतो डवूलानीं ।।
तुझ्या जीवासाठीं, जीव माझा थोडा थोडा ।
माझ्या तू बंधु राया, पाया मधीं घाल जोडा ।।
तुझ्या जीवासाठीं जीव, माझा हाऱ्याहुऱ्या ।
काम्हून सुकलास, शेतातील्या राजगिऱ्या ।।
यशवदेबाई, तुझा हारी कोनावाणी ।
सावळं याचं रूप जवसाच्या फुलावानी ।।

यशवदेबाई ऐक, हारीची आवई ।
शिंक्यापूराना हात खाली माडीतो तिवई ॥
नऊ महिने होत, माऊलीच्या भिंग्या आड ।
माऊलीबाईला, ओव्या गाईल देवा चड ॥
उगवला नारायण, दिसतो तान्ह बाळ ।
आला जानी मंदीं, मग झाला ग पायपोळ ॥
यव्हढ्या ग वनामदीं, काय दिसतं लाल लाल ।
सीताबाई बाळतीण, लुगड्याच दिल पाल ॥
सिताला वनवास, दगडाची केली उशी ।
एवढ्या वनामंदीं, सीता झोप आली कशी ॥
सकाळच्या पारी, बिगुल वाजतो झाई झाई ।
माझा तो बंधुराया कबर बाधितो घाई घाई ॥
खेळूनी मेळूनी बाळ आल विसाव्याला ।
राजसा बाळाला, माडी देतें बसायाला ॥
लेकूरवाळीला, हिला लेकराच मिस ।
बाळ तो राजबिंडा, सोन्याचा ढीग दिसं ॥
येशीमर्दी, उभा येशीबाई तुझा पती ।
हातीं शेंदराची वाटी नाव त्याचं मारवती ॥
भावजई बाई, झाड वाड्याची कगणी ।
बधु माझा बळीराज, चद्र निघाला अगणीं ॥
भावजईबाई, तुझा पदर भिंगाचा ।
असे बदवाच्या माझा, पटका गुलाबी रगाचा ॥
नेनंता मुराळी, बाई माझ्या नटनीचा ।
सागतें ग बाई तुला, घाल पदर पैठनीचा ॥
नेनंता मुराळी, बाई याला ग संभाळ ।
अस सुकूनी जाईल, बाई केळींच कंबाळ ॥
सासरवासीनीची, मजला ग येती कींव ।
सासरीं गेली मैना, तिच्यापशी माझा जीव ॥
सासरवासीनी बैस माझ्या ओसरीला ।
तुझ्या ग शीणयाची, मैना माझी सासऱ्याला ॥

कुंचीवर कुची काळ्या कुची चून पड ।
मैना माझी बाळाबाई, वाडा मामायाचा चढ ॥
खेळ खेळ बाळा, तुला कोणी केल मना ।
सागतें र बाळा तुला, आज्याचार परगाना ॥
लोकाचीं लेकर बाई खेळती, लगुऱ्या ।
बाळा माझ्या राजसाच्या, सये चेंडूला धागऱ्या ॥
लोकाचीं लेकर, खेळतीं आव्यापाव्या ।
अस बाळायच्या माझ्या, बाई रंगीयीत गोव्या ॥
माझ्या ग वसरीला कशाचे ग गडवे पेले ।
बदवाचे माझ्या, मइतर पानी पेले ॥
चार माझ बधू चाहीरी माझा सर ।
सोनार ग कारागीर, पदर केल बराबर ॥
माळ्याच्या मळ्या मदीं । माळिणी दोघी जावा ।
शेल्याची ग केली वटी, कबळ तोडीती तुरवा ॥
जाधवांच्या वाड्या नवऱ्याचा झाला झाडा ।
मैना माझी चंद्राताई, धाकलीचा साखरपुडा ॥
तुझ्या जीवासाठीं, जीव माझा थोडा थोडा ।
बंधु माझा तूं बळीराजा, पायामंदीं तू घाल जोडा ॥
मैना माझ्या साळाईचं, हिच हातपाय मऊ ।
हिच्या पिल्याला काळजी, कोण्या राजीयाला देवूं ॥
दळण दळीतें, सोजी घेतें आणीदार ।
बंधु माझा बळीराज, शिऱ्याचा ग जेवणार ॥
लाडयकी लेक, दिली कामाच्या कचक्यात ।
दरळू लागली, लवग ग मसाल्यात ॥
गाव ती ग फुरसुगी, याची चावडी चडायाची ।
रायाला सागीयती होरं सावली वडायाची ॥
जावई पाव्हना सासूबाईला झाली कोंडी ।
सोंगट्याचा डाव माडी दरवाजाच्या तोंडीं ॥
आडधा पडद्यांनीं सासू बघती जावाई ।
मैना चंद्राची ज्योत, जांवई सोन्याची तिवई ॥

आडद्या पडद्यानीं सासू बघती खिडकी वाट ।
जांवई राजसाची नवतीची तार तुट ।।
लेकी मैनाच चागुलपण सोयऱ्या सख्याला सांगू नका ।
मैना माझी ती चिंगूताई, पानी भरणीची मका ।।
वाकडी तिकडी लेका रघूबा तुझी माती ।
लेकी मैनाच चागुलपण पगाया घरा जाती ।।
वडील चुलत्याच सूपा यव्हड पाऊल ।
नंदवाचा माझ्या माग धन्याचा डवूल ।।
दैवाचं माणूस बाई हिंडत शेतामदीं ।
सांगतें सईयाला धनरेध ग हातामदीं ।।
बैल बडूचा डरकी टाकीतो पेडमंदीं ।
बाळराजा माझा धनी सावध वाड्यामदीं ।।
वाटच्या वाटसरा काय बघतो खेड्याला ।
सोन्याच कुलूप माझ्या बंधूच्या वाड्याला ।।
वाटच्या वाटसरा, काय बघतो डोंगराला ।
चुडीयाच्या माझ्या नंदी खिलारी नागराला ।।
जाईन शेताला उभी राहीन बादाला ।
बंदवाला माझ्या हाका मारीतें चादाला ।।
शिवच्या शेतावरी कुद्या पवन्यांनीं केली मात ।
बदवाला माझ्या नदी चाराया झाली रात ।।

● ● ●

६ संग्राहिका— कु. शरदिनी बाबर

## गाणी

१

पहिलवान उंमत वाण्यायाची
लगोट आणि छडी माडीयाची
अबीर बुक्याची भडीमार

अबीर बुक्याला काई उणं
आम्ही कबीर रस्त्यातून.

२

बाई आबंड नारीइची
तेनबाई कोंबाड जोडइलं
सख्या बाई भावाला तोडविल.
येसवा किग झाली नार
येसवा खालीं बस
तुझ्या बाई तोंडाला आली फेस.
काळ्या कि ग लुगड्याची दसी
इनाकारण कोंबाड खाशी.
तुझ्या बाई जीभीचा घेवा सेंद
राजबाई वाड्याला लावा झेंडा.
नार नसावी वाड्यामर्दी
कडू लागलं पानामंर्दी
नेत्रा घालीती येड्यामर्दी.
ताई वाण्याच्या बधू माझ्या
देववाडीच्या बाजारात
बोली मंजूर कागदांत.
येवढ्या म्हमईचा टपालवाला
येतो दादर चढुनिया
येता शेलार बाळा माझ्या
घेऊ कागूद फोडुनिया.

३

लुगडं काळकी चन्द्रकाळा
डोई पदूर झुरमुळ्याची
मरगू चातूर भाऊ मांची
पेठ धुंडिला करमाळ्याची
इवढ्या म्हमईच्या सोनाराची

घेतो घडणाळ बिलवराची
नार भावज बुजइती
लेक शिरीगमंतयाची
चोळी फाटली दडावरी
नक येऊस बाहीर दारीं
नक लावूस पडदोरा
माग लागतो त्येचा जोडा.

४

नक जाऊंर म्हमइला र
आग लागूर तुझ्या कमाईला र
तुळशी ग बाईचा वटा मोगा ग
तुळस वाळुनी झाला कोळा
इटुबाला घाली माळा
इवड्या ग पढरपुरामदीं ग
न्हाती रुक्मीणी मंदीरीं ग
राही रुक्माणी ग सारवती
रंग म्हलाच्या आड भिंती
एवड्या पढरपुरामंदीं ग
चंद्रभागला धुन धूती
वईल्या आळीला कलागत
तित कशाची ग गलबल
दाणेआळीला रस्ता गेला
सदाशिव ग बाळ माझं
बाळ दुरुनी वळखिलं
माप टाकिती दाण्यायाची
ताईवाण्याचा बंधू माझा.

५

पाटच्या ग पान्यामंदीं
कोण नार गाणं गाती

कवळ्या उंसाला पाणी देत
तत पाटान पाणी जातं
बाई सरळ सापावानी
खालीं साळुंखी ग पाणी पीत
मोटवाल्याला दुवा देत
अबकऱ्याला हात जोडी.

६

माझा पलक पावइना ग
काय भावज गोजरी ग
भोळ बंधू माझ
बोलणं ठसक्याचं तूझ
तुझा ठसका काढीन ग
लावीन शान काढायला ग
काय वाणीच्या बधू माझ्या
कर आघोळ लावी गदा.

## ७ ओव्या

चैत्राच्या महिन्यांत देव जोतीबा कुठं गेला ग
काळ भैरिला मान दिला ग. १
चैत्राच्या महिन्यात देव जोतीबा घोड्यावरी ग
त्याची नजर खेड्यावरी ग. २
दिवस मावाळिला झाडा झुडपाच्या आडुशानं ग
ताईता माझा बधू चद्र निघाला कडूशानं ग. ३
दिवस मावाळिला ग त्याला जाऊंद्या मावळाई ग
चद्र सागरा त्याची आई उभी राहिली ओवाळाई ग. ४
वाटच्या वाटसरू ग मला म्हणीतो मुळीबाई ग
आडव्या नदीचं नाव काई ग पतिवरता कृष्णाबाई ग. ५
वाटच्या वाटसरू ग मला दिसतो बधूवानी ग
ये घरला देतें मी तुला राजसा पाणी. ६

दिवस मावळिला ग दिवा लावावा कमानींत ग
भैऱ्या बैलाच्या गवाणींत ग. ७
दिवस मावळिला झाडाझुडपाच्या आडुशानं ग
मामा मुराळी कडुशानं ग. ८
पंढरपुरामंदीं ग कुणीं शाण्यानं दिली लेक ग
तिची हरली तानभुक ग गलोगलीनं गायमुख ग. ९
पंढरपुरामदीं कोण सोन्याच्या जोडव्याची ग
राणी इठ्ठल बडव्याची ग. १०
दळग काडण्याचा कधीं करूनी कटाळा ग
शेतीं नागर असावा ग. ११
बापानें दिली लेक नाहीं ग पायहिली
चालरीत ग जाइ लववीत चिलारी ग. १२
ठुशानि ग टिक्का खालीं सरी बाई ग
तू जामीन हुशार कांताची कामीन ग. १३
माळ्याच्या मळ्यामधी एक दापा लाविला ग
हणमंत बाळ माझा दृष्ट होईल मामाभाच्या ग. १४
पंढरीचा देव नाहीं पाहिला सावचीत ग
विठ्ठलाची गाठ बाई पडली अवचित ग. १५

## ८ ही नार कुठं जाती

पहिली माजी परदक्षणा । द्वारकेच्या नारायणा ।
उभा तुळशी वृंदावना । पावा मुखीं ठेवुनी ।
अग दाशी तुळशी बाळ । तुजं अमरूताच आळ ।
शिंपील तुझा बाळ ।
आगारशी बनारशी सेवा सकराची ।
पायल शिवाची ।
हरली तानभूक । पायला शिवाचा, । कळस सोन्याचा ।
कळस गेला दिहीचा आळस । पायली शिवाची पाठ ।
मिति घडली तीनसे साठ ।
पायलं शिवाचं अगण । झाल पापाच भगण ।
पाईलीं शिवाची न्हानी । झाली पापाची हानी ।

पायल शिवाचं दरवट । पाप पळत सुटत ।
बारा बाहा बलभीम मारुती । तुमच्या दर्शना यति ।
सुवर्णाचा कासुटा पाव । माझा संकष्टा रामाचा रता ।
लक्ष्मी मनाच्या परम दुता ।
धान्या पुन्यानीं मला । हारावर झाकला शकरशेला ।
ईश्वर पुसे पारबती । ही नार कुठ जाती ।
तुळसिची सेवा करिती । सरव पाप दास हरिती ।।

## ९ पहिली ग माझी ओवी

पहिली ग माझी ओवी । तेतीस कोटी देवा ।
विटेवरल्या सदाशीवा ।।
दुसरी माझी ओवी । माथां रुक्मिणीच्या चुड्या ।
जन्मला कृष्ण देव । तुटल्या बद-बेड्या ।।
तिसरी माझी ओवी । तिनवं माझ काज ।
सावळा पाडुरंग । त्रिभुवनीं करी राज ।।
चवथी माझी ओवी । चारी चौक भरुनी ।
जन्मले कृष्ण देव । बहु आनद करुनी ।।
पाचवी माझी ओवी । पाची पाडवाला ।
द्रोपदीच्या बंधवाला ।।
सहावी माझी ओवी । सहावा मडप देतो शोभा ।
सावळा पाडुरंग । हरि कीर्तनाला उभा ।
सातवी माझी ओवी । साती सत्यभामा ।
हरीच्या रथामदीं । सोळा सहस्त्र गोपीगणा ।।
आठवी माझी ओवी । करती आठव लिंबलोण ।
सावळा पाडुरग । गादी बसले भगवान ।।
नववी का माझी ओवी । पढरी पाठवा ।
विठू निजला ऊठवा ।।
दहावी का माझी ओवी । दहा कोंबडा बाग देई ।।
सावळा पाडुरग । हरी निघाला आंघोळी ।।

● ● ●

७ संग्राहिका—सौ. नलिनी वैद्य

# जात्यावरील गाणीं

१

पाव्हणा आला मला पंढरीचा एकनाथ ।
बसाया टाकीती चंदनाचा पीडिपाठ ॥
तोंड पुसायला जरी रुमाल बारीक ।
चूळ भरायाला खालीं सोन्याच तवक ॥
भोजन वाढाया साळीबाई तुमचा भात ।
तोंडीं लावायला येळी-लवगाची शाक ॥
पाची पानाचा इडा वरी जायफळ येक ।
दात कोरायला दारीं तुळशीच रोप ॥
इठ्ठल पाव्हणा माझ्या दुबळीच्या घरीं ।
साळीच्या तादळाच्या दोन्ही आण्या बरोबरी ॥
सकाळीं उठोनी झाडीतें आगणवाडा ।
विठ्ठल देवाचा लोळतो धोतरजोडा ॥
सकाळीं उठोनी सडा देतें आगणाला ।
विठ्ठल देवाला चौत माझ्या बामणाला ॥
सकाळीं उठोनी हात जोडीतें आगणाला ।
सूर्य डुलतो गगनाला ॥

२

येसवदे बाई ! ऐका हरीचं गारार्ण ।
शिक्याच खातो लोणी, जातो मागल्या दारानीं ॥
येसवदे बाई ! हरी तुझा पक्का चोर ।
चोरीला रवी-दोर ॥
येसवदे बाई ! हरी तुझा मोठा धट ।
हातमधीं काठी, डेर फोडील्यात चट ॥

( निवेदक—भागूबाई चव्हाण )

● ● ●

८ संग्राहिका——श्री. जानकीबाई पाटील

# ओव्या

मोठनी मोठ डोळ राघुबा रतनाच ।
लान माझ ते बाळराज वाची कागाद बतनाच ।। १ ।।
बाळ निघाली सासऱ्याला घोडं धरीलं जेचत्येनं ।
माझ्या त्या बाळाईच पाय झाकिल बधुजीनं ।। २ ।।
बाळ निघाली सासऱ्याला म्होर बधुजी माग दीर ।
माझी ती बाळाबाई मधीं फुल्ली कोथमीर ।। ३ ।।
सारवीवली भिंत वर काढिली ग मईना ।
माझी ती बाळाबाई गेली सारुऱ्या ग मईना ।। ४ ।।
खारीक खोबइरं पैल्वानाचा माझा मेवा ।
तान्या माझ्या बाळायानं कुस्ती नेमिली कुन्या गावा ।। ५ ।।
खारीक खोबइर पैल्वानाची माझ्या न्हारी ।
माझ्या त्या बाळायान कुस्ती नेमिली खेड्यावरी ।। ६ ।।
वाजत गाजत पैल्वानाला कुठं नेला ।
माझ्या ताईता बंधुजीला पैल्या कुस्तीला उभा केला ।। ७ ।।
पालक पाळयीना वर चिमण्याचा जयजय झाला ।
माज ते बाळराज आंत चिल्याळ झोपी गेला ।। ८ ।।
चवधी आमी भैनी एकीमेकीच्या चालनीच्या ।
माझीला म्हणत्याती लेकी कुना या मालनीच्या ।। ९ ।।
विठ्ठल म्हनीत्याती कां ग रुक्मिनी रागराग ।
गेलों होतों मी फुलबाग आली तुळस माझ्या माग ।।१०।।
नार लेन लेती इस पुतळ्या कवा कवा ।
हळदीवरल कुकु जित दागिना माझा नवा ।।११।।
लेनं नेसगन्याची नार डाव्या बाजून माझी चाल ।
तुझ्या चिताबिकाच मोल माझ्या चोळीला ग दिल ।।१२।।
पतिच्या जिवावर मला दुनियेची परवा थोडी ।
पतिराजाना औक्ष मागी नारायणाल हातजोडी ।।१३।।

शनिवारवाड्या पुढें सभा बसली थोराची ।
बाळराजसाची तिथ बैठक मोराची ॥१४॥
दृष्टी ही म्हणूं झाली अंगणीं पायी धूता ।
बाळ माझा राजसा गोप्या रजपुता ॥१५॥
दृष्टी ही म्हणूं झाली तुला लाडक्या माझ्या चादा ।
ल्हान ठेंगणा तुझा बांधा ॥१६॥
दृष्टी ही म्हणूं झाली मीऱ्यां उतरीतें मी बारा ।
बाळ माझा राजस दृष्टीजोगा माझा हिरा ॥१७॥
चांदण टिप्पूर बाई पुनवीबाईच ।
शोभीवंत दिसे घर माझ्या ग आईचं ॥१८॥
चादण टिप्पूर आहे चांदण्याजोगी रात ।
बधुराजसाला कृष्ण देवाची सोबत ॥१९॥

• • •

९ संग्राहक—डॉ. ना. गो. नांदापूरकर, हैद्राबाद

# जैन स्त्रियांच्या ओव्या

## शिरपुरचे अंतरिक्ष महाराज

पहिली माझी ववी । अरेहत चागलेला । देवा या अरहंताला । हवा केली बगल्याला ॥

जाईच्या फुलाचा । इनीला इंजनवारा । पाठविला शिरपुरा । अरहंत महाराजाला ॥

चला पाह्या जाऊ । शिवपुरं गाव शिवरात । नदादीप भोयरांत । अंतरक्षे महाराजाचे ॥

शिरपूर गावामध्यें घरोघरीं आड । पवळीच पानी गोड । देवाचे पुजेला । ( देवाच्या प्रक्षाळाला ) ॥

चला ग पाहे जाऊं । शिरपूर गाव चवकोनी । नंदादीप दोन्ही कुनीं । अंतरिक्ष महाराजाच्या ॥

चला पाहे जाऊ । शिरपूर गाव जवळ । आहे पर्तिमा केवळ । अरहत महाराजाची ॥

चला पाहे जाऊ । या ग शिरपूर देशात । जाई लावली सात । अतरक्ष महाराजानीं ॥

हे ग सोन्याच्या समया । नाहींता देशोदेशीं । लावीली नदादीप । अतरक्ष देवापशीं ।

पहाटेच्या पहाऱ्यामधीं । अरिहंत नाव घ्यावं । मग पाऊल टाकावं । धरनीमातेवर ॥

चला जाऊ पाहूं । शिरपूर नगर । सका सुमीच्या अधर । अंतरिक्ष महाराज ॥

यथून दिसतो । शिरपुर गांवचा अंबा । माझा नमस्कार सांगा । अतारिक्ष महाराजाला ॥

जाईच्या फुलाचा इनविला दोरवा । पाठविला शिरपुरा । अंतरिक्ष महाराजाला ॥

शिवपुर गावाच्या । येशी कमानीच्या । अंबराई लावनीच्या । अतारिक्ष महाराजाच्या ॥

चला जाऊ पाह्या । शिरपूर देशात । जाई लाविली ऊसांत । अंतारिक्ष महाराजानीं ॥

## जिनमंदिर

मदिरासी जाताना । बोलू नये कोनाला । निते ये जेपाव । नमोकार मंत्राला ॥

जिन मदिरा जाया । आडवा लाग बाग । फुल मला तोडूं लाग । जाई मोगऱ्याचे ॥

जाई मोगऱ्याचा । वास येतो मंदिरांत । हार परभूच्या गळ्यांत ॥

जिन मदिरात । येळा लवगाचा सडा । इंद्र आले वाट सोडा ॥

जिन या मंदिरात । आता पंडित पढती । तेल सेंदुर चढती । क्षत्रपाळ महाराजाला ॥

जिन या मदिरात । पंडितांचा मेळा । वळखू आला गळा । माझ्या ये बाळाचा ॥

जिन या मंदिरात । पडिल किती गोरे । पोथीचे पिवळे दोरे ।।
जिन या मंदिरात । वास कस्याचा येतो । लवगच जाग्व देतो ।
क्षत्रपाळ देवाला ।।
जिन या मांदिराचे दारीं । साडलं चेरुपान । आग्रह देल नेनत्यानं ।
भाई राजसानं माझ्या ।।
मोठे मोठे लोक । चालले इदुराला । भाव आला सेंदराला ।
क्षत्रपाळ महाराजाच्या ।।

## केशरी महाराज

चला जाऊ पाहू । धुळेगावची चिंच । दयाळाचा वाडा उंच ।
केशोरी महाराजाचा ।।
चला कीं पाहू जाऊं । धुळेगांवची दिंडी । केसर चढे सव्वा खंडी ।
केशेरी महाराजासी ।।
बावाजी महाराजाच्या । दर्शना काय नेऊ । केशराची प्रीति बहू ।
केशेरी महाराजाला ।।
आठा दिवसा सोमवारीं । कापुर लावून साखर वाटी । धुळेगावची
भक्ति मोठी । केशरीय महाराजाची । माझ्या बाळाला ।।
चला ग पाह्या जाऊ । धुळेगावचा महिमा । त्याह्यला सवा
खंडीचा गहिना । केशरी महाराजाला ।।
पहाटच्या पाहाऱ्यामधें । वरि सुटले मजुळ । दह्या दुधाची आघुळ ।
केशरी महाराजाची ।।

## नवागड

पहिली माझी ववी । अरिहत चांगल्याला । हवा केली बगल्याला ।
नेमीनाथ महाराजाच्या ।।
नवागडावरी । कोन बसलेत रुशी । नव्या बांधिल्यात येशी ।
नेमीनाथ तीर्थंकरा ।।
नवागडावरी । कोन भाग्याचा नादतो । नित्ते चवघडा वाजतो ।
देवाच्या दरबारीं ।।

नव ये ग गडावरी । कोन आथरिल आसन । जागा केली पसन्त ।
नेमीनाथ महाराजानीं ॥
यथून दिसत । उखळदगांवच आखरं । नवं येशीला शिखर ।
नेमीनाथ महाराजाच्या ॥
चला ग पाह्या जाऊ । उखळद गांवचा महिमा भारी ।
अग्या लेले जरतारी । नेमीनाथ महाराजाला ॥

## पार्श्वनाथ

गधनाल्यापासून । सितानाला वाहे । शेवटीं राजा हाये ।
पार्श्वनाथ महाराज ॥
मंदिरात जातवळीं । नाहीं यकलीचा लाग । चरनावरी नाग ।
पार्श्वनाथ महाराजाच्या ॥
मुक्तिगिराला जाऊं । देव पार्श्वेश्वर पाहूं । साडे तीनशें कोडी मनीं ।
गेल्या मोक्षाच्या भुवनीं ॥

## पद्मावती

चला ग पाहे जाऊं । माते पाद्मिनीचा वाडा घर । जाऊन बसन घडीभर ।
हारदी कुरवासटी ॥
मदिरात जाया । दुपार कलली । जाई वटीला खुलली ।
माते या पद्मिनीच्या ॥
चला ग पाहया जाऊ । देवा धनेस्याची खोली । पद्मावती झोंपी गेली ।
सोन्याच्या पलगावरी ॥
आता उजेड पडला । धनेंद्राचे माडीचा । लालपदर साडीचा ।
माते या पद्मिनीचे ॥
माते पद्मिनीचा । डाव्या बाजूला वाडा । पाल्यावरी केवडा ।
क्षत्रपाळ महाराजाच्या ॥
वळठीन धुन धुते । पद्मावतीची शाल । सर्व गंगा झालीं लाल ।
तिचे पदरीं गुलाल ॥

वळठीन धुनं धुती । पद्मावतीचं पातळ । पानी गंगचं निथळ ।
वाळू घातल सूर्येथळ ॥
माझ्या ग अगनात । हत्तीची दावनी । आली हुमशीची पाव्हनी ।
माते ही पद्मिनी ॥
हुमसाची पद्मावती । पावली येका दोघा । चला जाऊं जिवलगा ॥
चला पाह्या जाऊं । देवा धनेंद्राची खोली । पद्मावती झोपी गेली ।
फुलाच्या शेजवरी ॥
चला पाह्या जाऊं । देवा धनेंद्राचं घर । आरसे लावूं चहूफेर ।
माते पद्मिन ॥
चला पाह्या जाऊं । माता पद्मिनीचा वाडा । डाव्या बाजूला
केवडा । देव क्षत्रपाळ ॥
वसईच्या दारीं । पद्मावती लाडकी । वहनासग पालखी ।
ऐसी मिरवती ॥
माझ्या दारावुनी । हत्तीची मिरवन । जडिताच सिंहासन ।
माते या पद्मिनीला ॥
माझ्या दारावुनी । हत्ती गेले दहा बारा । पालखीला इंजन बारा
मातेया पद्मिनीच्या ॥
वसईच्या दारीं । पद्मावता बसन । तिला गरदी सोसन । हळदी
कुकवाची ॥
वळठीन धुन धुती । पद्मावतीची साडी । वास गेला झाडोझाडी
देशात कापराचा ॥
अशात कापराचा । वास गेला झाडोझाडी ॥

## गोमटस्वामी

चल की पाह्या जाऊं । गोमटस्वामी उच । शिड्या लावून अभि-
षेक । करती जईन श्रावक ॥
चला पाह्या जाऊं । गोमटस्वामी दिगबरा । येका नखावरी तेरा ।
सेंडीचे नारेळ ॥
चला की पाह्या जाऊ । गोमटस्वामी राया । पडेना त्याह्यचीं
छाया ॥

देवामधें देव । गोमट हिरा ॥ यका नखावर तेरा ॥ शेंडीचे नारेळ ॥
चला ग पाह्या जाऊं । गोमटस्वामी हिरा । त्याह्यच्या येका नखावरी । नारेळ तेरा ॥
चला ग पाह्या जाऊं । गोमटस्वामी उंच । शिड्या लावून अभिषेक । करतील श्रावक ॥

## संकीर्ण

सिखरजी पहाड । चढता चढन । पहिले यौगीची वदन्या । आदीनाथ महाराजाची व्हईन ॥
चला ग पाहे जाऊं । राजगिरीचे पहाडाला । झरे सुटले माळाला । गरम पानीयाचे ॥
चला ग पायी जाऊ । हिरव हिरव रान । हवेलीला सूर्येपान । बाबाजीये महाराजाचे ॥
पापापुरीची वसई । तळ्यामध्यें वसई । महावीर स्वामीची ॥
जाईच्या फुलांचा । हार गुंफिते येगळा । देवाच्या दर्शनात । जीव लागला सगळा ॥
पहिली माझी ववी । देवाईधरमाला । गुरुजीच्या चेरनाला । माझा नमस्कार ॥
सोन्याच फुलपात्र । मोत्यानं भरीन । गुरुला दान केल ॥
वसईच्या दारीं । कोन वाचीतो पुरान । गळा सारगीपर्मान ॥
जाईच्या फुलाचा । इनवीते दुपाटा । पाठविला रामटेका । शांतीनाथ महाराजाला ॥
शिखरजीचा पहाड । रेघाया अवघड । दुरुनी हात जोड । चोवीस टेकीला ॥
पखालीच पानी । जातें हें कोन्या गल्लीं । नवी बांधिली हवेली । शांतीनाथ महाराजाची ॥
यथून दिसती । डिग्रस गांव हिरवं रान । हवेलीला सूर्येपान । बाबजी महाराजाच्या ॥

बळीभद्र स्वामी । आन्तापुरीं आले । रूप दाखविले जैन धर्मा ।।
काळी चन्द्रकळा । पदरी पद्मावती । वडील देसाई । जितुराला ।
गेले रार्ती ।।

## शिरडगांव

ऊसाचा ऊंसमळा । पानानं गजबज । शिरड हें ग गाव ।
मल्लीनाथ महाराजाच ।।
पाहटच्या पहारात । वारा सुटते मंजुळ । दह्यादुधाची आबुळ ।
मल्लीनाथ महाराजाची ।।
हें तर शिरडगाव । जइनाची काशी । नाव त्याच देशोदेशीं ।
मल्लीनाथ महाराजाच ।।
पहाटेच्या पहाऱ्यामध्यें । दह्यादुधाचा लोंढा वाहे । प्रा:तकाळीं
राजा नाहे । मल्लीनाथ महाराज ।।
अरिहंताच नाव । कठीच कारल । हुरदी वागविलं । मल्लीनाथ
महाराजाच ।।
अरिहताच नांव । खडीसाखराचा खडा । दुसरा दूध पेडा ।
मल्लीनाथ महाराज ।।
देवाच्या दर्शनाचा । मला नाहीं आळस । शिखरीं सोन्याचा कळस ।
शिरडीच्या मंदिराचा ।।
शिरड गावामधें । केवड्याला काय उनं । दरवाजाला चांदीसोनं ।
अतरिक्ष महाराजाच्या ।।
मंदिरा जाया । पायरी पाषानाची । आवड मला दर्शनाची ।
मल्लीनाथ महाराजाच्या ।।
शिरडगाव । राहनीला नाटक । रस्त्यामध्यें बयठक । मल्लीनाथ
महाराजाची ।।
जाई या मोगऱ्याचा । वास येतो मंदिरात । हार प्रभूचे गळ्यात ।
मल्लीनाथ महाराजाचे ।

## तीर्थंकर नेमिनाथ

पहिली माझी वई । जातीयाच्या फेरी । उभे हाती गिरीनारीं ।
नेमीनाथ महाराज ॥

पहिली माझी वई गायीली येकल्याला । शिवादेवीच्या लेकाला ।
नेमीनाथ तीर्थंकराला ॥

हळदीचा डाग । राजीमतीला लागला । नेमी गेलेत तपाला ।
गिरिनारीच्या पहाडा ॥

चला ग जाऊ पाहू ।-गिरीनार पहाडाला । राजीमतीच्या महाला ।
आहेत सोन्याच कळस ॥

गिरनारी पहाडावरीं । करवदाच्या जाळ्या । चालल्या लेंकुरवाळ्या ।
नेमीच्या दर्शनाला ॥

गिरनारीया पहाडाला । हे ग साडले आवळे । तपा गेलेत सावळे ।
नेमीनाथ महाराज ॥

राजीमतीबाई नेमीसग तपा गेली । इन हळद धुतली ।
गिरनारी पहाडाला ॥

गिरनारी पहाडावरी । सोन्याचं भवलं । नाहीं लगन लागल ।
राजीमतीईच ॥

हळदीचा डाग । राजीमतीच्या शिरीं । नेमीच्या बराबरी ।
तपाला गेली ॥

पहिली माझी ववी । अरिहंत देवाजीला । नेमीचं राज्य ।
राजीमतीबाईला ॥

गिरनारी पहाडाला । केली दगडाची उशी । राजामतीबाईला ।
झोप लागून गेली कशी ॥

पहिली माझी ववी । नेमीनाथाला गायिली । राजीमतीबाई ।
शेसे बनांत राहीली ॥

●●●

-१० सग्राहिका : सौ. निर्मला धारप

# मंगळागौरीचीं गाणीं

## १

### लाडू झिम्मा खेळतेवेळीं म्हणावयाचें गाणें

ध्या घ्या कुऱ्हाडी । चला जाऊ वऱ्हाडीं
चंदनी लाकडं तोडायला । तोडायला ।
गणपती देऊळ बांधायला । बांधायला ।
गणपतीच्या देवळात गजानन वसे । गजानन वसे ।
आली आली पार्वती टाकील फासे । टाकील फासे ॥

## २

### गोफ खेळतेवेळीं म्हणावयाचें गाणें

गोफ विणू बाई गोफ विणू ।
अर्ध्या रात्री गोफ विणू ॥
गरे खा गरे । पोटाला बरे ।
न खाईल त्याची म्हातारी मरे ।
मेली तर मेली । कटकट गेली ।
ससाराला मोकळीक झाली ॥
गोफ विणू का गोफीण विणू ।
गोफ विणू बाई गोफ विणूं ॥

## ३

अग अग सूनबाई । काय म्हणतां सासूबाई ।
माझ्या पाटल्या केल्यास काय । केल्यास काय ।
भावाच्या मुजींत आईला दिल्या । आईला दिल्या ॥
अग अग सूनबाई । काय म्हणतां सासूबाई ।
माझी नथ कुठें ठेवलीस । कुठें ठेवलीस ।
भावाच्या लग्नांत वहिनीला दिली । वहिनीला दिली ॥

याप्रमाणें सर्व दागिन्यांचीं नावें घेऊन हें गाणें दोन बायकांनीं म्हणावयाचें असतें.

४

तू रडतेस का गे बहिणी । तुला काय केलें कोणीं ।
तुला काय सागूं दादा मी । माझी घागर गेली बुडुनी ।
माझी नथ घेरे दादा ।माझी घागर दे काढुनी ।
तुझी नथ नको गे बहिणी । तुझी घागर गेली बुडुनी ।।
माझा चद्रहार घेरे दादा । माझी घागर दे काढुनी ।
तुझा चद्रहार नको गे बहिणी । तुझी घागर गेली बुडुनी ।।

याप्रमाणें बहिणीनें सर्व दागिने घे म्हणून झाल्यावर शेवटीं ——

माझें काळीज घेरे दादा । माझी घागर दे काढुनी ।।

असें म्हणावयाचें, त्यावर भाऊ म्हणतो——

तुझें काळीज नको गे बहिणी । तुझी घागर देतो काढुनी ।।

हा खेळ दोन बाजू करून खेळावयाचा असतो.

५

खुर्चीं का मिर्चीं । जाशील कैशी ।
सासूबाई मारतात । बर करितात ।
दीर रागावतो । बर करितो ।
नणद बोचकारते । बर करीते ।
मामजी मारितात । बर करीतात ।
जाऊबाई बोलवतात । बरं करीतात ।।
खुर्चीं का मिर्चीं । जाशील कैशी ।।

६

लाटा बाई लाटा । कणकेचा बोटा ।
मामानीं दिला मला चादीचा पेटा ।।
लाटा बाई लाटा । चदनी पेटा ।
मामानीं दिला मला सोन्याचा लोटा ।।
आई मी लहान । केतकीच पान ।
मामाला साग मला कंबरपट्टा आण ।।
एक सू सूं । दोन सू सूं ।
आपण दोघी मैत्रीणी साड्या नेसू ।।

• • •

११ संग्राहक—श्री. दा. गो. बोरसे

# बेळगांवी गाणीं

## १ कृष्णदेव

जन्मीले कृष्णदेव झाला गोकुळीं आनद
हात्तीवर साखर वाटीतो राजा नंद.
जन्मीले कृष्णदेव सर्व गोकूळीं दिवे लावा
सावळें त्याचें रूप मामे मावशाला दावा.
जन्मीले कृष्णदेव झाली गोकूळीं आरोळी
बोलतो कंस मामा देवकीला बंदीशाळीं.
मारीले कंसमामा रक्तीं भरविल्या तलवारी
बोलती कमलजा मासा नाहीं माझा वैरी.
मारीले कंसमामा रक्तीं भरीले बाण
बोलती कमलजा मासा नाहीं तो दुष्मन.

## २ हिंदोली गीत

जजरी वारा सुटला ग
अंजनी वारा सुटला ग
भाऊच्या धक्क्याला हिरवी हिरवी बत्ती
उजेड वारा कोसाला
जंजरी वारा सुटला ग.
राही रुखमिणी या दोन्ही बहिणी
बसून घालती वेणी ग
जजरी वारा सुटला ग.
जाई चमेली फुलाचा गजरा
शोभतो हार साजरा ग
जंजरी वारा सुटला ग.

## ३

### अंगाई

अगऽ तान्ह्याचे आई, बोल सुताराचे बाई
तुझा भरतार पाळणा देईना, बाळ राजाला झप कशी येईना.
अगऽ तान्ह्याचे आई, बोल सोनाराचे बाई
हातकडा पायकडा भरतार तुझा देईना, बाळराजाला झप कशी येईना.
अगऽ तान्ह्याचे आई, बोल शिपीयाचे बाई
आगडऽ टोपडऽ भरतार तुझा देईना, बाळराजाला झप कशी येईना.
ऊठ तान्ह्याचे आई, बोल वाणीयाचे बाई
तुझा भरतार खाऊ कांहीं देईना, बाळराजाला झप कशी येईना.

## ४

### नागपंचमी

उठा उठा नदू रायाजी,
आपल्या शिवार्शी चोर आले जी
आपल्या गाईचे कळप नेले जी.
गरगर गाठ्याचा
चौक मोत्याचा
पिकल्या पानाचा
रस गाळीला, देश बुडविला.
उठा उठा नदू रायाजी,
तुमच्या शिवार्शी चोर आले जी
तुमच्या म्हशीचे कळप नेले जी
तुमच्या बकरींचे कळप नेले जी
तुमच्या मेंढीचे कळप नेले जी
तुमच्या बैलाचे कळप नेले जी.
उठा उठा नदू रायाजी
आपल्या शिवार्शी चोर आले जी.

५

## हिंदोली गीत

चाफ्याच्या झाडाखालीं उभा ग भाऊराया
जमल्या आया बाया काय बाई
दिंडी ग लुगड्याच्या भाऊच्या हातामधीं
बहिणी म्हणे नादी काय बाई.
रेशमी खण फाडी आई ग घेई साडी
मावशी घाली घडी काय बाई.
मिराणी जाडीजुडी रुतती माझ्या पोटीं
ध्यावी ही पिवळी घडी काय बाई
आई घे माझ्यासाठीं करंडे कुंकवाचे
मणी ग सोनीयाचे काय बाई
गांठून देता नथ सोन्याचें मंगळसूत्र
आईचे भरले नेत्र काय बाई.
पंढरपूरची फणी माझी ग घाल वेणी
आम्ही ग दोघी बहिणी काय बाई.
पैठणी येवल्याची नेसता हरीख वाटे
माहेर माझें मोठें काय ब.ई.

[ निवेदक—श्री. शेवताबाई शिंपी. ]

६

## बुरुडीण

अगऽ बुरुडीन बाई, तुझा बुरुड कोठें गेला ?
माझा नवरा वेळू बना. वेळू तोडिले तोडीले
वेळू धरणीशीं पाडीले. दुरडी बनविल्या
नेल्या मनमाड पेठाला. अग नवऱ्याचे आई
बोलव तुझ्या जावाभावा दुरडी उघडूनी पाही
आमची वरमाई रंभा.

१५१७ ग्रं. क्र.

खिडकी पेरीला डवना माळ्या उगल का नाय रे.
दादा गेले कराची बंदरा लवकर येतील कीं नाय रे ?
वेलाचे जोड आणतील कां नाय रे? वेलांचा संभाल पोरी करशील काय ?
वेलाचा मोल तूं सागशील काय ? सूरग्याचे मोती गुंजाचा भार
दारूच्या पेला सर्वांचा मार. खिडकी पेरीला डवना
माळ्या उगल कां नाय रे.

८

## ' मिरुगची वई ' ( मृग नक्षत्राचा पाऊस )

आज उठा दल बादल पाऊस पडे कि मुलखावर.
हवा सुटली फार मिरुगाची लागली धार.
मिरुग धरस उतरे खालीं सावली पतिवर्ता रे सिता माउली.
पावसाळा लागला महाधारी डोले पपया मानकरी;
उडीद मुंग आले खेतावरी संगें घेऊन दल बादल
लंकेंत राम गेला रघुवीर देव बर्म्या बोले मिरुग पाणी घेऊन चाले.
मिरुग धरे की उन सावली पतिवर्ता सिता माउली.
संगें घेऊन दल बादल लंकेपुरी गेला रघुवीर.
यानें रावण मारूनी सीता आणली सोडूनी.
दारीं पडे रे तुळशी सावली पतिवर्ता सिता माउली.

• • •

१२ संग्राहिका—सौ. मालतीबाई दांडेकर

## रुखवत

पहिली दुरडी फुलाचा हार । इवाही भेटला मनहार ।।
दुसरी दुरडी भाताची । नवरा नवरी गोताची ।।
तिसरी दुरडी केळाची फणी । रुखवत उघडत्यात नवऱ्याच्या
बहिणी ।।

चवथी दुरडी साखर सोजी । रुखवत उघडते नवऱ्याजी आजी ।।
पाच दुरडी साखरशाई । रुखवत उघडते नवऱ्याची आई ।।
सहावी दुरडी पानाची । चुलती रुसली मानाची ।।
सातवी दुरडी सातवुन बसली । रुखवत उघडाया चुलती उठली ।।
आठवी दुरडी बुदिच लाडू । रुखवत उघडल्यात नवऱ्याच शाडू ।।
नववी दुरडी नऊखंड ताजा । रुखवत उघडते पाहिला नबर माझा ।।

## रामलंकेची कथा

रामलकेची कथा सागता पाय एक मजबूत ।
चोरून नेली सीता सीतेपायीं राम गेल हुतं ।।
आई रानामधीं गुंफा बाधली बिकट जगलांत ।
सुवर्णाचा होऊन मृग फिरे गुफेभवतं ।।
सीता बोले रामास स्वामी पाय की प्रीत ।
ह्योच मृग मारून कचुकी शिवावी तुरुत ।।
मृगापाठीं लागुन गेले तवा रघुनाथ ।
एक वन ओलाडून गेले तिसऱ्या वनांत ।।
तो मृग मारून राम झाले यशवत ।
कपटी जात रावणाची, तयाची कळना हिकमत ।।
झोळी चिमटा घेऊन तयाच्या पताक बगलेंत ।
भिक्षा भिक्षा करीत हारुळ्या मारी रानात ।।
धर्माचं साकड सीताबाईला पडल हुत ।
सुवर्णाच सूप घरामंदीं, वर करी हात ।।
वर करी हात घातली झोळीच्या आत ।
दुरून पाहिली गुफा गुफा दिसते ओसाड ।।
कुऱ्या झाडासंग रामान केल अवघड ।
वासुऱ्यामधीं 'राघुबापू' हमेष गातात ।।

[ वासुदेवाचें गाणें ]

• • •

१३ संग्राहिका—सौ. इंदुबाला ढेरे

# ओव्या

झाल्या तिन्ही साजा जाऊ नको दूर दूर ।
होईल दृष्ट तुला लावू नको हुर हुर ॥ १
झाल्या तिन्ही सांजा गाई आल्या गजरानीं ।
तान्हे बाळ झाका पदरानीं ॥ २
झाल्या तिन्ही साजा पारिजात फुलला ।
अगणात हिरा माझा गोड बोलला ॥ ३
झाल्या तिन्ही साजा अशी साजाई फुलली ।
बाळ राजाच्या वाड्यात लक्ष्मी बोलली ॥ ४
झाल्या तिन्ही साजा गाई येती घरोघरीं ।
रागत आला राजा झाली थोडी अगण ओसरी ॥ ५
तिन्ही साजा झाल्या वारा वाहे थडगार ।
रागत आला हिरा हा बंड फार ॥ ६
झाल्या तिन्ही साजा दिवा लावा तुपाचा ।
उजेड पडला लक्ष्मीच्या रूपाचा ॥ ७
झाल्या तिन्ही साजा वारा वाहे झराझरा ।
दृष्ट होईल राजसाला जावळ उडे भुरभुरा ॥ ८
जगी भवऱ्यानीं बाजार झाला लाल ।
बाळाला माझ्या घेवून देतें चल ॥ ९
उनाड माझा राघू नको करू शिव्यागाळी ।
शेजारीणबाई सभाळ आपल्या डाळीसाळी ॥ १०
शेजी आला घरा पाट देतें बसायाला ।
बाळाच्या माझ्या खोड्या पुसायाला ॥ ११
विहीण परीस बाळंतीणीचे सोहाळे ।
बाळतीणीचे सोहाळे पाय नित्याचे पिवळे ॥ १२

ओली हळद वाळती दारामध्यें ।
वाळती दारामध्यें बाळंतीण घरामध्यें ॥ १३

बाळतीणीबाई बारा दिवस झाले तुला ।
पुत्राचं काय नाव सया पुसताती मला ॥ १४

नवरीच्या बापाचं गेलं शहाणपण वायां ।
पोटीच देवूनी पडे सोयऱ्याच्या पायां ॥ १५

मामा माडी पाट मामी घाली रागोळी ।
अण्णा तुझं कौतुक करी आजोळी ॥ १६

सासूपेक्षां सून मोठी आगोचर ।
गंगा वाहे स्थिर प्रवरेला आला पूर ॥ १७

आला यमुनेला पूर पाणी गेलं दूरी ।
माझी सासू नव्हती घरीं धुण राहल हौदावरी ॥ १८

लक्ष्मी लक्ष्मी हांक मारी तुझा सासरा ।
दिवा लावूनी आवर भांड्याचा पसारा ॥ १९

सासूरवाशीण जसा मोटेचा बैल ।
विमलबाई माझी रात्रीं विसावा घेईल ॥ २०

परक्या पुरुषापाशीं मागूं नये कात चुना ।
आम्ही बाई गृहस्थाच्या सुना ॥ २१

दुधापरीस साईला फार गोडी ।
तुझी माझी बाळपणीची जोडी ॥ २२

आपण गुज बोलूं गुजाच्या गुजरणी ।
ल्हानपणीच्या मैत्रीणी ॥ २३

मैत्रीण विचारीते तुला भाऊ किती जण ? ।
उत्तर देती चंद्र सूर्य दोघे जण ॥ २४

१४ संग्राहिका—कु. विमल तपस्वी

# मंगळागौरीच्या खेळांचीं गाणीं

## कीकीचें पान

कीकीचें पान बाई कीकी । सागड मासा सूं सूं ।।
आल्या ग बाई गुजरणी । कापूस घ्या ग पिंजरणी ।।
कापूस आमुचा सोन्याचा । कीकीचें पान बाई कीकी ।।

## कीस बाई कीस

कीस बाई कीस दोडका कीस ।
दोडक्याची फोड लागली गोड ।
आणीख तोड बाई, आणीख तोड ।

## साळुंकी साळकी

साळुकी साळकी । तुझी माझी पालखी ।
पगडा फूं बाई, पगडा फू ।।
गेलें होतें विहिरीं । विसरलें दोरी ।
पगडा फू बाई, पगडा फूं ।।
गेलें होतें शेता । विसरला कोयता ।
पगडा फू बाई, पगडा फू ।।
गेलें होतें आडा । विसरला घडा ।
पगडा फूं बाई, पगडा फूं ।।

## दंडफुगडी दंडाची

दंडफुगडी दंडाची । बाई माझी पिंडाची
पिंडावरुन जाईन ग । पाच पान खाईन ग
दिवाळीला बोली केली । दसऱ्याला येईन ग
दंडफुगडी दंडाची ।।

१५ संग्राहक—पं. महादेवशास्त्री जोशी

# गौरीस्वयंवर

## [ प्रसंग पहिला ]

पहिलें दडवत देवा लंबोदरा । मग वंदियले शारदा सुंदरा ।
गुरुप्रसादें गाईन गौरीहर । श्रोते सावधान कथा अवधारा ॥१॥
पर्वतांचा राजा हिमालयगिरी । त्यासी उपमा नाहीं पृथिवीवरी ।
जैसा कनकाचा मेरु म्हणू जरी । तळीं हो पुरता विस्तारला वरी ॥२॥
असे संतती संपत्तीचा सागर । नवही चुंबित ध्वजा वरी कल्पोत्तर ।
नवही रत्नें माणिकें पाषाणीं गंभीर । सप्त धातु शृंगी आणिक भंडार ॥३॥
अष्ट कुळाचळीं कैसी ग्रावी सरी । एकालागीं एक दिशा अधिकारी ।
याचे परिवार सकळ हे गिरी । तोच शैलपति नांदे पृथिवीवरी ॥४॥
अहो येथुनी आरंभिलें गौरीसैंवर । गात्या-आईकत्या रमे मनोहर ।
दक्षाचिये कुशीं उपजली शक्ति । नाव दाक्षायणी पुराणीं बोलती ॥५॥
पूर्वी शंकराला त्यानें दिली होती । यज्ञाकारणें माहेरा आली प्रीतीं ।
शिव नंदीला पितयानें तेच काळीं । निंदकाच्या वीर्यें स्वयें उपजली ।
म्हणुनी अग्नीकुंडामाजीं गुप्त झाली । त्याच हिमवंता पोटीं जलमली ॥६॥

## [ प्रसंग दुसरा ]

काय वर्णू हिचें लावण्य चांगलें । हिच्या रूपालागीं जगत्र आटिलें ।
वेदीं वाखाणीतां मुख पल्लाटलें । इथें मंदमति काय बोल बोले ॥१॥
ती नवरी अनुपम दिसे शैल्यबाळी । त्रिभुवनीं लावण्याची शोभा झाली ॥ध्रु.॥
मुख देखुनी चंद्रासी लाज वाटे । नेत्र विशाळ साजिरीं नासापुटें ।
अधरीं पाहतां अरुणप्रभा भेटे । दंत हिरे झळकती तेज मोठें ॥२॥
गुड गुल्फ केस सुकुमार चांचरे । वाग्या कठिण उत्तम रातोत्पलें ।
मानस सरोवर जैसें हृदय दिसे । माजीं हेम कमळकळी कुच तैसे ॥३॥

केश सुकुमार सोनिळ चाचर । मुक्ताशुक्ति ऐसे श्रवण पातळ ।
कंठ साजिरा दिसताहे वर्तुळ । दंड बाहू हृदय आरक्त कर्दळ ॥४॥
मध्य देखुनी केसरी हेवा करी । कटिप्रदेशाची पहा केंवी सरी ।
जघन वर्तुळ जंघा शोभते अंतरीं । कासे पीतांबर वेष्टिला परिकरीं ॥५॥
ब्रह्मा विष्णु इंद्र वंदिती सकळ । हिच्या मुगुटावरी प्रभेचा झळाळ ।
नखीं चंद्ररेखा शोभती अंगुली । राजहंस तिची शिकावया चाळी ।
चतुरपण मागावया रति आली । तिथें सरस्वती बोल्ह विसरली ॥६॥
ऐशी सामुद्रिकें सर्वांगीं संपूर्ण । तिच्या गोरेपणा भाळों सुवर्ण ।
अग्नीमाजीं तप मांडिलें दारुण । तप झाल्यावरी वाखाणिती जन ॥७॥

## [ प्रसंग तिसरा ]

हिमवतरायें केल्या तपराशी । कन्यारूपें शक्ति उपजली त्याशी ।
झाली उपवर प्रिय प्राणवसी । मनीं विचारीतो देऊं कवणाशी ॥१॥
ते सभेसी प्रधानासी पुसतसे राव । अंबेसाजे ऐसा वर विचारा हो ॥ध्रु.॥
दोन्ही कर जोडूनी विनवीती प्रधान । म्हणती कन्यारत्न नव्हे हें सामान्य ।
हिच्या रुपातुल्य वर नाहींसे कोण । चंद्र म्हणाल जरी कृष्णपक्षीं क्षीण ॥२॥
कश्यपाचा सुत सूर्य म्हणू जरी । हिंडे वायुचक्रीं एकला अंबरीं ।
त्याशीं सावकाशी नाहीं क्षणभरी । अस्त उदयातें पावे निरंतरी ॥३॥
इंद्र बरवा म्हणू कैशीं अंगीं भगें । परदारी ऋषी श्रापीयेंला रागें ।
त्यानें छेदीयेली पर्वताचीं शृंगे । त्याचे सोहिरीके कैसें मन रंगे ॥४॥
ऐसा सभेमाजीं करिता विचार । तिथें पातले ते नारद सत्वर ।
रायें उठूनिया केला नमस्कार । आसन देवूनिया मांडिले ऊपचार ॥५॥
मधुपर्कें पूजा रायें शीघ्र केली । मग विनविलें जोडुनी अंजुळी ।
कोठुनि येणें झालें स्वामी कृपा केली । धन्य आजी दिन भेटी आम्हा झाली ॥६॥
तुम्हा चौदा भुवनें आहे जी गमन । सदा वसतसे तुमचे हृदयीं ध्यान ।
आम्हा कुळीं एक आहे कन्यारत्न । हिच्या रूपा तुल्य वर सांगा कोण ॥७॥
इतुकें आइकूनी वदले नारदमुनी । आपली कन्या ऐशी नका धरू मनीं ।
हा तो आदिमाया त्रैलोक्यस्वामिनी । एवढा प्रपंच हा झाला इसपासूनी ॥८॥

## [ प्रसंग चवथा ]

कोण म्हणाल जरी वैकुंठीचे हरी । रूपें मेघश्याम पितांबर धारी ।
शंख चक्र गदा पद्म वाहे करीं । सुकुमार शेषावरी निद्रा करी ॥ १ ॥
त्या नारदें रायाप्रती सांगितला वर । हाचि जोडेल जरी तुमचें भाग्य थोर ॥ध्रु.॥
लक्ष्मी चरणसेवा निरंतर करी । त्याचें आरूढन गरुडस्कंधावरी ।
त्याचा वास क्षीरसागरा माझारीं । रक्षी शरणागता भक्तांचा कैवारी ॥ २ ॥
ध्वज वज्रांकुश सामुद्रिकें पाहीं । जंघा वर्तुल तोरड्या गरजती पायीं ।
कासे पितांबर विजू जैसा पाही । कटीं माणिक सुत्रें रचिलीं ठायीं ठायीं ॥३॥
गळां वैजयंती कौस्तुभ झळाळी । श्रीवत्सपदक शोभे वक्षस्थळीं ।
मुखीं मंदस्मित मृगनाभि भाळीं । शिरीं मुकुट श्रवण शोभती कुंडलीं ॥४॥
यज्ञ पृथिवी धर्म गाई द्विज पाळी । भजती त्याचे जन्म-मृत्यु टाळी ।
आम्हा विचारिता हे या ब्रह्मगोळीं । एक नारायण दुजा चंद्रमौळी ॥५॥
सागरानें कन्या विष्णूप्रती दिली । शिव नवरा ऐशी मात आइकिली ।
त्यासी देई कन्या न धरीं संशय । शुद्ध दिन आजि करा का निश्चय ॥६॥
ऐशी आयकोनी नारदाची मात । राजा म्हणे स्वामी बोलती उचित ।
परि या अंबिकेचें शिवतत्वीं चित्त । तिशीं मानलिया देऊंजी विश्रांत ॥७॥

## [ प्रसंग पांचवा ]

अंबा शिवतत्वीं वितरली जरी । शिव निर्विकारी कैसा अंगीकारी ।
शब्द निश्चयाशीं नये क्षणभरी । आलिंगन देता बहु पळे दुरी ॥१॥
तो नारद सांगतसे शिवाचीं दूषणें । अंबे आइकिल्या होतातीं भूषणें ॥ध्रु॥
घेता चुंबन अधरीं रुची नाहीं । अंगीं परिमळ न लागे जो काहीं ।
भस्म उधळण करीतसे देहीं । त्यासी वरिलिया संसारीं सुख नाहीं ॥२॥
त्यासी रहावयालागीं भूमी नाहीं । सदा वसतसे स्मशानाचे ठायीं ।
त्याची वृत्ति पुसाल तरि मी सांगू कायी । भिक्षा दारोदारीं मागतो प्रत्यहीं॥३॥
त्यासी नेसावया न मिळतें चीर । लोक म्हणताती तया दिगंबर ।
गळा रुंडमाळा वासुकीचे हार । गजचर्म परिधान व्याघ्रांबर ॥४॥
रूपें भव्यांबर बरवा न दिसे काहीं । आठी अवयव सांगताती देहीं ।
लोक म्हणताती—पंचवक्त्र पाही । तीन डोळे त्यासी मायबाप नाहीं ॥५॥

एक म्हणताती कर्पूरा ऐसा गौर । देती उपमा तयासी सिंधुक्षीर ।
कोटी चंद्रक्षीर साधू जैसा खरा । त्यासी निर्धारितां नयेची निर्धारा ॥६॥

त्याणें ब्रह्मेयाचा शिरच्छेद केला । निज श्वशुराच्या घाता प्रवर्तला ।
मायें अविद्येचा घात त्याणें केला । अवघा ब्रह्मगोळ वायाची जाळीला ॥७॥

एकादश रुद्र स्वयें रौद्र झाला । भूतें खेळविता कोपें खवळला ।
महा हळाहळ गिळू जो लागला । कंठीं राहिलें तैं नीळकंठ झाला ॥८॥

इतुकें आइकूनी नारद बोलणें । रायें नारदातें मागुतें विनविलें ।
द्यावी माधवाशी ऐसें चित्ता आलें । आता तरी देऊं तुमच्यानी बोलें ॥९॥

## [ प्रसंग सहावा ]

अंबा सभेआड बैसोनी सादर । ऐके सभेमाजीं वर्तला विचार ।
तों त्या नारदाचें बोलणें साचार । मानूनिया विष्णू निर्धारिला वर ॥१॥
ती अंबिका आईकोनी मनीं दचकली । काय करु ऐसें सखीतें बोलली ॥ध्रु॥
गौरी म्हणे सखी तूं ग प्राणवशी । तरि तू इथुनी मजला घेवूनिया जासी ।
परम शिवपद मज दाखविशी । तरी होतिल तुझ्या उपकाराच्या राशी ॥२॥
सखी म्हणे कां ग उतावीळ होशी । तुजला नेईन मी जिथें तूं सांगशी ।
मान न देशी का पितृ वचनासी । हें तूं मजप्रती सागें विस्तारेशीं ॥३॥
सखी म्हणे विष्णुघरीं काय उणें । विपरीत तुजला सागीतलें कोणें ? ।
गौरी म्हणे वेदाअर्ती काय उणें । हे तू विचारानीं पाहें तेची खूणें ॥४॥
गौरी म्हणे सखे सागतें मी पाहे । युग चौक दहा शतवेळा जाये ।
तों त्या ब्रह्मयाचा एक दिवस होये । तिसा दिशीं ऐसा एक मास लाहे ॥५॥
ऐसा बारा मासीं संवत्सर होये । नव्हे दुश्चित ग अगणित लेखा पाहे ।
शता संवत्सरीं ब्रह्मा पावे लय । लक्ष ब्रह्मे तेव्हा विष्णू घटिका होय ॥६॥
विष्णू बारा ऐसे दोन्ही वेळा जाती । तों त्या ईश्वराची निमिषाची स्थिती ।
माझ्या सौभाग्याची कोण करिल गणती । सखी विचारून दृढ पाहे चित्तीं ॥७॥
शिव वरिलिया अधिक पुण्य झालें । वासनेचें मूळ ठायींच निमालें ।
गौरी म्हणे सखे बरवें त्वा पूशिलें । तुजला सागतें मी ऐक एका बोलें ॥८॥

## [ प्रसंग सातवा ]

ऐसे सखीतें गौरीनें सांगितलें । भ्रांति फेडुनियां समाधान केलें ।
तिचें अंत:करण ईश्वरीं रतलें । दोघी मिळूनीया प्रस्थान आरंभिलें ॥१॥
ती पार्वती सखीसवें वनाप्रती गेली । काया वाचा मनें तपें आरंभिलीं ॥ध्रु.॥
करुनी प्रात:स्नान विभूतीलेपन । लिंगपूजा दंडवत जपध्यान ।
काम क्रोध मोहें विवर्जिलें मन । अधोमुखी करितसे धूम्रपान ॥२॥
देवालयीं सडेसंमार्जन करी । चौक रांगोळीया घाली नानापरी ।
मंत्र पंचाक्षरी वदनीं उच्चारी । करीं रुद्राक्षाची जपमाळ धरी ॥३॥
शिव अष्टोत्तर शत नामावली । दहा शतें जपीतसे नित्यकाळीं ।
वातपर्ण जळ कंदमूळ फळीं । क्षुधानिवारण करीते वेल्हाळी ॥४॥
पार्वतीचें तप वाढलें अद्भुत । पंचमहाभुतें जाहलीं संतप्त ।
देवगण ऋषी झाले भयभीत । ब्रह्मा विष्णू कूर्म शेष चिंताक्रांत ॥५॥
स्वर्गीं देवराया गुरुप्रती पुसे । कां हो ब्रह्मगोळ तापलासा दिसे ।
शिव तिसरा नेत्र उघडीला असे । नकळे मंडळी काय वर्तलेंसें ॥६॥
गुरु सांगतसे सुरपतीपुढें । हिमाचळीं गौरी तप करी गाढें ।
शिव भ्रतार पाविजे या निक्षोडें । शिव निर्विकारी प्रपंचीं न पडे ॥७॥
ह्यासी काय उपाय ऐसें इंद्र पुसे । कन्यारत्न शिव अंगीकारी कैसें ।
येरू म्हणे कामा धाडा ह्या उद्देशें । त्याणें विंधिल्या तो वरिल अनायासें ॥८॥

## [ प्रसंग आठवा ]

मदनाची राणी रती आली होती । तुम्ही न जावें त्या भूमंडळाप्रती ।
शिव कोपलिया करील विभूती । एवढा माझा शब्द तुम्ही धरा चित्तीं ॥१॥
तो मदन शिवाप्रती देवें पाठविला । वनीं शोभला तो वसंत पुढें झाला ॥ध्रु.॥
पंचबाण तेथें पातला त्वरित । सर्व वनिताचा मेळा अगणित ।
त्याच्या अंगीं वाढला अद्भुत । पाहिलें वय त्याचें अति अप्रमित ॥ २ ॥
त्याणें पुष्पजाती फुलविल्या बहुत । तेथें कोकिळेचा स्वर शोभे मंजुळ ।
भ्रमर झेपावुनी सेवीताती मधू । परिमळ घेवूनीयां संतोषले शिवू ॥ ३ ॥
सर्व अलंकार हेममय दीसती । चिरें सपूरती नेसल्या अति प्रीतीं ।
कुंकुम केशरें त्यावरी शिंपीताती । त्याचे अवयव प्रगट दिसती ॥ ४ ॥

एक समस्वरें करीती गायनें । एकवीस मूर्च्छना धरीताती स्थानें ।
वीणा टाळ श्रुती मृदंग नाचणें । थैयै नाचताती इंद्रियें दाखविणें ॥ ५ ॥
वसंताचा खेळ देखोनिया डोळा । गौरी वरावया शिव पुढें झाला ।
तंव गौरीमागें कंदर्प देखिला । म्हणे कोपुनिया इथें कैंचा आला ॥ ६ ॥
त्याणें मग वर मोकलीले बाण । स्थिर चंचळ तें केलें अंतःकरण ।
शिवें उघडीला तृतीय नयन । कोपें भस्म केला रतीचा रमण ॥ ७ ॥
पूर्व ध्यान स्थिती ईश्वर बैसले । भाव भक्तीवीणें देव कैसा पावे ।
युक्ति प्रयुक्ति ईश्वरीं न चाले । म्हणुनी गौरी उग्र तप आरंभीलें ॥ ८॥

## [ प्रसंग नववा ]

जप तप श्रुत अदृश्य हो झालें । पहा पार्वतीनें इतुकें हें केलें ।
कर जोडुनिया उभी काय बोले । नका उपेक्षा करूं तुम्हा शरण आलें ॥ १ ॥
तो शंकर पार्वतीच्या भक्तीसी भाळला । भाव जाणूनिया अनुग्रह केला ॥ध्रु ॥
इतुकें ऐकुनिया उमेचें वचन । कृपा केली शिवें विसर्जिलें ध्यान ।
तुझ्या सेवेनें मी तृप्त झालों जाण । आतां मागसी तें देईन वरदान ॥२॥
गौरी म्हणे प्रसन्न जाहलेत जरी । तरी अर्धांगीं या बैसवा त्रिपुरारी ।
आपणा वेगळी नका करुं क्षणभरी । म्हणुनी मस्तक हा ठेवी चरणावरी ॥ ३॥
शिवें उचलूनी अलिंगन दिलें । जैसें गंगेमाजीं लवण मेळविलें ।
तेव्हा जिवा शिवा समाधान झालें । परस्परां सुख अनुभवासी आलें ॥ ४॥
सावधान ऐशी ध्वनी आईकिली । आदित्यानें घटिका होती प्रतिष्ठिली ।
पंचमहाभूतें साक्षीभूत झालीं । माया अंतरपाट घेवूनीया आली ॥५॥
देवीं पुष्पवृष्टी तयेकाळीं केली । महा दुंदुभि निशाणें वाजिन्नलीं ।
एवढ्या गौरीप्रती शंभू काय बोले । चाल कैलासासीं जाऊं शैल्यबाळे ॥ ६॥
गौरी म्हणे मातापितया वेगळी । कैसी येऊं जन हासती भूतळीं ।
तुम्ही यथाविधि मागा तयाजवळी । अस्तु वर देऊनी गेले चंद्रमौळी ॥७॥
शंभु कैलासासीं जाउनि तेंच काळीं । महा हरिद्वारें मुळें पेल्हावलीं ।
देवगण ऋषी वृंदें बोलाविलीं । इथुनि विवाहाची स्तुती आरंभिली ॥८॥

## [ प्रसंग दहावा ]

तवं येरीकडे हिमवताघरीं । रावें नारदासीं नेलें अभ्यंतरीं ।
दृष्टी घालवया अंबिका नोवरी । तंव न दिसे ती मंदिराभीतरीं ।।१।।
तो हिमवंत पार्वती वियोगें कळवळी । म्हणे शोधा माझी अंबा कुठें गेली ।।ध्रु.।।
कुठें गेली माझी अबा गुणराशी । हिये वाचुनि मज घडि कसे कैशी ।
अंबावियोगें राजा कासाविशी । शोधावया लोक धाडी दाही दिशीं ।।२।।
कठें गेली माझी असेल भुखाळ । कुठें कोणाजवळी मागेल कवळ ।
दु:खें व्यापलाँ तो नयनीं वाहे जळ । जवळी स्तमित किती मंत्रीयाचे मेळ ।।३।।
कुठें गेली किंवा व्याघ्रदष्ट झाली । कीं हो गंधर्वांनीं हिरीं चोरुन नेली ।
कीं हो इद्रें इंद्रजाल विद्या केली । एवढ्या भूतलामाजीं गुप्त झाली ।।४।।
राजा प्रधान ते शोधी मही स्थळ । म्हणे मी केव्हा देखिन माझें बाळ ।
चरण सुकुमार रुतती अरळ । दु:खें व्यापला तो पिटी वक्षस्थळ ।।५।।
असें शोधीता श्रमले बहुत दिन । तव गगेतीरीं असे एकस्थान ।
जवळी वालुकेच्या लिंगाचें पुजन । तिथें एक पार्वतीचें पद्मासन ।।६।।
दिव्यधूप दिव्य विभूती सर्वांगीं । दिव्य माळा शोभती सुतनू अगीं ।
देखुन विस्मय वाटे हिमवतालागीं । मत्री म्हणताती रगली शिवरगीं ।।७।।
राधें उचलूनी आलिंगिली बाहें । गहिवरुनी स्नेहें मोकलिली धाये ।
वाळे कोठूनीया आलीस हे ठायीं । चल घरा जाऊं आता लवलाहीं ।।८।।

## [ प्रसंग अकरावा ]

कन्या घेऊनी हिमवंत घरा आला । सकळ जनां थोर आनंद वर्तला ।
तवं येरीकडे विष्णु लोकपाळा । अवघे मिळूनियां विचार आरभीला ।।१।।
तो सोहळा आरभिला उमा महेशाचा । मनोरथ सिद्ध झाला सकळांचा ।।ध्रु.।।
कन्या मागावया सप्त ऋषीश्वर । देवी पाठवीले चालती सत्वर ।
शीघ्र जाती तिथें हिमवताचें घर । रायें उठूनियां केला नमस्कार ।।२।।
कर जोडूनिया स्वागत पुशिलें । धन्य दिन आमुचें भाग्य फळा आलें ।
आसन देऊनिया उपचार केले । काय अपेक्षीता सागा मज वहिलें ।।३।।
भोळा देव आदि देव त्रिपुरारी । अवघ्या भक्ताचीं वचनें अगीकारी ।
तुमची कन्या मागावया इयेवरी । आम्हां येणें झालें ये हो अवसरीं ।।४।।

भोळा शिवशंभु उदार चक्रवर्ती । अष्टमहासिद्धी दास्यत्व करीती ।
नऊ निधी निरंतर सेविताती । सकळहि जाणताती आहे सर्वांभूतीं ॥५॥

काय वानूं शिव शंभूचें वैभव । वेदां नकळे त्याच्या रूपाचा उद्भव ।
आज्ञा वादिताती ब्रह्मादिक देव । स्तविता सहस्त्रफणी धरी मौन्यभाव ॥६॥

ऐसा सहसवाद करुनी हिमगिरी । जाऊनि राणीप्रती पुसे अभ्यंतरीं ।
म्हणे अंबिका ही झाली उपवरी । ऋषीं नवरा सांगू आले त्रिपुरारी ॥७॥

आता सुकृताप्रती हिचें कन्यादान । इतुकें आयकोनी पतीचें वचन ।
हास्यमुख राणी विनवी कर जोडून । तुम्हा मानलें तें आम्हा कोटि गुण ॥८॥

## [ प्रसंग बारावा ]

ऐसा निश्चय करूनी हिमाचळ । बाहेर येऊन ऋषी पूजिले सकळ ।
त्यासी पांघरविले शेले सोनेसळ । सवें विप्र दिलें नवरेयासी मूळ ॥ १ ॥
तो निश्चय हिमवतें तेच काळीं केला । अंबेलागीं शंभू वर निर्धारिला ॥ध्रु.॥
जाऊनि वृत्तांत सांगती हरिहरां । म्हणती नवरीचा निश्चय केला खरा ।
वर प्रस्थानासी हाची मुहुर्त बरा । सैन्य पालवी पालणीं शीघ्र करा ॥२॥
इतुकें ऐकुनी आनंदले सदाशिव । गरुड स्कंधावरी चढले माधव ।
नंदीवरी आरुढले सदाशिव । वाद्यें एकानादीं लहाटोळीं सर्व ॥ ३ ॥
निज वहानीं आरुढले लोकपाळ । अष्ट नायक किन्नर कन्या मेळ ।
भाट ब्रीदें पढती ध्वनीचे कल्लोळ । तुरें भेरी शिंगें वाजतीं अपार ॥ ४ ॥
आदरेंसी पुढें झाला हिमाचळ । यावें यावें तुम्ही वऱ्हाडी सकळ ।
परस्परें भेटी पुशिलें कुशल । जानवसा दिला अती रम्य स्थळ ॥ ५ ॥
तेल हळदी घेतली शंकरानें । उष्णोदकें संपादिलीं मंगल स्नानें ।
देवप्रतिष्ठेचीं केलीं अनुष्ठानें । अष्ट वर्ग संपादिले थोर मानें ॥ ६ ॥
बरवे सुमनाचे जडिताचे अलंकार । शंकरातें लेववीति मनोहर ।
अति प्रीतीनें शृंगारिती वर । नवरा शोभिवंत दिसे कर्पुरगौर ॥ ७ ॥
विष्णु शिवाप्रती बोलती उत्तर । गळा रुंडमाळा वासुकीचे हार ।
कोटी भुतावळ त्रिशूळ व्याघ्रांबर । याचा चारीं दिवस करावा अव्हेर ॥८॥

## [ प्रसंग तेरावा ]

शिवें वेताळासी आज्ञा दिली ऐशी । तुम्हीं भूतें न येऊं यावीं मंडपाशीं ।
यथास्थानीं सूचना केली सकळाशीं । शेवटें रुखवत आलें तयापाशीं ॥१॥
तो नवरा शंकर मंडपा चालिला । नाद थोर मंगळ तुराचा वर्तला ॥ध्रु.॥
सोनसळा शेला पासोडीला पाटी । बरवी मेळविली देवांगनाची घटी ।
आल्या पतिव्रता आरती घेउन ताटीं । राजपत्नी न्यहाळूनी पाहे दृष्टीं ।।२॥
इतक्या हिमवताचे विप्र तेथें आले । वर प्रस्थानासी चला म्हणती वहिलें ।
इतुकें ऐकुनी सकळीक ऊठिले । वेगें पालणा पालणा शीघ्र झाले ॥३॥
गुढ्या तोरणें मखरें उभविलीं । आले चंद्रचूड मंडपाजवळी ।
आल्या पतिव्रता कुरवडी केली । शिव सिंहासनीं सभा घनवटली ॥४॥
तव येरीकडे हिमवता घरीं । बरवी विवाहाची स्थिती संपादिली ।
लोड गादिया घातल्या बहुतांपरी । बैसाकार दिले महाराजद्वारीं ॥५॥
कन्यार्थी होऊनी आले हे ईश्वर । कुशासनीं चरण धुवी गिरिधर ।
अर्घ्य आचमन वस्त्रें अळंकार । अर्पुनि दधिपात्र करी नमस्कार ॥६॥
मधुपर्क पूजा रायें शीघ्र केली । बरवी विवाहाची स्थिती संपादिली ।
शिव आले पुढें घटिका प्रतिष्ठिली । येरीकडे अंबा नवरी शृंगारिली ॥७॥

## [ प्रसंग चौदावा ]

पायीं अंगुष्ठलें जोडवीं पोल्हारे । विरवलिया वाळे वाजती गजरें ।
जोड कडसूत्रीं झळकती हिरे । कासे क्षुद्रघटा मिरवे सपुर चीरें ॥१॥
त्या हिमवतें साळंकृत कन्यादानकाळीं । नाना अलंकारीं नोवरी शृंगारेली ॥ध्रु.॥
गळा अक्षय सत्र मोतियाचे सर । पदक एकावळी रत्नजडित हार ।
अंगीं मधवेची काचोळी परिकर । हातीं अक्षय चूडे शोभताती कर ॥२॥
कानीं तानीवडें कर्णफुलें नग । मासबाळ्या मुक्ताफळें शोभे भांग ।
गोंड राखडी मूद माणिक मोतीलाग । नेत्रीं काजळ मुखीं तांबूल सुरंग ॥३॥
नाकीं मुक्ताफळ शोभे अमोलीक । विश्वकर्म्या हातिचें कोंदण सुरेख ।
भिवया शोभती जैशी चंद्ररेख । शेस मुक्ताफळीं भरली सुरेख ॥४॥

चंद्र तारा रचना पूर्णिमेची जैशी । नानावर्ण वाटिका फुल्ली जैसी ।
सर्व अलंकारीं अबा शोभे तैसी । अंत्रपटाआड धरिली संभ्रमेंसी ॥५॥
करीं धरुनी हिमवत कन्यारत्न । देव ऋषेश्वर म्हणती सावधान ।
गौरी पहावया उतावीळ मन । अत्रपटावरती शभू करिती मान ॥६॥
गौरी पहावया शभू उच होती । ऋषीश्वर अंतपट उचलीती ।
तव गौरीचरण प्रगट दिसती । काम उद्भवला ब्रम्हेयाचें चित्तीं ॥७॥
मदनें आकुळले वीर्य उसळलें । तेथें साठी सहस्र वालखिल्य झाले ।
त्याहो विधात्याचें कर्म ओढवलें । देवें कर्म अनुष्ठान भिन्न केलें ॥८॥

## [ प्रसंग पंधरावा ]

वेदमंत्रध्वनी विप्रें उच्चारिली । कन्या उचलुनी शिवाकरीं दिली ।
आड अत्रपट भ्राति निवटली । वाद्यें एका नादें अवघीं वाजीन्नलीं ॥१॥
त्या शकरे पार्वतीचें पाणिग्रहण केलें । हिमवत रायें कन्यादान दिलें ॥धृ.॥
वेदध्वनी म्हणती ऋषीश्वर । बाहेर झाला मंगळतूराचा गजर ।
ढोल दुंदुभीचे नाद होती फार । तुरें भेरी कहाळा वाजती अपार ॥२॥
मृदंग मोगरशिंग गिडबिड्या कासाळा । अवघ्या वाजंत्र्याचा झाला एकमेळा ।
अंबर गर्जतसे धरणी ते वेळा । आलें बधिरत्व शेषकर्णस्थळा ॥३॥
सप्ताहि ऋषीश्वर संकल्प सांगती । पार्वतीचें गोत्रत्रय उच्चारीती ।
तुमचें सागा कवण शकरा पुशिती । पुसता कवण्या ज्ञानें शकर बोलती ॥४॥
नाहीं मायबाप बधु सहोदर । ठायींच वाढत होतों दिगबर ।
युक्ति करुनिया तपा ढळविला । मायबाप उच्चारूं सागता कोणाला ॥५॥
ढवळे गाती सवासिणी पतिव्रता । वधूवराभाळीं लाविती अक्षता ।
आदण धारें हिमवतें घातलें हाता । तें तें जे जे काळीं देईल सर्वथा ॥६॥
दोन्ही पाळवासी गाठी जी घातिली । लाजाहोम करुनी बहुल्या बैसवीली ।
पार्वतीचे बंधू त्यासी वस्त्रें दिलीं । मग अरोगणें ताटें विस्तारिलीं ॥७॥
उमा शभू बैसविलीं एके ताटीं । सोनेसळा शेला पासाडिला पाटीं ।
आल्या पतिव्रता आरती घेऊनि ताटीं । राजपत्नी न्याहाळूनि पाहे दृष्टीं ॥८॥

## [ प्रसंग सोळावा ]

आले तैसें लिंबू झारीची रसाळ । काकड्या करवदें माइनीचें मूळ ।
आंबे जाभरे नृपत्याचे घड । चिरल्या कोशिंबिरी रायतीं हो फार ॥१॥
त्या मंडपीं जेवितातीं वधूवराच्या पक्ती । समारंभें वाढी मेनका निजहस्तीं
॥ध्रु०॥
बरव्या वाढिल्या पत्रशाखाच्या ओळी । लवण शाका वाढिल्या तयाजवळीं।
दुधें आटविल्या बोटव्याच्या खिरी । गव्हले बोटवे साखर पचेधारी ॥२॥
घारिया पुरिया उंडवरिया गुळवरिया । खांडे माडे साखर फेणवलिया ।
वडे पूर्णवडे काय सागूं तुला । जिव्हा नाचत आहे पक्वान्नें देखिल्या ॥३॥
बरवा वाढिला मोगऱ्याचा भात । वरीं वरण मुगांचें हो अलौकिक ।
वाटया भरुनिया ठेवियलें तूप । तिथें वधूवर जेविती अनेक ॥४॥
आपोषण घृत वाढिलें विपुळ । देव ऋषीश्वर जेवेती सकळ ।
हरहर नामघोष करीती प्रबळ । जेवा सावकाश विनवी हिमाचळ ॥५॥
उमा महेशाचे पंक्तीं जे जेविले । पूर्वीं त्यानीं पुण्याचे हो पर्वत केले ।
चवी जाणती ते रुचीनें जेविले । येर पोटासाठीं अगणित मिळाले ॥६॥
हेम कळसामाजीं लावूनि परिमळ । रायें प्राशनासी निवडिलें जळ ।
कर प्रक्षाळूनी आचवले सकळ । त्यासी समर्पिलें कर्पूर ताबूळ ॥७॥
उमा शंभू एके आसनीं बैसलीं । पुढें गंधर्वें गायने आरंभिलीं ।
रंभा उर्वशी तेथें नृत्य करूं आली । वाद्यें एकनादें अवघीं वाजिन्नलीं ॥८॥

## [ प्रसंग सतरावा ]

ऐसे चारी दिवस यथाविधि झाले । देव ऋषीश्वरां रायें अहेर केले ।
स्थायिक आगतुक अवघे सुखी केले । जाऊ कैलासासी ऐसें शिव बोलिले ॥१॥
अहो एथूनी वरात चालिली शकराची । धन्य नोवरी सर्वे दुहिता हिम-
वताची ॥ध्रु०॥
गौरी भक्तीरगें तुमची जोडी झाली । बरवी विवाहाची स्थिति सपादिली ।
जाऊ कैलासासीं आज्ञा द्या जी वहिली । इतुक्या राजा राजपत्नी गहिवरली ।२।
म्हणती महादेवा परिसा विनत्रणें । पुत्रा ऐसें केलें कन्येचें पाळण ।
आतां तुमचे चरणीं केली समर्पण । बरवे रीतीं हिचें करा संरक्षण ॥३॥

सेवे चुकेल ही कारण विसरेल । बोलूं न कळे ऐसी आहे आमुची बाळ ।
कोप न धरा तुम्ही देवाजी दयाळ। आर्जी विज्ञापन ऐसे आमुचे बोल ।।४।।
इतुक्या प्रत्युत्तर दिलें उमेरायें । हिचे सेवें जाण विकला माझा देहे ।
हिचे अधीन झालों निस्संदेह । तुमच्यापरीस माझा हिचे ठायीं मोह ।।५।।
इतकें ऐकुनी हिमवंता सुख वाटे । म्हणे अंबिकेचें भाग्य आहे मोठें ।
अंबेप्रसादें शंभू आम्हा भेटे । त्याच्या हो दर्शनें आमुचें दैन्य फिटे ।।६।।
इतुकें ऐकुनी सैन्यें पालाणिलीं । उमा-शंभू नदीवरी आरूढलीं ।
येथून वरात ही कैलासा चालली । वाद्यें एकानादें अवघीं वाजिन्नलीं।।७।।

## [ प्रसंग अठरावा ]

आंदण थोरें हिमवंतें घातलें होतें । तेंही तितुकें दिलें पार्वतीसांगातें ।
दैव कैलासासी पावले हृष्ट चित्तें । तेथें सन्मान झाला सकळांतें ।। १ ।।
अहो येथुनी वरात पावली कैलासासी । भक्तिरंगें शिवें प्रणिली पार्वतीशीं।।ध्रु.।।
समाहि ऋषीश्वर गंधर्व किन्नर । कर जोडूनीया स्तविती महेश्वर ।
देव दुंदुभीचा नाद झाला थोर । तुरा भेरी कहाळा वाजती अपार ।। २ ।।
गौरी स्वयंवर गावें आयकावें । श्रावणमासीं सोमवारीं उच्चारावें ।
शिवसहस्रनाम मुखीं उच्चारावें । वाचे नये त्याणें श्रवणीं आयकावें ।।३।।
गौरीस्वयंवर गाती आइकती । त्यासी गंगा भागिरथी स्नानें होतीं ।
गया गदाधरीं पितर उद्धरती । त्यासी वैकुंठ होईल हो मुक्ती ।। ४ ।।
गौरीस्वयंवर ऐशी पुण्यकथा । आइकतां हरे तापत्रय व्यथा ।
दुःख दारिद्र हरेल मुखीं गाता । कमलाकरसुत विनवी लिंगा संतां ।। ५ ।।

• • •

# महार मुरली

ऐका पूर्वीचें वर्तमान । मुळ मुरलीचें करा श्रवण हो ।। ब्रह्मपुरीं महिवरी । होती साजीरी पुण्यवान । तिथें एक अधिकारी ब्राह्मण । होता शागीर धनशी पूर्ण होता ब्रम्हकर्म सपूर्ण । कथा-कीर्तनादी व्याकर्ण अंत्यज करुनी बहुकर्म । सोडून धर्म पहा आपुला । विप्राचें सुटलें काम घरीं निष्काम राही आपुला । अनामिका तिथें करमेना उदासी मनीं फार झाला । पुसे वेद गोत्र प्रवर त्यासी । कन्या अर्पिली आपली त्यासी । हो केलें लग्न । ब्राह्मण सदय ठेवूनी जामातासी । नारद ह्मणे रुक्मीणीसी । सखे किती तूं गर्वें जासी ग । धन्य भाग्य मूरलीचें । पूर्ण प्रेम करितो ह्रषिकेशी ।। ध्रु. ।।

मग ती स्त्री म्हणे भताराला । चला जाऊ आपल्या देशाला हो । पाहुनिया निजस्थळ । सत्वर येऊं माहेराला । न कळे म्हणुनी स्वार झाला । गमन करूनी उभयतानीं हो । गेले मार्ग चालून । गेले मार्ग चालून । पाप उठलें अंत्यजाला । म्हणे पाज जिवन प्रियकरें । आज स्वकरें आपुलें मजशीं । घेऊनी दोर सत्वर काढी नीर त्या विहीरीशीं । मागूनी तिशी लोटिल पहा चांडाळें कूपाशीं । लगबगा तेथून चालला गेला एकला आपुले देशीं । भेटी लहान थोर सकळिका अनामिका सख्या-सोयऱ्याशीं । इकडे ती स्त्री निमाली कूपाशीं ऐसा समजला शाप त्यासी हो । जाऊन श्वशूर मंदिरा । जाऊन श्वशूर मंदिरा जरी पुसेल सागू त्यासी । नारद म्हणे रुक्मीणीसी ।। ध्रु. ।।

सिद्ध मसलत ज्यानीं केली । इकडे काय हरिनें मात केली हो । तृष करित आले पाथस्त । तृष करित आले पाथस्त । होऊनी स्वस्थ ते ही वेळीं । म्हणे तू कोणाची राजसबाळी । पूर्ण न्याहाळिली नेत्रकमळी हो । टाकूनिया मग दोर । टाकूनिया मग दोर । सत्वर काढिली ते ही वेळीं । लगबगा तेथूनी चालली । गेली पित्याच्या सदनाशीं । पिता म्हणे का गे बाई झडकरी परतली । नऊ देवाचा पहिला देश आपुला हर्ष अंतरीं कन्येच्या । इतक्यात आला जामात ब्राह्मणाचा । कांता न्याहाळली दृष्टीं । वचक बसली अतऱ्याशीं । नारद म्हणे रुक्मीणीसी ।। ध्रु. ।।

धन्य ती सती पतिव्रता । गेली सुखाशयनी एकाता हो । कर जोडुनी आपण । करी विनती प्राणनाथ । काय अन्याय केला होता । कूपीं लोटलें उदक देतां हो । सत्य वदा तुम्ही मात । सत्य वदा तुम्ही मात । कोणतें गोत्र प्रवर आतां । सखे मी अनामिका आहें । देह भ्रष्ट-विला तुझा । इतकें ऐकूनी उतरली । आली पित्याजवळी ते वेळा । म्हणे ऐकताची एकमात स्पर्श झाला हो भांड्याला । पिता म्हणे अग्नीडाग दे बाई, दुसरा उपाय नाहीं त्याला । बाईनें कुंड सिद्ध केलें । त्यामध्यें देह समर्पिला । अनामिका टाकली उडी । अनामिका टाकली उडी । पहा दोघाचा चुना झाला ।एक मुरली एक वेणू कोम वंशाचा उगवला ॥ चाल ॥

प्रितीनें वाजवी हृषिकेशी । पूर्ण नद बोले दोघांशीं हि हो । कष्ट झाले बहु भारी । कष्ट झाले बहु भारी ।नारद म्हणे रुक्मिणीसी ॥ध्रु.॥

• • •

# लोककथेचे कांहीं नमुने

संग्राहिका—डॉ. सरोजिनी बाबर

## १. योगायोग

आटपाट नगर होतं. तिथं एक राजा होता. त्याला एकुलती एक मुलगी होती. ती राजाची फार लाडकी होती. ती मोठी होत होत लग्नाला आली. राजानं सुदर सुंदर राजपुत्र आणून दाखविले. पण एकही राजकन्येच्या मनाला आला नाहीं. तेव्हा तुझा नवरा तूच शोधून काढ, अस राजान तिला सागितल. बरोबर एक स्वयंपाकी देऊन देश फिरण्यास परवानगी दिली.

राजकन्या नवरा शोधण्यास निघाली. एका गांवाहून दुसऱ्या गावीं, त्या गावाहून तिसऱ्या गांवीं अशी ती चालली. वाटेंत तिला तहान लागली. वाटचालीच्या श्रमानें दोघेही थकून गेलीं. राजकन्या तर तहानेनें फार व्याकूळ झाली होती म्हणून तिला एका झाडाखालीं बसवून भटजी जवळच्या झऱ्यातून पाणी आणण्यास गेला. तेथें जाऊन पाहातो तों त्या झऱ्याजवळ एक म्हातारा ब्राम्हण काहीं दर्भाच्या काड्या घेऊन गांठी मारीत बसला आहे. भटजींनें विचारलें, " स्वामी महाराज, आपण हें काय करीत आहा? आपण कोण आहात?" " अरे, मी ब्रह्मदेव आहें. या नवराबायकांच्या गाठी मारीत बसलों आहें. अमक्याला ही बायको, अमक्या मुलीला हा नवरा. ह्या गाठी केव्हांही चुकणार नाहींत. कारण मी ब्रह्मदेव आहें ब्रह्मदेव!" " स्वामी महाराज, असें जर आहे तर मला कोणती बायको ठरविली आहे? कृपा करून सागा." म्हणून भटजी त्याच्या पायावर लोळण घेऊं लागला. स्वामीजींनीं सागितलें कीं, " भटजी, तूं मोठा नशीबवान आहेस. तुला एखादी राजकन्या माळ घालील. तूं राजकन्येचा नवरा होशील, जा." "स्वामी महाराज, असें कसें होईल?" "त्याची काळजी

तुला नको. कारण ती तशी गाठच मारलेली आहे. हल्लीं तुझ्याबरोबर असलेली जी राजकन्या तीच तुझी बायको होईल, जा." हें ऐकल्या-बरोबर त्या भटजीस फार आश्चर्य वाटलें. असें जर घडून आलें तर काय बहार होईल. खरोखरच तो ब्रह्मदेव असावा काय? असा विचार करीत करीत, तो पाण्यानें भरलेला, सोन्याचा पेला हातात घेऊन राजकन्ये-जवळ आला.

राजकन्या तहानेनें फार व्याकूळ झाली होती. त्यामुळें फार रागावली होती. तिनें भटजीस दरडावूनच विचारल, "भटजी, इतका वेळ काय केलंत? वाटेंत झोपला होता कीं काय?" विचारा भटजी! थरथर कापत, "बाईसाहेब चूक झाली, क्षमा करा," म्हणाला. "काय! लाज नाहीं वाटत क्षमा करा म्हणायला?" "तसं नव्हे बाईसाहेब, कोणी एक ब्रह्मदेव दर्भाच्या काड्या घेऊन नवरा-बायको, नवरा-बायको, अशा गाठी मारीत झऱ्याजवळ बसला होता. तें थोडा वेळ पाहात उभा होतों." 'मग तूं विचारलंस कीं नाहीं मला बायको कसली मिळते म्हणून?"

भटजी :—हो, हो, विचारल तर, बाईसाहेब.

राजकन्या :—साग तुला बायको कसली मिळणार?

भटजीची बोबडी वळली! त्याला बोलता येईना. "अरे सांग." राजकन्येनें जोरानें पुन्हा विचारलें.

भटजी अडखळत अडखळत म्हणतो, "त्या... त्या.... ब्रऽऽब्रह्म देवानें सागितलें कीं, तुला राज. .. क....न्या बायको मिळेल म्हणून."

राजकन्या :—अस्स अस्सं! ती कोणती राजकन्या असली पाहिजे असल्या स्वयपाक्या भटजीला वरणारी! तिचं नाव तरी साग.

भटजीची गाळणच उडाली. आणि तो अडखळत अडखळत, भीत भीत, लाब सरकत, सरकत म्हणाला, "आपणच."

हे शब्द एकताच तिच्या हातांत जो पेला होता तो तिनें मोठ्या जोरानें त्याच्या कपाळावर मारला. त्याबरोबर त्याचें डोकें फुटून रक्तबबाळ झालें. आणि तो तेथून जाण्याकरितां राजकन्येची परवानगी मागू लागला.

" मेल्या, नीघ येथून चालता हो !" असें राजकन्या म्हणाली.

तो स्वयपाकी तेथून जो निघाला तो येता येता एका मोठ्या शहरीं येऊन पोंचला. त्या दिवशीं त्या शहरचा राजा मेल्यामुळें, एक मोठा दरबार भरवून हत्तीच्या सोंडेंत माळ देऊन राजा निवडण्याची तजवीज चालली होती हत्ती ज्याच्या गळ्यात माळ घालील तो राजा, असें ठरविण्यात आलें होतें. हा समारंभ आमचा स्वयपाकी भटजीही लाबून पाहात होताच.

हत्तीच्या सोंडेंत प्रधानानें माळ दिल्याबरोबर तेथून तो हत्ती जो पळत सुटला, तो त्या स्वयपाक्याजवळ आला. तसा स्वयंपाकी पळू लागला. हत्ती त्याच्या मागें लागला. शेवटीं स्वयंपाकी भिऊन जमिनीवर आडवा पडला. त्याबरोबर हत्तीनें त्याच्या गळ्यात माळ घातली. सर्व लोकांनीं त्याचा जयजयकार केला. त्याला सिंहासनावर आणून बसविलें. त्याच्या नावें राज्याची द्वाही फिरविली.

इकडे ही राजकन्या फिरत फिरत त्या शहरीं आली. तिला बातमी समजली कीं, या शहराचा नवीन राजा फार चागला प्रेमळ आणि मोठा नशीबवान आहे. असें ऐकल्याबरोबर तिच्या मनात त्याच्याशींच विवाह करावा असें येऊन तिनें आपला बेत निश्चित केला. आपल्या वडिलास ही हकीकत कळविली. वडिलांनीं तिच्या म्हणण्यास मान्यता दिली. विवाह समारंभ साजरा करण्यात आला.

राजाला अनुरूप अशी राणी मिळाली. काहीं दिवस गेले. एके दिवशीं राजाराणी एकातवासात असता राणीनें विचारलें, महाराज ! आपल्या कपाळास ही इतकी भली मोठी खोक कशानें पडली आहे ?

राजाला माहितच होतें कीं, ब्रह्मदेवाच्या सागण्याप्रमाणेंच आपणास राणी मिळाली आहे. राजानें उत्तर दिलें, हा आमच्या राणीसाहेबांचाच लग्नाआधीचा प्रसाद आहे. असें म्हणून पूर्वीची आठवण करून दिली. हें ऐकताच राणी मनात फार खजील झाली हें सांगणें नकोच.

●●●

# २. हुकमाची धनीण

सात वनं ओलांडून गेल्यावर पहिल्यांदा नजरेंत येणाऱ्या डोंगराच्या आडोशाला एक गाव होत. तिथं एक राजबिंडा माणूस रहात होता. दिसायला चागला तसा मनानहि निर्मळ. चार चौघात त्याची ऊठबस असायची. त्याचा शब्द माणस आनदान झेलीत. कुणाला म्हणून कुणालाहि त्यानं कधीं दुखवल नाहीं. राग आलाच तर मुकाट गिळून टाकायचा फार तर स्वत:शींच बोलायचं. एरव्हीं कुणाला अवाक्षरहि ऐकू येईल तर शपथ ! दुसऱ्याच चागल व्हावं हीच त्याची भावना. जरूर त्याला वेळेला मदत करावी हेंच त्याच काम.

पण एकदां काय झालं कीं, हा एवढा चागला माणूस आपल्या बायकोवर एकदम बिथरला. कधींच न संतापणारा माणूस एकाएकीं भडकला. उभ्या जन्मात कुणावरहि न रागावलेला माणूस एका घटकेंत फाडदिशीं मुस्काटात द्यावी तसा बोलून गेला, "तू चालती हो माझ्या घरातून ! तोंड काळ कर !" बिचारी बायको हुकमाची धनीण होती. हा भलताच हुकूम ऐकून भांबावली. घेरी येऊन कोलमडली. जन्मातून उठायची वेळ आली म्हणून तिनं धीर सोडला. तरी पण कसं बसं उसन अवसान आणून तिन नवऱ्याला विचारलं, "कारण काय झालं, देवा ? एवढी कोणती आगळीक घडली ?" तो जास्तच चिडला व म्हणाला कसा, " चाडाळणी, माझ्या मित्रानं तुझा हात धरला आणि तूं प्रतिकार न करता गप राहिलीस? यापरतं आणखी दुर्दैव कोणतं ?" आणि वेड्यासारखा अगणातील कबुतर भुर्रदिशीं उडून जाव तसा घर सोडून चालता झाला !

झाल्या प्रकारानं सार गांव हादरलं. इकडचा सूर्य इकडं उगवावा तसा प्रकार झाला. सांडलेल पाणी पसरत जावं तशी पसरत निघालेली ही बातमी कुणाच्याच विश्वासात शिरेना. खुद्द त्या भल्या माणसाच्या बायकोला देखील हें खर वाटेना, तिथं बाकींच्याचा काय पाड !

परंतु झालं खर तसं. तो निघून गेला. त्याची बायको एकटी घरांत पडली. नाहीं म्हणायला तिच्यावर आईसारखी माया करणारी

तिची म्हातारी मोलकरीण तेवढी जवळ होती. पण मनातील तिच्यों-जवळ कसं ओकायच ? तिला पेंच पडला. मूग गिळून ती गप्प बसली.

इतक्यात काय झालं कीं, तिच्या नवऱ्याचा एक मित्र अचानक घरीं आला. म्हणाला, " वहिनी, लवकर वाढा ! फार भूक लागली. " " आता काय करावं ? झाला प्रकार याला माहित नसावा " ती स्वतःशीं पुटपुटली. पण कांहीं बोलायच तिला जमेना. धीरच होईना. नवऱ्याचा हुकूम मानायची तिला संवय लागलेली. " माझ्या मित्राचा प्रत्येक शब्द झेलला पाहिजे, " अशी त्याची ताकीद. त्यामुळं ती बिनबोभाट उठली. " भाऊजी, एवढ्यांत राधतें, " असं सागून तिन चूल पेटवली. वाऱ्यासारखी माउली हालली. हां हां म्हणता सैंपाक झाला. जेवणं झालीं.

त्यानंतर त्या मित्रानं म्हटल, " वहिनी, विडा द्या. "

" देतें. " तिनं विडा करून दिला.

" तुमचा विडा, तुमच्या हातचा घास खाल्ला कीं पोट भरतं. "

" हं ! "

" तुम्ही मला फार आवडता. "

" ह ! "

" एक विचारूं का ? "

" ह ! "

" आज रात्रीं मला तुमची सोबत पाहिजे ! "

" भाऊजी ! " तिच काळीज हादरल. तिला विलक्षण धक्का बसला. तिच्या डोक्याला अंधेरी आली मनान धीर सोडला. वेड्यासारखी ती टक लावून बघत राहिली. पण तिला वाचा फुटेना. तिला काहीं कळेना. तो जाऊन झोपला. ही विचार करीत बसली.

" धरणीनं पोटात घ्यावं मला ! " तिनं ध्यास घेतला. काल परवां वाढताना ऊन ऊन भातानं हात भाजला म्हणून नवऱ्याच्या मित्रान तो धरून फुंकर घातली. तेवढ्या निमित्तान नवऱ्यान तिच्यावर कुंभाड घेतलं ! सोडून द्यायची भाषा केली. पुन्हा तोच प्रसग ! तिचं काळीज दडपून गेलं. खालचा श्वास खालीं वरचा वर राहिला. ती दुचीत पडली.

पाय नेतील तिकडे निघाली. रक्तबबाळ होस्तोंवर पायाना तिनं तुड-वल ! अरिंग्या वनात आली. सगळीकडे अंधार् मी म्हणत होता. तिथल्या

राक्षसांच्या आरडाओरडीनं ती भेदरली. जीव घेऊन पळत सुटली. माघारीं घरीं आली. धापा टाकीत तिनं म्हातारीला म्हटलं, " न्हाऊ घाल. साज-शिणगार कर. "

म्हातारीनं सारं नेहमींच्या सवयीनं बिनबोभाट केलं. शंका आली नाहीं तर विचारेल कशी ?

इकडे मध्यान्ह रात्र उलटली तरी अजून वहिनी कशी येत नाहीं म्हणून तो मित्र वाट पहात होता. खुट् वाजलं कीं, अधीर होत होता.

एवढ्यांत जवळच सारं वैभव अंगावर घेऊन ती आली. त्याच्यापुढं येऊन उभी राहिली.

त्यानं तिला पाहिलं मात्र, त्याच्या नि तिच्या डोळ्याची भेट झाली मात्र, त्यानं एकदम नजर खालीं वळवली. आपण हें काय भलतच करून बसलों याचा त्याला पस्तावा झाला. त्यानं तिचे पाय धरले.

पण त्याच्या तेवढ्या स्पर्शानं देखील तिला कससच वाटलं. झाली गोष्ट नवऱ्याला समजली, गावाला मिळाली तर आपली अब्रू जाईल, या ईर्षेनं तिनं जवळचा खंजीर छातींत खुपसून घेतला. नवऱ्याच नाव घेत तिनं अखेरचा श्वास सोडला रक्ताच्या थारोळ्यात ती कोलमडली.

तो देखावा बघून, तिचा त्याग बघून त्या मित्रान देखील तिच्या पायाची शपथ घेतली " चूक झाली," म्हणाला, आणि ती अधिक पवित्र रहावी म्हणून स्वत:लाहि त्याच खंजिरानं जगातून नाहीसं केलं !

एका शेजारीं एक दोन तरणां माणस रक्ताच्या गादीवर निजलेली बघून त्या म्हातारीला झाला प्रकार उमजला. आपल्या जिभेनें ही बातमी कुणाला सागूं नये म्हणून तिनं त्याच घटकेला स्वत:च्याहि काळजात खंजीर खुपसून घेऊन त्या दोघाना सोबत दिली !

झालं. साऱ्या गावांत बातमी गेली. उभं गाव हळहळलं. त्याना बघायला माणसाचा समुद्र आला.

एवढ्यात त्या बाईचा नवरा पस्तावून घरीं आला. चाचपडत आला. भीत भीत आला. माणस बघून त्याची दातखिळी बसली. लोकांची कुजबुज ऐकून त्याचं धाबं दणाणलं. तो बाणाच्या वेगानं घरात घुसला.

आत येऊन बघतोय तों हा प्रकार. बायकोच्या त्यागानं त्याचे डोळे दिपले. खाड्दिशीं त्याला जाग आली. स्वत:च्या संशयित मनाचा

संताप आला. झाल्या चुकीचं प्रायश्चित त्यानं घेतलं. दुनियेला रामराम करून त्यान बायकोला मिठी मारली आपल्या रक्ताचा टिळा तिच्या कपाळावर लावून ती पवित्र आहे हें सिद्ध करण्यासाठीं त्यान स्वतःच्याहि छातींत खंजीर खुपसून घेतला !....

झालं. चार जीव पुन्हा एकत्र झाले. मनांतल किल्मिष जाऊन त्याच्यात एकजीनसीपणा आला. माणसाच्या तोंडांत त्याची चव घोळूं लागली.

नागवेलीच पान, कात, सुपारी आणि चुना या रूपान ते अमर झाले. त्यांच्या एकीकरणान माणसाच तोंड रंगलं. त्याच्या रूपानं प्रेमाची किंमत बाजारात शिरली. खर प्रेम विडा रंगण्यावर उभारलं गेल.... त्यागाची किंमत जगान पारखली. हुकमाचा धनी अमर झाला...डोंगराच्या अडोशाला असलेल्या गांवाच्या महिमा सात वन ओलांडून उभ्या दुनियेनं आपल्या ओंठावर झेलला...

• ••

# ३. जादूची अंगठी

एक सावकार हुता. त्येला तीन मुलगे होत. त्येच्या मनात अस आलं कीं, आता आपल्या मुलासनी काय येपार बिपार करता येतो का तें पहावें, म्हणून तेनं परत्येकाला तीन तीनसं रुपय दिल व ह्येचा मला येपार करून दाखवा म्हून सांगतलं. तवा थोरल्यान तीनशाचं पाचसं केलं, मदल्यानं चारस केलं, व लहानग्याला इचारता तेनं सागतलं, " म्या माल खरेदी केलाय पर अजून इकाइचा हाय." " त्वा काय काय माल खरीदी केलाईस ?" तेनं तवा सागतल कीं, "म्या शंभर रुपयाच कुत्र, शंभर रुपयाच मांजर आनी शंभर रुपयाचा साप इकत घेतलाय." तें ऐकून सावकाराला आला राग व तेनं तेला घराभाइर घालवून दिलं. मग त्यो रानांतून जात असता वाटंत एकाजागीं एका वारुळातून योक साप भाइर आला व आपल्या मुलाचें लगीन हाय म्हणून आपल्या जातगंगेला हाको मारूं लागला तंवा तें हेच्या जवळ-च्या सापानं ऐकल व त्यो आपल्या मालकाबरुबर बोलता झाला व तेन

सागितलं, कीं आपल्या जातींपैकीं एकाच लगीन हाय तर आपुन सगळीच तिकड जाऊं चला. तवा त्यो सापाचा मालक लई भेला. मग सापान सागतल, “ तू काहीं भिऊ नग, तुझा सगळा बंदुबस्त मी करतों. ” म्हणून त्येला घेऊन गेला. आनी आपला उपकार फेडण्यासाठीं म्हणून त्येला सागतल कीं, “ सर्वजण निघून गेल्यावर लगनाचा मालक जो सेस त्येच्याजवळ असलेली अंगठी मागून घे. त्या अगठीचे अंगात इतक पाणी हाई कीं तिची पुजा करून तिच्यापुढ हात जुडुन मनात असल तें मागतलं तर तें ती देतीया. मग सगळ लगीन गेल्यावर तेनं सेसाफुड हात जुडून म्हटल, “ माझ एक मागण हाई. ” तंवा सेस परसन हाऊन म्हणतो, “ काय हाई तें माग.” मग त्यो म्हंडला, “ मला तुमच्या हातातल पवितर तेवढ द्या. ” मग तें पवितर घेऊन व वारुळाच्या भाईर येऊन त्येनं त्याची पुजा केली आणी म्हणाला, “ चौघाना चार जेवणाचीं पाची पकानाचीं ताट मिळावीं. ” म्हणल्याबरुबर तीं आलीं. मग ते चौघजण जेवल. मग त्या आगठीच धातमं पावून त्येला तिचा बराच उपयोग झाला. मग त्येन (त्या सापान) आपला उपकार फेडला म्हणून त्येला सोडून दिला व आणिकी फुडा तिकड मुलुख थोडा करीत निघाला, तर एका कोलापुरासारख्या एका शारात गेला. तर तितल्या राजाच्या मुलीचा काय पण होता कीं, “एका घटकत सात तालाची माडी, तिच्या समुर एक बाग व त्या बागत आड जो बाधील त्योच माझा नवरा; नाही तर वरकड मायबाप. ” हें ह्यान ऐकल व एका माळावर जाऊन त्या अगठीची पूजा केली आणि हात जोडून म्हणाला, “ हितं सात तालाची दामुदरी आली पाईजी.” अस म्हटल्याबराबर त्या मुलीन जें काय मागतल हुतं तें तिथ आल. हें पावून त्या मुलीला ही बातमी कळली. मग तिन आपल्या बाला सागून त्येच्या बरुबर लगीन केल. ही हकीकत दिलीच्या राजाला कळली. तवा तेन अगोदर ह्या मुलीला मागण घातल होत. तंवा ह्या अटीबद्दलच ती लगीन करून घेत नव्हती. तेन मग इचार केला, “सात ताली दामुदरी एका घटकेंत कशी बाधली तें इचारून बघाव. मग इगतीनं तिला काढून आणावी.” म्हणताना त्या मुलीला रोज फुलाची कचुळी करून घालाइला घाइला एक फुलाई माळीण जात असे. तिला या राजान वस केल व म्हणाला, “ तला पाचसं रुपये देतों. त्यानं ती सातताली माडी

कशी बाधली तेवढा तपास कर.'' म्हणताना दुसऱ्या दिशीं ती फुलाबाई चोळी घेऊन गेली व त्या राणीला म्हन्डली, " तुमच्या नवऱ्यान ही माडी एका घटकत कशी बांधली ?'' त्यावर ती म्हणाली, " मी काई तेचा तपास नाई केला.'' तवा माळीन म्हन्डली, " तर तेवडं इचारून घ्याकी, मला बि गरिबाला समजल.'' त्या राणीनही आपल्या नवऱ्याला इचारलं. तवा तेन त्या अगठीची हकीकत सांगतली मग ती अंगठी बगाइला घेऊन त्या माळणीला दिऊन टाकली. माळणीनं आपली गरसूळी राणीला दिली. व ती अंगठी दिलीच्या राजाला दिली. मग त्येन त्या अंगठीची सागतल्याप्रमाणं पूजा केली व हात जोडून म्हन्हला, " ती दामुदरी व राणी हितं आली पायजेल.'' म्हणताना ती तितल कवऱ्यालच्या कतराल उठून दिलीला गेलं. व मग ह्यो एकटाच तिथ रायला. हें मग त्या मुलीच्या बाला समजलं. तेनं आपल्या जावयाला गोसावडा म्हून कैदेंत टाकलं. मग त्येच्या जवळच्या कुत्र्याला व माजराला वाटल कीं, आपुन आता आपला उपकार फेडला पायजे. म्हणून ते आपल्या धन्याची आदन्या घेऊन निघाले. जर जात्यात तर त्यो वाटंत आपल्या धन्याचा वाडा व ती मालकीन तेनीं बघितली व आपल्या मालकिणीची गाठ घेतली व हें असकस झाल म्हणून इचारूं लागलीं. तंवा तिनं आपल्या फुलाई माळणीनं केलेली गटपट सांगितली. मग त्या माजरानं इचारल, " आगठी आता कुठ ठेवलीया ? तेवढी इचारून घ्या. इगतीन इचारा, नायतर सगळच फुटल.'' म्हनताना मग तिनं त्या राजाला इचारलं झाल. म्हटली, " आता तरी ती आगठी जपून ठेवा. नाहींतर मागच्यासारख हुईल.'' मग त्यो म्हन्डला, " अग, मी काई भोळा नाय, म्या ती पेटींत घालुन वर आड्याला बाधून ठेवलिया.'' मग तिनं ती हकीगत त्या माजराला सांगितली. मग पुनः त्या माजरानं उदीर माराइला सुरवात केली. तर त्यांत एक म्हातारा उदीर त्या माजराला म्हणतो, " अरे दादा, मला मारू नको. मी तुनी काइनी का हुइनो कामगिरी करीन.'' मग माजराला तेंच पाइजी हुत.'' मग तेनं तेला सागतलं कीं, तेवडी आड्याची पेटी कातरून खाली पाड. तें उंदरान कबूल केलं व ती पेटी कातरून खालीं पाडली. पेटी खालीं पडली तवा तिची याक फळी फुटली. मग माजरान त्यातली अंगठी काढून घेतली व आपल्या धन्याला आणून दिली. मग तेनं तिची

पूजा केली व पूर्वीचं हुतं तसं हितं आलं पाइजी, म्हणून मागितलं त्या बरुबर तें सर्व तिथं आल. मग तो आपल्या सासऱ्यावर रुसून आपली अगठी घिवून जातो, असं म्हणून जाऊं लागला. मग परधानान त्येची समजूत घातली व कांहीं लोक संग दिऊन, तुम्ही आपल्या गावीं जात असाल तर जावा म्हणूनशानि त्येला आपल्या घराकडे घालविला. मग त्यो आपली सैना घेऊन आपल्या गावीं आला व बाला वर्दी दिली कीं, “ मी आपला लहानगा मुलगा तुमच्या भेटीला आलु हाय ” तें ऐकून त्या सावकाराला ह्यो अपली थट्टा करतुया असा वाटून त्योही मुद्दामच गेला. बघतुया तर खरच ! मग तेनं तेला लाडानं जवळ घेतलं व मग तेन राज केल तस तुम्ही करा.

• • •

# ४. लाखाची गोष्ट

एक होतें खेडें. त्यामध्यें नवरा-बायकोचें एक कुटुंब रहात असे. जवळच्या एका गावीं बाजार भरत असे. त्या ठिकाणीं दर बाजारीं बायको जाऊन बाजार करून आणीत असे. एका बाजारीं तिचा नवरा म्हणाला, “ तू दर बाजारीं जातेस, आज मी जाणार. ” त्याप्रमाणें चार पाच रुपये घेऊन तो बाजारात गेला.

बाजारात एक गृहस्थ एका मोकळ्या टोपलीवर उपरणें टाकून बसला होता. त्यास या गृहस्थानें विचारलें, “ काय रे आहे यात ? ” बाजारातील गृहस्थ उत्तर करितो, “ यांत गोष्टी आहेत. ” बाजारास आलेला गृहस्थ विचारितो, “ एका गोष्टीची किंमत काय ? ” बाजारातील गृहस्थ उत्तर करितो, “ एक रुपया एका गोष्टीची किंमत. ” पाहिला म्हणतो, “ एक दोन गोष्टी साग पाहूं. ” दुसऱ्यानें सागण्यास सुरवात केली, “ ( १ ) गावास जातांना मित्र बरोबर घ्यावा. ( २ ) अत्यत महत्त्वाची गोष्ट फटकळ तोंडाच्या माणसाजवळ बोलू नये. ” अशा दोन गोष्टी सांगून त्या इसमाजवळून त्यानें २ रु. घेतले.

आमचा हा बाजारातील गृहस्थ घरीं गेला व त्यानें या ऐकलेल्या गोष्टींचा अनुभव घेण्याचें ठरविलें.

एके दिवशीं तो एका गावास निघाला. ओढ्यात आल्यावर त्यास गोष्टीची आठवण होऊन बरोबर मित्र घ्यावयास पाहिजे असें वाटलें. तो एक मोठा थोरला खेंकडा चाललेला त्यास दिसला. हाच आपला मित्र असें म्हणून त्यानें तो धोतरात बाधून घेतला व रस्ता सुधारला !

दिवस उन्हाळ्याचे होते म्हणून भर दुपारीं विसावा घेण्यासाठीं एका मोठ्या आंब्याच्या झाडाखालीं तो बसला. त्या ठिकाणींच त्याला झोंप लागली. धोतरात बाधलेल्या खेकड्यानें धोतराचें कात्रें पाडून तो लौकरच बाहेर पडला. थोड्या वेळानें त्या झाडावरून एक सर्प खालीं उतरून त्या निजलेल्या माणसाला चावण्यास येऊ लागला. हें त्या खेकड्यानें पाहिलें व त्यानें आपल्या तीक्ष्ण नांग्यानीं सापाचे तुकडे तुकडे करून टाकीले ! थोड्या वेळानें तो माणूस उठला व त्यानें हे दृश्य पाहिलें त्यास अतिशय आनद झाला, व त्याच्या तोंडून पुढील उद्गार निघाले, " एक रुपया एका गोष्टीस गेला पण गोष्ट मात्र लाखाची आहे. मित्र घेतल्यावाचून प्रवास करणें बरें नाहीं. "

नतर दुसऱ्या गोष्टीचा अनुभव घेण्याचें त्यानें ठरविलें. एका राजधानींत तो राहिला. व तेथील राजाचा मुलगा दूर प्रवासास गेला असतां, एक कावळा मारून फडक्यात गुडाळून आणून एका फटकळ तोंडाच्या माणसास त्यानें असें सागितलें कीं, " मीं राजाच्या मुलाचा वध केला आहे व त्याचें शीर माझ्या घरातील देवीपुढें पुरून ठेवीत आहें. "

हा हा म्हणता ही बातमी त्या माणसानें राजापर्यंत पोंचविली. व त्या खेडवळ गृहस्थास राजवाड्यात बोलवून राजानें एकदम तोफेचे तोंडीं देण्याचा हुकूम केला. तेव्हा तो खेडवळ गृहस्थ म्हणाला, " महाराज, आपण अगोदर नीट चौकशी करा, माझ्या देवीसमोर मीं कावळा मारून पुरला आहे. " नतर राजानें स्वार पाठवून पुरलेला जिन्नस आणविला. तो खरोखरच कावळा ! इतक्यात राजपुत्रही प्रवासाहून सुखरूप परत आला. त्यामुळें राजास अत्यानद होऊन त्या गृहस्थास सोडून दिलें. अशा प्रकारें दोन रुपयाच्या दोन्ही गोष्टींचा त्या खेडवळानें पूर्ण अनुभव घेतला व त्याप्रमाणें नेहमीं वागणेचें ठरविलें.

● ● ●

# ५. धनदौलत !

कोण्या एकेकाळीं एका गावात एक राजा रहात होता. त्याला दोन बायका होत्या एक आवडती, एक नावडती. तर ह्या नावडतीला दोन मुलगे होते त्याना घेऊन राजान नावडतीला एका बागेंत ठेवलेली. मोठा वाडा दिलेला. तिथं ते रहायचे

एक दिवस काय झाल कीं, नावडतीच्या समोर अचानक एक गोसावी आला. त्यासरशीं सगळीकडे प्रकाश आला. त्यान तिला सांगितल, " तुझीं मुल बारा वर्षं वाड्यातच असू देत. बाहेर पाठवू नको. धोका आहे. सावध ऐस " आणिक तो एकदम गुप्त झाला. राणी काळजींत पडली. तिन मुलांच्यावर कडेकोट बदोबस्त ठेवला

पण तेवढ करूनहि मुलांनीं तिचा डोळा चुकवला. खेळायला जायचा बेत करून दोघे बाहेर आले मुलांच्यात खेळत राहिले त्यांच्या-बरोबर त्यांनीं दगा केला हंसत खेळत, उड्या मारीत राहिले

त्यावेळीं आवडती राणी पोथी वाचीत होती. तिच्या कानावर मुलांचा दगा गेला ती चिडली. दासीला पाठवल. चौकशी केली या दोन मुलाची बातमी तिच्या कानावर गेली. तिन मुलाना पकडून आणल. धाकटा म्हणाला, " का बोलावलंत आम्हाला, आईसाहेब ? "

आवडती म्हणाली, " एवढा दगा करायच कारण ? कोण तुम्ही ? "

धाकटा म्हणाला, " का ? आम्ही आहोंत आपले असेच ! " आवडतीला राग आला. तिनं त्या मुलाचे पटके काढून घेतले. तिन मुलाना ओळखल. मनांतून जळफळली. आजाराच सोंग घेतलं. राजाला कळवलं, " सवतीचीं कार्टीं अगाबरोबर झोंबलीं. दुखण आल. त्याना ठार करा. "

राजा सतापला. आवडतीचा हुकूम त्यान ताबडतोब अंमलांत आणला मारेकऱ्याना बोलावलं मुलं ताब्यात दिलीं मारून टाका म्हणाला.

मुल हुषार होतीं. आपल्या अगावर तरवारीचा घाव बसणार असं दिसताच धाकटा म्हणाला, " छे छे ! आम्ही निरपराधी आहोंत. माझी सहावी करंगळी कापून न्यावी राजाची समजूत पटेल. "

मारेकऱ्याला दया आली. त्यानं त्या मुलाच्या करंगळीचं रक्त तरवारीला माखलं. तो माघारीं गेला. मुलांना ठार केल्याचं त्यानं राजाला सांगितलं.

इकडे हीं मुलं भटकत निघालीं. एका मागून एक वन ओलांडीत चाललीं. होतां होता एका तळ्याच्या काठावर आलीं तिथं थोरला झोपला. धाकटा बसून राहिला. इतक्यात त्या तळ्यांतून एक बेडूक आणि एक साप बाहेर आला. बेडकाच्या मस्तकावर लालमणी होता. त्याच्या उजेडात दोघे चरायला फिरत होते. दोघांची मैत्री. तर तिथं एक झाड होत. झाडावर शकुन पक्षी बसलेला. त्यानं चहाडी केली, म्हणाला, "बेडूक मारील त्याला लाल मिळेल."

बेडूक रागावला. त्यानहि जबाब दिला, "पक्षाच धड खाईल त्याला १२ वर्षं वनवास घडेल. शीर खाईल त्याला राज्य मिळेल."

धाकट्यानं हें ऐकलं. बेडूक मारला. पक्षी पण मारला. स्वत: वनवास पत्करून थोरल्या भावाला राज्य दिलं !

दिवस मावळला. एकटाच धाकटा पुढं निघाला. नगर सोडून चालला. राक्षसाच्या भीतीन घाबरला. पण धीर धरून निघाला. परंतु मध्यरात्रीला राक्षसान त्याला गाठलच. दोघाची झटापट झाली. धाकट्यानं राक्षसाला मारलं. पण स्वत: जखमी होऊन पडला.

तेवढ्यात त्या गावच्या सावकाराच्या गड्यानं त्याला बघितलं. त्याला दया आली. घरीं घेऊन गेला. धाकट्या जवळचा लालमणी गावच्या सावकाराला विकून त्यानं त्याला बर केल.

इकडे तोंवर थोरल्याचं लग्न झाल. तो गादीवर आला. राज्य करू लागला.

पण ह्याचा वनवास चालूच होता. दिवसभर कष्ट करावेत, मिळेल तें खाव. तरीपण लालमण्याची रकम उभी केली सावकाराकडे तो गेला. लालमणी परत दे म्हणाला सावकाराला शंका आली त्यान "नाहीं" म्हणून सांगितलं. एवढच नाहीं तर ह्याच्यावर चोरीचा आळ आणला. त्याला कैदेंत टाकल !

तेवढ्यात काय गंमत झाली कीं, त्या गावच्या राणीन नव्या दागिन्यापायीं हट्ट घेतला. म्हणाली, "अत्ताच्या आत्ता मला दागीने

पाहिजेत." गजदंताची फणी, मोत्याचं कारलं, कोशींबिरी करंड आणि शिंपल्या हार तिनं राजाला मागितला. तें सारं दिलं तरच राजावर प्रेम करीन म्हणाली !

राणीचं बोलणं ऐकून राजा कष्टी झाला. हे दागिने कोठून आणणार? त्याच्या देशात तर नव्हते ! त्यानं सगळे कारागीर बोलावले. चौकशी केली. त्या सावकारालाहि बोलावलं. तो तरी काय सांगणार ? पण त्याला युक्ति सुचली. त्यानं त्या धाकटयाला अशी न अशी गोष्ट असल्याचं सांगितलं, व म्हणाला, " सुटका करीन पण मार्ग दाखव."

धाकटा म्हणाला, " साता समुद्रापलीकडे गेलं पाहिजे. तिथं चित्रकूट बेट लागेल. त्या बेटावर चित्रसेन नांवाचं नगर आहे. तिथं हे दागिने असतील."

सावकार हारखला. राजाला त्यानं वर्दी दिली. दागिने आणील त्याला अर्धं राज्य देईन, असं राजानं जाहीर केलं. सावकाराच्या तोंडाला पाणी सुटलं. धाकटा म्हणेल तसलं जहाज रातोरात त्यानं बांधून काढलं. त्याला घेऊन तो त्या देशाला निघाला.

सात वनं ओलांडून त्याचं जहाज त्या देशाला लागलं. त्यावेळीं तीनशेंसाठ समया लावून त्या देशाच्या राजाची लेक पूजा करीत होती. चांगलं गाणं म्हणेल त्याच्याशीं लग्न करण्याचा तिचा पण होता. धाकट्याला तें समजलं. जहाजावर उभा राहूनच त्यानं गाणं म्हटलं. राजाची लेक तें ऐकत राहिली. आनंदली. राजाला तिनं सांगितलं, " शोध लावा. माझा धनी आला. हीच माझी धनदौलत. त्याच्याशींच लगीन करीन."

राजानं जासूद पाठवले. धाकट्याला मानमरातबानं बोलावून आणलं. तेवढ्यांत ते दागिने गोळा करून सावकार तिथं आला. त्याला सर्व कळूं आलें. तो धाकटयाला म्हणाला, " तूं हिच्याशीं लग्न केलंस तरी ती माझी बायको होईल. लक्षात घे. नाहींतर ठार करीन." राजाच्या लेकीनं हें ऐकलं. पण ती घाबरली नाहीं. हसली. मनात म्हणाली, " करीन तर या धाकटयाशींच लगीन करीन."

धाकटयानं मंत्र घातला. त्या तीनशेंसाठ समया घटकेंत लागल्या, घटकेंत मालवल्या. चांगलं गाणं म्हटलं. राजानं त्याला आपली लेक दिली. थाटानं लग्न लागलं. पांच दिवस सुखसोहळा झाला.

पण गंमत अशी कीं, धाकटा मग कुणाशीं बोलेचना नाहीं. राजकन्येला वाटलं, तो मुका आहे ! ती थोडी घाबरली. तिनं बापाला तसं सांगायचा बेत केला. पण रात्रीं एकांतांत धाकटा तिच्याशीं बोलला झाली गोष्ट तिला समजली. तिनं रातोरात एक कागद केला. सगळी हकीकत त्यावर मांडली. त्याची घडी करून चोळींत दुमडली.

जहाज माघारीं निघालें. राजकन्येनं हुषारीनं धाकट्याला जहाजावरच लपवला. स्वतः सावकाराबरोबर निघाली. सावकार तिचं रूप बघून खूष झाला राणीचे दागिने दिले कीं, हिच्याशीं लगीन करीन म्हणाला.

होता होता ते सगळे माघारीं आले. सावकारानं गावजेवण घातलं. त्याला गावचा राजा आला. राजकन्येनं मोठ्या शिताफीनं त्याच्याजवळ तो कागद दिला.

राजानं तो कागद वाचला. मनांतून तो हारखला. त्यानं भावाला ओळखलं दोघे कडकडून भेटले. राजानं सावकाराचं कपट जाणलं. त्याला कायमची कैद केली. त्याच्या त्या नोकराला अर्धं राज्य दिलं !

इकडे नावडती मुलाची आई वाट पहात होती. काळजींत होती. तिची तेवढीच धनदौलत. त्या कारणानं बिचारी काळवंडून गेलेली. पण बारा वर्षं मागं सरलीं. वनवास संपला दोघे मुलगे आपल्या राण्यांना घेऊन तिच्याकडे आले तिला आनंद झाला.

राजाला ही गोष्ट कळू गेली. त्यानं आनंदानं धाकट्याला गादीवर बसवलं. नगरांत आनंदी आनंद झाला.

• • •

# जुन्या आचारविषयक समजुती

संग्राहक:—श्री. चिं. ग. कर्वे

[ आपल्या जुन्या लोकांत प्रत्येक बाबतींत रूढि, आचारविचार वगैरे गोष्टींविषयीं जे नियम पाळले जातात त्यांतील कांहींचा संग्रह खालीं केला आहे. व्यवहारदक्षता किंवा व्यवहारचातुर्य हा गुण प्रत्येक मनुष्यांत अधिक उण्या मानानें असणें जरूर आहे; पण, तो सुसंगति आणि विद्याव्यासंग यांच्या योगानें वाढविला असतां वाढला जातो. प्रत्येक

समजुतीच्या मुळाशीं कांहीं कारण, तथ्य किंवा सावध राहाण्याचा इषारा आहे हें दिसून येईल ]

१. आपणापेक्षां थोर मनुष्याबरोबर बोलताना नेहेमीं तृतीय पुरुषीं बोलावें

२. थोर लोक बसले असतील तेथें त्याच्यापेक्षा उंच स्थानीं किंवा पाठमोरे बसू नये मर्यादेनें बसावें व अंगविक्षेपादि करू नये

३ जाभई किंवा शिंक आली तर तोंडावर पदर किंवा हात धरावा.

४. भाषणात अलकार आणवेल तितका कमी आणावा. अप-शब्दाची तर बिलकूल छायाही पडता कामा नये. बोलताना फार हंसू नये, तसेंच आपल्या बरोबरीच्याची किंवा कनिष्ठाची थट्टा करणें रास्त नाहीं. बोलताना दुसऱ्यास हातानें डवचणें किंवा हातानें टाळी देणें हीं असभ्यतेचीं लक्षणें समजलीं जातात. दुसऱ्याची स्तुति करू नये व आपली करून घेऊं नये हें उत्तम; पण कोणाची स्तुति करणें र झालें तर त्याच्या तोंडावर तरी करूं नये

५ कोणाच्या वर्मीं लागेल असें वाक्य कधींही बोलूं नये.

६. वडिलादेखत स्वस्त्रीशीं भाषण करूं नये किंवा आपल्या मुला-बाळाबरोबर हास्यविनोद करू नये, त्याजबरोबर नेहमीं मोठ्या आदबीनें व मर्यादेनें वागावें. चैनीचे प्रकार तर त्याच्यासमोर कधींच करूं नयेत.

७. परस्त्रीशीं भाषण करूं नये.

८. जेवताना दुसऱ्याच्या पानाकडे पाहूं नये.

९. जेवतांना दुसरा मनुष्य आपणास शिवला तर नेत्रास उदक-स्पर्श करावा

१०. जेवत असता, पाणी पितेवेळीं पचपात्रास उजवे हाताचा टेकू देण्याची वहिवाट आहे. एरव्हीं उजव्या हातानेंच पाणी पितात.

११. सगळी सुपारी खाऊ नये.

१२. मुसळ आडवें ठेवूं नये.

१३. विस्तवावर थुंकू नये.

१४. दोघामधून विस्तव नेऊं नये.

१५. जेवताना शिंक आली अगर वायू सरला तर डोळ्यांस पाणी लावावें.

१६. जांभई आली तर चुटकी वाजवावी.

१७. दाराची कडी वाजवूं नये.

१८. उंबऱ्यावर उभें राहून शिंकूं नये.

१९. मांजर, विधवा, बोडका व तेल वगैरे पदार्थ बाहेर जातेवेळीं पुढें आले तर जाऊं नये; फारच जरूर असेल तर अमळ थांबून व जोड्याची बदल करून मग जावें.

२०. तोंडानें दिवा विझवूं नये.

२१. मीठ पायाखालीं पडूं देऊं नये.

२२. आरशांत आपलें रूप रात्रीस पाहूं नये.

२३. सुपाचा वारा घेऊं नये.

२४ पदरानें बिस्तवास वारा घालूं नये.

२५. पालीचा शब्द झाला तर कृष्णाचें नांव घ्यावें.

२६. झाडताना केरसुणी पायास लागली तर तिचा एक फडा माडावा.

२७. शेंडीस नेहमीं ग्रंथी असावी.

२८. सकाळीं तेल किंवा तेलीं ह्याचें नाव घेऊं नये.

२९. कुवार, कुयोग, पौर्णिमा व अमावास्या असता हजामत करवूं नये.

३०. जळतां दिवा पडला असता वाईट.

३१. दोघां भावात अगर बापलेकात जेवणास बसूं नये.

३२. दिव्याची ज्योत दक्षिण दिशेकडे करूं नये.

३३. डोकीवर हात ठेवूं नये.

३४. सहाणेवर गंध लावूं नये.

३५. जात्यावर बसू नये,

३६. शिवणेशीचा शब्द जेवतांना अगर संध्या करतांना ऐकूं नये.

३७. पाण्यांत तोंड पाहू नये.

३८. पळसाचे पानावर चुना घेऊं नये.

३९. रात्रीचा हिंग आणूं नये.

४०. लघ्वी ओलांडूं नये.

४१. दहीं व गूळ एकत्र खाऊं नये.

४२. माप पालथें घालूं नये.

४३. हातावर मीठ देऊ नये.

४४. पिठावर रेखा ओढू नयेत.

४५. पाणी जमीनीवर ठेवल्यावांचून पिऊं नये.

४६. डोक्यावर दिवा नेऊं नये.

४७. कोणी निजलें असता त्यास ओलाडून जाऊ नये.

४८. आपल्या हातानेंच दुसऱ्याच्या हातावर पाणी घालूं नय.

४९. रस्त्यानें खात खात जाऊं नये

५०. प्रयाणकालीं दधी भक्षण करून गमन करावें.

५१. सोमवारीं तीळ खाऊ नये.

५२. शुक्रवारीं चणे व शनिवारीं उडीद अवश्य खावे.

५३. दुधात थोडेसें तरी पाणी घालून मग तापवावें

५४. स्त्री ऋतुस्नात असता तिच्या चवथ्या दिवशीं परगावीं जाऊ नये.

५५. घरात नखें टाकू नयेत,

५६. विस्तवाचे कोलीत फिरवू नये.

५७ भाड्याचा आवाज होऊ देऊ नये.

५८ तिन्हीसाजा तसेंच अमावस्येस विस्तव देऊं नये.

५९. अंधारात जेवूं नये. जेवतांना दिवा मालवला तर पुन्हां लावून जेवावें

६०. रात्रीस तवा घासू नये.

६१ कपडा अंगात असता शिवू नये.

६२. दारास मुसळ लावूं नये.

६३ जेवताना तोंड मटमट वाजवू नये.

६४ मागें पाय घालून बसू नये

६५. बाहेर जाताना 'कोठें जातोस' विचारलें असताना जाऊ नये.

६६. तूप व तेल एका वेळीं आणू नये.

६७. रात्रीं निजतेवेळीं ईश्वरस्मरण करून व आस्तिकाचें नाव घेऊन मग निजावें

६८. रात्रीं चुन्यात पाणी घालू नये व तो कोणास देऊ नये.

६९. क्वाथ, विश्वा हीं नावें रात्रीं उच्चारू नयेत.

७० पाणी, दूध, भिक्षा, तूप, मीठ व काथ हे पदार्थ हातावर देऊ नयेत.

७१. हजामत करवून परगांवीं जाऊ नये.

७२. रविवारीं ताक करू नये.

७३. कोरें धोतर अथरू व पांघरू नये.

७४. कोरें वस्त्र परिधान करणे आहे तर पहिल्यानें देवावर त्याचें सूत काढून वहावें व सूर्यास नमस्कार करून मग नेसावें व सर्व वडील मंडळीस नमस्कार करावा.

७५. तळहातावर काथ घेऊ नये.

७६. रात्रीला मारलेला विंचू बाहेर फेकूं नये.

७७. जातें व उखळ ह्यामधून जाण्यायेण्याचा रस्ता नसावा.

७८. भिंतीवर कोळशाच्या रेषा ओढू नयेत.

७९. चैत्र शुद्ध १ देस निंब खावा. कोठें कोठें ऊंस खातात.

८०. तुळशीचें लग्न झाल्याखेरीज चिंच, ऊस, आवळे खाऊ नयेत.

८१. दौतींत लेखणी घालून ठेवू नये

८२. ऊन पाण्यांत थोडेंसें तरी विसण घालून मग स्नान करावें.

८३. शनिवारीं तेल व मीठ आणू नये.

८४. पायरी उतरताना ईश्वरस्मरण करून सूर्यास नमस्कार करावा.

८५ जात्याची तळी घराचे भिंतीस लावूं नये.

८६. रात्रीस झाड कापू नये.

८७. दोघानीं बरोबर स्नान करू नये.

८८. मुलाचे बापानें सोमवारीं हजामत करवू नये.

८९. हजामत करविताना बोलू नये.

९०. शौचास बसले असता बोलू नये

९१. गणेशचतुर्थीस चंद्र पाहू नये.

९२. पागोट्यावर पागोटें ठेवू नये.

९३. चुलीवर पदार्थ शिजत असता तसाच घेऊन खाऊ नये.

९४. उच्च स्थानीं बसले असता पाय हालवू नयेत.

[ व्यवहारदर्पण ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २३०८० वि ३८५
क्रमांक ९०८० नों: दि. २५।३।५८



प. वा. कुमारी सुलोचनाबाई सप्तर्षि
[ १९१०–१९५८ ]

लोकसाहित्याचें मोठ्या आवडीनें व निष्ठेनें संकलन करणाऱ्या या विदुषी अहमदनगर येथील सुप्रसिद्ध वकील नानासाहेब सप्तर्षि यांच्या ज्येष्ठ कन्या. प्रकृति नेहमीचीच वाईट असतांना त्या महिला विद्यापीठाच्या 'गृहीतागमा' झाल्या व नंतर त्यांनीं लोकसेवेला व लोकसाहित्याला वाहून घेतलें. त्यांच्याकडे मदतीसाठीं येणाऱ्या अडाणी बायाबापड्याकडून त्यांनीं लोकगीतें मिळविलीं. अशा रीतीनें सांस्कारिक आणि पारंपरिक गीतांचा आणि कथांचा त्यांनीं केलेला संग्रह चांगला आहे. त्यांतीलच काहीं महाराष्ट्र लोकसाहित्य मालेंत निवडून दिलेला आहे. त्यांच्या निधनानें लोकसाहित्याची, विशेषतः म. लो. समितीची मोठी हानि झाली आहे.



प्रौढ बायांची फुगडी



आतां गाणें कोणतें ?

[ डॉ. सरोजिनीबाई बाबर यांनी मुद्दाम घेतलेले फोटो ]

# नगरी लोकसाहित्य

# नगरी लोकसाहित्य

## अहमदनगरच्या परिसरांतील ऐतिहासिक लोकगीतें

( कु. सुलोचनाबाई सप्तर्षि, अहमदनगर )

"साऱ्याही विषयात आशय कधीं मोठा किती आढळे," ह्या एका महान् कवीच्या ओळीची आठवण मला हीं लोकगीतें जमविताना आली. खरोखरच हीं लोकगीत म्हणजे त्या त्या वेळच्या परिस्थितीचें चित्र रगविणारें एक साधेसुधें काव्य आहे. हें काव्य वाचताना त्यावेळची परिस्थिति, त्यावेळची समाजरचना, त्यावेळचे धदे, त्यावेळची राज्यपद्धति, त्यावेळचें तत्त्वज्ञान, त्यावेळच्या धर्माविषयींच्या कल्पना काय काय होत्या व त्या त्या परिस्थितीनुरूप सर्व कसें बदलत गेलें, हें आपल्याला उत्तम तऱ्हेनें कळतें. नेहमीं असें म्हणतात कीं, धर्म स्त्रियांच्याकडून राखला जातो. त्या न्यायाला अनुसरूनच मीं जमवलेलीं भावगीतं याची सत्यता पटवून देतील. पूर्वींच्या काळीं लोकगीतें कुठेंही लिहून ठेवलेलीं आढळणार नाहींत. स्त्रिया एकमेकींकडून हें काव्य शिकत असत. कामाला काव्याची जोड असली कीं, कितीही कठीण काम असलें तरी करताना तें कठीण वाटत नाहीं. अगदीं सुलभ वाटतें. लोकगीतें जमविताना मला प्रत्येक घरातून जणू काय प्रत्यक्ष पुस्तकेंच आहेत असा भास होतो. वेद जसे प्राचीन काळीं लिहिलेले नसत तसेंच हें काव्य कुठेंही लिहिलेलें तुम्हाला आढळणार नाहीं. म्हणूनच त्या काव्याला अपौरुषेय वाङ्मय म्हणतात.

आता आपला त्या अपौरुषेय वाङ्मयाशीं सबध काय तें पाहू. आपला ह्या काव्याशीं निकटचा संबध आहे तो कसा ? हें विचारलें असता उत्तर अगदीं सोपें आहे. आपण ज्या देशात राहातों त्याचें वर्णन त्यात असतें, आणि तें वर्णन म्हणजेच आपला इतिहास. ह्या इतिहासाचा शोध करताना आपल्याला शिलालेख, ताम्रपट, नाणीं, पत्रव्यवहार, बखरी,

आख्यायिका व काव्यें ह्या साधनांचा उपयोग करावा लागतो. आज आपल्याला अहमदनगरच्या परिसरातलीं ऐतिहासिक लोकगीतें फक्त विचारात घ्यावयाचीं आहेत.

काहीं ऐतिहासिक ओव्या खालीं देऊन त्यांचा अहमदनगर शहराशीं कसा संबंध येतो तें पाहूं :

वाजत्रीं वाजतीं गावा भिंगारा खालतीं । आई अंबिकेची आली
पलग पालखी ॥ १ ॥
नगर शहर पाण्याच्या डबक्यात । आई अंबाबाई फुलाच्या
झबक्यात ॥ २ ॥
आई अंबाबाई हिला सोन्याच सिंहासन । बंधवाला माझ्या होय
भक्ताला प्रसन्न ॥ ३ ॥
दर्शनाकारणें गेलें होतें देवळात । आई अंबिकेनें मोतीं दिलें
अंगाऱ्यात ॥ ४ ॥
आनंदी अंबाबाई आनंद कर माझा । पान या फुल यानीं दाट
सारवितें तुला ॥ ५ ॥
आई अंबाबाई गडावरली राखण । बाळाच्या हातीं माझ्या सोन्याच
काकण ॥ ६ ॥
आई अंबाबाई तुमच सोनियाचं कबळ । दूर देशात माझ्या बाळाला
संभाळ ॥ ७ ॥
आई अंबाबाईची सोनीयाची मिरी । जन्माला जावो माझी कुंकवाची चिरी ॥ ८ ॥
आई अंबाबाई पैठणी नेसली सोहोळा । आई अंबिकेच्या कपाळीं
कुंकवाचा टिळा ॥ ९ ॥
नऊ दिवस नवरात्र दहाव्या दिवशीचा दसरा । शिलंगण खेळायला
अंबा निघाली उशीरा ॥ १० ॥

वरील ओव्या वाचल्या कीं, आपल्या येवढें सर्वसाधारणपणें लक्षांत येतें कीं, अंबाबाई, भिंगार व अहमदनगर ह्या तीन गोष्टींचा एकमेकांशीं कांहींतरी निकटचा संबंध आहे. एके काळीं नगर शहरात भरपूर पाणी असलें पाहिजे व देवीची त्या ठिकाणीं स्थापना झाली असावी. भोंवतीं भरपूर पाणी व गडावर देवीची मूर्ति असावी. बर, त्या देवीचं सिंहासन

कौशल्ययुक्त कमळाच्या आकाराचें असून, देवीचें लुगडें सोन्याचें असावें व देवी सर्व लोकांना मोत्यांनीं युक्त असा अंगारा देत असावी. केव्हा केव्हां रेशमी पैठणी नेसलेली देवी दिसत असावी. हें झालें देवीचें वर्णन. अशी ही ऐश्वर्यानें नटलेली देवी कोणाच्या तरी आश्रयाशिवाय असणें शक्य नाहीं. हा आश्रय म्हणजे राजाश्रयच असावा बर, आता ह्या देवीचा भिंगारशीं काय संबध असावा ? भिंगार हें सध्याच्या अहमदनगर शहरापासून दोन मैल अंतरावर आहे. आणि असं म्हणतात कीं, भिंगार हें गाव पैठण इतकेंच जुनें गाव आहे ह्याला पुरावा म्हणजे भिंगारवरून पैठणला सरळ रस्ता जातो. त्या ठिकाणीं आध्रभृत्य राजे राज्य करीत होते. ह्या राजांनीं आपलीं नावें महाराष्ट्रातल्या कांहीं भागांना दिलीं आहेत. पारनेर तालुक्यात जीं लेणीं आहेत तीं ह्याच राजाच्या वेळचीं असावींत असें म्हणतात, व त्याचा संबध ह्याच कालाशीं येतो. ह्या राजाच्या वेळचीं काहीं जुनीं नाणीं नाशिकला सापडलीं आहेत. ह्यानंतर तिसरा गोविंद म्हणून त्याच्यापैकीं एक प्रबल राजा होऊन गेला ह्याच्यानंतर चालुक्य घराण्यातील राजे राज्यावर आले व त्याच्या मालकीचीं सर्व लेणीं व देवळें झालीं. चालुक्य राजाच्यानंतर यादव घराण्यातील राजे राज्य करू लागले. पुढें कांहीं दिवसानीं यादवाचें राज्य मुसलमानानीं घेतलें. सन १९२४ मध्यें महमद तघलक राज्यावर आला व त्यानें राज्य केलें.

आध्रभृत्य राज्य म्हणजेच शालीवाहनाचें राज्य होय. शालीवाहन राजाना आपल्या गादीचा फार अभिमान होता त्याची कुलस्वामिनी अबाभवानी होती. हे राजे आपल्या कुलपरंपरेस विशेष जपत असत. ते फार स्वाभिमानी होते. ह्या राजाची राजधानी पैठण होती. हें गाव नगरपासून सुमारें पन्नास मैलावर आहे. नगरच्या जनरल पोस्ट ऑफिसपासून सरळ रस्ता पैठणला जातो. पैठण हें त्या वेळीं भरभराटीचें गाव होतें. त्या गावात एकनाथाच्या सारखा मोठा संत होऊन गेला. त्या ठिकाणीं उत्तम रेशमी वस्त्रें विणलीं जात असत. तीं अजूनपर्यंत प्रसिद्ध आहेत. त्या वेळीं नगर-भिंगारलाहि लुगडीं विणलीं जात असत. पैठणचें वर्णन खालील ओव्यात चांगलें केलें आहे.

पैठण पैठण पैठणाला बारा गल्या । एकनाथाच्या घरीं विठ्ठल
लुगडीवाला ॥ १ ॥
पैठणच्या बायाना मोठं दिंडीच भूषण । अंबारीचा हत्ती भरजरीच
निशाण ॥ २ ॥
जाईच्या फुलांचा वास सुटला सुंदर । नाथ महाराजाच चिंचबनात
मदीर ॥ ३ ॥
नाथ महाराजाची मूर्त गाळीव सोन्याची । पाठीशीं गंगाबाई पुढें
बारव पाण्याची ॥ ४ ॥
गाव पैठणाला गल्लीला सोनार । देव नाथराया चंद्रहाराचा
लेणार ॥ ५ ॥
गंगाबाई तुझं पाणी सोन्याच्या कासंडींत । नाथरायाला तहान
लागली दिंडींत ॥ ६ ॥

शककर्त्या शालीवाहनाचा वाडा त्या ठिकाणीं अजून त्या वेळच्या राजांच्या ऐश्वर्याची साक्ष देत आहे. पुढें काहीं दिवसांनीं ह्या राजाची सत्ता खिळखिळी झाली. सर्व दुसऱ्याच्या ताब्यात जाण्याची वेळ आली. त्या वेळीं त्याच्याचपैकीं एका राजपुत्रानें त्याची कुलस्वामिनी अंबाभवानी व राजाची गादी घेऊन पळ काढला व एका टेंकडीवर निर्मनुष्य अशा ठिकाणीं देवीची स्थापना केली. तीच ही बुऱ्हाणनगरची देवी असावी. त्या देवीवरूनच ‘ अम्बानगर ’ हें अहमदनगरला नांव दिलें गेलें असावें. मुसलमानी राज्य आल्यानतर बुऱ्हाण सरदाराच्या नावावरून बुऱ्हाणनगर नाव दिलें. परंतु पूर्वीचें तें ‘ अम्बानगर’च होतें. कारण बुऱ्हाणनगरच्या आसपास त्या राजाचीं नाणीं सापडलीं आहेत शालीवाहन राजाच्यानतर पसतीस वर्षांनीं ‘ अम्बानगर ’ हें वसविलें गेलें असावें.

शालीवाहन वंशातल्या हाल ह्या राजानें ‘ गाथा सप्तशती ’ हा ग्रंथ लिहिला. शालीवाहनापासून महाराष्ट्राच्या इतिहासास प्रारभ होतो. महाराष्ट्राचें वैशिष्ट्य त्या वेळेपासून दिसूं लागलें महाराष्ट्राची स्वतत्र संस्कृति शालीवाहनापासून सुरू झाली. अहदनगरचें नाव ‘ अम्बानगर ’ असावें याला वरील सर्व गोष्टीमुळें पुष्टि मिळते.

नगरचें अहमदनगर होण्यापूर्वीं चाहुराणा बुद्रुक व चाहुराणा खुर्द अशीं दोन गांवें होतीं. ह्या दोन्हींचा समावेश नगर शहरात झाला. भिंगार

हें पूर्वीपासूनच चाहुराणा बुद्रुक व चाहुराणा खुर्द यामध्यें सामील आहे. माळीवाडा, नालेगाव, मोरचुदानगर ही सर्व वस्ती अहमदनगरपूर्वीचीच आहे. चाहुराणा हें चव्हाण घराण्याचें नांव आहे. अगदीं पूर्वी चाहुराणा नगरही म्हणत असत. पांच देवींच्या नांवावरून पांच वेगवेगळ्या नावाचीं पुरें अजून इथं आढळून येतात. चाहुराण्याचा मुलगा मगळ ह्याच्या म्हाळसा व गुणाई अशा दोन बायका होत्या. म्हाळसेच्या नावावरूनच माळीवाडा हें नांव ह्या लोकवस्तीला मिळालें आहे. गुणाई हें नाव पण खालील ओवींत सांपडतें. ह्या ओव्या माळीवाड्यातल्या वस्तींतूनच मीं गोळा केल्या आहेत. जेजुरीचा खंडोबा ह्याविषयींही काहीं ओव्या आहेत. त्या खालीं देत आहें :

म्हाळसा गुणाई दोघी दळिती भंडारा । देव ते मल्हारी वाघ्या तोडितो लंगरा ॥ १ ॥

जळमीं येऊनी जेजुरी कर नारी । नऊ लाखाची पायरी एक ध्यानामंदीं धरी ॥ २ ॥

भ्रतार ह्यावशा अंग दाखवी जेजुरी । नऊ लाखाची पायरी हळुंच उतर सुदरी ॥ ३ ॥

म्हाळसेच्या नावावरूनच माळीवाडा हें त्या भागाचें नाव पडलें असावें याला वरील ओवीवरून पुष्टि मिळते.

नवनाथाचीसुद्धां ह्याच जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणें आहेत, हेंहि खालील ओव्यावरून दिसून येईल. त्याचप्रमाणें नगरच्या आसपास पुष्कळ साधु हाऊन गेले. त्याच्याविषयीं काहीं ओव्या आहेत. त्या ओव्यावरून ते कुठें रहात असत, ते होते कसे, त्याचें पुढें काय झालें वगैरे आपल्याला सव समजतें तसेंच प्रत्येक गावात मारुतीचें देऊळ साधारण कुठें असतें व त्याचें कार्य काय हेंहि ओव्यावरूनच सर्व सविस्तर कळतें. ह्या सव ओव्या उदाहरणादाखल खालीं देत आहें :

गोरखनाथ वडी मागावया गेला । वड्याच्या कारण डोळा हातावरी दिला ॥ १ ॥

मच्छींद्रनाथ स्त्री-राज्यामधिं गेला । चलो मछिंदर गोरख नेया आला ॥ २ ॥

गोपिचंद राजा राज्य सोडून गोसावी झाला । गाजवली आलक् माय
म्हण गोरखनाथाला ॥ ३ ॥

ल्योकावरी ल्योक तुला झालेत चढाचे । देव वृद्धेश्वराला अन्ने
वाहिले पाडाचे ॥ ४ ॥

नगर जिल्ह्यातच मेहकरी म्हणून एक लहान खेडेगाव आहे. त्या मेहेकरीला एक भारतीकबाबा होऊन गेले. त्याची समाधि तेथें आहे. त्या-सबधीं दोन ओव्या खालीं देत आहें:

नाहुनी धुवुनी बाई म्या सैपाक केला । भारतीकबाबा माझ्या
वाड्या आला ॥ १ ॥

सद्गुरुच्या मठामधिं नव्हती बागडी वाजत । भारतीकबाबाला नाव
गुरूला शोभत ॥ २ ॥

राया मराठ्याची गादी सद्गुरुच्या गादीवरी । राजा बंजारी माझा
राज्य करी ॥ ३ ॥

तसेंच नगर जिल्ह्यात पाथर्डी म्हणून गाव आहे. तिथून सात कोस नारायणगड आहे. त्या ठिकाणीं भगवानबाबा म्हणून एक साधु होऊन गेले त्याची समाधि आहे. त्या गादीसंबधीं अजून कोर्टात भांडणें चालू आहेत. त्या गादीचे मुख्य मालक नरसोबाबा हे जातीचे मराठे होते. परतु त्याचा शिष्य भगवानबाबा हा बंजारी होता. तरीसुद्धां त्यानीं त्याला ती गादी दिली. परतु मागाहून बजारी व मराठा लोकामध्यें भांडण लागलें. त्या भगवानबाबाच्या काहीं ओव्या देत आहें :

नारायण गडावरी साधु झाले जागोजाग । पाण्यावरी वाची पोथी
नाव याचं भगवानबाबा ॥ १ ॥

टाळ मृदुंग वाजती नारायण—गडाच्या पारीला । साधु भगवानबाबा
निघे आखाड वारीला ॥ २ ॥

आले आले भगवानबाबा खान्या लिंब्याच्या पाणदी । जळ काप-
राची ज्योत नरसोबाच्या संबंधीं ॥ ३ ॥

नारायण गडावरी टाळकरी झाले गोळा । भगवानबाबाचा ऐक
वजाऱ्याचा गळा ॥ ४ ॥

आले आले भगवानबाबा उतरले गायरानीं । गाईच्या दुधाला नका
टाकू धाखणी ॥ ५ ॥

अनुक्रम 23026 . दि: ...
क्रमांक ...7000... नों दि: 27-3-58



नारायण गडावरी नाहीं पाखराला पाणी । भगवानबाबानी हौद
बनवीले दोन्ही ॥ ६ ॥
नारायण गडावरी टाकी वाजती हजार । बाधणी वीटाची गौंडी
झालेत बेजार ॥ ७ ॥
साधु म्हणू साधु साधु कितीक होणार । भगवानबाबाची नाहीं
परतिमा येणार ॥ ८ ॥
चांदीचा साज घोडी तुला घुंगुबाई । भगवानबाबा ब्रह्मचारी चाली
याच्या पायीं ॥ ९ ॥

ही झाली सर्व भगवानबाबाची हकीकत.

यानंतर एक गोविंदबाबा म्हणून कोणितरी साधु होऊन गेले. त्याची समाधि स्टेशनरोडला आहे. त्याच्यासमोर मारुति आहे त्या-संबधीं एक ओवी खालीं देत आहें :

मारुती म्होर जाई जुईच रोपड । आडव्या सडकाला गोविंद-
बाबाच झोपड ॥ १ ॥

मारुतीचें देऊळ शहराच्या कोणच्या ठिकाणीं असावें यासंबधीं नियम ठरलेले आहेत. मारुतीला वेशीचा पति म्हटलें आहे त्याला निर-निराळ्या प्रकारानीं आळवलें आहे. त्यासंबधींच्या ओव्या खालीं देत आहें:

वेशीमदि उभा वेशीबाई तुझा पति । अंगीं शेंदुराची उटी नाव
याच मारवाति ॥ १ ॥
राजा मारुति वेशीबाहेर नांदतो । लाल तुझा झगा लाल पगडी
बांधतो ॥ २ ॥
माझ्या अंगणात कशाच लालपाणी । राजा मारुतीला राती होती
मेजवानी ॥ ३ ॥

मुसलमानी राज्याचा अमल सुरू झाल्याबरोबर तशा धर्तीचें काव्य रचलें गेलें. अंबानगरचें अहमदनगर झालें. शहराभोंवतीं तट बांधला, वेशी बांधल्या. बारेमाम ( म्हणजे बडा इमाम—मोठा संत ) हा कोणीतरी पूर्वीं एक सत्पुरुष होऊन गेला असावा. त्याला सावेडी हें नगराच्या जवळच असणारें एक गाव इनाम मिळालें असावें. म्हणूनच त्याला सावेडीचा वतन-दार म्हटलें आहे. पूर्वीं जसें देवीलाच नुसते नवस करीत तसेंच आता लोक

बारेमामला नवस करू लागले. ह्या सर्व परिस्थितीचें वर्णन खालील ओव्या-तून हुबेहुब केलें आहे. त्या कांहीं ओव्या खालीं नमुन्यादाखल देत आहें

पुणं झालं जुन मुंबई अशी तशी । कुणी राजानें बांधल्या बारा वेशी ॥ १ ॥

नगर भिंगार एका दोरीन हालत । बधवाचं माझ्या बाळ कायद्यान बोलत ॥ २ ॥

नगर भिंगार मधिं किल्ला डौलेदार । इथुनि देखीन चांदबिबी तुझा महाल ॥ ३ ॥

देवामध्यें देव बारेमामा उंच । कुणा राजानें लाविली जमिनीवरी चिंच ॥ ४ ॥

नवस बोलले मुसलमानाच्या देवाला । सोन्या तुझ लिंबू वाहू केल मीं डोल्याला ॥ ५ ॥

नगर शहरात धुल्ला होतो वारंवार । देवा बारेमाम सावेडीचा वतनदार ॥ ६ ॥

जाई तुझ फूल जवसाच्या पानामंदिं । देव बारेमाम सावेडीच्या रानामंदिं ॥ ७ ॥

नगर शहरात गल्ली गल्लींत कंदील । त्याचें उजेडानें बांधु लागले मंदील ॥ ८ ॥

पुढें काहीं दिवसानंतर मुसलमानाचें राज्य खिळखिळें झालें व नाहींसें झालें. इंग्रज त्या ठिकाणीं आले. कितीतरी सुधारणा झाल्या. नवीन आगगाडी ज्या वेळीं आली त्यावेळीं निरनिराळ्या तऱ्हेनें काव्य रचलें गेलें. त्यातलें काहीं नमुन्यादाखल खालीं देत आहें :

आगीनगाडीला सव्वा कोसाचा पसारा । कळ दाबायाला वर इंग्रज बसला ॥ १ ॥

आगीनगाडीला बहु लोखंड आटल । खेड्याच्या नारीला इला नवल वाटल ॥ २ ॥

आगीनगाडी आली दिसती आऊ बाऊ । नको नारी भिऊ इंजनवाला माझा भाऊ ॥ ३ ॥

आगीनगाडी आली आली किंकाळ्या ठोकीत । बधवाची माझ्या तांगेवाल्याला ताकीत ॥ ४ ॥

आगीनगाडींत डब्याडब्यानीं कंदील । इच्या उजेडानीं बघु वाचितो मदील ॥ ५ ॥
आगीनगाडीला देते चवल्यापावल्या । बयाच्या गावा जाया आता डब्याच्या सावल्या ॥ ६ ॥
आगीनगाडीला नाहीं लागत बैल । इंग्रजीच्या बाळा कळ सोडावी सैल ॥ ७ ॥

आतांपर्यंत परिस्थित्यानरूप लोकगीताचा ओघ कसकसा बदलत गेला हें आपण पाहिलें. यावरून ह्या काव्याला किती महत्त्व आहे हें सर्वांना पटेल. इतिहास लिहिताना केव्हा केव्हा त्याचा आधार घेतां येईल. येथें मी फक्त ऐतिहासिक आधारासाठीं त्या त्या प्रकारचींच लोकगीतें नमुन्यादाखल घेतलीं आहेत. परतु त्यात सुद्धा जिवतपणा कसा आहे हें तें वाचताना प्रत्ययास येतें. आणि काव्य निर्माण करणारे कोण ? तर अगदीं अशिक्षित स्त्रिया. खऱ्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास आमच्या ह्या भगिनींनींच केला आहे. काहीं प्रसगीं जीवनाचें वैफल्य, निराशावाद त्याच्यासमोर कराल दाढा उघडून उभा असला तरी सुद्धा त्यात आनद कसा निर्माण करायचा हें त्याना फारच चागलें समजत होतें. कोणत्याहि कामांत त्या अगदीं रगून जात. याचें कारण म्हणजे फक्त त्याना प्रसगानुरूप विनोद निर्माण करता येत होता. करमणूक करून घेता येत होती. वेळप्रसगीं नाट्यसमारभहि त्या काव्याच्या सहाय्यानें निर्माण करता येत होते. काव्याच्या करमणुकीच्या द्वारा वेळप्रसगीं शिकवणूकहि देता येत होती.

• • •

# विविध लोकगीतें

१. संग्राहक—विष्णू रंगनाथ सोनार

## १ बाभळ्या बाईचा

बाभळ्या बाईचा । बाईचा हिरवा पाला,
कोण्या देशीचा । देशीचा जोगी आला.
त्याची किंगरी । किंगरी नानापरी,
त्यानें हयेली । हयेली बांधू केली.

नाग्या सुतार । सुतार नेवास्याचा,
दडी रुमाल । रुमाल ठेपुस्याचा.
आई मला देशील । देशील कोण्या घरीं ॥ ध्रु. ॥
तुला देईल । देईल सुतारा घरीं.
सुतार नवरा नवरा नको ग-माय !
लाकुड तासीता । तासीता जलम जाय.
माझ्या आईची । आईची येडी माया,
आंबे खावून । खावून धाडी कोया ॥ १ ॥
तुला देईल । देईल सोनारा घरीं.
सोनार नवरा । नवरा-नको ग माया !
दागिणे घडता । घडता जलम जाय.
माझ्या आईची० . ... धाडी कोया ॥ २ ॥
तुला देईल । देईल चाभारा घरीं.
चाभार नवरा नवरा नको ग माय !
टाके घालिता । घालिता जलम जाय
माझ्या आईची०. .... धाडी कोया ॥ ३ ॥
तुला देईल । देईल ताबुळा घरीं.
ताबुळ नवरा । नवरा नको ग माय !
त्याच्या पलगीं पान खाय् अन जलम जाय.
माझ्या आईची० घाडी कोया ॥ ४ ॥
तुला देईल । देईल ल्व्हारा घरीं.
ल्व्हार नवरा । नवरा नको ग माय !
भाता फुकिता । फुकिता जलम जाय.
माझ्या आईची० .. धाडी कोया ॥
बाभळ्या वाईचा । वाईचा हिरवा पाला ॥ ५ ॥

## २ कावडीचें गाणें

रामा हो रामा, रामा । रामाच्या बागामंधीं हो, बागामंधीं ॥ ध्रु. ॥
चाव्हऱ्या मोटा दोन्ही, हो मोटा दोन्ही ।
जाईला जात पाणी, हो मंजुळ वाणी ॥

जाईला आल्या कळ्या, हो आल्या कळ्या ।
हार गुंफून घालूं गळ्या, हो घालू गळ्या ।।
रामा हो रामा रामा ।। १ ।।
त्या बांदावर जाई कुणी लावीली । लावीली रामा ।
लावीली हो, लावीली रामा ।।
लावीली लक्ष्मण दिराणीं, दिराणीं रामा ।
दिराणीं हो दिराणीं रामा ।।
जाईला पाणी कुणीं घातीलं । घातीलं रामा ।
घातील हो, घातील रामा ।।
घातीलं लक्ष्मण दिराणीं । दिराणीं रामा ।
दिराणीं हो दिराणी रामा ।। २ ।।
जाईला कळ्या कुणीं आणील्या । आणील्या रामा ।
आणिल्या हो आणिल्या रामा ।
आणील्या लक्ष्मण दिराणीं । दिराणीं रामा ।
दिराणीं हो दिराणीं रामा ।। ३ ।।
जाईचा हार कुणी गुंफिला । गुंफिला रामा ।
गुंफीला हो गुंफीला रामा ।
गुंफीला लक्ष्मण दिराणीं । दिराणीं रामा ।
दिराणीं हो दिराणीं रामा ।। ४ ।।
[ निवेदक—बाबुराव खोबराजी बडे, वडगाव ( पाथर्डी ) ].

## ३ भलरी

तुम्ही ममईला जाताल काय हो ?
मला नाटीच आणाल काय हो ?
आता व्हय रे भलरीदादा ।। ध्रु. ।।
तुझ्या नाटीचा बाबद काय ग,
तू नाटीच नेसून पाय ग,
तूं रस्त्यानं डौलान जाय ग,
तूं खुशींत राहायच ग,
आता व्हरे भलरी दादा ।। १ ।।

तुम्ही ममईला जाताल काय हो ?
मला दंडाळ्याच आणताल काय हो ?
तुझ्या दंडाळ्याची बावद काय ग,
तू दडात घालून पाय ग,
तू सडकान थाटांत जाय ग,
तूं माझ्याकडे एकदा पाय ग,
आतां व्हय रे भलरी दादा ॥ २ ॥
तुम्ही ममईला जाताल काय हो ?
मला नथच आणताल काय हो ?
तुझ्या नथाची बावद काय ग,
तूं नाकात घालून पाय ग,
तूं पेठानं मिरत जाय ग,
आतां व्हय रे भलरी दादा ॥ ३ ॥

१. संग्राहक—भीमराव डी. आंधळे

## भिल्लीण

तुळसीबाई तुझे मंजूळ हालती ।
तुझ्या सावलीला देव सोंगटी खेळती ॥ १ ॥
सोंगटी खेळता डाव आला गिरीजावरी ।
महादेव बोलं गिरीजा नको जाऊ रडी ॥ २ ॥
सोंगटी खेळता पहिला डाव गिरीजाचा ।
[1]जीथून नेला ढवळा नंदी शंकराचा ॥ ३ ॥
बारा वर्सं तप महादेव तपसरी ।
आटाचं रूप तुझं भिल्लनी नारी ॥ ४ ॥
बारा वर्सं झाली बसला नेत्र लावून ।
ओवाळाया गेली गिरीजा भिल्लीन होवून ॥ ५ ॥
महादेव बोलं उभी उभी तूं भिल्लनी ।
दंडी कुसरीच्या वेळीं, माझी गिरीजा तुझ्यावाणी ॥ ६ ॥

१ जिंकून. २ वाक्या.

महादेव बोल उभी उभी तूं भिळट ।
दंडी कुसरीच्या येळा माझ्या गिरीजाचा थाट ।। ७ ।।

• • •

३. संग्राहक—**ये. स. झांबरे**

## म्हातारा संबुदेव

म्हातारा संबुदेव दाडी लोळती भुईला ।
गिर्जा बोलती माईला ।। १ ।।
म्हातारा संबुदेव दाडी लोळती केरात ।
गिर्जा जानीन्या भरात ।। २ ।।
म्हातारा संबुदेव हालती त्याची मान ।
गिर्जा बेगडाच पान ।। ३ ।।
म्हातारा सबुदेव गळती त्याची लाळ ।
गिर्जा मसुराची डाळ ।। ४ ।।
बळीच्या शिकरावरी सबुदेव सोडी जटा ।
गिर्जा नारीचा हिय्या मोटा ।। ५ ।।
संबुदेवाच्या शिकरावरी चरतेत वासरं ।
गिर्जा नारीच सासरं ।। ६ ।।

• • •

४. संग्राहक—**अे. डी. सदगीर**

## ओव्या

### १

पहिली माझी ओवी । गायिली प्रातकळीं ।
देव पांडूरंग अगणीं नाच वनमाळी ।। १ ।।
दुसरी माझी ओवी । अस दुज नहीं कुठ ।
देव पांडूरग माला । जनीवानी भेट ।। २ ।।
तिसरी माझी ओवी । तिरगुन आठविलें ।
देव ते सावळे । माला साक्षत भेटलें ।। ३ ।।

चवथी माझी ओवी । चौखडामधीं काशी ।
देव पांडूरंग । लक्ष तुझ्या पायापाशीं ।। ४ ।।
पाचवी माझी ओवी । म्यां गाइली संताला ।
श्रीकृष्णाजीला । दुर्पतीच्या बंधवाला ।। ५ ।।
साही माझी ओवी । साही सागराला ।
श्रीकृष्णाजीला । रुक्माबाईच्या वराला ।। ६ ।।
सातवी माझी ओवी । म्या गाइली संताला ।
देव सांवळ्याला । रुक्माबाईच्या कंथाला ।। ७ ।।
आठवी माझी ओवी । आठविते वेळोवेळां ।
देव पांडूरंगा । माझ्या जिवाचा जिव्हाळा ।। ८ ।।
नववी माझी ओवी । नवही अंत्तराला ।
देव सावळ्याला । रुक्मिनीच्या भर्ताराला ।। ९ ।।
दहावी माझी ओवी । कशी एकादशी बाई ।
पंढरपुरात दुरडी । लाहियाची जाई ।। १० ।।
आकरावी माझी ओवी । अकरा गांठी ।
देव सावळ्याच्या । दर्शनाला झाली दाटी ।। ११ ।।
बारावी माझी ओवी । बारस माझ्या घरीं ।
पारन सोडिती । रुक्माबाईच्या मंदिरीं ।। १२ ।।
तेरावी माझी ओवी । एक मौज पहायाची ।
गप्पलपूरात । हांडी फुटती दह्याची ।। १३ ।।
चौदावी माझी ओवी । माझें चौदावें रतन ।
देव सांवळ्याला । देही केली आरपन ।। १४ ।।
विठ्ठल विठ्ठल । विठ्ठल नाईबंद ।
रक्मिनीपरिस याला राधिकेचा छंद ।। १५ ।।

[ निवेदक—वेणूबाई ]

२

पहिली माझी ओवी । गणराया गणपती ।
देवाच्या सभाला । सारजा उभी होती ।। १ ।।
दुसरी माझी ओवी । गणराया तुम्ही यावा ।
घामन्याच घोळ । सग सारजाला घ्यावा ।। २ ।।

तिसरी माझी ओवी । गणराया तो नटला ।
घागऱ्याच घोळ । एक नाद तो सुटला ।। ३ ।।
चौथी माझी ओवी । दशरथ वचन द्यावा ।
राम वनवासा लावा । भरत गादीवर बसवा ।। ४ ।।
पाचवी माझी ओवी । कैकयी माझी आई ।
वडील रामराया । गादीला कसा लाऊ पायी ।। ५ ।।
सावी माझी ओवी । भरत शत्रुघन ।
रामाच्या सुदीला । निघाले दोघेजन ।। ६ ।।
सातवी माझी ओवी । सुमत परधानाला ।
राम गेले वनवासाला । रस्ता दावा माला ।। ७ ।।
आठवी माझी ओवी । गोहक नावाडी ।
राम गेले वनवासा । टाकी भागीरथी उडी ।। ८ ।।
नवी माझी ओवी । नदक रामावरी ।
दशरथ राजाची । हकीगत साग सारी ।। ९ ।।
दहावी माझी ओवी । शत्रुघन माग जावा ।
कौसल्या माताची । सेवा कराया लागावा ।। १० ।।
आकरावी माझी ओवी । शत्रुघन माग जावा ।
रामाच नाव घ्यावा । राज्य हाकाया लागावा ।। ११ ।।
बारावी माझी ओवी । राम निघाले आईरानीं ।
सीताला रुल खडं । डोळ्याला येत पानी ।। १२ ।।
तेरावी माझी ओवी । डोंगरकाठीचा मिरग पळाला ।
सीताच्या चोळीसाठीं । मिर्ग रामानीं मारिला ।। १३ ।।
चौदावी माझी ओवी । लक्ष्मन गेला वनाला ।
मारला वीरभद्र । वेळूच्या रानाला ।। १४ ।।

[ निवेदक—रखमाबाइ ]

• • •

५. संग्राहक—उ. भा. कोठारी

### १. कुणबीक

बारा बलुत्याची । दौड गेली शेता ।
खिनरला गडी गुड देता देता ।।

माळ्यानं केला मळा । टाकूनी गेला देशा ।
निंबुणी आल्या रसा ॥
पडतो पाऊस होवो । रुपयाचं मण ।
समरथ थोडे जण । दुबळे लई जण ॥
पडतो पाऊस । तु पडुनी बरं केल ।
कोण कुपणाच्या पेवात पाणी गेलं ॥
पडतो पाऊस । ओल्या होऊ दे जमीनी ।
भाकरीच्या पाट्या शेता चालल्या कामिनी ॥
वाटाच्या वाटसरू । काय पहातो शेताला ।
गाई तुझे गोऱ्हे । मामा भाषे औताला ॥
बैल पस्तुल्याचा । नंदीचा अवतार ।
ओट्यावरी उभा । धनी याचा सावकार ॥
बैल रामीया । घाट्या धुंगरानीं नटला ।
गहूं हरभऱ्याची गाडी । उभी खरवडी पेठाला ॥
नागर नागर । जमीनीच केल पाणी ।
चारी बैल नदीवाणी । नागऱ्याची भर ज्वानी ॥
समस्त सोयरा । माझ्या ओटींतील भाजी ।
फेडल्यानं पाग । माझ्या दावणीची तेजी ॥
माझी ग आशा । काय सोयर देईना ।
फेडल्यान पांग । माझ्या दावणीच्या बैला ॥
केली कुणबीक । धरिले बारा शेत ।
अशी आहे माझी काळी । जसं वाघीणीच येत ॥
सोनारदादा, वजनीं घाल माझा एळा ।
घुंगरमाळा जोगा बैल गुणीयाचा गळा ॥
बैल गुणीया पहिलवाना तो सागती ।
बैल पिलीयाला । आपला जोडी मागती ॥
बैलाचं नाव मदन । मोतीयाची जाळी ।
शिवाच्या शेताला । राघू माझा घाली पाळी ॥
गाईमध्यें गोऱ्हा । गोऱ्हा बारगळ झाला ।
पहिल्या गुणीयाशीं । सडका लावून शेता नेला ॥

वाटच्या वाटसरा । काय पहातो शेताला ।
गाई तुझे गोऱ्हे । मामा माझे आऊताला ॥
वाटावरी शेत । आल्या गेल्यान मोडीलं ।
बाळानं माझ्या । भाग्यवंतान पेरीलं ॥
वाटावरी शेत । आल्या गेल्याची ग भागी ।
बाळानं माझ्या । पेरील दोन्ही लागी ॥
चाड्यावरी मूठ । घ्याव बहिणीच नाव ।
बाळाच्या माझ्या । पिकाला काय पहाव ॥
हात्ती पडला रात्री । माझा बाळा तुझ्या शेती ।
तुरीला तवर । मुगाला शेंगा येती ॥
बैस खातील । ओल्या तुरीचा तवर ।
आता माझा राघू । कुणबी माझा गजाधर ॥
बारा बलुत्यान । माझा राघू वेढीला ।
शेलक्या गुडावरी । यान सुतार सोडीला ॥
बारा बलूत्याची । दौड गेली शेता ।
आता माझा राघू । घामेला गुड देता ॥
शेती लागली सोंगणी । घरीं बाळतीण राणी ।
सोयऱ्यान माझ्या । खर्चे चालविले दोन्ही ॥
शिणल्यात वसवराज । घेईनात चार पाणी ।
बाळाच्या माझ्या । दुरल्या शेताच्या धावनी ॥
शिणलेत वसुवराज । यांनीं मोडीलीत मेटं ।
बाळाचें माझ्या । लांब वर्वंड्याचें शेत ॥
बैल धिगाण्याची । घाटी वाजते चोरुनी ।
गाव सिरसवाड्याची । आले परणी करुनी ॥
पेरणी लागली कशी । गहू हरभऱ्याची ।
पुढवी फण बापाची । मागें रासणी ल्योकाची ॥
तीफणबाई । वर्णभरा नवरी होती ।
ईला जानवसा । सुताराच्या नेहापाशीं ॥
तीफण चालली । बाई झटक्यात ।
आता माझ बाळं । आल तुला आटपीत ॥

दिसा दिवा जळ । सुतार नेह्यावरती ।
तीफणबाई । वर्णभरा नवरी होती ॥
तीफणबाई । चालते ग चक्रचाळ ।
बाळाची माझ्या । रासण्याची ताराबळ ॥
शेताशेजारीं शेत । पडल्या पाचुद्याच्या हारी ।
गाव खरवडीचे पाटील । मला दैवाचे शेजारी ॥
बगड घेते । बगडाला बैल माझे ।
आता माझे बया । शेले करी ल्योक तुझे ॥
तीफणबाईचा । चाडदोर रेशमाचा ।
फेर धर जोंधळ्याचा ॥
बैलामध्यें बैल । धींगाण्या बाळाचा ।
रचीयल हेल यानीं । ओल्या ग तीळाचा ॥
वाळूमधिं गाडा । आरोळ्या देऊन काढा ।
बैल माझ्या धिंगाण्या । वारे घाला ॥
वाळुमध्यें गाडा । आरोळ्यान काय होत ।
बैल माझ्या धिंगाण्याच । सैल सोडा जोत ॥
बैल धिंगाण्यान । उरकी फोडली पेडात ।
आता माझा राघू धनी । सावध वाडयांत ॥
तीफणबाईचा । चाडदोर तो जाईचा ।
नदीं पारच्या गाईचा ॥
नागराच्या ताशीं । लागली ओली जाई ।
आता माझा बाळ । कुणबी दैवाचा हाई ॥
नागऱ्या नागऱ्याची । शेतीं पैन पडली ।
बाळाच्या बैलान । नवी चावरी तोडली ॥
दुध तुपाचा काल । घेत्यें चरीभर पाणी ।
आता माझा राघू । नागऱ्या कोणा रानीं ॥
सावली गदीबाज । कशी झाड पागऱ्याचीं ।
बाळाची ग माझ्या । बैठक नागऱ्याची ॥
नागऱ्या माझा बाळ । नागरट काढी तो हिवाळा ।
रेशमाचें जोतें । चंदन बैलाच्या शिवळा ॥

बैल रतने शेती शीवळ साडिली ।
नेणतं माझ बाळ । याची राळ ग माडीली ॥
शेता शेजारी शेत । वादान कोण्या जाऊ ।
आता माझा दादा । पेंडावळ्या जाई लावू ॥
हरबऱ्याची भाजी । गोरी खुडीते घोळणा ।
आता माझा बाळ । कुणबी भीडाचा बोलना ॥
आगण झाडीतें । गोड दिसायाला ।
बैल इंजण्याचं । मन झालं बसायाला ॥
बैलाच नाव । घेतो इळइळ ।
आता माझा । दादा कधीं होईल ओल्या बाळ ॥
बैलाच नाव । कस मदन सरजा ।
आता माझा दादा । गेला मेहूणे एरजा ॥

## २. तुळस

पाणी घालू घालू, तुळशीला आले बोंड ।
नाव पतिव्रता दड ॥
तुळशीबाईची झाली वाळून लाकड ।
गोविंद ठकडा केला कठीला आकडा ॥
तुळश्याबाई, वाळून कोळ झाली ।
तुझ्या मजुळाची, गोविंदानं माळ केली ॥
तुळश्याबाईच्या वाळून झाल्या काड्या ।
देवा विठ्ठलान, भरुन नेल्या गाड्या ॥
तुळश्याबाईच्या मजूळाचा झाला सडा ।
देवा विठ्ठलान, भरुन नेला गाडा ॥
तुळश्याबाईच वाळून झाल सरपण ।
देवा विठ्ठलानं, देह केला अरपण ॥
तुळस म्हणते, रुक्मिण कशान ग थोर ।
आधीं लेले माझा हार, मग झाले तुझे वर ॥
तुळस म्हणते, रुक्मिण कशान ग मोठी ।
आधिं लेले माझें मोती, मग झाले तुझे पति ॥

तुळस म्हणते, भोपळे माझे सवती ।
जळो तुझी नवती, वेली कुपावर जाती ॥
तुळस भोपळी, दोघी भाड झणुझना ।
गळ्या तुळशीच्या माळा, केला भोपळीचा विणा ॥
तुळस म्हणते, भोपळी मोठी आगुचर ।
बसलीस निलाजरे, विठ्ठलाच्या शिरावर ॥
तुळशीचा पाला, वारीयान गेला ।
देवा गोविंदान, आवडीन गोळा केला ॥
तुळशीबाई, कवळी लल्लोलसी ।
तिखट तुझें पान, दाळ मिऱ्याची जशी ॥
तुळस म्हणते, भोपळे अगुचर ।
विण्याच्या मिस, देवाच्या खाद्यावर ॥
तुळसबाई, माझ्या वाड्यात असावी ।
हिच्या सावलीला, पोथी वाचीतो गोसावी ।
तुळश्याबाई, माझे सखे येशी ।
तुझ्या मंदिरीं, राम मला दाखविसी ॥
माझ्या आगणात, तुळसा नारीच बहुल ।
उमटले बाई, श्रीकृष्णाचीं पाऊलं ॥
माझ्या अगणात, तुळसा नारीचा बगला ।
गोविंद रंगेला, शिड्या लावून एघला ॥
गोविंद ठकडा, मोजतो सोननाण ।
वजनीं घालायाला, तुळशीचीं तीन पान ॥
गोविंद ठकडा, शिणगार मोजि तो राहीचा ।
वजनीं घालायाला, पाला तुळश्याबाईचा ।
विठ्ठल म्हणतो, तुला नाहीं आईबाप ।
काळ्या मातीवरी, उगवलं तुझ रोप ॥
विठ्ठल म्हणतो, माझी तुळस गुणाची ।
बाहेर राहून, तप करिते उन्हाची ॥
जिला नाहीं लेक, इन तुळस लावावी ।
घालील येरझारा, गोविंद इचा जावई ॥

तुळसबाई नको हिंडू जंगलात ।
पैस माझा वाडा, जागा देते आगणात ॥
तुळसबाई नको हिंडू रानींवनीं ।
पैस माझा वाडा, जागा देते इद्रावणी ॥
तुळशीबाई हिरवागार तुझा डेरा ।
तुझ्या सावलीं खेळेल माझा हिरा ॥

• • •

६. संग्राहिका—**नलिनी रसाळ**

## १. लग्न व मुंज

तुपाच्या शेजारीं, साखराची गोणी ।
राजसानें काढिले लग्न मुंज दोन्ही ॥ १ ॥
लगनापरीस, मुजीचा यज्ञ भारी ।
राजसाच्या माझ्या, प्रल्हाद माडीवरी ॥ २ ॥
मुजीचें लग्न, बापलेकाशीं लागत ।
राजसाला माझ्या, चद्रबळ हें लाभतं ॥ ३ ॥
ब्राह्मण म्हणती, मुजा बाहेर येऊ द्या ।
राजसाला माझ्या, मातृभोजनीं जेऊ द्या ॥ ४ ॥
मुजीच्या वेळीं, मुजा कापे थरथरा ।
राजसाचा मामा, येऊ द्या धीर धरा ॥ ५ ॥
लग्न नाहीं मुंज, दारीं तोरण कशाच ।
राजसाच माझ्या, फळशोभन सख्याच ॥ ६ ॥
तुझ्या घरीं शोभन, माझ्या घरीं बारस ।
सख्या माझ येण, होईल कसं ॥ ७ ॥
माझ्या माहेरीची वाट, शिंगी खदाळ झाली ।
राजसान माझ्या, मुजवेळ सभाळिली ॥ ८ ॥
पहिली भिकाळ, माता घाली बत्ताशाची ।
राजसा माझ्या, मुजाबाळा भुकेलासी ॥ ९ ॥

हौस मला मोठी, सोन्याचं जानव ।
राजसाच्या माझ्या, मामान आणाव ॥ १० ॥
मांडव घातला, फुलासकट जाईचा ।
गोऱ्या मालनेचा छंद मुंजाच्या आईचा ॥ ११ ॥
मांडवाचे दारीं, तुपवाला कोण झाला ।
सखा माझा मुधा, गोवी जानव्याला ॥ ११ ॥
मांडवाच्या दारीं, पाट शिंपीणीबाईला ।
गोऱ्या मालनेला, चोळी मुंजाच्या आईला ॥ १३ ॥
सोनाराच्या इथ, कशाची ठाकाठोकी ।
सख्या माझ्या मुंजाची ताटवाटी ॥ १४ ॥

## २ दिनक्रम

[ सकाळीं उठल्यापासून ते रात्रीं निजेपर्यंत आपलीं नित्य नैमित्तिक करताना, बायका विशेषतः ब्राह्मणाच्या, ज्या काहीं ओव्या किंवा इतर पद्य म्हणतात तीं पुढें दिलीं आहेत. संस्कृत श्लोक बायकांच्या तोंडीं जसे असतात तसेच ( अशुद्ध ) दिले आहेत. ]

### करदर्शन

कराग्रे वसे लक्ष्मी । करदृष्टोचि सरस्वति ।
करमध्योचि नारायण । करपृष्टेची प्रभाकर ॥

### धरणी

धरणी, धरणी धरणी माय । धरणीवर पाय । शेषावर भार ।
धरणी माझा नमस्कार ॥

### तुळस

तुळशी श्रीसखी शोभे । पापहरणे । दे पुण्ये नमस्तुतु ।
नारायणा नम प्रभो ॥ तुळस देखली । भ्रांत फिटली ।
कृष्ण-रुक्मिणीसहित द्वारका भेटली ॥

### गाय

गाय गौळी । मोती पौळी । कानीं कृष्ण । मस्तकीं विष्णु ।
पोटीं द्वारका । पाठीं धर्मशीळा । शेणात लक्ष्मी ॥
गोमित्रात सप्तऋषी । माझा नमस्कार गाई गौतमेशी ॥

## नारायण

उगवले नारायण पहिल्या प्रहरीं । स्नान केलें
गंगेतिरीं । जसा पावला राजाराणी विश्वदुनी ।
तसा पाव मला हरी ॥
रत्नबिंब महातेज । सूर्यरत्न मुमेशना ।
दु:ख दारिद्र नाशनं । प्रभाते सूर्यदर्शन ॥

## महादेव

प्रात:काळीं शिव दृष्टवान् । निशी पाप विनश्यति । आजन्मकृत
माध्यान्ह सायान्य सप्तजजन्मनि । मेरु काचन गवाकोटी ।
शैतरपि पंचकोटी तुरगाणा तत्फल शिवदर्शन ॥

## झाडणी

हातीं घेतली झाडणी । झाडी इश्वेश्वराची न्हाणी ।
गति दे का मुक्ति दे । अत:काळीं रामराय दर्शन दे ।

## सडासारवण

सारवितें सारवण रामनामें सार । बाई गोड हा संसार ॥ ध्रु० ॥
जन्मविधी झाले बाई स्वप्न सोशीतें । थोर भाग्य जागृत
झालें हो बाई ॥ १ ॥
प्रात:कालीं मनबुद्धी मंदिर झाडूं । रामनामाचा विश्रांतिचा
केर हा काढूं ॥ २ ॥
सारवितें सारवण मुंगी न किडा । रामनामाचा वर
घालितें सडा ॥ ३ ॥

## रांगोळी-

खडा खडा रांगोळी । रेघ ओढतें भीमस्थळीं ।
तेथें कृष्ण वनमाळी । अत:काळीं भेट देई ॥

## अंघोळ

गंगेंत पाय टाकितां । जागी झाली यमुना । ऐसे गंगेचें
महिमान । आलें विष्णूचें विमान । रामनामाची आंघोळी ।

आणिक नलगेची बुचकळी । पार्वती पुसे महादेवा । हा मत्र मला द्यावा । हा मत्र आहे सोपा । येता जाता जपावा ।
गगेसी जाता बहु सुख वाटे । तेथें मज नित्य गोविंद भेटे ।
जाईन आता मनकर्णिकेशीं । पूजीन देवा इश्वेश्वराशीं ॥
त्याशीं वाहीन शत बिल्वपत्र । त्यानें उद्धरतील शतगोत्र ॥

## धूतवस्त्र

धूत वस्त्र नेसाव । पवित्र असाव । रुद पात्र गगेच मधीं शिखर मेरूचं । उघडुनी पाहिली भागिरथी । शख चक्र गदा हातीं । माझा नमस्कार लक्ष्मीपति ॥

## पडदाणि

पडदाणि पडदाणि । पडदाणिचा केरा पिळा । गगा दिसतसे काळी निळा । लागूं दे इठोबा रखुमाईचा मोळा ॥

## चूल ( डाळ टाकताना )

सडासमार्जन सिद्ध । अग्निनारायण प्रसिद्ध । द्रौपदीन पाचाचा पाक केला । पन्नासाला पुरविला । जसा तिचा पुरला तसा माझा पुरो ॥

## तुळशील पाणी

तुळशी तुळशी वाळ । अमृताच आळ ।
शिपीतें तुझ्या बळं । उद्धारिलें बेचाळीस कुळ ।
रामानें आणली । लक्ष्मणानें लावली ।
सीतान तिचा प्रतिपाळ केला । जसा तिचा केला तसा माझा करो ॥

## तुळस तोडणें

कृष्णरूपेण तुळशी । विष्णुरूपेण मजिरी ।
प्रार्थितें कृष्णकार्यास्तव । मम दोष विनाशति ॥

## तुळशीचं तीर्थ ( तुळस पाण्यांत बुडविणें )

तुळस तुळस बंदा । अतिप्रीत गोविंदा । तुळशीपाशीं माझ मन । तिथं भेटले जनार्दन । तीर्थ घ्याव फुकाचं । कृष्णराय सख्याचं ॥

## तुळशीच्या प्रदक्षिणा

पहिली करी प्रदक्षणा । वृंदावनीं कृष्णराणा । त्यानीं भाग दिली मला । अंत:काळीं भेट देई ॥ १ ॥

दुसरी करी प्रदक्षणा । वृंदावनीं कृष्णहरि । पावा ठेऊनी मुखावरी । तुळशी विनोद करितसे ॥ २ ॥

तिसरी करी प्रदक्षिणा । गोपाळ घालिती घुमरें । पावा खडस्तभ मोहोरी । धेनुसहित लुब्धल्या ॥ ३ ॥

चवथी करी प्रदक्षणा । चौसष्ट तीर्थ तुळशीपाशीं । गंगा भागिरथीच्या तिरीं । तिथें मी स्नान करीतसे ॥ ४ ॥

पाचवी करी प्रदक्षणा । पाची कुडाची दाटणी । बाप माझे सारंगपाणी ॥ ५ ॥

सहावी करी प्रदक्षणा । सहस्र हरिनाम उच्चारी । त्याचें चरण न मी सोडी ॥ ६ ॥

सातवी करी प्रदक्षणा । वृंदावनीं कृष्णराणा । त्यानीं भाग दिली मला । अंत:काळीं भेट देई ॥ ७ ॥

आठवी करी प्रदक्षणा । वृंदावनीं कृष्णहरि । पावा ठेवुनी मुखावरी । तुळशी विनोद करितसे ॥ ८ ॥

नववी करी प्रदक्षणा । नरहरी मुनी नारायणा । लक्ष्मीसहित गोविंदा ॥ ९ ॥

दहावी माझी प्रदक्षणा । दहाखंड काशीस जावें । काशीं इश्वेश्वर राज । चरण पद देई मज ॥ १० ॥

अकरावी करी प्रदक्षणा । अकरा रुद्र भरतील दाणा । उदार द्वारकेचा राणा । लक्ष्मीसहित गोविंदा ॥ ११ ॥

इतकें उच्चारुनी मनीं । बारावी प्रदक्षणा करी । शरण आलें तुजपाशीं । बा गोविंदा ॥ १२ ॥

## देवाची माळ

प्रथम पूजा इश्वराची । बहुत कृपा पार्वतीची । नादणूक अमरावतीची । सभा राजेंद्राची । वैभव लक्ष्मीच । शिणगार गौरीचा । सौभाग्य गंगाचं । लावण्य रंभाचं । उच्चित भोजाच । मूर्त गणेशाची । गायन सरस्वतीच । सिंहासन राजविक्रमाचं । अन्नदान शिराळाच । येक व्रत एकादशीच्च । येक व्रत सोमवाराचं । तेज सूर्याच । कळा चंद्राची । उंची गगनाची । रुंदी पृथ्वीची । खोली समुद्राची । तीर्थयात्रा वाराणशीची । माळ तुळशीची । पत्र बेलाच । फूल पारजातकाच । पूजा करावी लिंगाची । तब्सुख देवाचं । ज्योतिषे सहदेवाच । अनुसंधान अर्जुनाच । बळ भीमाचं । सत्य बोलण राजधर्माचं । कपट दुर्योधनाचं । झाड धात्रींच । भाव नदीचा । उत्सव पुत्राचा । वर्षाव मेघाचा । वेद ब्राह्मणाचा । मार गदाचा । नाद सिंहाचा । लोट येडक्याची । पैज हनुमताची । सूचित स्नानाच । दृष्टी कागाची । अस्त्र स्त्रीच । भोजन घृताचं । पुण्य कन्यदानाच । चळित्र अस्तुरीच । कौतुक पारजाच । आहार दुर्वासाचा । वास कापुराचा । सुगंध कस्तुरींचा । परोपकार उदकाचा । भोग ताबुलाचा । रंग पळसाचा । ढाळ मोत्याचा । बंधुपण रामलक्ष्मणाच । पुत्रपण त्या श्रावणाच पतिव्रतापण त्या अनुसयाच । अहंकार रावणाचा । धुंधुकार गरुडाचा ।।

• • •

७. संग्राहक—जी. जी. मोरे

## लोकगीतें

### १

डोंगरी माथ्या बुचूडा । चोळी लेली उफराटी ।<br>
लेली सोन्याचं आजन । बहू भूषण ॥<br>
भाग टिळा ल्लाटीं । तुम्ही तपेशी दिसेता ।<br>
मशीं हंसेता । कांहो आसे मुले ॥<br>
तूं ग हैवनी । व्हय ग कामिनी ।<br>
तुझा छंद लागला ।

देरे मव्हना गिरजा झाली उदास ।
नाहीं घरदार बसूनी करु इच्यार ॥

२

आबा गळतो, रस पळतो । कोंकणचा राजा झीम खेळतो ॥
झीम गेला फुटून । पोरी गेल्या उठून ॥
नदीच्या कडाला । दामूजी सोनार ।
नथ नाहीं घडीली । पाया नाहीं पडीली ।
नथाचा जोड ग । सव्वतं बोल ग ॥
सव्वत बोलाना । माडव हालाना । माडव सोन्याचा ।
नवरा वाण्याचा । हळद लाऊन पिवळा केला ।
मारुतीच्या देवळीं न्हेला ॥
आमची नवरी फुदाती । जाय कळ्या माघाती ।
जाय कळया साज ग । आमची फुगडी पाच ग ।
आमच्या फुगडीला ताठा । आन हरबऱ्याचा घाटा ॥

३

आकण माती चिकण माती मळून दे
उभ्या भिती घाळून दे ॥
उभ्या भिती उळया । लवगानें गुफील्या ।
लवगाचे डेरे, साखराचे पुडे । साखर मोठी गोड ग ।
जीबीला आला फोड ग । फोड काहीं फुटाणा ।
दारचा पाव्हणा उठाना ॥
दारचा पाव्हना खैस ग । त्येनं घेतली म्हैस ग ।
म्हशीच्या कानांत बुगड्या । आपुन खेळूं फुगड्या ॥
आशा फुगड्या नटाच्या । चोळ्या शिऊं शिटाच्या ।
शिट बाई शीट ग । एक्या आंब्याला भेरु ।
भेरु गेला ताकाला । इच्यु डसला नाकाला ।
एका थापड साजन । नदी चाल्ला जवळून ।
पैसा टाका ववाळून ॥

४

चल ग सई पाण्याला । माझा राघू तान्ह्याला ॥
तान्हून दे ग तान्हून दे । एवढीच खेप आणून दे ॥
एवढीच खेप फुटली । मामानी बायकू कुटली ॥
आम्ही गेलों सोडाया । लागला आम्हाला मारायला ॥

५

फुगडी फुलली जागा उलती ।
चावडीखालीं साप गेला मैना डुलती ॥
मैनाच्या हातीं खोबर वाटी ।
मेल्यान मारलं तमुखीसाठीं ॥
मार मेल्या मार, घरांत मार ।
दारीं बसला हवालदार ॥
चोळी शिई तो हिरवीगार ।
शिवता शिवतां इसरला ।
आन भोपळ्यावाणी पसरला ॥

५

गावा खालती पढरी । नागरीली डोंगरीली ।
तिथ लिमुनी पेरीली । लिमुनी आली एक पान ।
लिमुनी आली दोन पान । लिमुनीला आले लिंब ।
तोले लिंब भरली पाटी । गेली मथूराच्या हाटीं ॥
लिंब घ्या ग बायानो । लिंब कैसा शेंकडा ।
लिंब पईसा शेंकडा ॥
राहिना लिंबजी घेतले । कादा माघाया लागली ।
वाली ग वाली घरताराची । राही झटक्याना उठाली ॥
आगं आगं माझे आई । मला माळीण बोलली ।
बोलून देग राहीबाई । जाय आपुल्या घराबाई ॥

६

आपरी खाली टिपरी । टिपरी खालीं मळा ।
असा भाऊ भोळा । बायका केल्या सोळा ॥

केल्या तर केल्या पळूं पळूं गेल्या । पळता पळता मोल्डा कांटा ।
शंभर रुपये आला तोटा । शंभर रुपये बागात ।
आमची फुगडी रागात ॥

७

अहिला नमन पहिला नमन गनिशदेवा ।
माझा ख्योळ माडून दे करीन तुझी सेवा ॥
माझा ख्योळ माडला यशीच्या दारीं ।
पारीया गुफी घोडीयावरी ।
घोडीवरल्या पाखराचे गुंजुगुंजु डोळे ।
गुंजुगुजु म्हणूनी सारील्या टिका ।
एका भरपुऱ्याना घरीं ।
नंद गौळी राज करी ॥

८

नकुलीबाई नकुली । चंदनाची टिकुली ।
एक टिकुली उडाली । गगात जाऊन बुडाली ।
गगा आला लोंढा । भिजला माझा गोंडा ।
गोंड्याच्या पदरीं काडी । भिजली माझी साडी ।
गोंड्याच्या पदरीं रुपाया । भाऊ माझा शिपाया ।
त्येना केली बाईलु । नाकात मोती लेईलु ।
खाधोर घेऊ का कडोर घेऊ । शेंदराच्या ब्याला जाऊं ॥

९

आड बाई आड ग । सुपारीच झाड ग ।
त्येला आल्या शेंगा । घाल ग पोरी पिंगा ॥
एकीचा कीं दोघीचा । वार पडला चौघीचा ।
मामुजीच्या लेकीचा ॥ मामुजीची लेक गोरी ।
हाळद लावा थोडी । हाळदीचा उडा ।
रेशमाचा गोंडा ॥ रेशीमकाठी हालाना ।
चिंचाखालीं लोळाना ॥ चिंच बाई गोड ग ।
जिबीला आला फोड ग । फोड काहीं फुटाना ।

दारचा पाव्हना उठाना ॥ दारचा पाव्हना खैस ग ।
त्येना घेतली म्हैस ग । म्हसे म्हसे दिवा लाव ।
दिवा गेला वाऱ्याना । म्हैस न्हेली चोराना ॥

१०

काळी चोळी मोत्या जाळी । तिनशीसाठ कातरकरी ।
साटणीला दोराभरी । कोण्या हौशाचा सुटला पार ।
शिपीनार चित्तावला । कान्हा जलमला धरतरी ।
कानऽऽडी कानऽऽडी । गळ्या दुऽऽऽऽळडी ।
कानी चपडी शिवई चोळी । तुला चोळी ग दंड माझे मैना ॥

११

एकाला सोडीत व्हती । एकाला बांधीत व्हती ।
एकाला हातीं धरून, मंदेरीं न्हेत व्हती ॥
कोन्हाला सोडीत व्हती ? । कोन्हाला बाधीत व्हती ? ।
कोन्हाला हातीं धरून मदेरीं न्हेत व्हती ? ॥
गाईला सोडीत व्हती । वासराला बाधीत व्हती ।
दुधाची कासडी मदेरीं न्हेत व्हती ॥
एकाला लाईत व्हती । एकाला पुसीत व्हती ।
एकाच्या तोंडाकडं पाहून हासत व्हती ॥
कोन्हाला लाईत व्हती ? कोन्हाला पुसीत व्हती ? ।
कोन्हाच्या तोंडाकड पाहून हासत व्हती ? ॥
कुकाला लावीत व्हती । काजळाला पुसीत व्हती ।
आरशाच्या तोंडाकड पाहून हासत व्हती ॥
यकाला लाइत व्हती । एकाला दडपीत व्हती ।
यकाच्या मुखावर शालू टाखीत व्हती ॥
कोन्हाला लाईत व्हती ? । कोन्हाला दडपीत व्हती ? ।
कोन्हाच्या मुखावर शालू टाखीत व्हती ? ॥
कवाडाला लावीत व्हती । इस्त्याला दडपींत व्हती ?
दीयाच्या मुखावर शालू टाखीत व्हती ॥
यकाला देते हात । यकाला देते पाय ।

अनुक्रम २३०६० . दि: ...
क्रमांक ...३८०० ....... नों दि ..नागरी लोकसाहित्य

चकाच्या पलंगावर । निजरा करती बाई ॥
कोन्हाला देती हात ? । कोन्हाला देती पाय ? ।
कोन्हाच्या पलंगावर निजरा तूं करतां बाई ? ।
कसाराला देती हात । वतऱ्याला देती पाय ।
सुताराच्या पलंगावर निजरा मी करती बाई ॥

८ संग्राहक—**उमेश बलवंत थिटेकर**

## १. लोकगीत

कोणे एका वनामध्यें होती चिमणा हो चिमणी ।
वृक्षामध्यें कोठा, तिचे पिलें होतीं तान्हीं ॥
कोणी एका दुष्टानें वणवा लाविला वनीं ।
सकळ जीव जळूनी मेले, नव्हते श्रीहरीच्या ध्यानीं ॥
अग्नि जवळ आला, आकाशीं लागली ध्वनि ।
संकट पडलें जिवा, तारी विठ्ठला म्हणे चिमणी ॥ १ ॥ ध्रु०
चिमणा म्हणे चिमणीला आपण लागू श्रीहरीचें ध्यानीं ।
चिमणा म्हणे चिमणीला आपण इथें न राहू ।
हें वन सोडूनि आपण दुज्या वना जाऊं ॥
उत्तम जागा पाहूं, तिथें एक खोपा बनवूं ।
करशि काय या पिलाला, येथेंच टाकूनि जाऊ ॥
वाचू तुम्ही आम्ही, तेथें पिलें होती बहू ॥ सकट पडलें० ॥ २ ॥
चिमणी म्हणे, चिमण्या, तुम्हास लागलें वेड ।
माझीं पिलें तान्हीं, दोघाशीं सांगड ॥
तुम्हास आहे हातपाय, उडून जाल पहा ।
पिलास नाहीं हातपाय ।
जळतील वनातील झाडें ।
या पिलासाठीं मी जळून होईल राखण ।
म्हणून हें वन सोडून मी न जाई दुसरीकडे ॥ सकट पडलें० ॥३॥

करणी जगदिशाची । अग्नि जवळाचि आले ।
राम राम जप, तिनें नेत्र झांकिलें ॥
चिमणा गेला उडून, त्यानें भलाई साधिली ।
तिथें करूं खोपा ऐशी चिमण्याची बोली ॥
ऐसा जिव प्यारा । स्त्री, लेकरें टाकिलीं ॥ संकट पडलें० ॥४॥
दोन चार दिवसानीं, स्वामी दर्शनास आला ।
त्यासी चिमणीनें धरला अबोला ॥
दे माझीं पिलें, चिमणा म्हणे चिमणीला ।
कसें गेला टाकूनि, नाहीं आली करुणा ।
ते दोघे स्त्रीपुरुष भाडत गेले गगना ॥
त्या दोघाचा न्याय राजा विक्रमानें केला ।
संतापली चिमणी तिनें देहत्याग केला ॥ संकट पडलें० ॥ ५ ॥

[ निवेदक—सौ. द्वारकाबाई विटेकर ]

## २. वेरुळच्या लेण्यावरच्या ओव्या

वेरुळ ह्या गावची काय मी सांगू ख्याती ।
घृष्णेश्वराच्या देवळात साजसकाळ वाजत्रीं वाजतीं ॥ १ ॥
घृष्णेश्वराच्या देवळात कोरिव काम फार ।
महादेवाच्या ग पिंडीवर चार गाईचे खूर ॥ २ ॥
तिन्ही ग सांजा झाल्या दारात गाय उभी कपिला ।
काढूनि ग तिचें दूध देतें देवाच्या नैवेद्याला ॥ ३ ॥
वेरुळ या गावाची बढाई मी सांगतें ज्याला त्याला ।
गाय ग आपुल्या दुधानें अभिषेक करी घृष्णेश्वराला ॥ ४ ॥
वेरुळ हें गाव कसं दिसतं राऊळ ।
तिर्थामधें ग आठ महादेवाचें देऊळ ॥ ५ ॥
शिवरात्रीच्या दिवशीं देव स्नाना येती तीर्थावर ।
देवाची पूजा आरति ग होती, रात्रीं बारानतर ॥ ६ ॥
महादेवाच्या गळा रुद्राक्षाच्या माळा, सर्वांगीं भस्माची उटी ।
भोळ्या शंकराला फसवूनि, गंगा बसली ग जटीं ॥ ७ ॥

शंकराच्या गळा ग मनुष्य मुंडाची माळ ।
पाठीवर ग व्याघ्राबर, हातामधें शोभे डमरू त्रिशूळ ॥ ८ ॥
कोणाचि करू नये निंदा, कोणाचें काढू नये उणें ।
सागतें ग सखेबाई, ऐकून घेऊ नये दुजें बोलणें ॥ ९ ॥
वेरुळ ह्या गावाचि, आणिक सागतें मी बढाई ।
पहाटेच्या प्रहरीं चौघड्याबरोबर ग वाजति सनई ॥ १० ॥
शरदाचें चादणें कसें पडतें दुधासारखें फार ।
अशी ग शोभा देति, शकराच्या शिरीं चंद्राची कोर ॥ ११ ॥
वेरुळ ह्या गावासारख दुसर गाव नाहीं आसपास ।
चवतिस लेण्यामध्यें, पहाण्यासारखा ग भव्य कैलास ॥ १२ ॥
वेरुळ ह्या गावाच्या सागतें आणिक मी खूणा ।
जगप्रसिद्ध, डोंगरी कोरिव चवतिस लेण्या ॥

[ निवेदक—श्रीमती गोदूबाई पळशीकर, जळगाव ]

• • •

९. सग्राहिका—**मंगला सप्तर्षि**

## १. तुळशीच्या प्रदक्षिणा

पहिली करिन प्रदक्षिणा । द्वारकेच्या नारायणा ।
पाप खडन होती । महादोष हरती ॥ १ ॥
दुसरी करिन प्रदक्षिणा । वृंदावनीं उभा कान्हा ।
तुळशी सहित गोविंदा ॥ २ ॥
तिसरी करिन प्रदक्षिणा । पावा ठेविन मुखावरी ।
गुप्त झाले ज्ञानेश्वरी ॥ ३ ॥
चवथी करिन प्रदाक्षिणा । कोटी तीर्थ तुळशीखालीं ।
गगा भागीरथीच्या तीरीं । तिथ मी स्नान करीं ॥ ४ ॥
पाचवी करिन प्रदक्षिणा । नर भज नारायणा ॥ ५ ॥
सहावी करिन प्रदाक्षिणा । सहस्र नाम जपला हरि ।
पुण्य होत बरोबरी ॥ ६ ॥

सातवी करीन प्रदक्षिणा । अंतरीं होतसे स्मरण ॥ ७ ॥
आठवी करिन प्रदक्षिणा । नर भज नारायणा ।
असा दयाधिक कान्हा । अतकाळीं सोडवी ॥ ८ ॥
नववी करिन प्रदक्षिणा । अंतरीं होतसे स्मरण ॥ ९ ॥
दहावी करिन प्रदक्षिणा । तिथें होता जगन्नाथ ।
त्यानें दिलें पूर्ण भग । अतकाळीं सोडवी ।
महाविष्णुची भेट होते ॥ १० ॥

## २. तुळशीला पाणी घालतांना म्हणायचे

तुळशी तुळशी एकादशी । पान म्हणे हृशीकेषी ।
मंजुळ म्हणे नारायण तुळशीसहित गोविंदा ।
हें मंडळ कृष्णाचें । पाप जाईल जन्माचें ॥

## ३

तुळशी तुळशी बाळ । तुझं अमृताच आळ । मी पुजीन तुझ्या बळ । तू उद्धरशील माझीं बेचाळीस कुळ । लक्ष्मणानी आणली । रामानीं लावली । सीतीनें प्रतिपाळ केला ॥

## ४ तुळशीच तीर्थ घ्यायच्या वेळीं म्हणायचे

तुळस वंदावी वंदावी । ऐशी प्रीत गोविंदाची । तुळशीपाशीं माझ मन । तिथें उभे जनार्दन । तीर्थ घ्यावं तुळशीच । ध्यान कराव श्रीकृष्णाचं ॥

## ५. तुळशीचं गाणं ( धावा )

तुळशी पाव ग सत्वर । कां झालीस निष्ठुर । मजवरी घालावी पाखर ।
करि भक्ताचा सभाळ । तुझ्या सन्निध उभी राहें ।
आणिक देखुनि पाहे । धांवा करितसे उठून करितसे सहाये । लवलाहे ।
आणिक देखुनि पाहे । तुळशी पाव ग ॥ १ ॥
रात्रदिवस भजनात । पुरवी मनोरथ । यादव जोडिती तुज हात ।
किती पहाशील अत । तुळशी पाव ग ॥ २ ॥
द्रौपदी बहिण कृष्णाची । करि सेवा चरणाची । गुह्य जाणीतसे अतरीं ।
हीं पदें विष्णुचीं । तुळशी पाव ग ॥ ३ ॥

तुजवरी येताती मंजिरी । कापतील वैरी मजला । धरावें तू करिं ।
पतिव्रते नारी । तुळशी पाव ग ॥ ४ ॥
तुझ माहेर सागर । द्वारकानगर । तिथे नादतसे रघुवीर ।
रुक्मिणीचा वर । तुळशी पाव ग ॥ ५ ॥
धावा ऐकुनि जागे झाले । चतुर्भुज देखिलें । मस्तक ठेवूनी या चरणावरी ।
अभय द्यावें नारी । तुळशी पाव ग ॥ ॥ ६ ॥

## नारायणाची ( रविवारची ) कहाणी

नारायण उगवले पहिले प्रहरीं । स्नान केलें यमुनातीरीं ।
कसा पावला द्रौपदी सुंदरी । तसा पाव बा श्रीहरी ॥
कसा पावला दुबळ्या भटा । कसा पावला कोंडया कोष्टा ।
कसा पावला मोळीविक्या । कसा पावला माळ्याला ॥
• काना डोळा मासाचा गोळा । अतीताच्या पुता ।
त्राणाईच्या सुता । जाईजुईचा मळा । वहात्या गंगेचें
पाणी । बेलाचें पान । दे नारायणा बाप्पा मला चुडेदान ॥
साठा शब्दांची एकच कहाणी । चुकल्या मुकल्याचा
नारायणा बाप्पा तू धनी ॥

●●●

१०. सग्राहिका—सुलोचनाबाई सप्तर्षि

## विठोबाच्या ओव्या

पंढरपुरात काय माझं देण घेण । दयाळ पांडुरंगा तुझ्यासाठीं मला येणं ॥ १ ॥
पंढरपुरात वस्ती हजारो लोकांची । दयाळू पांडुरगा मला गरज एकाची ॥ २ ॥
पंढरीच्या वाटे हळदीकुंकवाचा सडा । राणी रखमाबाई तुझा पोहोचला गाडा ॥ ३ ॥
देव विठ्ठलाला रुक्मीण पुसती एकात । सुभद्रा बहिण द्रौपदींच काय नात ॥ ४ ॥

रुक्मीण पुसती देवा कशान भीजला । गेलों वृंदावनीं होती तुळस शेजेला ॥ ५ ॥

तुळस म्हणती काय रुक्मणी तोरा । तुझ्या स्वयवरा आधीं माझ्या विठ्ठला तुरा ॥ ६ ॥

श्यामकर्ण वारू वारू बाधीले जाईला । हरि चाललेत मूळ । रखमीण बाईला ॥ ७ ॥

श्यामकर्ण वारू वारू बाधिले शीलेला । तुळसीबागेंत हरि चालले कथेला ॥ ८ ॥

चरणावरी माथा माथा ठेवीतें जाणून । सावळ्या पांडुरगा तू तर दयाळू म्हणून ॥ ९ ॥

माझ्या नवसाला पावलेत कोण देव । दयाळू पाडुरगा सागेन तुझ नाव ॥ १० ॥

माझ्या ग दारावरनं फुलाची ग गेली पाटी । मिराबाईला विठोबाची भक्ति मोठी ॥ ११ ॥

जाइन पढरीला नको बसण वारीला । माझ्या दर्शनाची चिंता पडली हरीला ॥ १२ ॥

मनाचीं हौस मोठी कधीं पढरी जाईन । दयाळाला माझ्या कधीं डोळ्यान पाहिन ॥ १३ ॥

रुक्मीण म्हणे देवा रुसून जाईन । अवघी ही पंढरी तुम्हा धुंडाया लावीन ॥ १४ ॥

जातीची कळवतीण कान्हुपात्रा हीचें नाव । देवा विठ्ठलाच्या चरणीं दिला हिनें ठाव ॥ १५ ॥

पंढरपुरामध्यें दौंडी कोणाची थोपली । देवा विठ्ठलाची तार वीण्याची तुटली ॥ १६ ॥

पंढरीला गेल्या वारकरी आया बाया । राणी रखमाबाई त्यात माझी आदि माया ॥ १७ ॥

भरली चंद्रभागा पलीकडे कशी जाऊं । आडवा हा येतो पुंडलीक माझा भाऊ ॥ १८ ॥

पंढरपूरात कुंकु विकत शेरानीं । विठ्ठला शेजारीं रुक्मीण भारानीं ॥ १९ ॥

विठ्ठला शेजारीं रुख्मीण बैसता बसेना । अबीर बुक्याची ईला गरदी सोसेना ।। २० ।।
रुख्मीणी म्हणे विठ्ठला आवड कोणाची । तुळशीबाई गुणाची तर तप करिती उन्हाची ।। २१ ।।
पंढरीच्या वाटें कुणीं साडिल्या खारखा । विठ्ठलाच्या दर्शना पंचवटीची द्वारका ।। २२ ।।
पंढरीच्या वाटें कुणीं साडिला गुलाल । विठ्ठलाच्या दर्शना आले पंचवटीचे दलाल ।। २३ ।।
पंढरीच्या वाटें कुणीं साडिली सुपारी । विठ्ठलाच्या स्नानासाठीं आले पंच-वटीचे व्यापारी ।। २४ ।।
भरली चंद्रभागा पाणी लागलं वडाला । पांडुरंग म्हणतो माझा पुंडलिक बुडाला ।। २५ ।।
भरली चंद्रभागा पाणी लागल काटाकुटया । देवा विठ्ठलाच्या पोहणाऱ्याच्या दंडी पेटया ।। २६ ।।
विठ्ठल विठ्ठल हाका मारिते केव्हाची । साखर विघरली देवा तुझ्या दुधाची ।। २७ ।।
पहाटेच्या प्रहरी गंगाबाई झोपी गेली । देवा विठ्ठलाच्या स्नानासाठीं जागी केली ।। २८ ।।
पहाटेच्या प्रहरामध्यें दिली ताकीद गवळ्याला । देवा विठ्ठला दहि, दूध सांवळ्याला ।। २९ ।।
पहाटेच्या प्रहरामध्यें हडे गंगाळ वाजती । देवा विठ्ठलाची काकडा आरती होती ।। ३० ।।
देवाच्या देवळांत गेलें होतें मी सहजगतीं । देवा विठ्ठलाची आडवी आली धुपारती ।। ३१ ।।
देवाच्या देवळात उभी होतें एका कोनीं । हळदीवरी कुंकु मला प्रसाद दिले दोन्ही ।। ३२ ।।
माझ्या दारावरनं कोण गेली जोडव्याची । कानडी रखमाबाई राणी विठ्ठल बडव्याची ।। ३३ ।।
रुसली रखमाबाई बसली वाळवंटी । प्रीतीचा पांडुरंग धरी तिच्या मनगटीं ।। ३४ ।।

रुसली रखमाबाई बसली पद्म तळ्यां । प्रीतीचा पांडुरंग हात घाली तिच्या गळ्यां ॥ ३५ ॥

रुक्मीणीला साडीचोळी सत्यभामेला दोरवा । तुळशीबाईला थंड पाण्याचा गारवा ॥ ३६ ॥

माझ्या मनांमध्यें एक आली कल्पना । देवा विठ्ठलाच्या रोज जावें दर्शना ॥ ३७ ॥

पंढरपुरीची मी ग होइन चिमणी । देवा विठ्ठलाचें नाम वेचीन अंगणीं ॥ ३८ ॥

पंढरपुरामध्यें कशाचा गलबला । रुक्मीणीच्या चोळीसाठीं नामदेव शिंपी झाला ॥ ३९ ॥

पंढरपुरामध्यें गर्दी कशाचा उठला । देवा विठ्ठलाचा महाद्वारीं रथ आला ॥ ४० ॥

रुक्मीणी अडविती विठ्ठलाला परसदारीं । सोळा सहस्र नारी नाव घेवू कुठवरी ॥ ४१ ॥

सुदामदेव पावना उकलितो साडया चोळ्या । सोळा सहस्र नारीन विठ्ठलाच्या भरल्या माडया ॥ ४२ ॥

चला जाऊं पाहू पैठणचा नाथराया । पाठीशीं गंगाबाई वरी पिंपळाची छाया ॥ ४३ ॥

भोळा माझा भाव भक्ति माझी थोडी थोडी । देवा पांडुरंगा संकटाला घाल उडी ॥ ४४ ॥

पंढरीची वाट कशान ओली झाली । कानडी रखमाबाई केस वाळवीत गेली ॥ ४५ ॥

जाईन पंढरीला उभी राहीन चिन्यावरी । माझी नजर विठ्ठलाच्या चरणावरी ॥ ४६ ॥

जाईन पंढरीला उभी राहीन लाटीशीं । देवा विठ्ठलाचें चरण धरितें पोटीशीं ॥ ४७ ॥

जाईन पंढरीशा पलीकडे कसं जाव । देवा विठ्ठलानें पाठविली मला नाव ॥ ४८ ॥

भरली चंद्रभागा नावेचा घोडा बुडे । विठ्ठल म्हणतो रुक्मीणी होय पुढें ॥ ४९ ॥

रुक्मिणीची चोळी नामा शिंप्यानें शिविली | सत्यभामा अगोचर इनें घालून पाहिली || ५० ||
परिजातकाचें झाड सत्यभामा तुझे दारीं | पडतीं फुल पुष्प रुक्मीणीच्या शेजेवरी || ५१ ||
रुक्मिणी म्हणे देव गेले वरल्या आळी | शेल्या काजळाचे डाग सत्यभामा लेकुरवाळी || ५२ ||
रुक्मिणी म्हणती देव कुठें होते रातीं | पडलेत डाग काळी तुळशीची माती || ५३ ||
विठ्ठल म्हणे जनीला नाहीं कोणी | तुळशीच्या बनीं बनीं अग उकलीतो वेणी || ५४ ||
पंढरपूरात कशाची मारामारी | देवाच्या पादुकाची जनीवरी आली चोरी || ५५ ||
पंढरीला जाया आवदा नव्हत माझ मन | देवा विठ्ठलानें चिठ्ठया पाठविल्या दोन || ५६ ||
पंढरीला जाया सोचत नाहीं कोणी | पुढं विठ्ठल मागं जनी || ५७ ||
पंढरीला जाया आवंदा केली म्यां तयारी | विठ्ठल मुराळी घोडं चरत दारीं || ५८ ||
आल्या पावसाची वाट व्हाती चिखलाची | रायाला बोलते जत्रा देवा विठ्ठलाची || ५९ ||
आयानों बायानों पंढरीला येता कोणी | हरीच्या नामाची तिथं उसवली गोणी || ६० ||
जातें पंढरीला आडं लागं कडगाव | खडीच्या चोळीवर विठ्ठला तुझ नाव || ६१ ||
जातें पंढरीला वरती सावली लिंबाची | गोपाळपुरामध्यें हवा गरुडखांबाची || ६२ ||
गांवा गरसुळ्यापासूनि देवा दंडवत | सोन्याहून पिवळ शिखर झकतळं तुझ || ६३ ||
आखाडी एकादशी कारतिकाच्या करा दोन्ही | श्रावणाच्या महिन्यामदीं घाला मारुतीला पाणी || ६४ ||

आखाडी एकादशी खाड पान खाऊ नाहीं । हरिचं ग वर्तमान खाटाला शिवूं नये ।। ६५ ।।
भरली चंद्रभागा पटपट कशी जाऊं । देवा विठ्ठलानें फुलाची केली नाव ।। ६६ ।।
भरली चद्रभागा इला उतार नावाचा । बोल्ते सयाला सगं भरतार जावाचा ।। ६७ ।।
भरली चद्रभागा नावाचा घोडा बुडं । राहि रुखमिणी पतिवर्ता होय पुढ ।। ६८ ।।
भरली चद्रभागा नावा लागल्या बुडाया । विठ्ठलाची रुखमिणी आली नारळ फोडाया ।। ६९ ।।
पंढरीची वाट ओली कशियानं झाली । रुखमिण नहाली केस वाळवीत गेली ।। ७० ।।
राजा भीमकाची कन्या रखमाबाइ अगोचर । अग पाहिला वर पंढरीचा शारगधर ।। ७१ ।।
राजा भीमकाची रखमाबाई किती शहाणी । अग पाहिला वर पढरीचा धणी ।। ७२ ।।
नवरा शिशुपाळ येइना रुखमिणीच्या मना । देवा विठ्ठलाला पत्र ने यजमाना ।। ७३ ।।
नवरा शिशुपाळ याचं बाशिंग मोडलं । गेला रुख्मीण जितवाया याला अपयश घडल ।। ७४ ।।
नवरा शिशुपाळ रित्या पाण्याच्या घागरी । शकुनि मामा बोले नगरी येईन माघारी ।। ७५ ।।
नवरा शिशुपाळ आडया सरपणाच्या मोळ्या । समद्या वऱ्हाडात नारद मामा खेळ्या ।। ७६ ।।
सोन्याची पत्रिका याला रुपियाच ठसं । विट्ठल मनामदीं हसं रुख्मीणीन लिहल कस ।। ७७ ।।
करिती रुक्मिण अंबिकेची सेवा । विठ्ठलासारखा तसा वर मला द्यावा ।। ७८ ।।
अंबिका मोरीमंदीं आपण इच्या जाग्यावरी । पचामृत भोजन राजा मारुती करी ।। ७९ ।।

शिशुपाल नवरा येईना रुक्मिणीच्या चित्तीं । देवा विठ्ठलाला पत्रं लावी वाऱ्या हातीं ॥ ८० ॥
कौंडणपूर शहर तिथं कौंडणपूर नाहीं । लावलं कुंकवाचं बोट झाली स्वयंवराची घाई ॥ ८१ ॥
नवरा शिशुपाळ बाशिंग पडलें पाण्यांत । रुक्मिणी नवरी नाहीं त्याच्या दैवात ॥ ८२ ॥
नवरा शिशुपाळ झाली वऱ्हाडाची दाटी । रुक्मिणीच्या स्वयवरला देव आले तेहतीस कोटी ॥ ८३ ॥
रुक्मिणी पाघरीना शिशुपाळा तुझा शेला । त्याचा स्वयंवराच्या दिशीं इनं अपमान केला ॥ ८४ ॥
इथुनि दिसती पंढरी काळी काळी । विठ्ठलाच्या माडीवरी रुक्मिणी केस वाळवी ॥ ८५ ॥
इथुनि दिसती चुनेगची । विठ्ठलाच्या शेल्यावरी रुक्मिणी मोतीं मोजी ॥ ८६ ॥
विठ्ठलाची माडी रुक्मिणी ये ग ती द्वारका । विठ्ठलाला एकादसच्या वटीला खारका ॥ ८७ ॥
विठ्ठलाची माडी रुक्मिणी ये ग झरांझरा । विठ्ठलाला एकादस तबकीं राजगिरा ॥ ८८ ॥
इथूनी पढरी दिसती हिरवीगार । विठ्ठलाच्या माझ्या तुळशीला आला बार ॥ ८९ ॥
पढरपूरामध्यें नाहीं रहायला जागा । विठ्ठलानें माझ्या लाविल्या तुळशीबागा ॥ ९० ॥
जावा पढरीला उतराया धर्मशाळा । विठ्ठल बोलतो आल्या माझ्या लेकी-बाळा ॥ ९१ ॥
विठ्ठल माझा पिता रुक्मिणी माझी आई । पुंडलीक माझा बधू भीमा माझी भावजय ॥ ९२ ॥
विठ्ठल माझा पिता मला माहेराला नेतो । गिनानाची पोथी हातीं वाचा-याला देतो ॥ ९३ ॥
विठ्ठल माझा पिता रुक्मिण माझी माता । शिण माझा गेला भाग दोन्हीला ओव्या गाता ॥ ९४ ॥

## ओव्या

[ गवळी जातीच्या लोकांकडून हीं गाणीं घेतलीं आहेत. गवळी जातींत पुरुष दळतात व दळतांना हीं गाणीं म्हणतात प्रत्येक म्हैस व्याल्यानंतर त्याना जातीला जेवण द्यायचें असतें. जेवण देण्यापूर्वी ते रात्रीं धान्य दळतात व दुसरे दिवशीं दळलेल्या पिठाचाच पदार्थ व इतर पदार्थ करून जातीला जेवण देतात. त्यांच्यामध्यें जात्यावर म्हणताना पुष्कळ वेळा चाली बदलतात प्रत्येक छोव्या ओवीला पालुपद वेगवेगळे लावतात. ]

नगरच्या कचेरींत न्याय देतो। न्याय दिसया देतो । न्याय दिसया देतो । पहारा पोलीचा रहातो ।।

नगरच्या कचेरींत बारा वाजले ठोक्याचे । बारा वाजले ठोक्याचे । बारा वाजले ठोक्याचे । अस ना जमा झाले लोक ना खटल्याचे । लोक ना हो खटल्याचे ।।

नगरच्या कचेरींत हिरवा कदील डुलयतो । कदील डुलयतो । कंदील डुलयतो । माझा वकील बोलयतो । बोलयतो ।

नगरच्या कचेरींत समई जळती महियना । जळती महयिना । जळती महयिना । माझा बधु वकील वळखु तो येईना ।।

नगरच्या कचेरींत समई जळती तिनशेंसाठ । जळती तिनशेंसाठ । जळती तिनशेंसाठ । नवीन निघाल घासलेट ।।

आनदी बाजारात जोश्या वकीलाची माडी। ताग्याला घोडे जोडी । ताग्याला घोडे जोडी । ताग्याला घोडे जोडी । येवढे खुनाचे तटे तोडी ।।

मजुळा तुझी बोली मला ऐकूं येईना । मला ऐकू येईना । मला ऐकूं येईना । वकील शेजारी बंधु वळखु येईना ।।

नगरच्या कचेरींत बारा वाजले आईका । वाजले आईका । वाजले आईका । पहारा बदल नाईका बधुराया ।।

नगर शहरात गल्लोगल्लीला पपया । गल्लोगल्लीला पपया । गल्लोगल्लीला पपया । पहारा बदल शिपाया बधुराया ।।

शिपायाच लेणं ग एका माणसाचं वझ । माणसाच वझ । माणसाच वझं । ऐक माझ्या बधुराया शिलेदारा लेण तुझं ।।

तुझा माझा भाऊपणा पडला बाळकीच्या बाजारीं । अशी खुडची टाकिली वकीला शेजारीं ॥

( चाल बदलून )

तुझा माझा भाऊपणा । तुझा माझा भाऊपणा । भाऊपणाची आगळी जात पडली येगळी ॥

तुझा माझा भाऊपणा । एक्या तिळीचे दोन भाग । अस सभाळून वाग । चवक्या दिल्या जागोजाग ॥

तुझा माझा भाऊपणा । भाऊपणाची लवक । भाऊपणाची लवक । मधीं पानाच तबक ॥

तुझा माझा भाऊपणा । जन जाहीर नसावा । लोभ अंतरीं असावा । अतरीं असावा ।

तुझा माझा भाऊपणा । भाऊपणाला काय देऊ । चहाचा कप आपण दोघे मैत्र घेऊ ॥

तुझा माझा भाऊपणा । खा शिळा तुकडा । तुला चहा कोण देत । तमाखु न पान घेत ॥

( चाल बदलून )

आळदी करून जाते देहूच्या देशाला । अस्से साखरेचे लाडू इन्द्रा-वणीच्या माशाला ग ॥

पढरी करूनी आळंदीला जाऊ । आळंदीला जाऊ । ज्ञानेश्वर डोळा पाहू ॥

जल्मी येऊनी सार्थीक काय केल । शिळ्या भाकरीच्या आळदीला नाहीं गेल ॥

आळदीला बाधली देहूच्या गाळानीं । समाध घेतली पाच वर्साच्या तान्ह्यानीं ॥

देहूचा मासा आळदीला येतो कसा । माझ्या साधुचा नेम तसा ग । माझ्या साधुचा नेम तसा ॥

आळदीचा मासा ह्या देहूच्या माशाला । जेवायला बसला घोडा नदात हिसला । घोडा नदींत हीसला ॥

पढरीच्या बाया आळंदीला येता कोणी । हरीच्या नावापायीं तिथ उसवली गोणी ॥

सोन्याच्या पिपळाला याला सुवर्णाची मुळी ।. ज्ञानोबा वाची पोथी मुक्ता बसली जवळी ॥

भरली इन्द्रावणी पाणी शिरल गावात । सत ज्ञानेश्वर पोथी वाचीतो नावात ॥

ज्ञानदेव म्हणे मुक्ताबाई तू भयेणी । तुझ्या कुकासाठीं नेली आळंदी देहूनी ॥

भरली इंद्रावणी पाणी चाल थीरथीर । संत ज्ञानेश्वर पोथी वाची बिनघोर ॥

ज्ञानदेव म्हणे मुक्ता रे माझ्यासंग चाल । माग राहिल्यान होतेल तझे हाल ॥

सोडून इद्रावणी अंघुळ करीतो वढ्याला । ज्ञानेश्वराच महात्म्य काय सागू रे येड्याला ॥

आळंदी क:नी मला रे देहूला जायाच । तुकयारामाचं ह्याच गल्लीत पाह्याच ॥

देहू रे करूनी चला रे आळंदीला जाऊ । फुटाणे टाकुनि इद्रावणीचा मासा पाहू ॥

आळंदी करूनी जाते ग जेजुरगडाला । शेंडीच नारळ इन्द्रावणीला फोडला ॥

आळदी करूनी मला रे देहूला जायाच । शेंडीच नारळ इन्द्रावणीला वाह्याच ॥

आळंदी करायाला ये रे बापाला पुसुनी । अघुळ करावी इंद्रावणींत बसुनी ॥

आळदी करावी आईबापाच्या पुण्यानीं । अघुळ करावी इंद्रावणीच्या पाण्यानीं ॥

नाशीक त्र्यबकला जाव सग न्यावा सख्खा भाचा । नवलाख तीं पायरी बाळ येंगील कसा ॥

साधुमदि साधु नामदेव ना साधु खरा । झाला ग पायरीचा चिरा ॥

विठ्ठल बोलतो मारुति बैल व्हावा । नामदेवाच ग लगीन वऱ्हाड बेदराला नेवा ॥

बेदगराच वाटं लिंदीचे ढिग झाले । पाडवाचें ना दळ गेलें ॥

मखर घातिल मखराला ना नाहीं जागा । मखराला ना ग न्हाणा जोगी ना चन्द्रभागा ॥

पढरीला ग जाता आधीं गरुड खेटा यावा । अबीर बुक्याचा मग विठ्ठल लुटा यावा ॥

पढरीचा बुक्का आहे अखंड माझ्या घरीं । मी त बारा महिन्याचा वारकरी ग बारा माहिन्याचा वारकरी ॥

पंढरीचा ग वास माझ्या चोळीला कुठु येनी । अग ये विठ्ठल मजला गेला भेटूयेनी ॥

झाले पधरा दिस तुला रे पंढरी केल्याला । बुक्का अजुनी शेल्याला ॥

वारीला जायाच आवंदा नव्हतं माझं मन । अग त्या विठ्ठलानीं चिठ्या पाठविल्या दोन ॥

पहाटेच्या पहाऱ्यामधिं दुधाला आला भाटी । म्हैस गिर्जाला कर पाटी ॥

पहाटेच्या पाऱ्यामधिं आला ग दुधाला ब्राह्मण । आला दुधाला ब्राह्मण । मोऱ्या गाईला आम्बवण ॥

नगरीचा किल्ला दिसतो आऊ बाऊ । किल्ल्याखालीं तझं गाऊ ॥

नगर भिंगार याची एक ग वाट । दोन्हीची ग एक वाट । किल्ल्याम्होसन जाव नीट ॥

( चाल बदलून )

पाच उतरंडी तुझ्या शिक्याच्या लामाणि । तुझा ससार बामणी ॥

पांच उतरडी सीताबाईनं लावील्या । अशी ग गेली वनवासा नाहीं फिरूनी पाहीलं ॥

( चाल बदलून )

दुसरी माझी ओवी अगणीं वहाती गंगा । देवा तुझ नाव पाडुरंगा ॥

पहिली माझी ओवी पाडुरग चतुराला । मी ओवीत घेतें शीण माझा उतरला ॥

तिसरी माझी ओवी अन् म्या गायीली तिन्ही देवा । ब्रह्मदेवा, महादेवा, सदाशिवा ॥

चवथ्या ओवीचा मला परसग पडयला । परसंग पडयला । संग गरतीचा घडयला ॥

पाचवी माझी ओवी ओवी पाडवाला । कारल्याच ग येल गर्दी झाली ना माडवाला ॥

सहावी माझी ओवी राजाच्या राऊळाला । सारविल सोनं अंबिकेच्या देवळाला ॥

सातवी माझी ओवी ओवी नानाजी गवळयाला । जाईन तुझ येल, येल पाण्याच्या जिव्हाळयाला ॥

आठवी माझी ओवी जाईबाई ग मोका मोकी । प्रीतीचा पाडुरग कळ्या तोडीतो एकाएकीं ॥

नववी माझी ओवी मारुतीच्या आईला । जाईच्या फुलाची चोळी अजन्या बाईला ॥

दहावी माझी ओवी चालली गुंगयत । चालली गुगयत । मला रामायाची संगयत ॥

नेणता मुऱ्हाळी आवडीन संग न्येला । आवडीन सग न्येला । वसरीला झोपी गेला ॥

लेकीचा बाप झाला लेंकाची हौस । मोती पवळयाचा पाऊस । नाहा पडत बारो मास ॥

• • •

संग्राहक:—श्रीमंत गं. ना. ऊर्फ आबासाहेब मुजुमदार

# नाथपंथी दंतकथा

## १. वारूळ

एक दंतकथा या स्थानाविषयीं अद्याप रूढ आहे. म्हातार देवाचें स्थान पूर्वी शिरापूर या गावाच्या हद्दींत होतें घाटशिरस हें गाव शिरापुराखालीं एक वाडी होती या गावाचीं गुरें या देवाल्यात चरण्यास जात असत एकदां गुराख्याना या ठिकाणीं एक गाय दिसली. ती कोणाची गाय म्हणून गुराख्यानीं तिचा पुष्कळ तपास केला. परतु त्याना शोध लागला

नाहीं. ही गाय नदीकांठीं एक वारूळ होतें त्याच्याजवळ येऊन बसत असे. दररोज ही गाय गुराखी या ठिकाणीं पाहात असत. परंतु तिचा तपास लागेना. त्यांनीं ही गोष्ट गावात सागितली. दरम्यान् गावातील एका भाविक गृहस्थास दृष्टांत झाला व त्यास देवानें स्वप्नात येऊन सागितलें कीं, मी या ठिकाणीं गुप्तरूपानें राहातों, त्यावरून गावकरी तेथें आले. त्यानीं देवाच्या गुप्तस्थानाचा तपास चालविला; परतु तपास लागेना. म्हणून ते या गाई-पाशीं आले व तिला उठविलें. ही गाय या वारूळापाशींच का बसते अशी त्याना साहजिक शका येऊन त्यानीं तें वारूळ फोडण्यास सुरुवात केली. त्यावर कुदळ टाकताच त्यातून दुधाची धार निघाली. मग गावकऱ्यानीं हेंच देवाचें गुप्तस्थान आहे हें ओळखून ते वारूळ मोकळें केलें, तें दगडाचें होतें. त्याच्या माथ्यावर गोपद्माच्या आकाराचा एक खळगा असून तेथून ही धार निघत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हापासून हें स्थान प्रगट झालें अशी ही दतकथा आहे.

## २. नागीण व नागकुळ

नाथपथाच्या योगपरिभाषेंत कुंडलिनी शक्तीस नागिणी, सर्पिणी, अशी नांवें दिलीं आहेत " जे कुडलिनी जगदबा । जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा । जिया विश्वबिजाचिया कोंभा । साऊली केली ॥ जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मया शिवाची करंडी । जे प्राणाची उघडी । जन्मभूमी ॥ " ( ज्ञानेश्वरी ६ २७२—७३ ) अशी ही जगदबा नागीण सर्पीण अशा नांवानें उल्लेखिली आहे. " नागाची पिलें कुकमें न्हालें । वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ॥ तैसी ते कुडलिनी । मोटकी औट वळणी । अधोमुख सर्पिणी । निजेली असे ॥" (६. २२२—२३) हें ज्ञानेश्वरीचें वर्णन आहे. ही नागीण जेथें सेजेस येते, जेथें निद्रा करते, त्या स्थानास 'वारूळ' हेंच नाव यथार्थ होय. गोरक्षसिद्धसिद्धान्तपद्धति या ग्रथात शक्तिचक्राचें वर्णन देताना कुंडलिनीसह शक्ति-पचक सागितलें आहे. व त्याना धारण करणारा तो परमशिव असें शिवस्वरूप दर्शविलें आहे. शक्तींना नागीण हेंच नाव असल्यानें त्या नागीणी ज्या स्वरूपात वास्तव्य करतात त्या परमशिवास 'वारूळ' म्हणणें युक्त होईल. व या दृष्टीनें पाहिल्यास वारूळ हें नाव ही नाथपथी शब्दकूट ठरतें व तेंच नाव प्रथम गोस्वामीनें दिलें होतें. मच्छेंद्र-नाथानीं तें बदलून म्हातारदेव हें नाव रूढ केलें.

## ३. नागरपंचमी

वास्तविक यात नागपूजेचा संबध असावा असें दिसत नाहीं. या प्रांतात नागपंचमीस नेहमीं नागरपचमी म्हणतात. व तेंच नाव यथार्थ आहे. ही नागाची पंचमी नसून नागराची पचमी आहे. आदिमायेच्या निरनिराळ्या शक्तीस नाथपथानें नागिणी, सर्पिणी, नागकन्या, सर्पांचीं पिलें इत्यादि नागकुलदर्शक नावें दिलीं आहेत. हीं सर्व सांकेतिक नावें असून योगपरिभाषेप्रमाणें त्याचा अर्थ करावयास पाहिजे. तेथें नागाचा अगर सापाचा मुळींच सबध नाहीं. मुळारंभीं नाथपथी स्वतःस नागर म्हणवीत असत. त्या शब्दामुळेंच 'नाथसकेतीचा दश' निर्माण झाला. गोरक्षनाथानीं हें नामाभिधान बदलून त्यास हेमाळरूप दिलें. नगरात राहणारा तो नागर असा जरी अर्थ असला तरी नाथपथी सकेतात विरुद्ध अर्थ करण्याची प्रथा मुळारभीं असल्यानें नाग म्हणजे पर्वत, त्यात राहाणारे ते नागर, असा सांप्रदायिक अर्थ आहे हें गूढ उकललें म्हणजे नागरपचमीचा उलगडा होतो. ती नाथपथी योग्याची पचमी आहे. तें नागरकुळ ज्या वारुळात अधिष्ठित झालें, ज्यानें त्यास आश्रय दिला, त्या वारुळाची आदिशकराची—ती पचमी आहे असें म्हणावें लागतें. मूळ वारूळ गोस्वामीनें प्रगट केलें त्यासच मच्छेंद्रानीं ' म्हातारदेव ' हें नाव दिलें परंतु त्या वारुळाच्या प्रीत्यर्थ जो सण सुरू झाला तो अद्याप घरोघर पाळण्यात येतो व त्या वारुळातील नागकुळास अद्यापहि गोमाऊलीचें दूध पाजण्यांत येतें. मूळ रहस्य मात्र लोपलें.

## ४. सटवाई

नाथपथाचीं जीं जीं स्थानें तेथें सटवाई बहुतेक असतेच. तसेंच प्रत्येक गावालाही सटवाईचें स्थान असतें. तथापि कांहीं स्थानें त्या त्या प्रांतात मुख्य अधिष्ठानें मानलीं जातात. त्यापैकीं लोण्याची सटवाई आहे. या भागातील नवीन जन्मलेल्या अर्भकास या सटवाईच्या पायावर घालण्याचा प्रघात आहे. सटवाई हें नाव सत्वाई यापासून बनलें आहे. तथापि त्यात आणखी कांहीं अर्थ भरलेला आहे. सटवा सहावी, पाचास धारण करणारी सहावी, असें रुस्थेचें कूट या नावात आढळतें. पचभौतिकावर जिची सत्ता चालते अशी ही शक्ति आहे म्हणून लहान मुलें तिच्या पाया-

वर घालून तिची कृपा प्राप्त करून घेण्याची प्रथा आहे. लेण्याची सटवाई बिकट जागेंत असतानाही या प्रांतातील लोक आपलीं अर्भकें घेऊन तेथें दर्शनास जातात. या लेण्यात मच्छेंद्रनाथाचें वास्तव्य आहे असें सांगतात व तेथून गोमठ नावाच्या योगाश्रमास जाण्यास डोंगरात एक भुयार कोरलें आहे, अशी दंतकथा आहे. गोमठ तेथून तीस कोस असल्यानें या भुयाराच्या कथेंत फारसें तथ्य दिसत नाहीं. मच्छेंद्रनाथ तेथें मधून मधून राहात असावेत हें संभवनीय दिसतें व धुनीच्या साक्षीवरून तसें म्हणतां येईल. तेथून ते गोमठात जात असावेत व त्यामुळें भुयाराची दंतकथा निघाली असावी. मच्छेंद्रनाथाच्या वास्तव्यामुळेंच तेथें सटवाईचें अधिष्ठान झालें. ती त्यांचीच सत्त्वशक्ति आहे. व तिचा प्रसाद अद्याप मिळत आहे, एवढें मात्र म्हणता येईल.

## ५. धोंडाई

कडयाच्या टोंकावर एक पुरुष दीड पुरुष उंचीची प्रचंड शिला आहे तिला हल्लीं धोंडाई म्हणतात या शिळेंतून पूर्वी तूप पाझरत असे व त्या तुपाचा दिवा मच्छेंद्रनाथाच्या समाधीपाशीं अखंड लाविलेला असे, अशी दंतकथा आहे अद्यापही त्या शिळेस हात लावला तर हातास ओशट लागतें मच्छेंद्रनाथापाशीं तुपाचा नंदादीप ठेवण्याचा प्रघात फार जुना असून अद्याप तो चालू आहे. तेथें दुसरा दिवा लावू नये असा निर्बंध आहे. मच्छेंद्रनाथाचीं जितकीं स्थानें आहेत, तेथें प्रत्येक ठिकाणीं तुपाचा नंदादीप असावयाचाच. यावरून जेथें तुपाचा नंदादीप तेथें स्थान मच्छेंद्राचें असें निश्चितपणें मानता येतें हा अद्याप चालू असलेला नाथपंथी दंडक आहे. हें तूप धोंडाई पुरवीत असे. हें नावही विचित्र आहे. पण हें मुद्दाम तसें बनविलें आहे. धोंड म्हणजे किल्ल्यावर ठेवलेल्या मोठमोठ्या शिला. त्या खालीं लोटल्या म्हणजे फुटत जातात व त्याच्या लहान मोठ्या शकलाचा जबरदस्त मारा सैन्यावर होतो. त्यावरून धोंड म्हणजे अकस्मात् आलेली आपत्ति, असा अर्थ रूढ झाला आहे. तथापि या नावात एक गूढार्थ भरलेला आहे. धुंदाई शब्द फिरवून धोंडाई शब्द बनला. योगपरिभाषेंत उन्मनी अवस्थेस धुंदी म्हणतात

" जें अपेक्षिजे विरक्तीं । सदा अनुभाविजे संतीं ।
सोहंभावें पारगतीं । रमिजे जेथ ॥ " (ज्ञा. १–५३ ).

अशी जी ओवी ( पद ) त्यालाच तूप म्हणतात. " पद आलें परिपाकें । आमोदासी ॥" असें ज्ञानेश्वर तुपाचें वर्णन करतात.

हें उन्मनी किंवा धुदीशिवाय बाहेर पडणार नाहीं. त्या धुदीचें स्मरण धोंडाई देत आहे.

## ६. नाथपंथी मुद्रा

साता समुद्रापलीकडे एक आटपाट नगर होतं. तिथ एक पाचामुखी परमेश्वर.

" चरपट पची मुखरि सुभा "
" विश्व प्रामाण्याची मुदी "
सगळच मुसळ केरात
" साता चोरां एक मुसळ नेलें "

## ७ नाथपंथी म्हणी

( १ ) " ना कानिं कान दे सोळा. अष्टाक्षरी:कान ना काणिं सोळा दे नाकानी कान्हे सोळा ? "
( अशक्य गोष्ट शक्य करणें )
[ ना—आज्ञा, आदिमाया. कानि—सूत्र कान—कर्ण, कणा. सोळा—सोनें ( ळ - ल—न ). सोवळा निरंजन. ]
आदिमायेच्या स्वरूपाविषयीं ही म्हण आहे.
तिच्या प्रमेयाचा भरणा आहे. सोळी असा पाठ असावा.

( २ ) गगे—घोडिये : घोडिया - घोडेस्वार ( गोडिया ).
[ अष्टाक्षरी . नाहले—न्हाले, ना हले. गोडिया—गोडी धरणार ].

( ३ ) गरवाचें घर खालीं ; गर्वाचे—ग खाचे.
[ अष्टाक्षरी : ख—एकाक्षरी बीज. कण—कण. खालीं—मोकळें. ग—अहकार ]。

( ४ ) काना मागुनि आले : तीं खट जाले.
का नामा गुणिआ ले : तीं खट जाले.
काना मागुनिआ ले : तिं खटे जाले.
[ खट, खट्पट, खटपट, खाट इत्यादि शब्दाचें मूळ या म्हणींत सापडतें ].

( ५ ) कानीं कपाळीं ( ओरडणें ) : कानिक पाळिं
[ कानिक–सम्प्रदाय, दडक;
क हा धारक प्रत्यय आहे कानीं व कानिक समानार्थी आहेत. ओरडणें–बजावून सागणें.
कानीं पाळणारा तो कानीफा
कण–ख, काणी–खाणी.]

( ६ ) कानो कों परा ( धुडाळणें ); कानाचा कोण ( कळूं न देणें ),
कानाला खडा ( लावणें ); कानामागें ( टाकणें ),
अशा शब्दप्रयोगात का व ना प्रमेयाचें विवेचन आहे

( ७ ) भल्याची दुनिया नाहीं : लंकेसि सोनिया विटा ।
पळसाते पान्हें तिंनि : चोराचा मनिं चादणें ॥

( ८ ) परमेशि मुखें पाचिं : साठिसिं बुधिं नटी ।
साता समुद्रा पैली : आठिंचि दिनु मावळे ॥

( ९ ) नवया सैनवा दिवसि : शिला काढिसि उति ।
अकरा वहिचा फेरा : बारा धडिं अबरु ॥

• • •

# खानदेशी लोकसाहित्य

[ श्री. दा. गो. बोरसे ]

'महाराष्ट्र लोकसाहित्यमाले'च्या पहिल्या पुष्पांत खानदेशच्या लोकगीतांच्या द्वारें खानदेशी संस्कृतीचा, विशेषत· कानबाई संप्रदायाचा परिचय महाराष्ट्र रसिकांना करून दिला आहे.

खानदेशी लोकगीताचा सांठा भरपूर आहे. या लोकगीतांचें वाङ्मयीन, शैक्षणिक, सामाजिक महत्त्व किती आहे व त्या दृष्टीनें संकलनाच्या कार्याचें महत्त्व किती आहे, हें नव्यानें सांगावयास नको.

लोकगीतें म्हणजे संपूर्ण लोकसाहित्य नव्हे. इतकेंच नव्हे तर केवळ लोकवाङ्मयहि संपूर्ण लोकसाहित्य नव्हे. तें पर्यायानें लोकसाहित्याचा एक भाग आहे खानदेशी लोकसाहित्य विविध प्रकारांच्या बाबतींतहि किती समृद्ध आहे, याचा अल्प परिचय या संग्रहांत करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

या संग्रहात चंद्रावळ, चंद्रसूर्य, भाऊबीज, नारायणराव पेशवे, इत्यादि सुंदर लोकगीताबरोबरच लोककथाहि दिलेल्या आहेत. 'सटीना टाक' या कथेचें सांस्कृतिक मूल्य रसिकांनींच अजमावावें. जन्मल्याबरोबरच पाचवीला आपल्या ललाटावर पुढें आपल्या जीवनांत कोणकोणत्या घडामोडी होणार याची हकीगत सटी लिहीत असते, असा समज आहे; व 'होणारें न चुकेल, होईल जरी ब्रह्मा तया आडवा ॥' या या गोष्टीचा परिचय खुद्द सटीच्या मुलीस कसा आला याबाबतची ही मनोरंजक कथा आहे. खानदेशी लोककथाप्रांतांत राजे–प्रधानाच्या सदरेस गांवचा पाटील व गांवांतील कांहीं म्हातारे व म्हाताऱ्याहि बसलेल्या दिसून येतात. न्हावी कावेबाजपणानें तुम्हांस आश्चर्य करावयास लावतो,

तर सोनार कोणाला होणार नाहीं असा पडताळा आणून देतो. शिंप्याचा वेंधळेपणा, सासूसुनाचें भांडण, सवतीमत्सर इत्यादि मानवी स्वभावनिदर्शक कथाहि भरपूर आहेत. व अतिशयोक्ति आणि रंजकता यांचा मसाला यात असल्यानें श्रोत्याला डोलवितात.

खानदेशातील वृक्षकथा, स्थलकथा, पौराणिक–ऐतिहासिक दंतकथा इतिहास–संशोधकांना, समाजशास्त्रज्ञांना महत्त्वाच्या वाटतील पश्चिम खान-देशांत या दंतकथाच्या आधारावरच उत्खननास सुरुवात झाली खानदेशी लोकसाहित्य हा रत्नांचा प्रात्यक्षिक सांठा उपलब्ध करून देण्यास समर्थ आहे, हें प्रकाशे, नंदुरबार भागात जे रत्नांचे खडे सांपडले यावरून दिसेल.

खानदेशी भाषेंतील शब्द मनोरजक आहेत. ते भाषाशास्त्रज्ञ, इतिहाससंशोधक, व समाज व वंशशास्त्रज्ञास महत्त्वाचे वाटतील. धाड्याचें लग्न, कानबाईचें लग्न इत्यादि लग्नप्रकारदर्शक शब्द, गोतपुडी, हातोळी, चिरासुजी, सायखेडा इत्यादि शब्द कुलाचाराची माहिती देतात. दिधऽ, किधंऽ शब्द शौरसेनीशीं नातें दाखवितात, तर पिनु, दिन्हऽ शब्द महाराष्ट्रीशीं जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करतात. खुद्द खानदेशी भाषांच्या विशिष्ट लकबा आहेतच कोणी ळ् बद्दल य् म्हणतो, कोणी ळ् बद्दल ड् म्हणतो. खानदेशी जनतेची सप्तशृंगी देवीवरील, विठ्ठलावरील भक्ति, व ज्ञानेश्वर, जनाबाई, तुकाराम या विषयींचें प्रेम महाराष्ट्र संस्कृतीशीं खानदेशातील विविध जमाती, एकजीव झाल्याबद्दलचा निर्वाळा देण्यास समर्थ आहे. करमणुकीसाठीं पोवाडे व ललितें याना उपयोगी पडणारें भरपूर वाङ्मय परंपरेनें टिकवून धरलेलें दिसून येईल; कांहीं मराठी तर कांहीं ग्रामीण भाषेंतील इतकेंच.

खानदेशी म्हणी लघुता, तीव्रता, सूक्ष्मता व चातुर्य या बाबतींत कोणत्याहि भाषेंतील म्हणींइतक्याच सरस असून परंपरेनें चालत आलेले अनुभव सागूं शकतात व योग्य तें मार्गदर्शन करतात.

---

# लोकगीतें

— ★ —

## १ संग्राहक—श्री. सदाशिव माळी

### १. देव विठ्ठल पाहुणा

बन्सी गहूं माझे, कोऱ्या डेरियांत।
देव विठ्ठल पाहुणा, आषाढ महिन्यांत ॥
याला बसायला, चन्दन प्रीतिपाट।
याच्या अंघोळीला, पाणी घंगाळात ॥
याला गंध मी लाविते, काळ्या कस्तुरीचें बोट।
याच्या भोजनाला, केला कमोदाचा भात ॥
गाय मोगरचंऽ तूप, वर मीं टाकिलें।
चन्द्रभागेचें तीर्थ, त्यानें प्यावया घेतलें ॥
चांदीच्या ताब्यावर, पात्र सोन्याचें ठेविलें।
नागिलीचा विडा, वर जायफळ टाकीलें ॥
रुक्मिणीनें शेज केली, तळघराच्या मंदिरांत।
कांचेचा कंदील, रेशमाची जळे वात ॥
तेलीण बाई तुझ, तेल जळतें सारी रात।
विठ्ठल रखुमाई, दोघे बसले मजेंत ॥

● ● ●

## २. सीतेचा वनवास

स्वारीचा ग रथ, त्याला घोडा जुंपियला ।
सीता चालली माहेरा, जाऊं देना राम तिला ॥

स्वारीचा ग रथ, मग जुंपल्या रानगाई ।
वनवासा चालली, रामा घरची सीताबाई ॥

स्वारीचा ग रथ, रथाला लाविल्या ध्वजा ।
सीता चालली वनवासा, रामानें दिली रजा ॥

स्वारीचा ग रथ, दीर लक्षुमण सारथी ।
रामानं दिलं वचन, सीता निघ लवकरी ॥

स्वारीचा ग रथ, वर काढले वानर ।
सीता चालली वनवासा, रामा घरची सुंदर ॥

स्वारीचा ग रथ, रथ वेशींत दाटला ।
सीता वनवासा चालली, राम शोकाकुल झाला ॥

स्वारीचा ग रथ, निघाला खळखळा ।
सीता चालली वनात, राम रडे वळघळा ॥

स्वारीचा ग रथ, त्याला बांधिला झोळणा ।
दूर वनवासा गेली, सीतारामाची ग मैना ॥

वनदाट अरण्यांत, सीता सोडली सुंदरी ।
तिच्या अगावर, गरुडराज छाया करी ॥

सीताबाईले वनवास, डोंगरा खोदिला झरा ।
राम कसा म्हणे, एवढा वैतण नाहीं बरा ॥

सीतेला वनवास, जाई बसनी सव्वा कोस ।
तिले समजाडाले, पुढें पालखी मागें रथ ॥

सीतेला वनवास, डोंगरीं खोदली न्हाणी ।
राम कसा म्हणे, इथें कशाचं तेल-पाणी ॥



**‘मथुरेच्या बाजारांत’**

दही रे दुधाची गवळण चालली एकली ।
कळंबाच्या झाडाखालीं कृष्णानें आरोळी ठोकली ॥

[ खानदेशी लोकसाहित्य, पृ. ५ ]

सीताबाईले वनवास, केली दगडाची उशी ।
राम कसा म्हणे, तुले झोप लागे कशी ॥
डोंगराच्या आडे, सीताबाईचं बाळ रडे ।
रामाची एकादशी, पाला अन्जनीचा तोडे ॥
सीतेला वनवास, कोण कैकेयीनें केला ।
रामासारखा भ्रतार, तिने भोगूं नाहीं दिला ॥

● ● ●

## ३. मथुरेच्या बाजारांत

दही रे दुधाची, गवळण चालली एकली ।
कळंबाच्या झाडाखालीं, कृष्णानें आरोळी ठोकली ॥
मथुरेच्या बाजारांत, जातसे श्रीकृष्ण कोल्हाटी ।
खेळ मांडिला तिथें, राई चंद्रावळसाठीं ॥
मथुरेच्या बाजारात, झाला श्रीकृष्ण चांभार ।
वेगडी वहाणा, राई चंद्रावळ घेणार ॥
मथुरेच्या बाजारात, झाला श्रीकृष्ण कुंभार ।
नाजुक नवल्या, राई चंद्रावळ घेणार ॥
मथुरेच्या बाजारात, झाला श्रीकृष्ण कासार ।
राजहंसी बांगड्या, राई चंद्रावळ भरणार ॥
मथुरेच्या बाजारांत, झाला गवळणींत गजर ।
सोडा सोडा कृष्णदेव, राईबाईचा पदर ॥
दही रे दुधाची, राई परतली एकली ।
कळंबाच्या झाडाखालीं, कृष्णाने काचोळी गुंफली ॥

● ● ●

## ४. भाऊबीज

घोडे जुंपिले रथाला, लगाम घोड्याच्या लोंबती ।
दिवाळीच्या सणा भाऊ, बहिणीला घ्याया जाती ॥

भाऊ तुझा घोडा, आस्मानाचा तारा ।
बहिणीच्या गांवीं जातां, लागे न ऊन वारा ॥

दिवाळीच्या दिनीं आला, भाऊ माझा बंडखोर ।
वाघाचा ग केला नंदी, सर्पाचा ग केला दोर ॥

डावा डोळा लवे बाई, मना लागलासे छंद ।
बहिणीला भाऊराय, भेटला ग गोपिचंद ॥

आईचें माहेर, माझ्या लेकीचें मामेघर ।
दिवाळीच्या दिनीं मुली, दोघी जाऊ बरोबर ॥

दिवाळीच्या दिनीं बाई, दिवाळी घरोघरीं ।
येत्या पहाटें उठून, बीज करीन साजरी ॥

दिवाळीच्या दिनीं बाई, रांगोळी ग मी काढीन ।
होसी भाऊराय माझा, खण जरीचा देईन ॥

दिवाळीच्या दिनीं बाई, माझ्या ताटामधीं येल्या ।
ओवाळून आलें, माझ्या भावाच्या साऱ्या आळ्या ॥

दिवाळीच्या दिनीं बाई, माझ्या ताटामधीं मोती ।
ओवाळून आलें, माझ्या बहिणीचा पती ॥

दिवाळीच्या दिनीं बाई, काय करू भावाच्या नथेला ।
गाय दे आंदण, गोऱ्हा जुंपीन मोटेला ॥

दिवाळीच्या दिनीं बाई, काय करूं भावाच्या साडीला ।
गाय दे आंदण, गोऱ्हा जुंपीन गाडीला ॥

सात भाऊ माझे, सातही शिवती चोळ्या ।
शेजीबाई म्हणे, तुला नित्याच्या दिवाळ्या ॥

सात भाऊ माझे, मला साठाच्या थाकळ्या ।
सात भावजया माझ्या, चितांग खालच्या पुतळ्या ।।

● ● ●

## ५. जनाबाई

दळणाची पाटी, भरली गव्हाची ।
देव विठ्ठल बोलला, जनी दळते केव्हांची ।।
जनी दळण दळते, दळते कमोदाचा भात ।
देव विठ्ठल म्हणतो, जनी दळते सारी रात ।।
दळणाची पाटी, जनी ठेवते रागें रागें ।
जनाबाईला मग, देव विठ्ठल दळूं लागे ।।
रखमाईची चोळी, जनाबाईच्या धुण्यांत ।
हरवलें मोतीं, चंद्रभागेच्या पाण्यात ।।
विठ्ठल म्हणे जनी, आपलं लेकरूं ।
राणी रखमाबाई, तिचा भरम नको धरू ।।
जनी बैसली आंघोळीला, पाणी नाहीं नहायाला ।
हातीं घेतली रत्नझारी, जाई विठोबा गंगेला ।।
जनी बैसली सयंपाकाला, नाहीं जळण चुलींत ।
हातीं घेतला विळा दोर, जाई विठोबा रानांत ।।
बाधिलें मंदिर, बारा दिसाची बांधणी ।
भिंत आडवी बाधली, तिथें जनीची रांधली ।।
दळणाची पाटी, जनी बिचारी दळते ।
खरं सागरे विठ्ठला, जनाबाईशीं काय नातें ।।

## २. संग्राहक—श्री. दा. गो. बोरसे

### १. भल्याचं लेकरूं परणाया जातं ऽ

मांडवाच्या दारीं काय वाजतंऽ ।
मांडवाच्या दारीं ताफा वाजतं ।
भल्याचं ऽ लेकरूं परणाया जातंऽ ॥
शेल्लूच्या पदरीं काय हो बांधीतो? ।
शेल्लूच्या पदरीं साडी बांधीतो ।
नवऱ्या बाईला ल्यायला देतो ॥
नगरी बाहेरी काय व वाजऽतो ।
नगरी बाहेरी ताफा वाजऽतो ।
भल्याचंऽ लेकरूं परणाया जातंऽ ॥
शेल्लूच्या पदरीं चोळी बांधीतो ।
नवऱ्याबाईला ल्यायला देतो ॥

याप्रमाणें येळा, नथ, पुतळ्या, मंगळसूत्र, मोहनमाळा, तोडे, वजरटीक इत्यादि अलंकाराचींहि नांवें घेऊन गाणें म्हणतात.

[ निवेदक—श्री. गो. गं. घोडेराव ]

• • •

### २. विठ्ठल—रुखमाई

रुखमाबाईची कंचोळी, जनाबाईच्या धोन्यात ।
हरवलें मोतीं चंद्रभागेच्या पाण्यांत ॥
रुखमाबाईची कंचोळी, जन्याबाईला झाली तंग ।
विठ्ठलसख्यानीं, वर काढीला अभंग ॥

रुखमाबाईची कंचोळी, जन्याबाईला झाली दाट।
विठ्ठल सख्यांनीं, वर काढीला चंदनपाट ।।
विठ्ठल कसा म्हणे, जन्याबाई कां सुकली।
यमुनेचंऽ पाणी घोणंऽ, धुतें मी एकली ।।
विठ्ठल कसा म्हणे, नांव माझंऽ पांडुरंग।
जनीला पाहून, रुखमीण झाली दंग ।।

[ निवेदक—श्री. ब. ना. देशपांडे ]

●●●

## ३. बाळकृष्ण

कृष्णाचं आंगडंऽ बाई, कृष्णाचं टोपडंऽ।
शिंप्याकडे बाई शिवायला टाकलं।
धोब्याकडे बाई धुवायला टाकलंऽ।
चंद्रभागेंत खळबळलं।
जाईजुईवर वाळवलं।
चंदनाच्या पारावर घडी घातली।
घडीचा घडी रंग बाई कृष्णाचा पलंग।
चारी रात्रीं जल्मले श्रीरंग ।।

[ निवेदक—प्रतिभा बडवे ]

●●●

# बागलाणी व अहिराणी गीतें

★

## १. संग्राहक—श्री. दा. गो बोरसे

### १. नारायणराव पेशवे

मारीला नारायण बाळ, रक्तें भरली पायरी ।
गोपीकाबाईनें सोमवार उजविले माहेरीं ॥
मारीला नारायणबाळ, रक्तें भरीला खडा ।
रोजेना करती ठाणेबंदी घोडा ॥
मारीला नारायणबाळ, रक्तें भरीली माती ।
रोजेना करिती याने ठाणेबंदी हत्ती ॥
मारीला नारायणबाळ, रक्तें भरीला खुंट ।
रोजेना करिती याना ठाणेबंद उंट ॥
मारीला नारायणबाळ, रक्तें भरली खिडकी ।
रोजेना करिती अस्तोरी यानी लाडकी ॥
मारीला नारायणबाळ, रक्तें भरिला दरजा ।
रोजेना करिती अस्तोरी यानी सारजा ॥
मारीला नारायणबाळ, गावगांवले जातन्या ।
आनंदीबाईनें सग्गा मारिला पुतण्या ॥
मारीला नारायण, हाऊ काय खोली खोली पडे ।
आपला जीवासाठीं पाया चुलताना पडे ॥
मारीला नारायणबाळ, शीर पडलें अंगणीं ।
अस्तोरी याची शहाणी पत्र टाकती लिहोनी ॥
मारीला नारायणबाळ, नाना मारूं नको माले ।
अंबरावतीसाठीं अर्ध राज्य देस तुले ॥

मारीन नारायणबाळ, नाना मारूं नको माले ।
पुणेणी छोड गादी सगळी बक्षीस देस तुले ॥

● ● ●

## २. अवखळ कृष्ण

यशोदा, जसोदा बयणी बयणी दोघी ।
एक पुत्रावरती राज्य करू आपु दोघी ॥
यशोदा करे ताक, काना घुसळूं देना ।
कडेवर बाळ थाला, बाहेर कुणी नेईना ॥
यशोदा करे ताक, रवि वाजे सपासप ।
क्रिष्ण खाले भय डेऱ्यामधीं हाये साप ॥
जसोदा म्हणे सांग तुझ्या कारट्याला ।
खातो दहीं दूध लाज नाहीं चोरट्याला ॥
जल्मिले क्रिशणदेव, अंधारीं काळीकीट ।
मथुरेला जायला यमुनानें दिली वाट ॥
[ निवेदक—सौ. रुक्मिणीबाई कृष्णराव नामपूरकर ]

● ● ●

## ३. लाडशिकी लोकगीतें

गाव नामपूरना पाटील पांड्या मगरमस्ती ।
बाळा नवरदेव वयली जाऊ द्या उभ्या रस्ती ॥
नवरदेवना भाऊ मोठा शेतस मवज्या ।
माडचन्या बेळी तोडी वनात सब्बजा ॥

मांडवऱ्या वेळी तुम्ही दूर दूर रोवा ।
देव बालाजीना रतले जागा देवा ॥
मांडवऱ्या वेळी उच्च्या रोवजा चांगऱ्या ।
मामा मावस्याना गाड्या येतीन अंगण्या ॥
माझ्या घरीं व सोबनं गिरीवरी पत्र देवा ।
देवनी बालाजी घर कुटुंबशी येवा ॥
माझ्या घरीं व सोबन मी त आहे मोठी शहाणी ।
आधीं लवूं नंदा भाश्या मंग लवू माया—वहिणी ॥
माझ्या घरीं व सोबन मी ते आंगेन कमावसू ।
हाळदीनऽ येळे आया बाया बलावसू ॥
हळेद गजमज पिवळ्या शेजारणी ।
बाळ नवरदेवा त्याभी तुन्या मेघारणी ॥
वह्रीनी हाळेद काय काय दव्हाडी पाटणऽ ।
मना बाळकनऽ जव्वळ लगीन नेटणऽ ॥
वह्रीनी हाळेद तुम्ही लावा थोडी थोडी ।
गवळणबाई आगे पुष्टी आहे गोरी ॥
वह्रीनी हाळेद काडसू दणदण ।
बाळा नवरदेव हारकीत माझं मनं ॥
शेजारणी बाई तुम्ही हाळदीला चाला ।
तुमच्या आशिर्वादानें बाळ नवरदेव झाला ॥
नवरदेव भाऊ तुले हाळदीनंऽ पुट ।
तुना भाऊरनी गांव जिरायानऽ लुटऽ ॥
तुना लगीननी हौस फिटी नहीं ।
जवळ मालेगांव दारुखाना लावा नई ॥

---

१ लोइळा. २. वऱ्हाडणी.

माझ्या घरीं ग सोबत बीज तीज न लगीन ।
लिगी तरी यावं तुम्ही सोयरे सजन ।।

माझ्या घरीं ग सोबत एकरात शेव आडी ।
कोळ्कुळाची गाडी गांव माहेरले धाडी ।।

माझ्या घरीं ग सोबन नंदा भाश्या व आनन्या ।
सागूं आईबाईले सुना धाडी दे कामन्या ।।

नवरदेवनी जान जाऊं बा लागे लागे ।
शेले ना वराडी त्यांना मामा येती मागें ।।

नवरदेवनी जाण उतरनी सूर्यातळी ।
अशी चमकनी बाशिंगनी कळी ।।

आबानी आंबराई कोण राजानी उलगाई ।
बाळ नवरदेव मोठानी जाण गई ।।

नवरदेवनी जाल लागनी आबाले ।
सव्वाशें वराड सांगा नवरीना मामाले ।।

नवरदेवनी जाण लागनी जाईले ।
सव्वाशें वराड सागा नवरीनी फुईले ।।

नवरदेवनी जाण लागनीं चापाले ।
सव्वाशें वराड सागा नवरीना बापले ।।

नवरदेवनी जाण लागनी रुईले ।
सव्वाशें वराड सागा नवरीनी आईले ।।

नवरी व बाई खिडकी उभी राही ।
नवरदेवनी जाण पाही छातीले हात लावी ।।

तीळनऽ तेल विकायनऽ टक्के शेर ।
बाळा नवरदेव दिया जळे वयली वर ।।

---

१ वरात, मिरवणूक

लगिनना रोज मोठी झई लगभग ।
बाशिंगन्या कळ्या मोतीं करतीं तगतग ॥

नवरदेव परीस नवरदेवना भाऊ सवछंदी ।
बैलाले दाण मांगे ह्रवरासनी चंदी ॥

नवरदेव परीस नवरदेवता भाऊ शे सवाई ।
पलंग पासोडा शाली निरोप जानोसी पाठवी ॥

नवरदेव परीस नवरदेवना भाऊ शे व गोरा ।
हातीं कागद कोरा संगें साहेबना डेरा ॥

मांडवाच्या दारीं याईन बोलती यायाशीं ।
परातीं वांचून झाल मी नाहीं व्यायाची ॥

मांडवाच्या दारीं याइन बसली ओडून ।
समुद्र सोयरा दिली पुतळी काढून ॥

याहीनबाई चाल पायघड्यावरून ।
समुद्र तुझा याही हात जोडीतो दुरुनी ॥

झालं बारा वर्षऽ लेकीला वागवता ।
डोळ्यात आलं पाणी जंवाईचे पाय धुता ॥

[ निवेदक—सौ. रुक्मिणीबाई कृष्णराव नागपूरकर ]

## ४. कानड सासरीं जाते

आखाजीचा सन गेला, कानडबाईचा मुऱ्हाळी आला ।
किती दिवस राहशी तुझ्या माहेराला ॥
पंचमीचा झोका खाऊं, पोळ्याची मौज पाहूं ।
गाडी जुंपून येऊं दसऱ्याला, माझी कानड जाते माहेराला ॥

आला दिवाळीचा सण, खोपडीबाईला मोठा मान ।
नाग दिवाळीला करी बोळवन, माझ्या कानडचे गाऊन गुणगान ॥
सण आला वांगीसट, सोयरा करे वटवट ।
लाडू बांधू उन्हाणाला, माझी कानड जाते सासऱ्याला ॥
कन्हेर राजाला क्रुद्ध आला, कानोडबाईनें सिंगार केला ।
बारु जुपुले रथाला, माझी कानड जाते सासऱ्याला ॥
कोनी वटी भरती, कोनी पायां पडती ।
तिचे भक्त की राहतात टाकळीला, माझी कानड जाते सासऱ्याला ॥
होळीबाईला निवद दावूं, पाडव्याच्या गुढीवर पैठणी ठेवूं ।
जगजंबेची यात्रा पाहूं, गोंडे पैजण सोभती कासऱ्याला ।
माझी कानड जाते सासऱ्याला ॥

[ निवेदक—श्री अ. दा. बोरसे ]

●●●

## ५. बद्रीनारायण

दखीयले जाऊं, बदरी नारायण सरसा ।
त्याने पाठीमांगें, नव मणाना आरसा ॥
दखीयले जाऊं, बदरी नारायणना हात ।
त्याना हातावर जळे, कापूरनी जोत ॥
दखीयले जाऊं, बदरी नारायणना गळा ।
त्याना गळामान, सोन्याना मोहनमाळा ॥
दखीयले जाऊं, बदरी नारायणनी गादी ।
त्यानी गादीवरे, मोती शेतस तकलादी ॥
दखीयले जाऊं, बदरी नारायणनंऽ घर ।
सोनानंऽ कुलूप, घुंगरूं याले चहुमेर ॥

दखीयले जाऊं, बदरी नारायणनी खोली ।
सोनार्नऽ कुलुप, वर चांदीयानी किल्ली ॥
दखीयले जाऊं, बदरी नारायणना घाट ।
माले उमजेना, सखना बन दाट ॥

[ निवेदक—श्री. म. वि. साळी ]

● ● ●

## ६. उकिरडा

उखल्डा म्हणे मी उखल्डा देव ।
उखल्डा म्हणे मी उखल्डा देव ॥
हाई उखल्डा कोनी व टाका ।
हाई उखल्डा कोनी व टाका ॥
हाई उखल्डा मायनी टाका ।
हाई उखल्डा मायनी टाका ॥
मायनी मनी शे सोनानी डालकी ।
मायनी मनी शे सोनानी डालकी ॥
सोनानी डालकीवरे रुप्याना खराटा ।
सोनानी डालकीवरे रुप्याना खराटा ॥
मायनी मनी व मोतीम्नी चुंभग ।
मायनी मनी व मोतीम्नी चुंभग ॥
पुल्हायले झाडे ती गायना गोठा ।
पुल्हायले झाडे ती गायना मोठा ॥
उखल्डा देवा तूं व्हई जाय मोठा ।
उखल्डा देवा तूं व्हई जाय मोठा ॥

जुपी आना जुपी आना गाडीनी जोडी ।
जुपी आना जुपी आना गाडी नी जोडी ॥
उखल्डा हाऊ माय कथा व टाकू ।
उखल्डा हाऊ माय कथा व टाकू ॥
टाक व टाक व बापाजीना खेती ।
टाक व टाक व बापाजीना खेती ॥
पिकी येतीन पिकी येतीन माणिक मोर्ती ।
पिकी येतीन पिकी येतीन माणिक मोर्ती ॥

[ निवेदक—कुंभार गुरुजी ]

● ● ●

## ७. तेलवण ( अहिराणी )

समधीर मुक्त पाणी मुक्त तेलवणले तुम्ही इजाजी,
हाळदे कुकू घी जा जी.
गणपती घरनी सारजा राणी तेलवणले तुम्ही इजा जी,
हाळदे कुकू घी जा जी.
खंडेराव घरनी म्हाळसा राणी तेलवणले तुम्ही इजा जी,
हाळदे कुकू घी जा जी.
इटोबा घरनी रुखमाई राणी तेलवणले तुम्ही इजा जी,
हाळदे कुकू घी जा जी.
बालाजी घरनी लक्षुमी राणी तेलवणले तुम्ही इजा जी,
हाळदे कुकू घी जा जी.
महादेव घरनी पार्वती राणी तेलवणले तुम्ही इजा जी,
हाळदे कुकू घी जा जी.

[ निवेदक—श्री. म. ना. भामरे, जळगांव ]

● ● ●

## ८. साडा *

बारा सुटना सुरा व्हई भवरीना ।
जरीना पयकर भाऊ तुनी नवरीना ॥
जरीकाठी खन मी मागाडसु दोन ।
भाऊनी नवरी पयकर जोगी सून ॥
साडा साडा करू साडाले पडा मोडा ।
सोयरा कबलेना किल्लीना करतोडा ॥
साडा साडा करू साडाले जयी रात ।
सोयरा संबरत दिधी चोट्यानी पंगत ॥
साडा साडा करू साडाले जई रात ।
नवरी व बाई झोपी गई मंडपात ॥
साडा साडा करू, साडा चढे येवलेना ।
सुन्नेना साडा वर चन्द्रहार जडावना ॥
साडा साडा करू, साडा चढे अर्धी राती ।
सुन्नेना साडावर जडावनऽ लेणांऽ किती ॥
नवरी व बाई मंडपांत झोपे गयी ।
बायराजनी शेला टाकी जागी कयी ॥
सुनमुके पा जा मांडवे वनी जाई ।
सांगु भाऊ तुले कडे घे भवजाई ॥
सुनमुक पाहाता मांडवे उनऽऊन ।
सांगु भाऊ तुले कडे घे भाची सून ॥

[ निवेदक—श्री. म. ना भामरे, जळगांव ]

* यालाच फळ भरणें असा शब्द प्रचारांत आहे. लग्न लागल्यानंतर मुलीला सासरीं पाठविण्याच्या अगोदर हा विधि असतो.

● ● ●

१ सूनमुख

## ९ हरिश्चंद्र तारामती

हरिचंद्र राजा गोसाई झाया बाई ।
अस्तोरीना वाडे गया भिवशा वाढ माई ॥
सेजना भरतार इनी वयखिला नहीं ।
तारामती म्हने तुले भिवशा वाढूं काई ॥
हरिचंद्र राजा गोसाई व्हवूं नको ।
तारामती तुनी रानी तिले अंतर देऊं नको ॥
हरिचंद्र राजा तारामती तुनी कोन ।
समायाना शिरीं डोम्या घरीं भरे डोन ॥
हरिचंद्र राजा तारामती तुनी रानी ।
समायाना शिरीं डोम्या घरीं भर पानी ॥
हरिचंद्र राजा लागा अंगन झाडाले ।
सोनानंऽ कुलूप डोम्या म्हाराना वाडाले ॥
हरिचंद्र राजा तुले नादारीनऽ येड ।
समायना स्त्री बाय इश्कीले काढऽ ॥
हरिचंद्र राजा नित खाये तुप-रोटया ।
समायेना स्त्री डोम्या घरीं वढे घटया ॥
हरिचंद्र राजा तारामती तूनी रानी ।
समायेना स्त्री डोम्या घरीं भरे पानी ॥
हरिचंद्र राजा तूं म्हशान राखनऽ ।
रोहिदास बाय दिधा मुरदा झोकून ॥
हरिचंद्र राजा मनी वसरी उतर ।
गोसाईले दान कये अंगनऽ धोतर ॥

●●●

## १० सणमाहात्म्य ( अहिराणी )

सनामंधीं सन नागपंचमी डउली ।
आगाशी जाये झोका दखे मयानी माउली ॥
सनामंधीं सन पोया मना हाजी गाजी ।
भाऊ मना हौश्या नंदीले तेल पाजी ॥
सनामंधीं सन दसरा घातकी ।
सोनानी तलवार पडी हेलाना मस्तकीं ॥
धा रोजना दसरा ईस रोजनी दिवायी ।
मार्गे लागना भाऊ बहीनना मुरायी ॥
दिवायीना दिवा तिई संकरातीना लाड्डू ।
भवजाईबाई मना आशा नको मोडूं ॥
सनामंधी सन सन सीमगा गाजस ।
बाबाजीना वाडे हंडा रंगेस्ना शीजस ॥
सनामंधी सन सन गुडीना पाडवा ।
भवजाईबाई कंत मुरायी धाडवा ॥
सनामंधीं सन सन आखाजी र, वानी ।
गवयनबाई वाट पाहे मुरायीनी ॥

[ निवेदक—श्री. म. ना. भामरे, जळगांव ]

## ११. जात्यावरील ओव्या ( महापूर )

नदीबाईले उना पूर नदीबाईनी वाऊ वाजे ।
गवई भाऊ मनी सारंगी घोडी पाजे ॥
नदीले उना पूर वाही उना येला तूर ।
भाऊ मना झेपनार आडी लाई तलवार ॥

नदीले उना पूर पानी करे भडभड ।
आरधी रातले वाही गये वाडऽ गुढ ऽ ॥
उना हुई पूर गिरनई लाडीले ।
आसऽ राही गये गाव उपखेड थडीले ॥
नदीले उना पूर वाही उनात येला तुर ।
भाऊ झेपणार आडी लाई तलवार । नदीले० ॥

[ निवेदक—श्री. न. दो. पाटील ]

● ● ●

## १२. जात्यावरील ओव्या

### ( १ )

एक नारीना पुरुष पभरे बनांत ।
दोन नारीना पुरुष झुरे मनांत ॥
आगली होतीज मागली कारे मंग कयी ।
बानीना पुरुस अक्कल तुनी कोठें गयी ॥
घरनी अस्तुरी जशी खोबरानी वाटी ।
परायी नारीसाठीं फिरी उना तोरताटी ॥

### ( २ )

हासूं नको नारी हासूं तुना परकारनऽ ।
आसऽ जास पानी तुन्या चतूर भरतारनऽ ॥
जलि येईना राधता तिले करा दूरदूर ।
उतरीज गया तिन्या भरतारना नूर ॥

[ निवेदक—श्री. ए. कृ. पाटील ]

● ● ●

## १३ भाऊ

भाऊले झाया लेक माले धुयामान बातमी ।
पारोयाना बाजा नंदुरबारनी नाचनी ।।
भाऊ बहिनले एक सुरतना मोती ।
शेजीबाई म्हने कोठें भरती उनी व्हती ।।
मना गांववर लागली तुनी बजारनी वाट ।
नको पिऊ पानी मोड सुपारीनी नाट ।।
तपतेना काठले भोई बसना टप लायी ।
शोधे मासोईले आपला जीवना घात हुई ।।

●●●

## १४. दिवाळी

दिवायीनऽ मूय वाटे लायेना सासरा ।
भाऊले ववायाले सन नही का दुसरा ।।
दिवायीना रोज काय करू मी तथले ।
गाय दिशात आंदन नंदी जुपसू मोटले ।।
दिवायीना रोज काय करू मी साडीले ।
गाय दिशात आंदन नंदी जुपसू गाडीले ।।
दिवायीनऽ मूय रंगीत गाड्या गयात ।
भाऊ से हाउशी दिवायीले बहिनी लयन्यात ।।

[ निवेदक—श्री. पं. रा. पाटील, टाकळी ]

●●●

## १५. जन्मदाती

माले दिधा जल्म बाप मना जामननी ।
नव महिना वझऽ वागऽ माय मनी जमुनानी ॥
जल्म दिधा माले जल्मनऽ धनी कोन ।
दोघऽ माता पिता तिसरा भगवान ॥
मुडा हुयी काटा रग निंधनी पायले ।
नव महिना वझऽ वागऽ काय म्हनवा मायले ॥
नको म्हनू पोऱ्या तू रे माउलीले येडी ।
तुले जल्म देता तिना अंगनी झायी घडी ॥

● ● ●

## १६. संकीर्ण

### ( १ )

दयता राधता घाम उना व लाडीले ।
साग सोयराले खिडक्या ठिवज्या माडीले ॥
अंबीयाना बने कोंचड करे पानी पानी ।
आयत्रा मोठा ग्यानी झारी भरी आनी ॥
अंबीयाना बने कोयड बाईना पायना ।
गवयी भाऊ मना आंबा उतारू देईना ॥
भाऊ उना आज भाचा उना काल ।
भाचा कसा म्हणे आत्या माहेरले चाल ॥
शेजीबाई म्हणे बेगडी जोडा कोन्हा ।
भाऊ शे पाहुणा संगे मास्तर भाचा ऊना ॥
काशी काशी करू काशी कोनले पावनी ।
मामाजीच्या घरीं भाची तमानी जेवनी ॥

मामाजीच्या घरीं भाचा बसना गनपती ।
ताब्यानीं वाढे तूप मामीयानी धुरपती ॥

( २ )

उनी आगनगाडी इले खादीना कपडा ।
बागे उतर भाऊ तुना भांग शे वाकडा ॥
भाऊ कसा म्हणे मनी बहिन कामून काई ।
संसारना पाये सारी दिहीं टाकी बाई ॥
मना मायेरले उच्चा झेंडा कोनी रोया ।
गवयी भाऊ मना वतनले धनी झाया ॥
मोठऽ मन घरऽ थाटीवाटीना पसारा ।
जीसन उठना सुनबाईना सासरा ॥
शाखामंधी शाख तोरनी दाय पाक ।
जेवती बाप लेक सून यमुना पानी झोक ॥
चार पांच बहिनी आमले एकला भाऊ राया ।
गांवामंधीं राजा भाऊ दखती आयाबाया ॥
चारी पांची बहिनी चार गावन्या चार भुजा ।
मना माहेर व भाऊ एकला शाहू राजा ॥
उनी आगनगाडी धक्का लागना बंगलाले ।
भाऊ उनी नार हाक मार जागल्याले ॥
वाटवरना वड मोटाल्या पानना ।
वयनीले वाटे लान भाऊ कवया मनना ॥
आगाशे इवान हाई करस किरीकिरी ।
इवान चालाये त्याना जीवनी जानगिरी ॥

● ● ●

## चन्द्रावळ ( हिंदोलीगीत )

हाई चन्दरावय बाई, रातीं पानीले व जाई;
येक खेप पानी झायऽ, दोन खेप पानी झायऽ,
तीन खेप पानी झायऽ, चार खेप पानी झायऽ;
गयी पांचव्या खेपीले, गोईंदानऽ दरवऽतीले;
दासी पायाशी लागनी, चन्द्रा पायाशी लागनी;
हाक काम्हून मारनी, याद कयी का देवनी;
घर उनात गाई म्हशी, यावऽ गोईंद घराशी;
यावऽ गोईंद देवानऽ, चन्द्रावयीनऽ वस्त्र धरनऽ;
आमी राजीयाना लेकी, आमी पाटीलना सुना,
नको करू शानपना.

यावऽ गोविंद देवाले;
चंद्रा लागनी बोलाले--मोतीबागामंधी चला;
मोतीबागामंधी बोला, तठे गोईंद राजा उना;
काय मंतर बोलना; यालऽ निंबू भारना,
देव चंद्राले भूलना; पाठोपाठ मांग उना;
घरीं चंद्रावय बाईनऽ, थाटी भोजन वाढन;
आपुन भोजन जेवनी; देव त्रुस झाया मनीं;
शपरी पलंग सवारना, क्रिस्न देव ग झोपना;
आपुन तठे च झपनी, दारी तावडऽ फुटनऽ;
चंद्रा झापडी उठनी, टीप धुयाले लागनी;
आमन्या गोईंद देवानऽ घरमा नाग सोडी दिन्हा;
दाही आंगया फोडन्या, चंद्रा धरनीशी पडनी.
सासू गयी उठाडाले, चंद्रा थकनी भागनी,
चंद्रा दमनी भागनी, बाई रातरी जागनी;

सासरा गया उठाडाले, चंद्रा थकनी भागनी,
चंद्रा शीनानी दमनी, बाई रातरी जागनी;
ननीन गयी उठाडाले, वइन्ही थकनी भागनी
वइन्ही शिनानी दमनी, वइन्ही रातरी जागनी;
वइन्ही आताशी निजनी, वइन्ही नही मनी माता,
कोन करही डोकऽ माथा, उना दादोजी व तठे,
चंदरावयले उठाडाले; चंद्रा वइन्ही भागनी,
चंद्रा वइन्ही शिननी, वइन्ही रातरी जागनी,
वइन्ही आताच झपनी; वइन्ही तुमना मी व लेक;
कोन करही देखरेख, खोडी करस मी तुमनी,
वइन्ही म्हून का रागऽ भरनी.

मंग कंथाजी उठना,
शपरी पलंगी बठना, चंद्राराणीशी बोलना—
का गऽ आबोला धरना, खालीवर जीव मना;
नको निठूर मनाशी, येक सब्बद बोल मशी;
नाग त्यानी ग दखना, नाग चंद्राले डसना;
न्हाई केसरी पांढरी, झाई बहिन घाबरी,
सम्दा तशाच उठनात, चंद्रा कंथन्या हातात;
उजी धिदी हनुमंता, ग्यात अंबिकाना वाडे;
" का व रुसनी मायबाई, चंद्रावइले लागे पान,
सांग बया ग सकून. " अबा शिवावर वनीं;
काय मंतर बोलनी—चूडा खयखय करे,
कसऽ करू बाइले बरे; तथाहिन कंथजी उठना,
ग्या तो खंडेरावना वाडे; खंडेरावा रामराम,
तुमले बोलनू कारन, चंद्रावयले लागे पान;

सांगा देवाजी सकून; खंड्या शिवावर वना,
तथाहिन भंडार झोकना, काय मंतर बोलना—
सूद नही या बाईले, लागनार नही व्रत तिले.
तथाहिन कंथजी उठना, गया घर गोइंदना;
गोइंद देवा रामराम, तुले बोलनू कारन;
चंद्रावयले लागे पान. गोइंद जरासा हासना;
गोइंद शिवावरी वना, तथाहित निमू ग झोकना;
काय मंतर बोलना ? गोइंद कचुंकी लागना,
पिऊं लागे तिन्हा पान्हा; चंद्रा झपकनी उठनी,
पदर घेयाले लागनी; गोइंद आमना मेल्हना,
ऱ्हाई आमनी बहीन. गोइंद देव परसन्न,
हरखनात सम्दे जन.

[ निवेदिका—सौ. सुशीलाबाई बोरसे ]

● ● ●

संग्राहक—श्री. सदाशिव माळी

## १. सई बहीण

सही बहीन जोडूं माझ्यासारखी रंगेली,
अशी तोडूं लागे उंच झाडनी चमेली.
सही बहीन जोडूं माझ्यासारखी बारिक,
अशी तोडूं लागे उंच झाडनी खारिक.
सही बहीन जोडूं मायबापले चोरून,
रूपयाच्या खण देऊं मागच्या दारानं.
सही बहीन जोडूं माझ्या मनांत आणून,
दुख पण सुखले येई कंदील लावून.
सही बहीन जोडूं मुसलमानी सारजा,
कपायना कुंकु इना रामनी परजा.

## २. चंद्र--सूर्य

चांद चाद करी, हाका मारे चंदरनी रानी,
आगाशे नही चांद, चांद लागना देव ध्यानी.
आवस पुनीना, चाद न्हिंगना फेरीले,
न्हाऊनी धुवुनी, तीन दिवस नारीले.
आवस पुनीना, चादराज घरीं वना,
सूर्यानी नारीनी, ताव्या पालथा मारना.
सूर्यानी लेकले दऱ्या घरन मागनऽ,
चांद से चुलता दिधी तपती आंदन.
चांद माघेनी चांदनी, चांद अस्मानना तारा,
घरनीना पाठवरी भाऊ बहीनले प्यारा.
चांद माघेनी चादनी, सुक न्हिंगना झेंडू तारा,
सिरिश्टीनी पाठवरी भाऊ बहिनले प्यारा.
रूपवंती लेकी बाई, तुना रूपनी आवाई,
धवया घोड्यावरी चांद सारखा जवाई.
रूपवंती लेकीबाई, तुनऽ रूप झाकी ठेऊं,
चाद सूर्यासारखा माले जवाई कोठें देखूं.

● ● ●

## ३. अंबाबाई

सतर शिंगी अंबाबाई व माय, माय मनीं अंबाबाई ॥ ध्रु० ॥

उच गडनी पुतयी व माय, माय० १
कंबर पितांबर नेसनी व माय, माय० २
आगे जरनी काचोयी व माय, माय० ३
भांगे गुलाल भरना व माय, माय० ४
डोयी काजय झिरीमिरी व माय, माय० ५
धवया घोडावर बसनी व माय, माय० ६
पायी वेगडी मोचा व माय, माय० ७
आईनी जावानी तातडी व माय, माय० ८

# खानदेशी लोकसाहित्य

## लोककथा

संग्राहक—श्री. दा. गो. बोरसे

### १. वृक्षकथा

खानदेशात पाचोरें तालुक्यात कळमसरे गाव आहे. त्या ठिकाणीं हापूस आंब्याप्रमाणेंच अतिशय रुचकर मधुर लागणाऱ्या आंब्याचें झाड आहे; हा महाराष्ट्रात 'बोरश्या' आंबा म्हणून नावाजलेला आहे. बहिणाई चौधरीच्या गाण्यात याचा उल्लेख आलेला आहे. हें झाड बरेंच जुन झालेलें आहे व सरकार या झाडाची देखरेख करतें. या झाडासंबंधानें संशोधन करण्यासाठीं अनेक शेतकी शास्त्रज्ञ येऊन गेले व आजहि या झाडाचे कलमाची यशस्वी लागवड करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कीड लागू नये अगर वादळात झाडाची मोडतोड होऊं नये म्हणून संरक्षणाची सोय सरकारने केलेली आहे. या झाडाची आख्यायिका खालीलप्रमाणे आहे.

उन्हाळ्याचे दिवस. त्यांत खानदेशाचा उन्हाळा प्रखर ! सूर्याच्या किरणामुळें जमीन लाल लाल झाली. कळमसरें गावीं या भर उन्हांत अनवाणी चालत एक साधू धापा टाकीत एका गरीब म्हाताऱ्या पाटलाच्या घरीं आला. उन्हाळ्याचा त्रास त्याला बराच जाणवला. दुपारची वेळ; पोटांत कावळेहि कोकूं लागले. म्हाताऱ्या पाटलीणबाईनें साधूला ओसरीवर बसवलें व थंडगार पाणी प्यावयास दिलें व जेवण्यास भाकरी

आणि सबंध कोयाचें लोणचें दिलें. साधु भुकेलेला असल्यानें त्याला हें जेवण पंचपक्वान्नाहूनहि रुचकर लागलें. तो जेवून तृप्त झाला व पाटलीणबाईस त्यानें धन्यवाद दिला "बाई, माझ्यासारख्या आल्यागेल्याला पाहुणचार करतेस हें चागलें आहे. ईश्वर तुझें कल्याण करील"

"साधूमहाराज, तुमच्या पायाच्या पुण्याईनें आम्हास मीठभाकर मिळते. पण पोटीं मूलबाळ नसल्यानें घरधनी आणि मी दु खी आहें."

"मूलबाळ नाहीं म्हणून बाई, दु ख करण्यांत अर्थ नाहीं मूल होणें दैवाधीन आहे. चागला मुलगा असला तर ठीक, तो कुळाचा उद्धार करतो. पण तोच जर छंदीफंदी असला तर कुळाची अब्रू मातीस मिळवितो. मुलांप्रमाणेंच कुळाचा उद्धार करण्याचा, कुळाचें कायम नाव राखण्याचा उपाय सांगतों तो तूं कर."

"सागा महाराज, मी मन लावून तो उपाय करीन. व्रत आहे का एखादें ?"

"व्रत वगैरे कांहीं सांगत नाहीं. उपाय साधा आहे. ही तूं दिलेल्या लोणच्याच्या आंब्याची कोय तूं या अंगणात जमिनींत पुरून टाक. त्याला खतपाणी घाल त्याचें चागलें रोप तयार झाल्यावर त्याला नियमित पाणी देऊन मुलाप्रमाणें वाढव. याला जे आबे येऊं लागतील, ते अत्यंत गोड असतील. या आब्याचें नाव दूरदेशात पसरेल. राजेमहाराजे या आब्याची मागणी करतील. हा आबा तुमच्या कुळाच्या नावानें प्रसिद्ध होईल."

साधूनें सागितल्याप्रमाणें त्या बाईनें साधूनें दिलेल्या आंब्याची कोय जमिनींत पुरली व रोप तयार झाल्यावर तें जीव लावून वाढविलें. पुढें त्या रोपाचा डेरेदार वृक्ष झाला व आंब्याच्या रुचकरपणामुळें व न नासण्याच्या गुणामुळें त्याची ख्याती दूरवर पसरली व बाईच्या कुळाचें नाव मुलाप्रमाणेंच राखलें. आजहि सर्वत्र तो 'बोरश्या' आंबा म्हणून प्रसिद्ध आहे.

मेहरूणच्या बोराविषयीं अशीच दंतकथा आहे. शबरीनें रामाला जीं गोड उष्टीं बोरें स्वत चाखून दिलीं, तीं रामानें तिची आपणावरील भक्ति जाणून मोठ्या आवडीनें खाल्लीं व बोरांच्या आठी मेहरूणगावीं टाकल्या. त्यामुळें या बोराना अशी विशिष्ट गोड रुची आलेली आहे व बोरातून कीड आढळत नाहीं.

●●●

## २. स्थलकथा

पूर्वखानदेशांत जळगांव व पाचोरें याच्या दरम्यान् माहिजी हें गाव आहे या गांवाच्या नावाची लौकिक व्युत्पत्ति खालील प्रकारची आहे. सदर गावात नामवत कलावतिणी राहतात. माहिजीच्या कलावतिणीचें गाणें गाण्यांतील दर्दी लोकाना अपूर्व मेजवानी वाटते. आजहि त्याचा लौकिक सर्वत्र पसरलेला आहे. माहिजीची यात्रा पौषात भरते व ती पूर्वी एक महिनाभर चालत असे; आतां थोडे दिवस भरते.

या गांवीं एका स्त्रीला मूलबाळ होत नव्हतें. तिनें देवीस, निमसाडा नेसून दंडवत घालीत देवीच्या चरणावर मस्तक ठेवण्याचा नवस केला. देवीच्या प्रसादाने तिला मुलगा झाला. नवस फेडण्यासाठीं तिनें अंगावरील वस्त्रें बाजूला काढून अंगाभोंवतीं निंबाचा पाला गुंडाळला व भर उन्हांत अनवाणी देवीला घरापासून साष्टाग दंडवत घालीत गेली व नवस फेडला. मुलगा मोठा झाल्यावर तिनें देवीच्या सेवेंतच आपलें उर्वरित आयुष्य घालविलें. तिला सर्व लोक " माई " म्हणत असत. त्या नांवावरून या गावास माहिजी असे नांव पडलें व आजहि हेंच नाव प्रचलित आहे.

●●●

# ३. पौराणिक दंतकथा

पूर्व खानदेशांत अगदीं प्राचीन एरंडोल हें गांव आहे. त्यालाच पूर्वी एकचक्रवर्ति नगर म्हणत असत. पुढें समुद्रगुप्ताच्या कारकीर्दींत व गवळी राजांच्या कारकीर्दींत एरंडपल्ली हें नांव प्रसृत होतें. या गावीं एका मशिदीस ' पाडवांचा वाडा ' म्हणून अजूनहि संबोधतात. एका सावकाराच्या घरात पूर्वींच्या वैभवशाली नगराचे काहीं अवशेष सांपडलेले आहेत. पाडवांच्या या वाड्यात ब्राह्मणाच्या घरीं पांच पाडव व कुंती उतरलेले होते असा समज आहे.

या गांवापासून ७–८ मैलावर पद्मालय या नावाचें तीर्थक्षेत्र आहे. तेथें सुंदर तलाव असून त्यांत कमळेंहि आहेत. हें ठिकाण उंचावर आहे. येथें गोविंदस्वामी नांवाचे साधुपुरुष होऊन गेले. या ठिकाणापासून थोड्या अंतरावर लहानसा ओढा आहे. या ठिकाणीं भीम–बकासुराचें युद्ध झालें असें सांगतात.

या ठिकाणचा खडक विशिष्ट प्रकारचा आहे. या खडकावर तांबड तांबडे कायम ठिपके आहेत. अर्थात ते या खडकातच अंतर्भूत झालेले आहेत. हे ठिपके बकासुराच्या रक्ताचे आहेत अशी दंतकथा सांगतात. इतकेंच नव्हे तर भीमाला तहान लागली असतांना त्यानें कोपरानें जागा खणली व पाणी काढलें, ती घळहि दाखविली जाते.

पाचोऱ्यासहि पांचालेश्वराचें देऊळ आहे. त्या नांवावरूनच गांवाचें नांव पाचोरें पडलें. द्रौपदीला व्रतासाठीं शंकराच्या पिंडीची आवश्यकता वाटत होती. येथें तिला स्वयंभू पिंड सांपडली. पांचालीनें भक्तीनें शंकरास प्रसन्न करून घेतलें. अद्यापहि काहीं दगड त्या देवळाचा भाग म्हणून दाखविला जातो.

शेंदुर्णीचाहि असाच इतिहास सांगितला जातो. सिंदुरासुराचा या ठिकाणीं वध झाला. या गावीं त्रिविक्रमाची अति सुंदर मूर्ति सांपडलेली

आहे. तिचें शिल्प व दगड अतिशय चांगले आहेत. जवळील डोंगरहि शंकराचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे

अजंठ्याच्या आसपास अगटींत बसविता येण्यासारखे निरनिराळ्या ग्रहाला आवडणाऱ्या रंगांचे खडे सापडतात असा समज आहे. अजंठ्याच्या काही दगडाची चकाकी हें त्याचें गमक मानतात. निजामानें हे सर्व खडे काढून नेले असा लोकाचा समज आहे.

पांडवाचा वास या भागांत होता असें ठिकठिकाणच्या पांडवांच्या दंतकथाबद्दल दिसतें. हा द्वैतवनाचा व खांडववनाचा तर भाग नसेल ना ? खाडववनावरूनहि खानदेश नाव पडण्याची शक्यता आहे.

साक्री, भाडणें, तोंडापूर, गिरड, प्रकाशें, मुडी, फरकांडें, थाळनेर, नंदुरबार अशा गावाच्या नावाबद्दल व देवदेवनांबद्दल अशाच दंतकथा प्रसिद्ध आहेत.

चिरंजीव अश्वत्थामा. डोक्यावरील मणि द्रौपदीस काढून दिल्यानें डोक्यांतील व्रणांनीं विव्हळ झालेला असा आजहि लोकांना सातपुड्याच्या परिसरात आढळतो, असा लोकाचा समज आहे.

ऊन पाण्याचे झरे चोपडें गावापासून १० मैलावर आहेत. या स्थळास ऊनपदेव म्हणतात व जवळच सुनपदेवहि आहे. श्रृंगऋषीच्या अंगावरील खरूज जाण्यासाठीं रामानें बाण मारून जमिनींतून हे औषधी झरे वर आणले अशी दंतकथा आहे. पूर्वीं हे पाणी इतकें कढत असे की, त्यांत भात शिजत असे. आजहि शेंगा शिजतात. रुप्याचे दागिने काळे पडतात. पाणी गंधकयुक्त असल्यानें त्वचारोग बरा होतो स्थलनामांचा विशेष अभ्यास करूं इच्छिणाऱ्यास खानदेशात संशोधनास भरपूर वाव आहे. जोधा ( जहांगीर ? ), ' माणकेसरी ' ( अंदाधुंदी ), ' हेमाड्याचें थाडगें ( हेमाडपंताचें तोंड ) यांसारख्या शब्दांवरूनहि इतिहास-संशोधकाना दडलेल्या इतिहासावर प्रकाश टाकतां येणें शक्य आहे.

● ● ●

# ४. सामान्य कथा

## १. अस्तुरीच्या बळें चढे पुरुषास महिमा

एक होता पाटील. तो आपल्या बायकोला येडीबागडीच समजावयाचा. घरात तर खायला नाहीं कणी, आन् चावडीवर पाटील रिकाम्या मिशा ताणी. घरीं आला, तर बायकोवर सारखा गुरगरे. पाटलीन कशी म्हणे, "घरधनी, घरीं आल्यावर आसऽ तुनऽमनऽ का ? अस्तुरीच्या बळानेंच पुरुषाला महिमा चढतो." "अग चल व्हय दूर ! मोठी आली महिम्यावाली. एवढा गांवचा पाटील मी आणि तुझ्याकारण मला महिमा चढला व्हय ?" पाटलीणीला वाईट वाटलें एके दिवशीं मामलेदार आला चावडीवर. पाटील बसला मामलेदाराशीं गप्पा ठोकीत. इतक्यात त्याचीं पोरें आलीं उडारत. पाटलाला तीं म्हणालीं—"बाबा, मायनी इचारलं—घाटा तवलीभरच झाला, वांटा कसा पाडावा ? तुम्हाला वाटा पाडायला बल्हावलंऽ मायनी."

पाटील तर खिशानी[1] झाला. मामलेदार म्हणाला, "काय पाटील, तुम्ही तर मारे गप्पा ठोकता मोठ्यायकीच्या. आणि तुमच्यावर तर घाटयाचा वांटा पाडायची पाळी आली. पोरें उपाशीं आहेत. जा जा लवकर घरीं."
पाटील चावडीवरून तावातावानें घरीं आला. हातांत चांगला फोक घेतला. बायकोला बोलावलें, "का ग, इकडे ये. चावडीवर का पाठवली ही तुझी जन ? माझी अब्रू गेली ना. तुला चांगलेंच टिमकारून काढतों !" पाटलीण म्हणाली, "तुम्ही म्हणे ना, मी येडीबागडी. ज्याची अस्तुरी वडी त्याची नीट पगडी. तुम्हांला तर माझी किंमत नाहीं. घरांत नाहीं दाना नि बाजीराव म्हणा." पाटील म्हणाला, "अगऽपन असा निरोप देतात का ? मामलेदारापुढं माझी मान खालीं झाली ना." पाटलीण म्हणाली.

---

१ लज्जित.

" तुम्ही नका त्याची काळजी करूं. तुम्ही जा चावडीवर. मी बी पाटलीण आहें तुमचा मान तो माझा मान. "

पाटीलबुवा उठले नि चावडींत जाऊन बसले व मामलेदाराला सरकारी कामकाजांत मदत करूं लागले पाटलीणीनें थोडया वेळानें मुलांच्या हातावर शिऱ्याचे गोळे ठेवले व चावडीवर खात खात जाण्यास सांगितलें व पाटलास जेवणासाठीं बोलविण्यास सागितले पाटलाचीं पोरंऽ आलीं धांवत पळत, हातावरील शिरा खात व पुन पाटलास म्हणालीं, " बाबा, घाटा चागला शिजला; जेवायला चला लवकर. " मामलेदारास मोठें आश्चर्य वाटलें. " का हो, तुम्ही तर घाटयाचा वाटा पाडण्यासाठीं गेला होता ना व मुलें तर शिरा खातात. " पाटील खुषीनें म्हणतो, " आमच्यांत शिऱ्यालाहि घाटाच म्हणतात. तुम्ही पाहुणे आलात म्हणून घरधनिणीनें शिरा केला. दिला तिनें निरोप अडाणी भाषेंत, घाटयांचे ( शिऱ्याचे ) वांटे पाडण्यासाठीं. " मामलेदार पाटलाच्या बंदोबस्तानें पाटलावर मोठे खूष झाले. पाटलानें पाटालिणीस शाबासकी दिली "खरं आहे तुझें म्हणणें. अस्तुरीच्या बळानेंच पुरुषास महिमा चढतो. ज्याची चागली अस्तुरी तीच सगळे निस्तरी."

[ निवेदक—शेवंताबाई सोनवणे, पारोळें ]

● ● ●

## २. भाग्यशाली व तिचीं दोन मुलें

येक गांवमा येक राजा ऱ्हात व्हता. त्या गांवनऽ नाव व्हतऽ चचूपुरी. राजानऽ नांव व्हतऽ ईरभान. त्याले व्हत्या दोन अस्तुऱ्या. एकीनऽ नाव भागशाली; आखू दुसरीनऽ नाव पापसरी. भागशालीना म्हाल गावपाईन दूर व्हता. तिले दोन आंडोर व्हतात. येकन नांव मदन, आखू दुसरानऽ नाव गोरधन. येकदिन मदन आखु गोरधन दवडता दवडता पापसरीना म्हाल पास उनात. गोरधनना चेंडू पापसरीनी लिधा.

गोरधन ते लडाले लागना त्यानी पापसरीले म्हन्तऽ, "व माय, आमना चेंडू देई दे." पापसरी बोलनी, "मी तुमना चेंडू देई टाकस् पन तुमले मना आठे जेवनऽ पडही." दोन्ही बी कबूल झायात. तिनी सयपाक कर्या आखु दोन्हीस्ले जेवाडऽ तवय मांगथिन त्यास्ना चेंडू देई टाका. मदन गोरधन नाचत कुदत सईसांजले घर उनात. जराशानऽ झपी ग्यात. माय त्यास्ले पुल्हायलेच उठाडाले गयी. तवय तिनी त ते मरेल देखनात. व माय झाय काय यास्ले आन आस म्हनीसन ती लडाले लागनी. हाई दांगडू माजना तठे. आते त खेयत कुदत व्हा व्हतात आखु कशा मरी ज्यात आसऽ समदाजन म्हनाले लागनात. बहु आचबा लागना लोकेस्ले. मग लोकेस्नी त्यास्ना मढा उखलनात आखु म्हसन खाईमा त्या लई चालनात. मागशाली आखु राजा लडी लडी बिनठार कोल्डा पडी ग्यात म्हसनखाईमा सापनऽ रूप धरीसन म्हादेव उना. सापले दखीसन समदा लोक पयी ग्यात. त्या पोऱ्यास्ले म्हादेवनी जीव दिधा. दोन्ही पोऱ्हे जित्ते जीव पल्टी उनात. त्यास्ले जित्ता दखीसन लोकेस्ले बहु आचबा वाटना. राजाले पापसरीनी समदी गोट समजनी. त्यानी तिले गधडावर बठाडीसन गावना भायेर हाकली दिधऽ त्या पोऱ्हास्नऽ बहु थाटमाट करीसन लगीन करी टाकऽ आखु त्या सम्दाजन राज कराले लागनात तसऽ तुमी बी करा.

[ निवेदक—श्रीमती भिकुबाई मुरलीधर निकुंब ]

● ● ●

## ३. सटीना टाक

बम्हदेव आपुनले जल्माले घालस. पन आपल्या कपायवर पुढं काय काय व्हवानऽ यान हकीगत सटी लिखस. तिले दरोज बहु काम पडस. रात झाली की लागस ती भवडाले. आठे तठे. कोठऽ कोन जल्मले उनऽ आन आज कोना घर पाचवी शे यानी बिनचूक बातमी तिले ठाऊक व्हास पाचीले सम्दाझन झपी ग्या की हाई बाय-बायतीनना जोडे जास

आखु लेखनी उंखलस नि तान्हा बायना कपायवऱ्हे टाक मारीसिन पलटस. बायतीन जोडे कागद व्हई त कागदवर बी लिखस ती. आपुन मानसऽ तिनी काय लिखेलश बायना कपायवर हाई नही वाचता येत आपुनले.

सटीले बी एक आडेर व्हती. ती बी सरसुंदी झायी. सटी टाक मारायसाठे जधय भवडाले जात व्हती तधय हाई तिनी आंडेर झपी जात व्हती. पन येक दिन तिले आपसुक जाग वनी ! तिनी देखऽत माय गयी कोठऽ न्हिंगीसन. तिनी खूप सोधनऽ आठे तठे. सम्द घर चाफली मारऽ पन माय त काही कोठें ना दिसे. आखरी रजीस व्हई गयी ती दुसरा दिनले बी तोच परकार. हाई मनी माय माले एखली सोडीसन जास तरी कोठऽ. येक दिन ती सटीनी आंडेर सटी पलट येईस्तोवर जागी व्हाइनी. जधय सटी नवा जल्मेल बायना कपायवऱ्हे टाक मारीसन पलट वनी तधय तिनी सोधऽ—"काय वऽ माय ! कोठऽ गयथी आवलुंग. आखु माले एखलीले सोडीसन दरोज दरोज जास तरी कोठऽ."

"बहिन माले देवनी काम नेमी दिधऽ ते काम करनऽ पडस माले."

" कसानऽ काम करस आवढी रातले !"

"कोठऽ बी पाचीनी पुंजा व्हई तटे जानऽ पडस माले."

" आन् काय करस तठे जाईसन ?"

सटीनी आडेरले बहु आचंबा वाटना मायन्या रातना कामना.

" तान्हया बायन्या कपायवऱ्हे टाक मारनऽ पडस माले " सटी बोलनी.

" कसाना साठे तूं टाक मारस व माय ?"

" बायना नसीबमा पुढऽ काय काय व्हवानऽ शे हाई सम्द लिखनऽ पडस माले."

" मग मना बी कपायवऱ्हे तूं टाक मारना व्हई; सांग त काय लिखेल शे मना कपायवर."

"सांगस् पुढ कथय तरी. आते रात व्हई गयी बहु. झप त बहिन तू जल्दी "

येक दिन व्हई ग्या, दोन दिन व्हई ग्यात पन सटी त काहीं सांगेना. सटीनी आंडेरले बहु चुटपुट लागी व्हायनी. मना नसीबमा काय व्हई हाई जानायले ती जशी काय फाफयनी. येक दिन तिनी इचारनऽ मायले—

" काय व माय आशी करस ! सांग ना काय लिखेल स मना कपायवऱ्हे. का तूं कांहींच नही लिखऽ मना कपायवर."

"आसऽ कसऽ व्हई बहिन. देव ना हुकूम का मी मोडसू "

" माले खात्री शे तूं चागलऽच लिखऽ व्हई मला कपायवऱ्हे. साग त मी रानी व्हईन कां नही "

" बहिन, तू रानी त व्हशीनच व्हशीन. पन पुढनऽ नको इचारु माले."

" नही, तुले सांगनऽच जोयजे. "

" देख तुले बहु वाईट लागही. "

" नही लागनार वाईट माले. साग तूं जल्दी."

"मग आईक, तूं रानी व्हशीन पन तुनऽ लगन तुना आंडोरसंगऽ व्हई जाही."

हाई आइकताबरोबर सटीनी आंडेरल बहु वाईट वाटनऽ. जीवले ती खाऊ लागनी. आशी कशी हाइ मनी माय. मनऽ बी वाईट कयऽ तिनी. माय शे का वइरीन शे हाई. कितलाक लोकेस्नऽ हाई भलऽ करस पन मना नशीबवरे मात्तर दुन्याना निरायऽ लिखनऽ हिनी. आडोरनासंगऽ लगन कधय आइकनऽ कोन्ही. पन मना नसिबवरे आसा टाक मारना.

गज पस्तावा करे. बहु इचार कया. वइलाग वना जीवना कर्‍ा तरी काय आते. आखी सटी जथय भायेर गयथी तथय ती घर सोडीसन

रानमा गयी पयी. तिनी लग्न नही कराना निश्चेव कया. मी ज लग्निच नही कयऽ ते माले मूलच कसऽ व्हई हाई मनमा इचार कया तिनी.

रानमा खूप भवडनी. दमीथकी गयी फिरीफिरी. इतलामा, येक रुसीना मठ देखना.. .मठमा गयी बिचकत बाचकत. आन तटे रुसीना पाय धरात.

"बहीन, कसाले वनी आठे ! हाई जंगल शे काय जोयजे तुले.

"मी तुमनी आंडेर शे. माले आठे व्हावनऽ शे आखु तुमनी सेवा करानी शे. जलमभर मी कुवारीच व्हासू."

"आठे सम्दा दाद्यामानसऽ शेतस आखु कशी व्हाशीन तूं एखली. तूं पडनी बाई मानूस!"

"काहीं बी करना. तूमनाबिगर जगमा नही कुनी मन्हऽ माले 'हा' सब्द देनाच जोयजे."

साधु त मारे इचारात पडाना, "व्हाय बहिन, तू आठे तुला लागेल तितला दिन. तूं मनी धरमनी आंडेर शे ! जवय तूनऽ जावानऽ मन व्हई तवय जा तूं!"

आन मंग साधुनी समदा चेलास्ले बलहाव आन सागऽ—

"दखाऽर गड्यास्वो, हाई तुमनी धरमनी बहिन शे ! आखु मनी बी धरमनी आंडेर शे. इना वाटे नका जाऊ कुनी. ज ग्यात त याद राखा."

समदास्नी कबूल कयऽ आन सटीनी आडेर मोठी खुशीखाल व्हावाले लागनी.

सटीनी आंडेर मोठा पुल्हायलेच उठे आखु समदा आसरम झाडीझुडी, पुंजा भायेर फेकी फाकी साफ करे. रुसीना रोज बासनऽ कुसनऽ उटे. आखु त्याले फुलऽ लई देई. आखु देव पुंजानी तयारी करी ठेये. त्यानी कफनी लंगोटी धोये नि समदऽ समदऽ काम करे.

येक दिन ती लागनी त्यानी लंगोटी धोवाले. लंगोटीनी गाठ काही

न्हिंगेना. म्हनीसन ती दातेस्नी सोडाले लागनी. तधय काय जयऽ भू ! साधूना धातना थेम गया तिना पोटमा. आखु त्या दिन ती थी गर्व्हार व्हायनी.

दोनचार महिना व्हवावर तिले वकाऱ्या डकाऱ्या व्हवाले लागनात. मठा मझारना समदा लोके कुजबूज कराले लागनात. व्हय ना व्हय इनी कांहा तरी कयऽ व्हयी. कोनासंगऽ तरी इना फंद व्हयी. आन आव काय आनस आऊ है. माले कुवार व्हावानऽ शे जलमभर !

साधूना ध्येनमाबी हाई गोट वनी त्यानी चेलास्ले वल्हावऽ

"कोनी नाव घिदऽ र इनऽ ज्यानी इले नासाडी व्हई त्याले मी भसम करी टाकसू."

समदा जन चूपचाप व्हई ग्यात तो याना तोंडाकडे देखे हौ त्याना तोंडाकडे देखे येक बी बोलेना.

साधूनी सटीनी आडेरले वल्हावऽ "का व कोन शे तुला यार यास्मझारथिन ?'

ती काही बोलेना ! लाजखात मनमा चूर व्हई गयी.

"देख त बहिन, तूं तऽ मोठा आव आनना जोगीनना. आखु गर्व्हार कशी व्हायनी ! मनऽ चुकनऽ इस्तोजोडे लोनी टिवन की ते पचयानऽच. इतला समदा दाद्यामानसऽ आखु है जुवान. कशी व्हाइन बरमचारी. बट्टा लागना मना मठले नि मनी धवयी धवयी दाढीले" साधु मारे पस्तावा करु लागना.

सटी नी आडेर लडू लागनी. "तात्या तुनी सपथ ! मना पाऊल नही वांकडा पडना. है कसऽ जयऽ है मला बी नही माहूम. मनऽ नाव घिदऽ या भाऊस्मझारथिन कोनी '

"मंग हाई झायऽ कसऽ दाद्याना समदामिच्चूक का कोनी गर्वार व्हास ?"

"तुमना पायनी सपथ. खोटऽ नही सागस मी."

"बहिन, तुन तुले ठाऊक. आते अथाहिन जाय त न्हिंगी जल्दीनी. माले तुनऽ मोन्हडा नको दखाडू कालदिन"

सटीनी आंडेर बहु वाईट वाटनऽ. ती दोनदिशी उपाशीतापाशी. पन तशीच चालाले लागनी. रानमा भवडत भवडत येक गावना नजीक उनी. तठे येक देउयमा ऱ्हावाले लागनी. दिनले गावमा जाये भीक मांगले आखु रातले पडे देउयमा. तिना दिनभरी जावावर ती देउयमाच बायतीन व्हई गयी. गोरा गोरा मुलगा झाया तिले. तिनी लुगडाना पल्लो फाडना आखु फडकामा पोरले ठिईसन देवना पायवर पोऱ्या ठिई दिधा. "देवजी, सम्हाय मना बायले" आस म्हनीसन चालले लागनी म्होरे.

तठे देउयमा येक राजा वना देवना पाय पडाले. त्यानी हाई बाय दखऽ. त्याले पुत्रसंतती नव्हती. बहु आवडनऽ त्याले हाई बाय. त्यानी त्याले उखली घिदऽ आखु रानीले दिधऽ. "देख तुले पोरनी हाउस शे ना? देवनी सकायनापाऱ्हेच पोर दिधऽ. देवनी कुरपा शे हाऊ! देवना परसादले नही नको म्हनू."

रानीले बहु आनंद झाया. तिनी त्याले बहुजीव लावना.

सटीनी आंडेर भवडत भवडत येक गांवमा कशीबशी गयी. तिले शीननी कारन झाम वनी. तथाहिन येख धयडा मायी जात व्हता. आरऽ कोन पडनी आठे! त्यानी तिले पानी पाजाडऽ आखु आपल्या झोपडीमा तिले लई गया. तो राजाना मायी व्हता. रोज बागले पानी देये. सटीनी आंडेर बी तठे खूप काम कराले लागनी त्यानाकारन सटीनी आंडेर त्याले जीव की परान लागले लागनी. अशा आठरा येकोनीस वर्सऽ झायात. तठे निभनी सटीनी आंडेर.

इकडऽ सटीना आंडेर बी राजाना घरऽ मोठा व्हई गया. राजानऽ इथलऽ खानऽ पिनऽ!! हाई उच्चातडांग गडी दिसाले लागना. रूप बी नामी दिसाले लागनऽ.

येक दिन भवडता भवडता मायी ऱ्हात व्हता तठे गया. त्यानी सटीनी आंडेरले देखऽ. तिनऽ रूप त्याना मनमा भरी गे. त्यानी मनमा निश्चेव कया. करसु ते हाईच बायको करसू.

घर येताबरावर तो रानीचोडे ग्या. आखु म्हणाले लगना —

" माय, माले बायको करानी शे. "

" आरऽ मग मी आते सांगस. तुना बाले य आते धयडी व्हयी गयी. माले बी व्हऊ जोयजे. मना हातखाल काम बी ती करही आन माले सुखबी मीयही. तुना बाले सागाना उशीर की तो आते राजकन्यास्ना ताफा लाई देही तुना म्होरऽ. कोनती बी पसंद कर तूं त्यास्मझारथीन. "

" पन माले नको त्या सुंदर राजकन्या. मनऽ मन जडनऽ येका सुंदर गोरीपान तरनीताठी आऊवर दिसाले बी नामी शे."

" कोठ म्हास ती ?"

" ती मायीवाडामा म्हास. गरीब व्हई पन जशी काय दिसले परीच. "

रानी आखु राजानी सटीनी आंडेरले बलाव्हनऽ धाडनऽ. तिनऽ रूप समदास्ले पसंद पडनऽ. पन राजा पोऱ्याले बोलना —

" काय रे हाई त निब्बर शे ! तुमना जोडा नही सोभाना. वरनभात व्हयी जायी वरनभात ? जगदुन्या नाया ठिवतीन ना माले. "

" पण व्हयना व्हय मी हाईच बायको करसू."

राजारानींनी खूप समजाडऽ त्याले. पन तो कांहीं हाट सोडेना. आखी त्या बोलनात —

" तूं आमना मानिक लाल शे ! तुले पसंद ते आमले पसंद ! खुशी रहाय थो ! काल लगीन लाई देस तुमनऽ."

मोठऽ हजागाजानऽ लगीन झाय त्यास्नऽ. मायी त मारे खुशीखाल नाचले लगना. राजाना याही बनना ना तो. सटीनी आंडेर बी गुलक्या टाकाले लागनी. नादारीना दिन पलटी ग्यात तिना. इतला दिन कऽट कयात; त्यास्नऽ चीज व्हयी गयऽ आसऽ तिसे वाटनऽ.

बिंदीबिजोरा झाया. वरात मिरवनी रात व्हई गई. रातले ती म्हालमा गयी निजाले. मारे नटीथटीसन बठनी पलंगवऱ्हे. पंचारती करी

ठिई. आखु राजपुत्रनी वाट जोयाले लागनी. तितलामा राजाना आंडेर म्हालमा वना. हाई तवताक उठनी आखु त्याले ववायाले लागना. तितलामा त्याना मानवरना काया बदामी ल्हास दिसना तिले तिले आठरा वरसना पूर्वीनी याद उनी मना आडोरना मानवर बी आसाच ल्हास व्हता. हाइ आडोर त नही मन्हा ?

या इचार खाल तिले भाम यावाले लागनी. तिनी नजर कोपरामा गयी त तठे भी तिना पल्लोना धुडका तिना नजर पडना. तिनऽ डोकऽ गर' रात फिराले लागनऽ आखु तिले झाम येईसन ती धरनीवर धाडदिशी पडनी.

" काय झायऽ काय झायऽ " आसऽ जो तो म्हनाले लागना. हाई दागडू माजना तठे. तिले राजाना आंडोरनी उखलनऽ आखु पलंगवर ठिवनऽ. दासी वटकीस्ले यवस्ता ठिवाले जताडऽ आखु न्हिगी ग्या तों कामले

सूदवर यावावर राजाना आंडोरनी दाईले सटीनी आंडेरनी खरी खरी त्याना जलमनी हकीगत इचारनी. तिनी बी समदी हकीगत सांगी दिधी. तधय सटीनी आडेरनी खात्री पटनी की, हाऊच देउयमाना मना आडोर.

कितली पापीन शे मी आडोरले नवरा करी धिदा मी !

आंडोर तुना ,नवरा व्हयी जाई या तिन्या मायना बोलेस्नी याद उनी. सटीना टाक कधी बी खोटा नही हात व्हाई हाई तिनी खात्री पटनी.

रातना रात तिनी म्हाल सोडना. आखु पस्तावाखाल तिनी हेरमा जीव दिधा. सटीनी कपायवऱ्हे टाक मारना की, तसऽ व्हावानऽच. काहीं बी करा. कोठं बी जा; पन व्हनार तें व्हनारच.

[ निवेदक—रामड्या मिळ, मालेगाव ]

● ● ●

## ४. सोनाराचें चातुर्य

एका राजाला कांहीं सोन्याचे दागिने आपल्या आवडत्या राणी-साठीं घडवावयाचे होते. तथापि त्याचा कोणत्याहि सोनारावर विश्वास नव्हता. सोनार दिलेल्या सोन्यांतून सोने काढून घेईल कीं काय, अशी त्यास भीति वाटत असे. त्यानें एका अनुभवी पण चांगल्या कारागीर सोनारास बोलाविलें. सोनार कबूल नाहीं होणार हें त्याच्या मनानें घेतल्यानें त्याला सुरुवातीस दमदाटी दिली. हे दागिने इतके तोळे आहेत; दागिने घडविल्यानंतर एक रतिभरहि कमी होतां कामा नये, अशी ताकीद दिली. सोनारानें आपल्या प्रामाणिकपणाची परोपरीनें खात्री दिली. तो म्हणाला, "राजेसाहेब, आपण दागिने घडवितांना जरी पहारा बसविला तरी खरा कारागीर त्याचें कसब दाखविल्याशिवाय राहाणार नाहीं." राजानें सांगितलें, "तू जर माझा पहारा असतांना दिलेल्या सोन्यांतून स्वत:-साठीं काढू शकलास तर मी इनाम देईन." सोनारानें सांगितलें, "ठीक आहे सरकार, पण आपलें अभय मात्र असावें."

राजानें सोनाराकडे आपल्यासमक्ष सोनें मोजून दिलें व त्याच्या दुकानांत शिपाई पहाऱ्यासाठीं बसविलें व स्वत दागिने घडवित असतांना दुकानात बसला. सोनाराचें दागिने घडविण्याचें काम जोरात सुरू झालें. थोड्या वेळानें त्याची बायको तणतणतच त्याच्यासमोर दरवाजात उभी राहिली. धुरानें तिचे डोळे लाल झाले. इतकेंच नव्हे तर घरातील धुरानें पहाऱ्या-वरील शिपायाचे डोळेहि कडवटले. दरवाजांत सोनाराची स्त्री उभी राहून सोनारास रागारागानें म्हणाली, "तुम्हीं लांकडें ओलीं आणून ठेवलींत माझ्यासाठीं. चूल पेटत नाही, तर चुलींत काय माझे हात घालूं जळणासाठीं! खाण्यासाठीं तर आता फाफळाल?"

सोनारानें रागारागानें तिच्याकडे पाहिलें. "सटवे, तुला का हीच वेळ होती वाटते, मला ही घरातील किटकिट सांगण्याची? दुकानांत राजा प्रधान बसले, शिपाई बसले अन् यावेळीं माझी अब्रू

घेते अशी !" असें म्हणून ताडकन् तिच्या अंगावर बागीसरींतील विस्तव फुंकण्याची फुंकणी फेंकून मारली. सोनारीण बाईनें, "माझी फुंकणी आणली तर आणली वर दुकानात मला ही जाचणी !" असें म्हणून चूल फुंकण्यासाठी फुंकणी घरांत नेली हा प्रकार राजाला, शिपायांना अगदीं सहज वाटला. सोनारानें सोन्याचे दागिने तयार झाल्यावर पुन: तोलून दिले. ते बरोबर भरले. राजानें शाबासकी दिली.

"गड्या, राजाजवळ का तुझी मात्रा चालते ? तुम्ही कारागीर लोकांनीं गोरगरिबांना नाडावें. मी म्हणून तुला मजुरी देतों. एरवीं पैज मारून फजिती झाली याबद्दल मजुरी देखील द्यावयास नको."

"नका देऊं मजुरी राजेसाहेब ? मला माझी मजुरी केव्हाच मिळाली." सोनार म्हणाला.

"ती कशी काय ?" राजा म्हणाला.

"आपलें अभय असल्यास सांगतों." सोनार म्हणाला.

"तुला पूर्ण अभय आहे." —राजा.

सोनार घरात गेला आणि राजाची अर्धवट वितळलेली सोन्याची अंगठी घेऊन आला.

"महाराज, हें पहा आपल्या सोन्यांतील सोनें. लागल्यास खात्री करून घ्या, आपल्याच सोन्यांतील आहे किंवा नाही." राजाला आपल्या अंगठीचें सोनें आहे हें पटलें.

"आम्ही सर्व येथें सक्त पहारा करीत असताना व तूं येथून न उठताना तुझ्या घरांत सोनें गेलें तरी कसें ?" राजानें आश्चर्यचकित होऊन विचारलें. सोनारानें घडलेली हकिगत सांगितली. आपली स्त्री आली त्या वेळेस, फुंकणींत सोनें घालून ती फेंकली असें सांगितलें. राजानें या चातुर्याबद्दल त्याला शाबासकी दिली व ठरविलेलें इनामहि दिलें.

[ निवेदक—श्री. बडूशेठ सोनार, जळगाव ]

● ● ●

# ललितें

## १. गौळण

संग्राहक—श्री. दा. गो. बोरसे

एके दिवशीं कृष्णनाथ खेळत खेळत अकस्मात गेला शेरींतें[1].
गौळणीच्या वाडी जात गौळणीशीं पुसता झाला—
काय मूल आहे तुला ?
मग ती म्हणे श्रीकृष्णाला, नाहीं मज बाळ
महिने झाले तीनचार,
कृपा करील परमेश्वर होईल मज बाळ.
कृष्ण पुसे गौळणीशीं, गरोदर झाली कैशी ?
तूं तर साग मजपाशीं, झटकारून हाता. १
गौळणीस राग आला झटकारुनी बोलली
बुधी नाही चागली तुझी रे कृष्णा !
आणिक इतका वाढला मग तूं फार शहाणा !
आता तूं ऊठ बीगीशीं जाय तूं घरा.
कृष्ण म्हणे गौळणीशीं, मी ग म्हणालों तुला काय ?
मला ग म्हणशी जाय जाय कुणिया मुळ ?
गौळण रागामधीं वळखळी तुझी बुद्धी
नवस केले चक्रपाणि कुचाळखोर.
वरति धरे हनवटीशी, हात घाले कनचोळीशीं
रुसूं नको म्हणतीशी शिक्षा मज करी.
रागं रागं बोले त्याला, तेव्हां तिनी लोटून दिला;
आजपासून घराला येऊं तूं नको, नाहीं तर सागेन नवऱ्याला.

---

१. गल्लींत.

जर तूं परतुन आलाशी, धरीन बांधीन खांबाशी,
मुगा जाय बा रुशीकेशी, धरणार नाहीं तुजशीं.
येवढें ऐकून सत्वर मग तो बोले नारायण,
पाहीन तुझऽ बळकटपण ? बांधिसी आम्हा.
एवढ ऐकून सत्वर, निघून गेले रुक्मिणीवर
रात्र झाली दोन प्रहर. २
त्या दिवशीं गौळण भरतार, बळकट लावून माजघरं, आत ते दोघे.
गौळण निजली होती पतीपुढें, पाठ केली तयाकडे.
निद्रा आली कानोडे, कष्टाची तिजला.
तेवढ्या रात्रीं कृष्ण आला, कावड उघडून घरात गेला,
दाढी वेणीशीं बांधली, बळकट गांठ दिली,
सुटेना अशी केली बळकटपण. तिथून कृष्ण निघून गेला.
सूर्य उदय तेव्हां झाला, गाय आणिक वासर मिळती वेळा.
भरतार म्हणे गवळणीशी, तुला ग लाज नाहीं कशी ?
उगवला दिवस.
गवळण म्हणे भरताराशीं, ऊन आल अंगणाशीं,
अडकली वेणी सोडऽवा मज.
मग ते दोघं जागे झाले, सावध होऊन बोल्ले,
आशा कशा झाल्या गति ? जगामधें फजिती होईल काय आता. ३
एक होती शेजारीण, ऐकून दोघाचं बोलणं,
दारापाशीं येऊन हाका ती मारी.
कावड उघडून घरांत गेली, वेणी सोडायाशीं लागली,
सुटेना कांही सुटेना काही.
चुलींतून इस्तव घेतली, दाढी वेणीशीं लावली,
उजून प्रयत्न करती, जळेना केस जळेना केस.

गौळण म्हणे भरताराशी, शस्त्र घ्यावं कापायासी;
जाऊं येत ना एकाशीं, जाऊं या दोघं.
दोघे गेले शस्त्रापाशीं, कापाया लागले केसासी,
शस्त्राची धार लागेना केसा, लागेना केसा.
कळलें नंदराया उजूनशानें, जेठाई पाठवले त्याने.
मग ते दोघे बसविले, मिरवित मिरवित दारिं आणले;
हांसत हासत आला जगजेठी, सोडल्या गांठी.
कृष्णाची करणी मोठी, पाया पडती दोघं. ४

## २. तुलसीदास

आज्ञा वंदन श्रीरामाची मंग निघाले तेथून
आपन भुरचे कनोजी ब्राह्मण
भाच्छीयाचे दिवाण ते वाल्मिक ऋषी आपण.
बाराव्या दिवशीं बारसं केलं
नाव ठेवलं आवडीनऽ
ते नगरांत वाटल साखर तुळसीदास म्हणून. १

दिवसं दिवस थोर झाले करा याचें लगीन.
येसूबाई लगन ल्या इचे माहेर,
इच्या माहेरचा कागद आला,
जाऊन पुसते सासूला.
माझ्या आईच्या जीवाला बरं नाहीं वाटत
जातें भेटेकारण.
संध्याकाळच्या वायदा केला
आता येईल परतून. २

दा क्र ८४१५
मुंबई शाखा (स्थळ सूचित)

तुलसीदास आले बाजार करून,
घरांत पाहतां दारांत पाहतां,
कुठें गेली माझी कामीन ?
माउली म्हणाली ऐक माझें वचन—
तिच्या आईच्या जिवाला बर नाहीं वाटत
गेली भेटीकारण,
संध्याकाळच्या वायदा केला आतां येईल परतून.
वाट पाहता पाहता दिवस गेला अस्मान
अजून येईना कामीन, कुठें गेली ग माझी सुंदर. ३
तेथून निघाले तुलसीदास, आले सासुरवाडीशी
गावामध्यें सामसूम झाली सासोल येईना कोणाचा
दरवाजाला कडी कुलूप आतां जावं कुणीकडून ?
धरला नाग केला लांब गेले वरती चढून.
ती सुंदर उठली बिचकून,
चोर म्हणून धरला पकडून.
लावा दिवटी पाहू द्या दृष्टीं
लावली दिवटी, पाहिली दृष्टीं. ४
एवढ्या रात्री कां केलऽ येणऽ ?
पाच रुपये देऊन मजसारखी नव्हती का कोण ?
घरात गेले हळू बोला आपण वचन,
दरवाजाला कडी कुलूप तुम्ही आले हो कोणीकडून ?
तूं टाकला होताना दोर त्यावर आलों मी चढून
कुठे दोर दाखवा मला दाखवा सत्वर
तरतरा ती आली बाहेर नार;
नाग पाहतां गेली बिचकून मनीं घाबरून,
ते धरणीस पडली उलथून मूर्च्छा येऊन.

तुम्ही तुलसीदास मी लक्ष्मीकांत कैसा वाचीयला प्राण.
तुलसीदासाला लागलें रामाचें ध्यान. व्हा तुम्ही मनीं जाण. ५

[ निवेदक--आनंदा महादू चव्हाण ]

●●●

# खानदेशांतील कांहीं लोकसमज

( १ ) नावेंत विटाळशी स्त्री बसली असताना नाव बुडते, असा नावाड्याचा समज असतो.

( २ ) नवरा-नवरीस हळद लावलेली असताना फिरल्यास त्यांच्या स्वरूपाला चेटकिणी भुलतात व त्यांना भूतपीडाहि होते, असा समज असल्यानें त्याची हळद उतरल्याशिवाय रात्रीं बेरात्रीं फिरण्याची त्यास मनाई असते. लग्नाच्या मुदतींत वरास नवरदेव म्हणतात. या मुदतींत त्याला त्याच्या अंगीं असलेल्या देवत्वामुळें काम सांगत नाहीत.

( ३ ) लागोपाठ तीन मुलींच्या पाठीवर मुलगा होणें अनिष्ट समजतात. अनिष्ट ग्रहांची शांति ब्राह्मणाकडून करण्यात येते.

( ४ ) तीन बायका करूनहि त्या जिवंत न राहिल्यास पुरुषाला रुईशी लग्न लावावें लागतें. नंतर चवथ्या स्त्रीशी लग्न केल्यास तें लग्न शकुनी ठरतें.

( ५ ) पहिली स्त्री वारली असताना दुसरीस तिचा दुस्वास होऊं नये यासाठीं दुसऱ्या स्त्रीच्या गळ्यांत 'सवत'—सोन्याच्या किंवा रुप्याच्या पत्र्यावर कोरलेली मूर्ति—बांधतात.

( ६ ) बारी ( डोंगरावरील वाकण ) वरील म्हसोबा—मारुती वगैरे स्थलदेवतेस नारळ न फोडल्यास कार्यांत-प्रवासांत विघ्न येतें, असा समज आहे.

( ७ ) नवरदेव लग्न लावण्यास निघाला असतांना सबंध लिंबाच्या दोन फोडी करून ओवाळून दोन दिशेला नवरदेवास पीडा होऊं नये यासाठीं फेकतात. त्याचप्रमाणें नवरदेवाजवळ चाकू, कट्यार यासारखें

हत्यार असल्यास पिशाच्च-बाधा होत नाहीं असा समज आहे. तसेंच लग्नाला निघण्यापूर्वी घोडयाच्या पायाखाली अंडे ठेवतात बळी दिल्यानें नवरदेवाचे प्राण वाचतात असा समज आहे.

( ८ ) आजारी मनुष्य बरा व्हावा यासाठीं कोंबडीचें पिल्लू उतरून टाकतात. काहीं ठिकाणीं शनिवारी भंदे ( खापर ) उतरून चव्हाठयावर ठेवतात अशामुळें आजारी मनुष्य आजारातून लवकर बरा होतो असा सार्वत्रिक समज आहे.

( ९ ) मूल जन्मल्यानंतर सारखे रडतें. अशी रड धरली असताना त्यास एखाद्या पूर्वजाच्या नांवाचा अगारा लावतात. रडें थांबल्यास त्या मुलास अगर मुलीस पूर्वजाचें नाव ठेवतात. मृत आजा-आजी-बाप-बहीण पोटीं येऊं शकतात असा सार्वत्रिक समज आहे. केव्हा केव्हा त्यांच्या स्मरणार्थ देव्हाऱ्यात त्यांचे टाकहि बसवितात. तडवी या भिल्ल मुसलमान-समाजांतहि असे टाक बसवितात

( १० ) चांगल्या म्हशीला-गाईलाहि दृष्ट लागते असा समज आहे. दृष्ट लागू नये यासाठीं काळ्या लोंकरीच्या धाग्यांत पादऱ्या कवड्या ओंवून ती माळ जनावराच्या गळ्यात घालतात. यास भालदोरा म्हणतात यामुळें त्यांना दृष्ट लागत नाही

( ११ ) बाळंतीण बाळंत झाल्यापासून दहा दिवसाचे आत मेल्यास तिचा जीव मुलाचे आसपास घोटाळतो, असा सार्वत्रिक समज आहे. अशा बाळंतिणीस कांहीं ठिकाणीं जाळीत नाहीत. तिला पुरतात त्या वेळेस सर्व विधि उलटे करतात ( चोळी उलटी घालणें इत्यादि ); त्यामुळें बाळंतीण नवजात मुलाजवळ येऊ शकत नाहीं.

( १२ ) उलट, मूल १० दिवसाचे आंत मेल्यास त्यास काहीं ठिकाणीं घरांतच पुरतात. बाहेर पुरल्यास तीन दिवसपर्यंत त्याच्या जवळ दुधाची बोळकी—चाणकीं वगैरे ठेवतात. मुलाला परलोकींहि दुधाची अडचण भासूं नये यासाठीं हा खटाटोप असतो.

( १३ ) गंधर्व किंवा म्होतूर लावताना जे मंत्र ब्राह्मण म्हणतो ते सुवासिनींनी ऐकल्यास अनिष्ट परिणाम घडतो हा समज आहे. हे मंत्रहि तो उलटे म्हणतो असा समज आहे. लग्नहि नेहमींच्या वेळेपेक्षा कृष्णपक्षांत मध्यरात्रीं लागते पुनर्विवाहास समाजाची मनापासून मान्यता नव्हती हें यावरून दिसतें. या नव जोडप्यांचा 'मधुचंद्र'हि त्याच रात्रीं व्हावा लागतो. काही ठिकाणी पुनर्विवाहित जोडपीं गंधर्व लावले जात असतांना कपाळाला कपाळ लावतात. कांहीं ठिकाणीं त्याचे आप्त प्रसंगीं कोंबडा-कोंबडी पुढें अनिष्ट घडूं नये यासाठीं उतरून फेंकतात.

( १४ ) बऱ्याच कुळात हिरवे ( हिरवें लुगडें इत्यादि ) काहींहि साहात नाहीं. दुसऱ्यानें दिलेलें हिरवें मात्र चालतें. निरनिराळ्या कुळाचा काहीं देवतांवर रागहि दिसतो. कोणी गणपतीची पूजा करीत नाहीं, कोणी वटसावित्रीची पूजा करीत नाहीं, कोणी गोंधळ घालीत नाहीं. हें सर्व कुळाला ' साहात ' नाहीं या सदरात बसतें.

( १५ ) पारधी लोकांत आषाढ वद्य अमावास्येला ( दिव्याच्या अवसेला ) शिकार केल्याशिवाय अन्नग्रहण करणें अपशकुनी समजतात.

( १६ ) मूल वाचत नसल्यास नवे मूल वांचावें यासाठीं त्याचें नांव ओंबडधोबड-' उखडू, शेनफडू, दगडू, धोंडू ' ठेवल्यास वाचतें, असा समज आहे. कांहीं ठिकाणीं मूल वाचावें यासाठी जिचें मूल वांचत असतें अशा स्त्रीच्या ओटींत मूल टाकतात. कोणी पाच वर्षेंपर्यंत पायांत बेडी घालतात, तर कोणी पाच वर्षेंपर्यंत भिकेचे जिन्नस अंगडें-टोपडें-अन्नहि वापरतात. अशा मुलाचें नांव ' भिका ' ठेवतात. मुलगी असल्यास तिचें नांव ' भिकी ' ठेवतात.

( १७ ) पांच सुवासिनींकडून शकुन पाहण्यासाठीं गव्हावर भरलेली घागर फिरवितात. उजव्या बाजूकडे घागर फिरल्यास काम फत्ते होईल असा समज असतो.

( १८ ) एखाद्यानें पणतू पाहणें भाग्याचे समजलें जातें, पण निपणतू अगर खापर पणतूचें तोंड पहाणाऱ्यास ' द्वाड ' समजतात.

( १९ ) नववधूनें ज्येष्ठांत वडील दिराचे तोंड पाहूं नये, असाहि संकेत आढळतो. अधिकमासांत नववधूस सासरीं आणीत नाहीं. कारण पतीनें पत्नीचें तोंड पाहूं नये असा समज आहे

( २० ) खानदेशांतील चारण, कंजार जमातींत मृत्यूची अतिशय भीति बाळगतात मेलेल्या माणसापासून त्रास होऊं नये यासाठीं प्रेत जाळल्यानंतर झाडाला फेऱ्या घालीत येण्याची वहिवाट आहे. त्यामुळें एवढ्या वेढ्यातून मृताचें भूत जिवंत माणसाचा पाठलाग करूं शकत नाहीं, असा समज आहे

२१ ) चारण समाजांत जांवयाची कसोटी विशेष रीतीनें घेतली जाते. लग्नाच्या अगोदर जांवई सासऱ्याच्या येथें राहूं शकतो. होळीसारख्या सणाला सासुरवाडीच्या सर्व स्त्रिया त्याची पाठ नरम करतात. ही कणिक तिंबली जात असताना जांवयानें हुस् म्हणतां कामा नये, असा दंडक असतो. एखादा जावई मारानें रडूं लागला तर त्या तरुणाशी मुलीचें लग्न लावीत नाहींत

( २२ ) खानदेशांत बहुतेक जमातींत सगोत्रीय लोक लग्न लागेपर्यंत मांडवाबाहेर उभे राहातात. मुलगी पळवून नेतील अशी वधूपक्षास भीति वाटत असावी. भिल्ल, पारधी, रजपूत, परदेशी, गुजर यांच्यांत अशा प्रकारचे कितीतरी समज आहेत. स्थलाभावीं समग्र देणें अशक्य वानवळ्यादाखल वरील लोकसमज दिलेले आहेत.

● ● ●

## बोहाडे

[ निवेदक —**वसंत नारायण देशपांडे**, चांदोरी, जि. नाशिक. ]

'चद्रपुरी' नांवाच्या एका जीर्णपट्टन खेड्यात शिक्षकाचें काम करीत असता सामाजिक थरातले बहुमोल अवशेष माझ्या पाहण्यात आले.

एका लहानशा पण सुसंस्कृत खेड्यांत कितीतरी ऐतिह्यें, लोकाचार, लोकरीति व लोकवाङ्मयाचे विविध प्रकार आढळतात त्यातून प्रामुख्यानें दैवतविषयक प्रकार संग्रहित करण्याचें योजिलें आहे.

जवळ जवळ १२ वर्षांनंतर वरील गांवीं गंगाप्रदक्षिणा करीत करीत १०।१२ वयोवृद्ध मंडळी आमचे गांवीं आली व त्यांनीं गंगामंदिरांतच मुक्काम ठोकला. त्र्यंबकेश्वर उगमापासून गंगेच्या–गोदावरीच्या मुखापर्यंत ' पदप्रवास करणारी ही मंडळी ठराविक मुक्कामाच्या ठिकाणींच विशिष्ट स्थळींच उतरत. कोणी गंगास्तवराज, कोणी गंगालहरी, इ० पोथ्या, स्तोत्रें व अष्टकें म्हणत. सदाशिव नावाच्या १६ व्या शतकांतील पंडिताची गंगालहरीवरील टीका मीं उतरून घेतली व पुढे हीच पोथी शिळाप्रेसवर कँडी साहेबांच्या मुद्रणालयांत छापली गेली असें माझ्या निदर्शनास आलें. या मंडळींत एकानें तर नित्यनियमानें एक प्रत लिहावी आणि तिचें पूजन व विसर्जन गंगाप्रवाहांत केल्यावर मग आपलें भोजन उरकावें. असें कितीतरी आचार मला दिसले पेशवाईंतले चिंतामणीशास्त्री नामक ध्रुपद गवय्येसुद्धा ' गांगेय ' असावेत. ते प्रतिदिनीं अभिनव चिजा बनवीत आणि ही परिश्रमपूर्वक लोकोत्तर कृति लेखनिबद्ध करून लोक-गंगेला समर्पण करीत. त्याची शिष्यमंडळी याच चिजावर मेहनत करीत, इ० आठवणी श्री. ब्रह्मेबुवा यांनी सांगितल्या आहेत ब्रह्मावर्त ' या पंथाचे लोक सध्यां दुर्मिळ होताहेत. सांपडले तरी त्यांचीं कित्येक आचारमूल्यें समजून घेणें कठीण जातें सर्व मोगल सम्राट्, अयोध्येचा वजीर सादतअली हेसुद्धा गंगाजल अमृततुल्य, पवित्र आणि शुद्ध मानीत. पंडीत जगन्नाथानीं गंगालहरी आणि पंडित मयूरानीं ' गंगा वकिली ' हे भाग लिहिले आहेत. अयोध्येचा वजीर यवन असूनहि त्याच्या ऐतिहासिक चित्रांत गंगादेवी, मकरवाहन मासे, कांसवे इ० वारकावे सांपडतात. नाशिकजवळ रामकुंडाअलिकडे प्रदीर्घ खडकावर प्रशस्त कांसवे, मासे खोदलेले आढळतात व पूजेच्या उपकरणातहि त्याचा समावेश आहेच.

विष्णूचे हे प्रथमावतार गंगोपासकांना पण शिरसावंद्य आहेत. हींच चिन्हें दशावतार क्रीडेंत, हींच प्रतिकें देवालयांतून, हींच चिन्हें राजमुद्रेंतून पण आढळतात.

खेड्यातील जनता जुन्या परंपरेशीं एकरूप झालेली असते त्यांची करमणूक म्हणजे तमाशे, यात्रा आणि बोहाडे. बोहाडयामधून दशावतार मिरवतात, त्यात मच्छकूर्मांचा प्रवेश असणारच. याच पदयात्रिकामागोमाग 'गाणपत्य' पथाचे लोक पण पूर्वीं येत, असें वृद्धमंडळी सांगतात. या साऱ्या ऐकीव गोष्टी स्मृतिरूप उजळा देऊन ताज्या दमाच्या मंडळींना सांगताना वृद्धाचा उत्साह व तरुणाची कुत्सित वृत्ति आढळून येते. आमच्या गांवीं 'सिद्धेश्वर गणेशा' च्या मंदिरांत ते उतरत असत. कांहींजण संपन्न तर कांहींजण कोरान्नावर उदरनिर्वाह करणारे. हे लोक गावांत येतांच गांवकऱ्याना किती आनंद व्हायचा ! पाटील आणि बारा बलुते सेवेसाठीं हजर. त्यांना साहित्य काय लागणार ? उत्तम ताज्या दूर्वा, रक्तपुष्पें, शमीपत्रें इ० फुलें गांवच्या गुरवानें पुरवावयाचीं. सगळीकडे एकच वार्ता. अहो, गण्या आला .अहो गणपति आला ! ! मंदिरात मूषका-सनाच्या चौरंगावर त्यांच्या संवळी ठेवलेल्या. गावच्या 'अनिरवसित' शूद्रांनीं वेताच्या टोपल्या विणून तें कौशल्य गणराजास अर्पण करावें. गुरवानें पूजनसमयीं वाजंत्रींतून वेडेवाकडे "मी नाहीं वाजवीत !" या शब्दसाम्याचे सूर काढावे, प्रत्येकानें आपली सेवा रुजूं करून घ्यावी असा संकेतच म्हणाना. असो, या गाणपत्याना बनवणारे पण कांहीं कुशाग्र ग्रामस्थ असत. ते भोजनाला आमंत्रणें देत व गाणपत्य कांहीं ठिकाणीं नकार देत. अशा वेळीं तांडवगणेश, लीलागणेश, मुद्रागणेश, गणेशयंत्र, उजव्या सोंडेचा सिद्धिराज आमच्या देवात आहे, त्याच्या प्रसादास नाही म्हणूं नका इ० चाटा मारून त्यांना आमंत्रणें देत. आमचे गांवीं तर शें-सव्वाशें ब्राह्मणांचा उबरा व जहागिरदाराचे तीन वाडे असल्यामुळें त्यांची सोय सहज लागे मोदकाचा बेत, दक्षणा इ० लौकिक

गोष्टींकडे त्यांचें लक्ष नसून ते प्रथम देवघराकडे लक्ष देत. देव्हाऱ्यांतील मूर्तीच्याच योग्यतेची त्यांच्या संग्रहीं मूर्ति असावयाचीच. गणपतीचीं सर्व स्थानें ते पाहात आलेले ! यजमान जवळच भोजनास बसलेले; पण चित्राहुती घालून हे अतिथिदेव प्राणाहुति कां घेत नाहींत अशी शंका मालकास आल्यावर, मालक मुकाट्यानें आपली गणेशमूर्ति तांदळावर आणून पुढें ठेवीत व त्याबदलीं स्थलांतर मूर्ति घेऊन ती देवात नेऊन ठेवीपर्यंत भोजनास सुरुवात नाहीं ! असा या पंथाचा विचित्र नियम असावयाचा मग ती प्रासादिक मूर्ति निकृष्ट असली तरी यजमान मोठ्या भाविकतेनें स्वीकारीत. अशा प्रकारच्या अदलाबदलींतून दोन गाणपत्य घराण्याचे संबंध कायमचे जुळवले जात. अशा रीतीनें थेऊरचा गणेश आणि हंपीविरूपाक्ष येथील मुक्तेश्वर परस्परास प्रेमानें भेटावयाचे अशी गणेशभेट गाणपत्य करीत व स्नेहसंबंध जुळवीत मला एकानें 'मोदकेश्वर' गणपतीची गमतीची माहिती सांगितली. यात मोदकेश्वरावर दृश्य—श्लेष आहे ! हा गणपति मला चित्रातून पाहावयास मिळाला. गणेशाची विलासमूर्ति अष्टनायिकासह उपभोग घेणारी हा गृहस्थ-गणपति आपल्या एका हातांत मोदकपात्र घेत असून त्यानें आपल्या सोंडेनें पट्टनायिकेच्या कुचयुगलाला गुदगुल्या करण्याकरितां शुण्डवलय,कारागिरीनें मोठ्या खुबीनें रेखाटलें असून प्रत्यक्ष मोदकरस यापुढें फिका वाटतो, अशा आविर्भावांत गणेशमूर्ति दाखविणाऱ्या त्या रसिकाच्या रसमूर्तीला 'मोदकेश्वर' याशिवाय दुसरें कोणते समर्पक नांव देणार ! कांहीं गणेश युद्ध करणारे. कांहीं मल्लविद्या दर्शविणारे तर कांहीं रणतांडव करणारे ! ! ! अशा मूर्ति जुन्या सरदार घराण्यांतून आढळतात. असो. कांहीं गाणपत्य उत्तम वैदिक, नैयायिक, कर्मकांडी. कांहीं इतर जमातींचे लोक पण त्याच्याबरोबर असत. एक दैवज्ञ सुवर्णकार उत्तम मूर्ति बनवून द्यावयाचा व इतर चित्रकार पण असत. गणपत्यथर्वशीर्ष वैदिक स्वरासुद्धां कांहींजण म्हणून दाखवीत प्रचारांतल्या अथर्वशीर्षांत स्वर नाहींत, हे आपल्याला ठाऊक

आहे तुकाराम महाराज व एक गाणपत्य यांची भेट झाल्याच्या कथा आहेतच. नामदेवाचे तिलकुंद चतुर्थीचें कृष्णाख्यान, मुक्तेश्वराचें कुलदैवत, आंबेगांव येथें रात्रींतून शिवाजी महाराजांनीं पूजिलेली गणेशमूर्ति व मंदिर, थोरले माधवराव यांचें थेऊर येथील वास्तव्य, हीं सारी गणेशपूजेची उदाहरणें होत. मग ग्रामस्थसुद्धां या गाणपत्यांच्या आगमनानंतर एकत्र बसून, "राव, या वर्षी सोंड फिरवायचीच!" असा आग्रह धरून बसत आणि गणपतीच्या मुखवट्यावरील धूळ झटकून साऱ्या गावात सोंगाची जुळवा-जुळव सुरू व्हायची, हा संकेत अलिखित असावयाचा. 'गण्याचा' मुक्काम चतुर्थीच्या आंत हलावयाचा आणि गांवांतून गणेश-शारदेची सोंगें परंपरेनें ज्या घराण्यांत आहेत, त्यांना पाटील-ग्रामजोशाकडून अक्षत पाठवावयाची. तिथिनिश्चय होताच, गांवांत एक खांब उभारून त्याला मांगल्य पेंढी बांधून या वर्षी बोहाडा ठरला, असें एकमुखानें निश्चित व्हावयाचें. गांवोगांव निमन्त्रणें पाठवून नामांकित रिंगाडे, नाचणारे, वादक, कुशीलव म्हणजे नकलाकार, प्लवक म्हणजे भोरपी किंवा बहुरूपी, सौभिक नांवाचे ऐंद्रजालिक गारुडी, याशिवाय वाग्जीवक किंवा कथाकथक ही सर्व मंडळी आपआपले गुण व नांवलौकिक वाढवतील या हेतूनें बोलावली जातात. पण जग विविध प्रकृतींच्या माणसांनीं भरलेलें असल्यामुळें ज्याना आपले मनोगत सिद्ध करावयाचे असतें, असे लोक डोळ्यात तेल घालून जागें राहातात. आपलें काम पुरें व्हावें, यासाठीं ते या नावाज-लेल्या मूर्ति चोरून नेतात. एखाद्या बाईचा मुलगा परांगदा झालेला असतो. ती बाई या चौर्य-मूर्तीला देतां येतील तितक्या अचकट विचकट शिव्या देते. ही मूर्ति नंतर साखरेंत बंद करून ठेवण्यात येते कदाचित मुलगा परत आलाच तर पुन्हां मूर्तीची बंधन–मुक्तता होते, व योग्य ठिकाणीं वाजतगाजत समारंभानें मूर्ति नेण्यांत येते. मात्र सध्या कुणीहि बेकार मुलाच्या नोकरीसाठीं असले उपाय करू नयेत! समर्थांनी गळ्या-पर्यंत देव बुडवून ठेवल्याचा व नंतर अपार लेकुरें झाल्याचा दृष्टांत देताना

असे कितीतरी देव सांगितले आहेत. हे देव नवसाला पावल्याचीं पण बरींच उदाहरणें आहेत.

बोहाड्यात प्रथम गणपति मिरविण्याची प्रथा असून त्यानंतर शारदा मिरवितात काहीं सोंगे परपरेनें त्या त्या घराकडे वांटलेलीं असतात. बोहाड्याचा सर्व थाट जवळजवळ रंगभूमीच म्हणाना. या सोंगांच्या नर्तन-पद्धति सर्वसाधारण ठरवून दिलेल्याच आहेत. त्या वेळीं वाजंत्र्यांनीं लावा-वयाचा लय, सूर ही सौम्य व उत्साहजनक असून शारदेचें काम तर कितीदा बालमंडळींकडून केलें जातें. साहित्य असल्यावर त्याचा उपयोग गावकरी कौशल्यानें करतात. या गावी श्रीमंतानीं हौसेखातर मोर पाळलेले असत. जाळीच्या पेटींत मोर कोंडून वर शारदेचें नृत्य पाहावयास मिळे आणि हा सर्व सरजाम गाड्यांतून मिरवत जायचा. " बामनाघरीं लिव्हणं आणि मागाघरीं गाण, " ही जुनी म्हण बोहाड्यांत खरी होते सारी रात्र उजाडून जाईपर्यंत वाजंत्रीं फुंकणें अत्यंत त्रासदायक व उरफोडीचें काम आहे. गणपतीसाठी ग्रामीण कवींनीं जुळवलेलें, " आला गणेश—गणपति सांवसुत । ' यासारखें गीत असून शारदेसाठीं, " बसून मोरावरी शारदा ब्रह्मयाची कुमरी । बसून मोरा० ॥ करकरा लवतीन् बाई करकरा लवती । थय थय थय नाचती मयुरगण, वीणा पुस्तक हाऽऽतीं । " या—सारख्या दोनचार ओळी म्हणत पुढें सोंगे मिरवून येतात पहिल्या दिवशीं अधिक सोंगें नसतात उलट या दिवशीं परगावच्या पाहुण्याच्या आगमनाकडे सर्वांचें लक्ष लागलेलें असतें. कित्येकदां सोंगाची संपादणी करणारे शास्त्री त्या गांवात नसल्यास पंचक्रोशींतून विद्वान् शास्त्री बोलावून आणतात. या बाहेरील शास्त्रीबुवाचा प्रवेश वेशीबाहेर ठरविलेला असतो. त्याना सामोरें जाण्यासाठीं तितक्याच तोलाचे ' महाब्राह्मण ' गावामधून तयार करण्यात येतात. असे हे तादळे ब्राह्मण जरी महापंडित नसले तरी त्यांना लावलेला ' महाब्राह्मण ' शब्द कुचेष्टादर्शक आहे. कारण निद्रा, शंख, मांस, यात्रा, ब्राह्मण यांना

'महा' जोडल्यास अर्थ कुत्सित व विपरीत होतो. व्रात्य पोरें ताग़ाची दाढी, आडवे गंध, पगडी, उपरणें, दोरखडाचें जानवें. दर्भमुष्टीऐवजीं शिराई किंवा संमार्जनीचे दोनचार फड काखोटीस मारून पंडिताचा आव आणून वेशीबाहेर मिरवत जातात. नाथांच्या भारुडावरून असें दिसतें की 'स्वाध्याय' विसरणाऱ्या ब्राह्मणाची ही संगति कानउघडणी असावी. दोघां पंडिताची गांठ होताच मोठा हशा पिकतो. नांवानें ब्राह्मण असलेले ग्रामस्थ लाजून चूर होतात व विनोदाच्या वातावरणात आतिथ्य-सत्कार पण साधला जातो. एकजण उच्च संस्कृत पद्यात ग्रामस्थांना आशीर्वचन म्हणून दाखवितो, तर सोंगातला ब्रह्मवंद अचकट विचकट ग्राम्य शिव्यांची सर्व भाषांतर्गत खिचडी शिजवून तिला अपभ्रष्ट फोडणी देतो. वेड्यावाकड्या मुद्रा दाखवून तो खूप हशा पिकवतो. अशा या सोंगास 'बम्मन' म्हणतात. विनोदमूर्तींना यात खूप वाव असतो. ही सारी रात्र कारागीर तर जागून काढतात. सोंगें दुरुस्त करणें, सजविणें, सफेती देणें, पेले बनविणें, टोप व मुकुट बसते करणे हीं अनेक कामें त्यांना कौशल्यानें करावीं लागतात. त्याचीं साधनें किती साधीं, पण कला मात्र उच्च दर्जाची. शिंपले व शंखचूर्ण, गेरु, मनशीळ, काजळी, हिंगूळ, शेंदूर, अभ्रकी चमक, संगजिरा, मीन्याचे पत्रे, हीं साधनें ते वापरतात. मुखवटा दिसावयास मोठा पण वजनास हलका व्हावा यासाठी लुकण कमवावें लागतें. त्यास कीड न लागावी म्हणून मेथ्या, मसाला, सर्पत्वचा, मोरचूद इ० पदार्थ कुटून घालतात. सोंगें करण्याचें कसब परंपरेनें सापडतें. कुंदेवाडी स्टेशनजवळ 'बय्यामामा' नांवाचे एक कारागीर हेच काम करीत. जुनीं चित्रें बनविण्यात त्यांचा लौकिक होता. 'सय्यद पिंपरी' या गांवीं त्यांचीं शे-दीडशे सोंगें मी बारकाईनें पाहून थक्क झालों. या सोंगातलीं कित्येक अपरिचित सोंगें, त्यांचीं नांवें, त्यांचें स्थान हा विषय व्यापक आहे. मला 'बरकतराव' आणि 'फकड्राव' हीं दोन सोंगें आढळलीं. या दोनाहि सोंगांकडे पाहून

एखादा रडतराउत सुद्धां आतडीं गोळा होईपर्यंत हंसेल—एक जाडा व दुसरा पातळ, एक अष्टवक्र तर दुसरा योग्य त्या हालचालीमुळें त्याला वेडावणारा ! याच ठिकाणीं मला दीर्घकाय रावण आढळला व तोहि गर्दभ-रथावर बसलेला ! रावणाचें वजन फक्त १०—१२ शेर. कारागिराची खुबी अशी कीं, दहा तोंडांचें लटांबर एका आडव्या रषत न आणतां ते गोलाकृतींतून बसवून वर टोप, मध्यें मनुष्य मान हलवणें, डोळे फिरवणें इ० सोयी सूत्रक्रीडेप्रमाणें केलेल्या असाव्यात. राक्षसांच्या सोंगास गावठी लोक 'रानकेस' म्हणतात. हीं सोंगें उमेदवाराचीं. हल्लीं सोंगांचें बळाबळ नसल्यामुळें संमिश्र खिचडी पाहावयास मिळते, तर पूर्वी दशावतार, रामलीला, कृष्णलीला इ० पंचकें असत. पेठ, डांग या आदिवासी विभागातसुद्धां सोंगे लोकप्रिय होतात व गमत तर अशी कीं, त्यांच्यांतला एक ठाकूर (ठाकेर) रावणाच्या सोंगाला मोठ्या ऐटींत विचारतो, "संगा सरकारा ! रावणा ! रावणा ! अरे, तुझा किती आवणा ? ज्या रावणाला आपण चतुर्दशभुवनपति. चौदा चौकट्याचा राजा म्हणतो, तो वैश्रवणभ्राता रावण या विपन्न प्रदेशांतसुद्धां लंकाधीश म्हणून त्या मानानें श्रीमंत गणला जातो. पण तो रावण आपली खरी श्रीमती दाखवून ऐटीनें उत्तर देतो, "अरे, मी तर तीन आवणा नाहीतर पांच आवणा !" बिचाऱ्याची शालिधान्यें ५।७ आवणांतून—खाचरांतून सामावलेलीं असतात. तो ते खरें सांगतो अन सोंगाड्या म्हणतो "ना मग तू तर लई मोठा !" सपन्नतासुद्धां बोहाड्यातूनच व्यक्त होत असे. चांदोरीजवळचे साइखेटक (स्वामीखेटक) साइखेडे ज्ञानेश्वरींत सूत्रक्रीडेकरिता प्रसिद्ध आहे. तेथील ब्रह्मपुरींत चौदा नामांकित विद्वानांचीं घराणीं 'निधिनिवास' नेवासें येथून यावनी कालांत येथें आली असावींत असें भागवताच्या चूर्णिकावरून दिसतें. या गांवी तर मालगुजर संपन्न असत. सोंगें मिरवतांना शाल्, पैठण्या, जडजवाहीर अंगावर घालीत. नासिक येथें वीर निघत. त्यासाठीं कासार, तेली, कलाल या जमातींतील धनिक मंडळी पण दागिने चढवून नाचत. समाजाची नीतिमत्ता सावकर

असण्याइतकी शुद्ध असल्यामुळें दागिन्याचे सर तुटले, निखळले किंवा हरवले तरी गहाळ होत नसत. आता सोंगांची संपादणी—प्राक्कथनपद्धति हें एक कौशलकर्म आहे. विद्वान श्रोत्रिय किंवा पढिक पंडित अत्यंत सोप्या प्रभावी भाषेंत जनताभिमुख होऊन सर्वांना समजेल,रुचेल आणि मानवेल अशा पद्धतीने सोंगाची संपादणी करीत असतात. हे शास्त्री नुसत वाक्पंडित असतात. ते आपल्याच अध्ययनांत नि विद्वत्तेंत चूर असतात हें म्हणणें एकदेशीय ठरतें. परंपरेनें संपादनकौशल्य त्याच्या घराण्यांत आढळतें. ते समयज्ञ व लोकाभिमुख असतात. अवघड शास्त्रें नि पोथ्या बुडाळून ते प्रसंग सौकर्यानें समजून सांगतात. हर्षाच्या वेळी जातक कथांतलीं सोंगें निघत व तींहि वहानांवरून मिरवत. पण रात्र थोडी अन् सोंगें फार. अशीं देवादिकांचीं सोंगें मध्यरात्रीपर्यंत निघत. तोंवर संपादणी चालू. अचकट विचकट अश्लील सोंगें, नकला, विडंबन हीं सुरूं होण्यापूर्वींच शास्त्रीबुवा निघून जात. अशा निर्गमनानंतर मर्यादा सांभाळून इतरेजनांसाठीं क्षुल्लक सोंगें निघावयाचीं, असा संकेत असतो. शेट, सावकार, पंडित, सभ्यजन हळूहळू लुप्त ग्रहाप्रमाणें आपापल्या घरी निघून जात. अत्यंत नावाजलेलीं सोंगें निवडून शेवटच्या दिवशीं मात्र सर्वांची निवडक उजळणी व संभावना व्हायची, इतमामाप्रमाणें सोनतोडे, इनाम वाटला जायचा तो शेवटच्या दिवशीं !

आता संपादणीचा नमुना ऐकू. शास्त्रीबुवा किंवा वासुकाका उभे राहून हात जोडतांच जिकडेतिकडे सामसूम. काका म्हणजे पिकलें पान पण आवाजांत माधुर्य, शब्दसंपदेंत चातुर्य, कमालीचें सौकर्य दर्शवितें. पुराणविषयांचीं कथानकें, लोकोत्तर देवतांचीं चरित्रें घरगुती प्रसंगांवर रचून सांगताना मूळ विषयाशीं विसंगति होऊं न देण्याचें कौशल्य परंपरेनें व नित्य सहवासानें त्यांना साधतें. प्रसंगावधान आणि मार्मिकपणाचें परीक्षण यांत ते अनुभवी मुरब्बी असतात. दशावतार असल्यास एखादा श्लोक म्हणतील. कृष्णलीलेंत गीतगोविंद, भागवत यांची समश्लोकी म्हणतील.

सगुण वर्णनात भगवताच्या लीला ते सांगतील. देवतांचा विनोद सुभाषिता-मधून रंगवतील. मोठमोठे दशग्रथी सुद्धां माना डोलवतील असा काकांचा थाट. " हऽऽ ! मंडळींनो, हे कोण आले ? गणेश नि शारदा. गणेश म्हणजे कलानिधि. तशीच शारदा. बोला गणपती बाप्पाकी—जय " यानंतर " हं ! पण ह्या कोण ? महादेवी पार्वती. पूर्वजन्मातली दक्षकन्या माहेश्वरी; आज माहेरीं जाण्याच्या तयारीत आहेत आता दोघांचा संवाद ऐका. महादेव विचारतात, ' काय सती ! आज पदर सावरला आहेस. कपाळीं चंद्ररेखा बरीच खुलवली आहेस कुठं जायचं तर नाहींना ? ' ' हो, मी निघाले माहेराला. ' ' तिथें काय आहे ? ' ' माझ्या वडिलांनीं महामख ठरविला. अन् मी निघालें कुंडमंडप शोभा पहायला. ' ' अग पण वेडे, जावई तर राहो, पण तुला दोन बोटाची चिठ्ठीतरी पाठवली का ? बोलावल्यावाचून जावें का ? ' ' नाहीं. बोलावणं करायला विसरले असतील. जाऊंद्या. साती मुलींचा प्रपंच जंजाळ. गर्दींत विसर पडला असेल. ' ' अग, पण माय कशी विसरली ? ' सती फणकाऱ्यानें म्हणते, ' मला बोला ! माझ्या आईबापाचा उद्धार कशाला ? अहो, तुम्हाला काय ? तुम्ही जोगी ! माझे वडील विधिनियमात, शास्त्रचर्चेत, कर्मकांडात गुतले असतील. त्यांच्या आहुत्या, अवदानें, यज्ञसभार यावर खल चालला असेल, भृगु महर्षि यज्ञांगातलीं विधानें निर्दोष करीत असतील. सपत्नीक नांदीपूजन, मातृकापूजन, अरिष्टशांति हीं तर श्रवणपूर्ण कालांतच आटोपलीं असतील थोडा उसासा टाकायला आईला वेळ मिळाला असेल, जांवई आणि लेकी यांच्या व नातवंडाच्या गराड्यात ती मेटाकुटीस आली असेल, सपत्नीक सप्तर्षि, राजर्षि, देवप्रमुख यांची गर्दी; सुना, लेकी, पाहुणे, व्याही, विहिणी यांची विचारपूस तिला एकटीलाच करावयाची. जीव आहे कीं जिवडा, जरा विचार करा ! तुम्हाला काय आह्या माणसाबद्दल प्रेम वाटणार तें दिसतच आहे अहो ! तुम्ही बोलून— चालून संन्यासी, गांजेकस नि गोसावी ! जरा लोकाचार पहा. लोक हंसतील, बाहेर तोंड काढूं देणार नाहींत !"

"सती ! जरा शांत हो. निस्पृह माणसांची हीच गत. मानधन पुरुषांना त्रैलोक वंदनीय ठरविलें. माझी साधना इतरांसारखी नाहीं म्हणून रागाऊं नकोस."

आ हा हा हा ! अहो, पुरे झाले कोरडें तत्त्वज्ञान. आता माझे कान किटलेत तें ऐकून. आपला वामन, बालगणेश परशुराम हे सारे नेहमीं म्हणतात—

'नमस्कार-सहस्रेषु शाकपत्रं न लभ्यते' राहा तुम्हीच घरीं. मी एकटीच जाणार."

"सती ! नवऱ्याशिवाय बायकांनीं एकटेच लग्नाला यात्रेला प्रवासाला जाऊं नये असें शास्त्र आहे. ऐक बर. फुकट पस्तावशील."

सती सवाल करते, "अहो ! म्हटलं जरा विचार करा. आपण कोणाकडे न गेल्यास आपल्याकडे कुत्रें तरी येईल का ? तुम्हांला काय पुढचा विचार आहे थोडाच. समजा, उद्यां माझ्या गणेश बाळाची मुंज ठरली, तर कोण येईल तुमच्या दारांत ? लोक फिदीफिदी हंसतील. मामा मागें नाहीं तर मुंजी कशी लागणार ? मुंजी न केल्यास मधुकरी तरी कोण देणार ? तुमचे हे खादाड गण का मला माहीत नाहीत ? मी अन्नपूर्णा म्हणून पुरून उरतें तुमच्या घरांत. पुरुषांना काय त्याचं ? बायकांना पुढचं-मागचं सगळं पहावयाचं असतं आतां तरी प्रकाश पडला का ? कीं अजून समाधीच लावली आहे."

शंकर म्हणतात, "बरं तर मग, आतां पूर्णाहुतीच्या आंत तरी वेळेवर जा. हीं घे नागवल्यें. ह्या घे नागमूर्वी. लाव ही चंद्रकला मस्तकावर. असूं दे जवळ व्याघ्रांबर"

पुन्हां पार्वतीची कुरकुर—"काय मेलं जिणं ! फुटका मणी सुद्धां अंगावर नाहीं. कुबेर भावजी दागिने देत होते तेव्हां यांनीं डोळे वटारले. आतां यांना काय ? विटंबना माझी !"

" देवी ! जाणारच असलीस तर बस त्या नंदिकेश्वरावर. त्याचा पुष्कळ उपयोग होईल तुला. "

" अहा रे देवा ! थिल्लर नंदीवरून माझी मिरवणूक निघावी ना ? माझ्या बहिणी कोणी ऐरावतावर, कोणी रथांत, कुणी मेणापालख्यात, वांद्यांच्या जयघोषांत जातील. अन् मी मात्र नंदीवरून नग्नशिवगणांसह, शंख किटाळीं ऐकत जावेना ? ठीक आहे. महादेवापुढें हे सर्व तुच्छ आहे." निरोप घेऊन सति निघाली. पहा तिच्या नंदीकेश्वराची ऐट. हा दाणेदार बैल गुंजाळांचा आहे. करा या वृषभेश्वराला नमस्कार. बायांनो ! ओवाळा सतीला.

लोकहो ! सती माहेरी आली. आपल्या बहिणींशीं बोलूं लागली पण तिला कोण विचारतो ? शंकरानी सर्वांसमक्ष दक्षाचें शिंग फोडल्यामुळें वड्याचें तेल वांग्यावर निघून सर्वांनीं मानी सतीचा निरनिराळ्या रीतीनें अपमान केला. सती भावजयींना भेटली. तिची विटंबना झाली. जाऊं द्या भावजया चिंधीसारख्या. आपणाला रत्नाशीं काम. भाऊरायाची भेट घेण्यास ती निघाली. सगळे आपल्याच तोऱ्यात. बहिणीचें लक्ष भावापाशीं आणि भावांचें लक्ष लुंग्यासुंग्या लोकांच्या मोतदारापाशीं— आपले भाऊ मोतदार, नोकर, चपराशी, खरारेवाले यांचा समाचार घेतात अन् माझ्याशीं एक शब्दही नाहीं ? बाळ नंदिकेश्वरा, तुला भूक लागली कारे. तुला आज चाल तरी किती पडली— शेवटी ती गेली महामंडल वेदीजवळ. आहुत्या बाप देताहेत. पण अतिशय क्षुद्र दैवतांना. शंकराला एकहि आहुति द्यायची नाही, असें भृगूनें म्हटलें व दक्ष ऐटींत बोलले ! त्यां अपवित्राचें, आचारशून्यांचें नाव सुद्धां काढूं नका. आतां मात्र सती संतापली. चंडीच ती. चंडीस्त्वत्यंतकोपना. चंडीचे डोळे लाल झालेले. ती पावित्र्यांत उभी राहून सर्वांची निर्भर्त्सना करूं लागली. अरुंधती सासूबाई म्हणाल्या, 'सुनबाई ! जरा शांत हो. बापानें समंत्रक लाखोली मोजली. आईचें आंतडें तुटुन क्षीण आवाजांत ती म्हणाली, 'कार्टे ! तुला

तुला सारं माहीत असून तूं तेथें आलीस तरी कशाला. यांचा स्वभाव तुला नाहीं का माहीत ?' सती म्हणाली, 'आई ! विचारतेस म्हणून सांगतें ऐक. मी आलें तुमच्या द्वादशसत्रांत पूर्णाहुति देण्याला.' एका क्षणात सतीनें धगधगलेल्या अग्निज्वालांत आपलें सुवर्ण तावून सुलाखन घेतलें. जिकडे तिकडे हाहा:कार ! नदीनें तर काय प्रलय केला. त्यानें भृगूलाच शिंगावर घेतलें. गणांनीं मंडप पेटवून दिला. पूर्णाहुतींत नसतें विघ्न आलें म्हणून मत्सरी इंद्राला आनंद झाला.

इतकें होईपर्यंत ११ वाजतात. १२ शिवाय वीरभद्राला रंग नाहीं. म्हणून बाबुकाका ग्रामीण कवी–शाहीर–गोंधळी–होलार–यांना सतीचें गाणें म्हणावयास सांगतील. वादकाचे हाताला तर वारें बाधलें नाहींना ' अशा रीतीनें कडकडाट होऊन कलाकार लोक गोड सुरावर–लावणीच्या छंदांत गाणें गातात ( सदरचें गीत माझ्या वडिलांनीं पाठ केलें होतें, त्यात थोडा बदल करून )

' मी जातें म्हणुनीं ' सती निघाली ' साभाळावें घर ! ।'
अनिकेत शिवाला शब्द बोचले, ' कोप तुझा आवरऽऽचंडी ।।ध्रु०।।

मी तुला सांगतों व्यवहारी बोलणं–व्यवहारी वागणं ।
ना कुठेंच जावें अपमाना घेऊन ।
घरिं दारिं माहेरीं बोलावल्यावाचुन ।
इतुक्यावर ध्यावें तुझेंच तूं समजुन ।। ध्रु० ।। १

' मी लहान तोंडीं मोठा घेतें घास ।
व्यवहारिपणाचा तुम्हास कसला फास ।
अंगास फासुनी राख आहांत उदास ।
माय बाप माझे मायाबंधन त्यास ।। ध्रु० ।। २

जमतील ऋषीश्वर अरुंधति येइन ।
भृगु, नारद, तुंबर येतिल चतुरानन ।
स्वर्गंगा तीर्थे अपार मुनीवर जन ।
वालखिल्य येतिल मेरू ओलांडून ॥ ध्रु० ॥ ३

( मंडळी, साठ सहस्र बुटके इतक्या लांब जाणार ! )

सुरकन्या जमतिल माझ्या सांगातिणी ।
जरतारी शालू अंगावर पैठणी ।
नवनिधी—तारका शुक्राची चांदणी ।
मणि-मध्य नथेचा घालोनी गवसणी—
त्या दक्षकन्यका जमतिल साती जणी ॥ ध्रु० ॥ ४

[ भावाचें तेज शुक्र लोलकाप्रमाणें व सात भगिनींचें मंडळ ]

विधि-काल-नियम किति खडतर सांभाळुन ।
प्राक्संवत्सर सत्रान्त मौन पाळुन ।
कोपिष्ट ऋषीचें मधुपर्क पूजन ।
मम वृद्ध पित्याच्या विस्मृतिचें लक्षण ।
राहिलें द्यावया—चुकून आमंत्रण ॥ ध्रु० ॥ ५

वात्सल्य प्रेमरस वृद्धा माझी जननी ।
पळि घालुन दारीं शिणलेल्या नयनांनीं ।
निंबलोण उतरिल दहिभाताच्या द्रोणीं ।
हा अपूर्व उत्सव शेवटचा समजुनी ।
किति दिवसानंतर भेटतील मज भगिनी ॥' ध्रु० ॥ ६

' तो यज्ञ कशाचा ? दांभिकतेची खूण ।
हा कर्मठतेचा डंका घे समजून ।
या विधिवादांतुन संपत्ती—दर्शन ।
मज मिळो स्वर्गफल शतक्रतू म्हणवुन ।
यज्ञांश मिळवा प्रजापती लागुन ॥' मी जातें० ॥ ७ ॥

यापुढें बराच भाग असून तोहि अपूर्ण आहे प्रसंग वीरभद्रोदय-चंपूंतून घेतला असावा. हा चपू शोधून मिळाला नाहीं. असो. अजूनहि अर्धा तास अवकाश असल्यामुळें वासुकाका उभे राहून सांगू लागले—

"लोकहो! नंदीनें गोंधळ केला. त्या शृंगाग्रावर फाडून टाकलेल्या धर्मध्वजाचीं लक्तरें लपेटून बसलेलीं दिसली आणि शकरानें त्याचा अर्थ समजून घेतला. ते संतापले. डोक्यात राख घालताच जटाप्रदेशातले वीरभद्र पुढे सरसावले. नंदी धर्मध्वज आणि शंकर क्रतुध्वंसी, वीरभद्र विध्वंसक म्हणून प्रसिद्ध झाले. जरा दम मारा. आतां वीरभद्राला शंकराकडुन शस्त्रास्त्रें मिळतील, पण तोंवर एक प्रसंग ऐका. आपली चद्रपुरी—पेठ व्यापारी—सोंग घेणारा आबा रंगारी मी तर लहान पोर असेल आबा दिसायला राक्षसासारखा उंचापुरा व दमदार, सोंगासाठीं भाडला घेईल तर ईरभद्रंच. परगांवच्या पाहुण्याचें काय करावें हा प्रश्न लक्षांत न घेता तो अभद्र बोलों लागला संभा इचाळे व येशा थाटशृंगार जातीनें महार. पण रग लावणारे कसबी. इतक्यांत राखसावडे मध्यें बोलला — 'ए आबा ! द्वाडवाणी कशाला बोलतोस. देवाला शिव्या देतोस ? इच्चु झोंबतील तुझ्या थोबाडाला जरा माणसांत ये ' आबा सतापला—'अरे जाय ए ढोल्या ! मोठ्या बामणावानीं लागला शराप द्यायला शराब पिऊन देवापुढें वाजवताना तुझ त्वाड कसं फुटत नाहीं ? संभा बोलून बाका ' अरे नाचकामाबरोबर वाजून दाखव. तोंडीं फेस येतो अन् वाजवणारा ओलाचिंब होऊन घाम पुशीत आडवा पडतो. तुला काय त्यातल ठावं ? संक्राचार्यांच्या पालखीचे भोइबी पित्यात अन् मंग वझ नेत्यात. त्याना कोणी बोलल तर सक्रोबाना पायीं जावं लागतं. आज आम्ही प्यालों नाहीं. देवबाप्पांनीं उपास सागितला व आम्ही समद्या म्हारवाड्यानें उपास धरला. तुला काय त्यांतलं ठावं ! तुमच्या लोकावाणी म्हार चळले नाहींत अजून.' शेवटीं तीर्थरूपांनीं तोड काढली. पाहुणा झाला दक्ष प्रजापति. तो जानोरीहून नामांकित म्हणून बोलावला होता. काय त्याना रुबाब ! त्याला समोर पहाताच माणसें घाबरून तीन

पावलें मागें सरकत. आबा वीरभद्र. त्याचा टोप तीन मजले उतरून खालीं आणला. मुखवटा उत्तम रंगवला. घाई गर्दीत डोळे कवडी ठसकेदार बसवली. शेंदरी मीन्याची जीभ कातरून बसवली. ती ळळांळळा जिभल्या चाटणारी ! अभ्रकाचे विविध पेले, गोपुरें पुढें आणि सहस्त्रार्तिक्यें आजूबाजूस. वर छत्र आणि टांगतें हलतें झुंबर. २० शेराचा तो टोप. अष्टोत्तरशत दिव्यांचा खटाटोप. प्रभावळीस बिलोरी आरसे आणि तितकींच फिरतीं भिरभिरें दिव्याच्या उष्णतेवर फिरत व घुंगराचा त्यामुळें आवाज होई. आबा सपाटून भाग प्यालेला. पाहुणा नामा गोंधळी. ऐटदार पुरुष. भरदार पाउलं. ऐनकबाज नजर. आणि सर्वांत रुबाबदार. असा रंग कधींच जमला नसेल

याप्रमाणें पूर्वपश्चिम जमल्यावर कडाडून टाळी पडली. टिपरी झडून पवित्रें फिरूं लागलीं दिवे पेटल्यावर मागचे पत्रे तापले. प्रभावळीचा टोप पण तापून लाल झाला मुखवटा पक्का करकचून आवळून वीर-भद्राच्या दोन्ही हातांत आयुधें. पाठीमागें नदी, असा तो थाट होता.

पण आतल्या बाजूला प्रसूतिगृहात बाळत होण्यासाठीं विंचवाची एक मादी आली होती. बाळतिणीला प्रमाणाबाहेर शेक लागताच ती सप्तपुत्रासह वीरभद्राच्या भालप्रदेशाजवळ आली. माय शिकवील तशा नाग्या मुलें मारूं लागलीं. आबाला तर भाग चढली. त्या रात्रीं वीरभद्र असा ठेक्यावर नाचला कीं लोक टाळीच देत राहिले. आबाला वाटलें हा भागेचा प्रताप. आतां मात्र दम धरवेना. वाजंत्र्याचे दोन ताफे त्यानें दमविले, हें काय थोडें झालें ? शेवटीं दक्षयुद्धापूर्वींच वीरभद्र धाडकन् आदळला. मुकूट टोप सोडला. आंतून भराभरा वृश्चिकसेना बाहेर आली. सर्वांना कौतुकच वाटलें. " बघ, येशा म्हाराची वाणीसुद्धा कधी कधीं बामनावाणी खरी होते." हें वाक्य ऐकताच खूप हशा पिकला !!!

चला आतां वेळ झाली. इतक्यांत एक वीरशैव, लिंगाइत चोपदाराचा पोषाख करून जयघोष करतो, ' खडे खडे वीरभद्र !'

अनुक्रम २३०६८ क्रमांक ९२०० नों. दि. २०/३/६२

शंकराचें नाट्य सुद्धां यानाच उत्तम साधतें. आमच्या गांवचे आप्पा तर या सोंगात जिवंतपणा ओतीत. धाडस अवर्णनीय. सर्पमाळा, कारंजाची गंगा. जाड घुंगरे, जटाजूट व प्रशस्त देहयष्टि. पाउल टाकणें, पदविन्यास करणें, विविध नर्तनपद्धतींतून ते विद्याशंकराची कलोपासना करीत आमचे गांवीं तांडव-शंकर चितारणाऱ्या लक्ष्मण चिताऱ्यांसमोर ते उभें राहिले व हुबेहुब चित्र रेखाटलें गेले.''

ग्रामीण जीवनात चैतन्य ओतण्याचें सामर्थ्य या बोहाड्यांत आहे आबालवृद्धांना, स्त्रीपुरुषाना करमणुकीबरोबरच ज्ञानदान देण्यास हे बोहाडे समर्थ आहेत ग्रामीण कलांना व कलावंताना बोहाडे उत्तेजन देतात. या दृष्टीनें बोहाडे ग्रामीण जीवनास आजहि परिपुष्ट करूं शकतात. ग्रामीण संस्कृतीचें जवळून दर्शन या बोहाड्याच्या मार्फत होत असल्यानें त्याचा या दृष्टीनें अभ्यास होणें जरूर आहे.

# मुलीच्या वाङ्निश्चय ते लग्नापर्यंतचे खानदेशांतील विधि

[ संग्राहक—श्री दा. गो बोरसे ]

[ १ ] साखरपुडा. [ २ ] चोळीपरकर किंवा फडकीं. [ ३ ] कुंकू मागणं. [ ४ ] सायखेडा चढवनं. [ ५ ] हळद. [ ६ ] तेलवण. [ ७ ] दाभेंडा. [ ८ ] खंत्याखंती. [ ९ ] अष्टवर्ग [ १० ] दिवळ्या बुधल्या. [ ११ ] बिंदी. [ १२ ] शेवंती. [ १३ ] वरधांव. [ १४ ] लग्न; राजभेट.* माडव परतणी. [ १५ ] वरात. [ १६ ] गोंधळ+ किंवा सत्यनारायण. [ १७ ] वाळणें

* कांहीं ठिकाणीं यांस मोगल म्हणतात.

+ गोंधळ लग्नाच्या अगोदरहि करतात.

## खानदेशी उखाणे ( कूट व नांवाचे )

[ १ ] आंथराले नरम, पंघराले गरम, जो नेईल त्याचे फुटेल करम. [ गोधडी ]

[ २ ] आगडूचा भाऊ दगडू चाले दुडुदुडु, खाये कुडुकुडु. [ पाटा वरवंटा ]

[ ३ ] तरुणपणांत हालम डोलम, म्हातारपणीं लावलें कुंकू, बाळपणाचा मित्र म्हणाला, शाबास ओ काकू. [ मिरची ]

[ ४ ] नवरीच्या वऱ्हाडणी वडारणींचा बाजार, नवरीसाठीं रुपये मोजले हजार.

[ २ ] फूल चाफ्याचें, पान केळीचें, फळ आंब्याचें, झाड तुळशीचें, माहेर आईचें, सासर पतीचें, दारापुढें दरवळला दवणा, × × × × चें नांव घेतें, त्यांची नाजुक मोहना

[ ३ ] चंद्राच्या भोंवतीं चांदण्याची गडबड, मोहनेभोंवतीं करवलींची बडबड.

[ ४ ] नको सोने, नको चांदी, नको हिरेमोतीं, जन्मोजन्मीं लाभो मला × × × पती.

[ ५ ] इकडून डोंगर, तिकडून डोंगर, मधें भालू भुंकतंऽ, × × × × पाहून माझें डोकें उठतंऽ.

[ ६ ] गांवाच्या आखाडींत सोंगांचा दणका, रामाचें रूप पाहते त्यांची जानका.

[ ७ ] दिवस गेला कसाबसा, संपलें कामधाम, रामाच्या सेवेनें रात्रीं जिवाला आराम.

[ ८ ] शेतीवाडीचा पसारा घरांत नाहीं कुणी, शेवाळ्यांची मोहना परणून आणली गुणी

[ ९ ] लाखांचा कारभार हातात नोटांचा पुडगा, मोहनेच्या कमरेला किल्ल्याचा जुडगा

[ १० ] धरणगांवच्या पेढीवर शंभरसाठ आसामी आले, ×××× शेठ त्याच्याशीं बोलून शिणले.

● ● ●

REFBK-0009415